# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

एम. ए. भाग–२ : राज्यशास्त्र

# पाश्चात्य राजकीय विचार

## (Western Political Thought)

**सत्र ४ : पेपर DSC-8**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२३–२४ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

**प्रथमावृत्ती :** २०२२

**सुधारित आवृत्ती :** २०२३

एम. ए. (राज्यशास्त्र) भाग-२ पेपर DSC-8 (आवश्यक)

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ३००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-92887-34-5

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


■ सल्लागार समिति ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**■ अभ्यासमंडळ : राज्यशास्त्र ■**

अध्यक्ष - **डॉ. रविंद्र पांडुरंग भणगे**
राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. प्रकाश रामचंद्र पवार**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. अरुण मारुतीराव चव्हाण**
  भोगावती महाविद्यालय, कुरुकली, जि. कोल्हापूर
- **डॉ. शिरीषकुमार धोंडिराम पवार**
  बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, ता. कराड,
  जि. सातारा
- **डॉ. सचिन महादेव पाटील**
  श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय,
  उरूण-इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. विक्रमराव एन. पाटील**
  शंकरराव जगताप जगताप आर्टस कॉलेज, वाघोली,
  जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मेघा संजय पाटील**
  कै. मालती व. पाटील कन्या महाविद्यालय,
  उरूण-इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. संतोष केशव खडसे**
  कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण-इस्लामपूर,
  ता. वाळवा, जि. सांगली
- **डॉ. श्रद्धा विनोद कोठावळे**
  सहकारभूषण मा. एस. के. पाटील कॉलेज, कुरुंदवाड,
  ता. शिरोळ, जि. कोल्हापूर
- **डॉ. राहुल दत्ता मांडणीकर**
  श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, २९६८, 'सी',
  दसरा चौक, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. बाळ अनंत कांबळे**
  धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स, सातारा
- **डॉ. वासंती प्रतापचंद्र रासम**
  घरोंदा ३८४/३८५ आर. के. नगर सोसायटी नं. ५,
  मोरेवाडी, कोल्हापूर
- **डॉ. अनिल देवगौडा पाटील**
  आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. सिकंदर आप्पासाहेब जमादार**
  राजहंस हौसिंग कार्पोरेशन प्लॉट नं. ०९, विजय नगर,
  इस्ट सांगली मिरज रोड, सांगली
- **डॉ. रमेश दिनकर डुबल**
  किसन वीर महाविद्यालय वाई, जि. सातारा

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून व्यक्तीगत आणि भौतिक परिस्थितीने दूर गेलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात येण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' या शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूरशिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

हे पुस्तक एम. ए. भाग दोन च्या राज्यशास्त्र विषयाच्या आवश्यक पेपर क्रमांक DSC-8 सत्र चार साठी 'पाश्चात्त्य राजकीय विचार' हे विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

पाश्चात्त्य राजकीय विचार यामध्ये पाश्चिमात्त्य राजकीय विचारवंत, आधुनिक राजकीय विचार-१, आधुनिक राजकीय विचार-२, मार्क्स आणि मार्क्सवादी राजकीय विचार या घटकांचा विस्ताराने अभ्यास करणार आहोत.

या पुस्तक निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. रविंद्र भणगे, राज्यशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ मधील प्राध्यापक डॉ. प्रकाश पवार, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य व सर्व लेखक यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्या सर्वांचे मी आभार मानते.

वरील सर्वांइतकेच महत्त्वाचे म्हणजे दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे दूरशिक्षण केंद्रातील सर्व सहकारी विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांचे सहकार्याबद्दल व तत्परतेबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार.


■ **संपादक** ■

**प्राचार्य डॉ. शिरीष पवार**
बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण,
ता. पाटण, जि. सातारा

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**पाश्चात्त्य राजकीय विचार**
**एम. ए. भाग–२ : राज्यशास्त्र आवश्यक पेपर**
DSC-8

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **प्रा. संध्या जयसिंग माने**<br>चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | १ |
| **श्री. सूर्यकांत लकप्पा गायकवाड**<br>सहाय्यक प्राध्यापक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | २, ४ |
| **प्रा. सुनिल गायकवाड**<br>आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा | ३ |
| **श्री. मनोज जाधव**<br>लालबहुद्दूर शास्त्री कॉलेज, सातारा | ४ |

**■ संपादक ■**

**प्राचार्य डॉ. शिरीष पवार**
बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण,
ता. पाटण, जि. सातारा

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | अभिजात पाश्चिमात्त्य राजकीय विचारवंत | १ |
| २. | आधुनिक राजकीय विचार–१ | २८ |
| ३. | आधुनिक राजकीय विचार–२ | ६७ |
| ४. | मार्क्स आणि मार्क्सवादी राजकीय विचार | ९६ |

## विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२३-२४ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

## घटक १

# अभिजात पाश्चिमात्य राजकीय विचार

**अ) सॉक्रिटीस–राजकीय आज्ञापान**

**ब) प्लेटो–आदर्श राज्य, तत्त्वज्ञ राजा आणि न्यायाची संकल्पना**

**क) ॲरिस्टॉटल – नागरिकत्व, राज्य आणि क्रांती**

**घटक संरचना**


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ सॉक्रिटीस यांच्या विचारांची पार्श्वभूमी आणि राजकीय आज्ञापालनाविषयी विचार

१.२.२ प्लेटो यांच्या विचारांची पार्श्वभूमी व त्याच्या आदर्श राज्य, तत्त्वज्ञ राजा व न्यायाची संकल्पना

१.२.३ ॲरिस्टॉटल – नागरिकत्व, राज्याच्या क्रांतीसंबंधीचे विचार

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.५ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके/संदर्भ ग्रंथ


## १.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अध्ययनानंतर आपणांस–

- राजकीय विचारांची सुरूवात सर्वप्रथम ग्रीकमध्ये झाली, यास अनुषंगून सॉक्रीटीस याच्या विचारांचीपार्श्वभूमी समजता येईल व त्याचे नागरिकांच्याविषयी असणारी राजकीय आज्ञापालनाविषयी विचार अभ्यासता येतील.
- प्लेटो यांच्या राजकीय विचाराची पार्श्वभूमी समजून घेता येईल व प्लेटोचे आदर्श राज्य, तत्त्वज्ञ राजा व त्याची न्यायाची संकल्पना समजून येईल.
- नागरिकत्वासाठी तसेच राज्य आणि क्रांतीविषयक विचार समजण्यास मदत होईल.

## १.१ प्रास्ताविक

राज्यशास्त्राचा अभ्यास करताना पाश्चिमात्य जगतात प्रथम प्लेटो, ॲरिस्टॉटल या ग्रीक विचारवंतापासून सुरुवात करावी लागते. ग्रीक राजकीय विचारांच्या अध्ययनाची जन्मभूमी समजली जाते. या ग्रीक राजकीय विचारांच्या इतिहासात सॉक्रिटीसने राजकारणाला श्रेष्ठत्वाच्या पातळीवर नेले, त्यामुळे सॉक्रिटीसच्या राजकीय विचारांचा अभ्यास करताना त्याने मांडलेल्या राजकीय विचारांमध्ये नागरिकांप्रती राजकीय आज्ञापालनाची भूमिका ही संकल्ना अभ्यासणे आवश्यक ठरते. तसेच प्लेटो हा सॉक्रिटीसचा शिष्य होता. प्लेटोने मांडलेली आदर्श राज्याची संकल्पना, तत्त्वज्ञ राज्यकर्ता कसा असावा त्याची न्यायविषयक संकल्पना काय होती हे अभ्यासणे महत्त्वाचे ठरते. प्लेटोचा शिष्य ॲरिस्टॉटल होता. ॲरिस्टॉटल यास 'राज्यशास्त्राचा जनक' म्हणून ओळखले जाते. यास अनुसरून ॲरिस्टॉटलने मांडलेले नागरिकत्व आणि राज्य व क्रांतीविषयक मांडलेले विचार अभ्यासणे गरजेचे ठरते.

एकूणच या घटकाच्या माध्यमातून ग्रीक राजकीय विचारांचा सॉक्रिटीस, प्लेटो, ॲरिस्टॉटल यांच्या विचारांच्या माध्यमातून मांडलेले राजकीय विचारांची भूमिका कशा प्रकारची आहे हे समजून येईल. राज्य, तत्त्वज्ञ, राज्यकर्ता, नागरिक, नागरिकांचे आज्ञापालन, न्याय आणि क्रांती अशा महत्त्वाच्या मुद्यांविषयी या तिघांनी मांडलेले विचार आपणांस अभ्यासता येतील.

## १.२ विषय विवेचन

पाश्चिमात्य जगाला राजकीय विचारांची फार दीर्घ आणि समृध्द परंपरा आहे. आजही सॉक्रिटिस प्लेटो, ॲरिस्टॉटल यासारख्या ग्रीक विचारवंताच्या विचारांचे महत्त्व कमी झालेले नाही. वास्तविक सॉक्रिटिसने ग्रंथलेखन केले नाही. पण त्यांचा शिष्य प्लेटो याने याने आपल्या लिखाणातून सॉक्रिटिसचे विचार संवाद रूपाने मांडले. राजकीय विचारांमध्ये सॉक्रिटिसने मांडलेल्या विचारांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्याने मांडलेल्या राजकीय विचारांमध्ये नागरिकांप्रती राजकीय आज्ञापालनाची भूमिका ही संकल्पना या प्रकरणामध्ये अभ्यासली आहे.

सॉक्रेटिसचा शिष्य प्लेटो, राजकीय विचारांचा अभ्यास करताना प्लेटोने आपल्या 'दि रिपब्लिक' या ग्रंथात आदर्श राज्यकर्ते, न्यायाची संकल्पना यांची मांडणी केली. प्लेटोने 'स्टेटमन' आणि 'लॉज' या ग्रंथात राजकीय विचारांची मांडणी केली आहे, पण प्लेटोचे विचार समजून घेताना प्रामुख्याने 'रिपब्लिक' या ग्रंथातीलच विचार पहावे लागतात. प्लेटोच्या आदर्श राज्य, राजा आणि न्यायविषयक विचारांची चर्चा या प्रकरणात करण्यात आली आहे.

सॉक्रेटिसचा शिष्य प्लेटो आणि प्लेटोचा शिष्य हा ॲरिस्टॉटल होता, ज्याला आपण 'राज्यशास्त्राचे जनक' म्हणून संबोधितो. ॲरिस्टॉटलने 'पॉलिटिक्स' हा ग्रंथ लिहिण्यापूर्वी १५८ राज्यघटनांचा तुलनात्मक अभ्यास केला होता. त्याने आपल्या या ग्रंथात नागरिकत्व, राज्य आणि क्रांती याविषयी सविस्तर मांडणी केली आहे. प्रस्तुत प्रकरणात ॲरिस्टॉटलच्या या राजकीय विचारांवर मांडणी करण्यात आली आहे.

एकूणच सॉक्रेटिस-प्लेटो-ॲरिस्टॉटल या गुरू शिष्यांनी मांडलेल्या राजकीय विचारांचा अभ्यास या प्रस्तुत प्रकरणांमध्ये करण्यात आलेला आहे.

### १.२.१ सॉक्रिटीस यांच्या विचारांची पार्श्वभूमी आणि राजकीय आज्ञापालनाविषयी विचार

❑ **सॉक्रिटीसचा अल्पपरिचय :-**

सॉक्रिटीसचा कालखंड इसवीसनपूर्व ४६९-३९९ हा आहे. त्याचा जन्म एका शिल्पी मूर्तीकाराच्या घरात झाला. त्याची आई फेनरिटी ही नर्स होती. तो ग्रीकमधील अथेन्स नगरराज्यात राहत असे. इसवीसनपूर्व पाचव्या शतकातील या विचारवंताने आपल्या विचाराने आपले नाव अजरामर केले. नागरिक या नात्याने राज्यातील विविध पदे त्याने ग्रहण केली. स्वतंत्र विचार व नैतिक धैर्य हे त्याचे वैशिष्ट्ये होते. रूढी व प्रथांवरील स्पष्ट विचार, सामान्य नैतिक कल्पनांचे खंडण, देवाला न मानणे, निर्भिडता, वक्तृत्व अशा विविध गुणांमुळे वैचारिक अभ्यासपूर्ण मांडणीमुळे त्याची दखल आजचे अभ्यासक घेताना दिसतात.

प्राचीन ग्रीसमध्ये अथेन्स हे नगरराज्य होते, त्या नगरराज्यात सोफिस्टांचा पंथ सॉक्रिटीसच्या कितीतरी आधीपासून उदय पावला होता. राजकारण, समाजकारण, तर्क आणि वक्तृत्त्वकला या विद्यांचा समावेश असलेले तत्त्वज्ञान सोफिस्ट पंथीयांनी मांडले हे त्यांचे योगदान म्हणावे लागेल. परंतु केवळ पुस्तकी शहाणपणामुळे ते प्रत्यक्ष व्यवहारात आत्मकेंद्री, स्वार्थी ठरले. सोफिस्टांनी माजविलेल्या अशा गोंधळजनक परिस्थितीमध्ये असलेल्या जनतेविषयी सॉक्रिटीसला काळजी वाटू लागली व त्याने बुध्दिचा निकष लावून शास्त्रीय पध्दतीने स्वीकारून बड्याबड्या नामवंत सोफिस्टांना तोंडघशी पाडले. आपल्या निर्भीड, धैर्यवान वृत्तीमुळे कायद्याविरुध्द कार्य करण्याचा आरोप त्याच्यावर लावण्यात आला. मृत्युदंड देण्यात आल्यानंतरही तो आपल्या सत्य सिध्दांतापासून विचलित झाला नाही. कायदा न मोडता, कायद्यानुसार दिलेली शिक्षा जरी ती अन्यायकारक असली तरी ती प्रचलित कायद्यानुसार असल्याचे मत व्यक्त करत राज्यसंस्था व कायद्याचे महत्त्व मान्य करत सॉक्रिटिसने हेमलॉक विषचा प्याला तोंडाला लावून मरण पत्करले.

❑ **सॉक्रिटीसच्या अभ्यासपध्दती :-**

कोणत्याही गोष्टीतील असत्यता व भ्रम दूर करून सत्याचे दर्शन घडविण्याचा त्याचा प्रयत्न होता. सॉक्रिटीसचीअभ्यासपध्दती तर्कशुध्द, वास्तववादी व संवादात्मक स्वरूपाची होती. संवादपध्दतीद्‌वारा तो समोरच्या माणसाला, विद्यार्थ्याला बोलते करत असे. प्रश्न पध्दतीचा अवलंब करून त्या प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून लोकांचा भ्रम दूर करून सत्य शोधून काढण्याचा मार्ग तो अवलंबत असे. विद्यार्थ्यांना प्रश्न विचारीत, त्यांच्या मेंदूला चालना देत, त्यांच्याकडून योग्य उत्तरे तो काढून घेई व या पध्दतीने त्याच्या ज्ञानात भर घालीत असत. या पध्दतीला 'सॉक्रिटीस मेथड' असे म्हणतात. सॉक्रिटीसने स्वत:चे तत्त्वज्ञान, सिध्दांत लिहून ठेवले नाहीत. तो सतत तोंडी प्रबोधन करीत असे. सॉक्रिटीसचे विचार त्यांचा शिष्य प्लेटो, झेनेफॉन, ॲरिस्टॉटल यांनी ग्रंथित केले असल्याने आज आपण ते अभ्यासत आहोत.

'ग्रीक तत्त्वज्ञानाचा निर्माता', 'शहाणा माणूस' असे कार्ल मार्क्सने सॉक्रिटीसचे वर्णन केले आहे. ग्रीक राजकीय विचारांच्या इतिहासात सॉक्रिटीसने राजकारणाला श्रेष्ठत्त्वाच्या पातळीवर नेले. त्यातूनच प्लेटोचे राजकीय तत्त्वज्ञान व ज्यांना आपण राज्यशास्त्राचे जनक म्हणतो त्या ॲरिस्टॉटलचे राज्यशास्त्र निर्माण झालेले दिसते.

### ❑ सॉक्रिटीसचे राजकीय आज्ञापालनविषयक विचार :-

मानवतावादी तत्त्वज्ञानाची मांडणी सॉक्रिटिसने केली. ज्ञान व नीती याची एकरूपता (Virtue is Knowledge) हा सूत्रमय सिध्दांत सॉक्रिटीसने मांडला. ज्ञानी माणूस नीतिमान असतो किंवा नीती व ज्ञान एकच होय असे त्याचे मत होते. सत्य ज्ञान जाणून नैतिक तत्त्वे मनुष्याने शोधून काढली पाहिजेत असे मत सॉक्रिटिस व्यक्त करतो. नैतिकता राजकीय असते व राजकारण नैतिक असते. चांगला नागरिक होणे हा सर्वात श्रेष्ठ गुण आहे. ग्रीकमधील प्रत्यक्ष लोकशाहीमुळे प्रत्येक नागरिकास राजकारणात सहभागी व्हावे लागे म्हणूनच प्रत्येक नागरिक ज्ञानी असेल तर तो नीतिमान असतोच व नीतीमुळे नागरिक उपयुक्त नागरिक बनतो असे सॉक्रिटीस म्हणतो. राज्यकारभार चालविणे, राजकारणात सहभागी होणे ही कला आहे. सॉक्रिटीस राजकारणाला कला मानत होता. राजकारणाला तो ''रॉयल आर्ट'' असे म्हणत असे. व्यक्तिगत कौटुंबिक पातळीवर असेल किंवा शासकीय पातळीवर असेल ज्याला कारभार करण्याचे ज्ञान असेल तो नागरिक खाजगी व शासकीय पातळीवर जीवनात यशस्वी होतो. त्यामुळे सॉक्रिटीस प्राधान्याने नागरिकांमध्ये ज्ञान व नीतीची अपेक्षा व्यक्त करताना दिसतो.

### ❑ कायदा व न्यायाची संकल्पना :-

सॉक्रिटिस कायद्याला अत्यंत पवित्र मानत असे. कायदेशीरपणाबद्दल सॉक्रिटिस फार आग्रही होता. कायदा हा बुध्दिविवेकावर आधारित असावा व कायद्याद्वारे न्यायाची प्रस्थापना व्हावी असे सॉक्रिटिस मत व्यक्त करतो. कायद्याशिवाय राजकीय जीवनाची संघटना होवू शकत नाही, कायदा हा नागरी जीवनाचा पाया आहे असे सॉक्रिटिस म्हणतो.

सॉक्रिटिस म्हणतो की, न्यायाची व्याख्या मी एकदा अशी केली होती की, 'अन्यायन करण्याचा तिटकारा किंवा चीड म्हणजे न्याय.' पण तो म्हणतो की, आता मला असे वाटते की, 'न्याय म्हणजे अन्य काही नसून कायद्याप्रमाणे वागणे होय.' ही सॉक्रिटिसची व्याख्या त्याच्या तत्त्वज्ञानाचा पाया आहे.

### ❑ कायदा व नागरिक :-

कायद्याचे पालन करणे हे प्रत्येक नागरिकाचे, व्यक्तीचे कर्तव्य आहे असे सॉक्रिटिस मानतो. कायदा म्हणजे राज्यातील शासनाच्या दृष्टीने आवश्यक असलेला आदेश असतो व त्याचे उल्लंघन करणे म्हणजे विपरित कार्य करणे असे तो मानतो. नागरिकांनी नगरराज्यांतील कायद्यांवर निष्ठा ठेवावी अशी निष्ठा असेल तरच नागरिकांमध्ये सहमती निर्माण होईल व राजकीय जीवनाचे चांगले संघटन होऊन एकमत तयार होईल. नागरिकांच्या एकात्मतेमुळे राज्य टिकू शकेल किंवा राज्य संपुष्टातही येऊ शकेल त्यामुळे सॉक्रिटिस

नागरिकांच्या एकात्मतेला महत्त्व देतो आणि एकात्मतेची ही निष्ठा कायद्यामुळे, कायद्याद्वारे होणाऱ्या न्यायाच्या प्रस्थापनेमुळे होईल असा विश्वास व्यक्त करतो. कायदा पालनाच्या बाबतीत सर्वजण बंधनात असावेत अन्य बाबतीत नागरिकांचे मतभेद असू शकतात.

नागरिकांची सहमती हे राज्याच्या समाधानाचे, सुखाचे कारण आहे, त्यासाठी नागरिकांनी सहमतीने राहण्याची शपथ घ्यावी असे सॉक्रिटिस म्हणतो. कायदा व न्याय यांच्यात एकत्व ज्ञानामुळे होईल. स्वाभाविकच राज्यकर्ते जर ज्ञानी असतील तरच हे शक्य आहे. कारण ज्ञानी राज्यकर्ते हे न्याय्य कायदे करतील व असेच कायदे सर्वांनी पाळले पाहिजेत.

- **राज्याप्रती नागरिकांचे कर्तव्य व कायदा :-**

प्रत्येक नागरिकाने राज्यावर व कायद्यावर प्रखर निष्ठा ठेवावी हे तत्त्व सॉक्रिटिसच्या वैधानिक राजकीय तत्त्वज्ञानाच्या केंद्रभागी आहे. राज्य ही नैसर्गिक संस्था असून प्रत्येक व्यक्ती राज्यातच जन्म घेते व आपला विकास करते. राज्याच्या ठिकाणी सद्‌गुण असतात. राज्य व राज्यनिर्मित कायदा यावर नागरिकांचा विश्वास असावा. नागरिकांपेक्षा राज्य श्रेष्ठ व राज्यापेक्षा कायदा श्रेष्ठ असतो असे सॉक्रिटिस मत व्यक्त करतो. त्यामुळे तो कोणत्याही परिस्थितीत नागरिकांना कायदेभंग करण्याचा अधिकार नाही असे म्हणतो. कारण व्यक्तीने राज्याच्या चुका काढल्या तर व्यक्तिजीवनाचा नाश झाल्याशिवाय राहणार नाही असे सॉक्रिटिसचे म्हणणे आहे. राज्य चूक करत नाही (The State does no Wrong) असे मानले तर कायदा व न्याय यांना काही अर्थ प्राप्त होतो. थोडक्यात ज्याप्रमाणे आपल्या मातापित्यांची हिंसा कोणी करू नये, त्याचप्रमाणे राज्याच्या कायद्याची हिंसा (कायदा मोडणे) 'कोणी करू नये' असे इतके महत्त्व सॉक्रिटिस आपल्या विचारांद्वारे नागरिकांची कर्तव्य व कायद्याप्रती निष्ठा व्यक्त करताना मांडतो. त्याने नागरिकांचे स्वातंत्र्याविषयी विचार व्यक्त करताना नागरिकांवर नगरराज्यांनी कठोर बंधने न लादता विविध राज्यात मुक्त संचार करण्याचा अधिकार असावा या रूढ होणाऱ्या विचारांबद्दल चिकित्सक विचार केला आहे. स्वतंत्र नागरिकांचे राज्य ज्ञानी व न्याय कायदे यांच्या आधारे चालत आहे की नाही हे पाहणे, कर्तव्य आहे असे सॉक्रिटिस म्हणतो. स्वातंत्र्य हे व्यक्तीला व राज्याला फार मूल्यवान आहे. स्वतंत्र वागणे म्हणजे बुध्दिचा चांगला वापर करून चांगले राहणे, आत्म संयमन ठेवणे होय. नागरिकांचे स्वत:वरील नियंत्रण सुटले तर तो स्वार्थी, लोभी, पशूतुल्य होईल व राज्यात अराजकता निर्माण होऊन राज्य कमकुवत, दुर्बल होईल. त्यामुळे सॉक्रिटिस नागरिकांच्या स्वातंत्र्यास प्राधान्य देवून नगरराज्यात कायदा, सुव्यवस्था, न्याय प्रस्थापित व्हायची असेल तर सर्व नागरिकांमध्ये समानता मानणे हे मूलभूत तत्त्व आहे असे सॉक्रिटिस मानतो.

एकंदरीतच सॉक्रिटिसने व्यक्त केलेल्या राजकीय आज्ञापालनाच्या मुळाशी त्याची ज्ञान, नीती यांच्या आधारे राज्यकर्ते व नागरिक यांच्या भूमिका स्पष्ट केल्या आहेत. कायद्याप्रती असणारी नागरिकांची कर्तव्ये त्याने फक्त बोलण्यातून व्यक्त न करता कायद्याच्या प्रती असलेली त्याची निष्ठा त्याने हसत-हसत घेतलेल्या विषाच्या प्याल्याने अजरामर केलेली आहे. मात्र त्याचे राजकीय विचार आजच्या आधुनिक काळात तितकेच महत्त्वाचे व मार्गदर्शक ठरताना दिसतात.

*** स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१ ***

१. सॉक्रिटिसचा कालखंड सांगा.

२. राज्यशास्त्राचे जन कोणास म्हणतात?

३. सॉक्रिटिसच्या शिष्याचे नाव काय?

४. सॉक्रिटिसचे 'शहाणा माणूस' असे वर्णन कोणी केले आहे?

५. सॉक्रिटिसच्या मते सर्वश्रेष्ठ कला कोणती?

## १.२.२ प्लेटो यांच्या विचारांची पार्श्वभूमी व त्याच्या आदर्श राज्य, तत्त्वज्ञ राजा व न्यायाची संकल्पना

### ❑ प्लेटोचा अल्पपरिचय (इसवीसनपूर्व ४२७–३४७) :–

प्लेटोचा जन्म एका उमराव घराण्यात झाला. प्लेटोच्या घराण्यात तत्त्वज्ञान व साहित्य परंपरेने आले होते. साहजिकच प्लेटोलाही त्याचे बाळकडू मिळाले होते. सॉक्रिटिसचा शिष्य असणारा प्लेटो सॉक्रिटिसला दिलेल्या विषप्रयोगामुळे प्लेटो अधिक काळ अथेन्समध्ये राहू शकला नाही. आदर्श राज्यप्रणालीचा विचार मनात घेऊन तो आफ्रिका, इराण, इजिप्त, इटली, सिसली या राज्यांना अभ्यासपूर्ण भेटी देत फिरला. अथेन्सला परतल्यानंतर त्याने ॲकॅडमी नावाची पाठशाळा उघडली. या पाठशाळेत त्याने आपले तत्त्वज्ञ व पाठशाळा प्रमुख म्हणून व्यतीत केले. 'ज्ञानी मनुष्यच राज्य चालवू शकतो' या दृष्टीकोनातूनच प्लेटोची ॲकॅडमी भावी ज्ञानी (तत्त्वज्ञ) राज्यकर्ते आणि राजकारणात सहभाग घेणारे नागरिक यांना शिक्षण देण्याच्या हेतूने स्थापन झाली होती.

राजकीय प्रश्नांबाबत पध्दतशीरपणे विचार मांडणारा आणि ते ग्रंथबध्द करून ठेवणारा प्लेटो हा पहिला ग्रीक विचारवंत होता. सॉक्रिटिसच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव प्लेटोवर होता. याचबरोबर तत्कालीन ग्रीक नगरराज्याची अस्थिर शासनपध्दती, सॉक्रिटिसवर झालेल्या खुनी विषप्रयोगानंतर तब्बल १२ वर्षे विविध देशांना व नगरराज्यांना प्लेटोने दिलेल्या अभ्यासपूर्ण भेटी तिथल्या शासनपध्दतीचा केलेला अभ्यास यातून त्याचे तयार झालेले राजकीय विचार, सोलन, येलीस, डेमॉक्रिटस, पायथॅगोरास अशा ग्रीक तत्त्ववेत्याच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव व सर्वात महत्त्वाचे म्हणजे सिरॅक्यूसच्या तरुण राजाचा सल्लागार असताना त्या राजाला आदर्श शासक बनविण्यात आलेल्या अडचणी लक्षात घेता तात्त्विकतेपेक्षा वास्तवतेवर भर देणाऱ्या विचारांची बैठक अशा सर्व गोष्टींचा परिणाम व प्रभाव प्लेटोच्या विचारांवर होऊन त्याने लहान मोठे असे ३८ ग्रंथ लिहिले. राज्यशास्त्राच्या दृष्टीने त्याचे (१) दि रिपब्लिक (२) दि स्टेटस्मन (३) दि लॉज हे ग्रंथ प्रसिध्द आहेत.

'दि रिपब्लिक' या ग्रंथात प्लेटोने आदर्श राज्यकर्ते तसेच न्यायाची संकल्पना या विषयांवर मांडणी केली आहे. 'दि स्टेटस्मन' या छोटेखानी संवाद पुस्तकात प्लेटोने राजकारण व नीती यांच्या परस्पर संबंधाचे

विश्लेषण केले आहे. 'दि लॉज' हा ग्रंथ पूर्णपणे वास्तववादावर आधारलेला दिसतो. राजकारण व राज्यकर्ते याबाबतचे वास्तववादी विश्लेषण या ग्रंथात आढळते. एकंदरितच आदर्शवाद ते वास्तववाद हा प्रवास प्लेटोच्या राजकीय विचारांत ग्रंथाद्वारे व्यक्त होताना आपणांस दिसून येतो.

- **प्लेटोची आदर्श राज्याची संकल्पना :–**

प्लेटोने आपली आदर्श राज्यविषयक कल्पना 'रिपब्लिक' या ग्रंथात मांडली आहे. व्यक्तीला चांगले जीवन जगता यावे यासाठी आदर्श राज्य आवश्यक आहे असे प्लेटो मानतो. आदर्श राज्याची संकल्पना मांडताना प्लेटोने सेंद्रिय सिध्दांताचा आधार घेतला आहे. त्यांच्या मते, राज्य म्हणजे व्यक्तीचे विशाल स्वरूप होय. ज्या पध्दतीने व्यक्ती निर्माण होते व त्यांचे कार्य चालते, त्यापध्दतीने समाज बनतो. प्लेटोच्या मते, वासना, साहस व बुध्दी या आधारावर समाजात तीन वर्ग निर्माण होतात. उत्पादक, सैनिक व शासक. राज्यातील हे तीनही वर्ग आपापली कार्ये करून चांगले जीवन प्राप्त करण्याचा प्रयत्न करतात. आर्थिक गरजाची परिपूर्तता ही राज्यनिर्मितीच्या मुळाशी असलेली प्रेरणा आहे असे प्लेटो मानतो. श्रमविभागणीमुळे प्रत्येक गटाला आपापल्या कार्याचे विशेष ज्ञान व प्राविण्य लाभते त्यातून त्याची कार्यक्षमता व उत्पादकता वाढते.

आर्थिक घटकाच्या जोडीला म्हणजेच उत्पादकाच्या जोडीला राज्याच्या निर्मितीसाठी आवश्यक असलेला दुसरा घटक म्हणजे सैनिक हा आहे. समाजाचे उत्पादक कार्य जसे विकसित होत जाते तसे समाजाला आवश्यक असते ती संरक्षणाची, विपुल जनसंख्या आणि व्यापक भुप्रदेशाची यासाठी युध्दाद्वारे प्रदेशप्राप्ती व संरक्षण केले जाऊ शकते यासाठी आवश्यक असते तो म्हणजे सैनिक वर्ग होय.

राज्यनिर्मितीसाठी आवश्यक तिसरा घटक म्हणजे शासक, तत्त्ववेत्त्यांचा होय. शत्रू व मित्र यात फरक करण्याइतपत ज्ञान आणि विवेक या गुणांचा परिपूर्ण विकास आढळतो तो फक्त तत्त्ववेत्ता असलेल्या संपूर्ण शासकवर्गातच. विवेक व राज्याचे सर्वात महत्त्वाचे तत्त्व असल्यामुळे विवेकसंपन्न तत्त्ववेत्ताच राजपदावर विराजमान झाला असला पाहीजे असे प्लेटो म्हणतो.

- **आदर्श राज्याची वैशिष्ट्ये :–**

**१. तत्त्वज्ञ राज्यकर्ते :–**

प्लेटोच्या मते, राज्याचा शासक, राज्यकर्ता ही तत्त्वज्ञ, बुध्दिमान असावा. राज्याचे शासन चालविण्यासाठी त्यांच्याकडे, सर्व उत्तम गुण असावेत. तो कुशल, सूज्ञ, नि:स्वार्थी, विवेकी, आत्मसंयमी, साहसी, सद्गुणी, न्यायप्रिय अशा सर्व गुणांनी युक्त असावा. प्लेटोच्या मते, जोपर्यंत राजा हा तत्त्वज्ञ राहणार नाही तोपर्यंत राज्याचे कल्याण होणार नाही. राजा तत्त्ववेत्ता असल्यास तो राज्याची उत्तम काळजी घेईल. सदैव नागरिकांचे हित पाहील.

**२. शिक्षण पध्दती :–**

तत्त्वज्ञ राज्यकर्ते व सैनिक वर्ग निर्माण करण्यासाठी प्लेटोने आदर्श शिक्षणपध्दती सुचविली आहे. आदर्श राज्य तेव्हाच निर्माण होईल जेव्हा शिक्षणाद्वारे व्यक्तीमध्ये सुधारणा करून त्यांना राज्यासाठी योग्य

बनविले जाईल. मानवाला आदर्श राज्याची दिशा दाखविणारे शिक्षण हेच योग्य साधन मानतो. प्लेटोने शिक्षण व्यवस्थेवर अधिक भर दिला आहे. शिक्षणामुळे व्यक्तीला तिच्या कर्तव्यकर्मांची जाणीव होते असे प्लेटो मानतो. जन्मलेल्या वयाच्या ६ व्या वर्षांपर्यंतच्या शिक्षणापासून ते व्यक्तीच्या ५० व्या वर्षापर्यंतच्या शिक्षणाची, अभ्यासक्रमाची मांडणी प्लेटोने आदर्श राज्यासाठी केली आहे. प्लेटोने आपल्या शिक्षणयोजनेत स्त्री-पुरुषांना सारखेच स्थान दिले आहे. त्याकाळी चूल-मूल मर्यादित व्यवस्थेत असणाऱ्या स्त्रियांना शिक्षण देण्याची प्लेटोची योजना क्रांतिकारी होती. प्लेटोच्या आदर्श राज्यात एकूणच शिक्षण योजनेत ज्या वर्गाला जे शिक्षण आवश्यक आहे ते त्याला दिले जाते अशी भूमिका व्यक्त करून आदर्श राज्यामध्ये प्लेटोची शिक्षणविषयक भूमिका त्याने व्यक्त केलेली दिसते.

**३. न्याय :-**

प्लेटोच्या 'रिपब्लिक' या ग्रंथाचे दुसरे नाव 'Concerning Justice' असे आहे. प्लेटोच्या आदर्श राज्याचा आधारच न्याय आहे. न्यायामुळे आदर्श राज्याला पूर्णत्व येते असे प्लेटो म्हणतो. समाजात सुव्यवस्था संघटन आणि न्याय असेल तरच आदर्श राज्याची निर्मिती होऊ शकते. ''प्रत्येक व्यक्तीला ती गोष्ट प्राप्त व्हावी जी तिला प्रिय आहे'' अशी न्यायाची व्याख्या प्लेटोने केलेली आहे. आदर्श राज्यात उत्पादक, सैनिक आणि शासक हे तिन्ही वर्गातील लोक आपआपसात मित्र म्हणून राहतील. हे तिन्ही वर्ग आपआपली कार्ये करतील आणि दुसऱ्याच्या कार्यात हस्तक्षेप करणार नाहीत अशी भूमिका प्लेटो मांडतो. भिन्न व्यक्ती भिन्न प्रकारची कार्ये करतील पण ती करीत असतानाही ते एकतेच्या सूत्रात बांधलेले राहतील. मनुष्याला आपल्या कर्तव्यशीलतेची जाणीव करून देऊन त्यांना संघटित ठेवण्याचे कार्य प्लेटोचा न्यायसिध्दांत आदर्श राज्यात करतो. न्यायामुळे संघर्ष नाहीसा होतो व राज्यात एकता व सुख निर्माण होऊन आदर्श राज्य प्रस्थापित होईल, असे प्लेटोचे मत आहे. न्याय म्हणजे राज्यरूपी शरीराचा आत्मा आहे. आदर्श राज्यापासून तो अलग होऊ शकत नाही असे अनन्यसाधारण महत्त्व आदर्श राज्यामध्ये न्यायाला देताना दिसून येते.

**४. साम्यवाद :-**

प्लेटोने आदर्श राज्याची निर्मिती न्यायाच्या आधारावर करावयाची होती. परंतु नुसत्या शिक्षणाने आदर्श राज्य निर्मिती होणार नाही हे जाणून प्लेटोने आदर्श राज्यासाठी साम्यवादाची कल्पना मांडलेली दिसून येते. मनुष्य आपल्या कर्तव्यापासून विचलित होण्याची दोन कारणे तो स्पष्ट करतो. एक म्हणजे संपत्ती व दुसरे म्हणजे कुटुंब होय. व्यक्तीला आपल्या मार्गापासून पदभ्रष्ट करणारे संपत्ती हे फार मोठे आकर्षण आहे असे प्लेटो मानतो म्हणून तो शासक आणि सैनिक यांना संपत्तीपासून वर्ज्य करतो. शासनकर्त्यावर संपत्तीचा मोठा प्रभाव पडतो असा प्लेटोचा ठाम विश्वास होता. त्यासाठी त्याने शासक वर्गासाठी संपत्तीचा अंत केलेला दिसतो. व्यक्तिगत संपत्ती आणि व्यक्तिगत परिवार, कुटुंब यांच्या प्रेमामुळे शासनकर्ते, सैनिक पदभ्रष्ट होतात ही प्लेटोची धारणा असल्याने त्याने शासक व सैनिक यांना संपत्तीचा व स्त्रियांचा साम्यवाद स्पष्ट केला आहे. कौटुंबिक प्रेमामुळे शासक, सैनिक राज्यकारभाराकडे पूर्ण लक्ष देऊ शकत नाहीत.

मुलांबद्दलचे प्रेम व काळजी व्यक्तीला स्वार्थी व स्वकेंद्रित बनविते. कुटुंबाचा मोह संपत्तीच्या मोहापेक्षा अधिक असतो. कुटुंबासाठी मनुष्य अनुचित व अनैतिक कार्य करायला मागेपुढे पहात नाही. यासाठी प्लेटो शासक व सैनिक यांचा संपत्ती व कुटुंबापासून दूर ठेवण्याविषयी विचार व्यक्त करतो.

प्लेटोच्या साम्यवादी व्यवस्थेत फक्त जीवनाला जेवढी आवश्यक आहे तेवढीच संपत्ती जवळ ठेवण्याची मुभा. राज्यकर्त्यांना तो देतो. तसेच ''स्त्रिया सर्वांच्या सामाईक स्वरूपात पत्नी असतील, त्यांची अपत्येही सामायिकरित्या सर्वांची असतील, अपत्यांना त्याच्या जन्मदात्याची ओळख असणार नाही'' अशा पध्दतीने शासक व सैनिक यांनी नि:स्वार्थी, निरपेक्ष पध्दतीने आपले राष्ट्रापती, राज्याप्रती कार्य करण्यासाठी प्लेटोने संपत्ती व कुटुंबाबद्दल आपली साम्यवादी विचारसरणी व्यक्त केली आहे. अशाप्रकारे प्लेटोने आदर्श राज्याच्या निर्मितीसाठी संपत्ती व स्त्रियांचा साम्यवाद मांडलेला आहे.

**५. स्त्री–पुरुष समानता :–**

आदर्श राज्य व्यवस्थेत प्लेटो शासक वर्गात स्त्रिया व पुरुष यांना बरोबरीचे स्थान देताना दिसतो. प्लेटोने स्त्री व पुरुषांसाठी एकसारख्या शिक्षणपध्दती सांगितली आहे. चूल–मूल या चौकटीतून बाहेर पडून राज्यकारभारातल्या आपल्या जबाबदाऱ्या स्त्रिया उचलू शकतील असा विश्वास प्लेटोचा होता. प्लेटो त्याच्या विचारांत स्त्री–पुरुष समान स्थान देतो. राज्याची अर्धी शक्ती म्हणजे स्त्री आहे  असे प्लेटो मानतो त्यामुळे त्याच्या आदर्श राज्यनिर्मितीमध्ये तो स्त्रीयांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान व दर्जा देतो.

❑ **प्लेटोच्या आदर्श राज्यावरील टीका :–**

**१) गुलामगिरीविषयी मौन :** तत्कालीन ग्रीकमध्ये गुलामगिरीची पध्दती अस्तित्वात होती. मात्र प्लेटो ने आदर्श राज्याच्या योजनेत गुलामगिरीविषयी आपले मत व्यक्त केलेले दिसत नाही.

**२) उत्पादक वर्गाकडे दुर्लक्ष :** प्लेटोच्या आदर्श राज्य निर्मितीमध्ये त्याने शासक व सैनिक यावर लक्ष केंद्रित करून त्यांना महत्त्वपूर्ण स्थान दिले आहे, मात्र त्याचवेळी त्याने उत्पादक वर्गाचे स्थान गौण मानलेले दिसून येते, तो उत्पादक वर्गास फारच कमी स्थान देताना दिसतो.

**३) कायद्याची उपेक्षा :** आदर्श राज्यात शासक, राजा हा तत्त्वज्ञानी, बुध्दिमानी, सर्व गुणांनी युक्त असल्याने आदर्श राज्याला कायद्याची गरज नाही. तत्त्वज्ञ राज्यकर्ता इच्छेनुसार कुठल्याही प्रकारचे शासन करू शकतो. ही प्लेटोची भूमिका कायद्यास दुय्यमत्त्व देणारी ठरते, कारण कायदा नसेल तर प्लेटोने मांडलेल्या न्यायाच्या संकल्पनेला अर्थ उरत नाही.

**४) अतिरेकी साम्यवाद :** प्लेटोने कुटुंब संस्थेचा पायाच नष्ट केला. संपत्तीप्राती व कुटुंब या मानवाच्या सहजप्रवृत्तीस तो विरोध करून राज्यनिष्ठेच्या आड कौटुंबिक प्रेम येते म्हणून प्लेटोने कुटुंबसंस्थाच उडवून दिली. माणसाला जनावरांच्या पातळीवर प्रजोत्पादन व मानवी शरीरसंबंधाच्या बाबतीत आणून ठेवलेले दिसते. मुलांचे मानसिक आरोग्याचा विकास कुटुंबात होऊ शकतो व तो चांगली व्यक्ती कुटुंबातूनच बनू शकते. या गोष्टींचा विचार प्लेटोने केला नाही.

एकूणच राज्याला आदर्श मानताना व्यक्तीला गौणस्थान दिले आहे. प्लेटोचा साम्यवाद हा आदर्श राज्य निर्मितीसाठी मांडलेला एक काल्पनिक विचार आहे, ही कल्पना मूर्त येणे कठीण असल्याचे स्वत: प्लेटोने आपल्या 'दि लॉज' या ग्रंथात मान्य केले आहे.

### ❑ प्लेटोचे उप–आदर्श राज्य :–

प्लेटोने 'रिपब्लिक'मध्ये वर्णन केलेली आदर्श राज्याची संकल्पना प्रत्यक्ष भूतलावर अशक्य आहे हे तत्कालीन दुसऱ्या डायनोसिला आदर्श राजा बनविण्यामध्ये आलेल्या अपयशावरून लक्षात आल्यानंतर प्लेटोने 'दि लॉज' या ग्रंथात अनुभवावर आधारित विधिद्वारा शासनप्रणाली स्वीकारावी लागली, त्याच्या 'लॉज'मधल्या या आदर्श राज्यालाच प्लेटोचे उपआदर्श राज्य म्हटले जाते.

### ❑ प्लेटोच्या उप–आदर्श राज्यातील महत्त्वाच्या गोष्टी :–

### १. मिश्र संविधान :–

उपआदर्श राज्याच्या निर्मितीसाठी राजा आणि प्रजा, धनवान आणि निर्धन, बुध्दिमान आणि शक्तिशाली या सर्व व्यक्तिच्या सहकार्याची आवश्यकता स्पष्ट केली आहे. त्यांच्या लॉज या ग्रंथामधील आदर्श राज्य हे राज्य तंत्रात्मक, बुध्दितंत्रात्मक व लोकतंत्रात्मकही असे संमिश्र आहे. राज्याचा अध:पात होऊ न देण्यासाठी बुध्दी, शक्ती आणि स्वातंत्र्य यांचा समन्वय साधायला हवा असे प्लेटो मानतो.

### २. राज्याची भौगोलिक स्थिती व जनसंख्या :–

प्लेटोच्या मते, राज्य समुद्र किनाऱ्यापासून विशिष्ट अंतरावर असावयास पाहिजे, राज्य चारी बाजूनी सुरक्षित सीमांनी सज्ज असावी जेणेकरून शत्रूला सहजासहजी हल्ला करता येऊ नये तसेच त्याचे हे उप–आदर्श राज्य कृषीप्रधान राज्य असावे ही त्याची भूमिका होती. राज्याच्या जनसंख्येबाबतही तो विचार व्यक्त करतो. त्यांच्या मते, राज्यातील लोकसंख्या ५,०४० असायला पाहिजे. ही संख्या शांतिकाळात, युध्दकाळात व कर वसूल करण्यासाठी उपयुक्त आहे त्यामुळे ती कमीही होता कामा नये व वाढूही नये यासाठी लोकसंख्येच्या बाबतीत राज्याने कायदा करावा अशा प्रकारचे विचार प्लेटो भूमी व लोकसंख्येच्याबाबतीत मांडतो.

### ३. सामाजिक अवस्था :–

'दि लॉज' या ग्रंथात प्लेटो स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीचे स्थान देतो. दोघांनाही समान शिक्षण मिळावे असे त्याचे मत आहे. शासकानाही प्लेटो कुटुंबाचा, कौटुंबिक अधिकार बहाल करतो. विभिन्न वर्ग एकमेकांपासून अलग ठेवण्याऐवजी त्याने त्यांच्यात समन्वय स्थापन करण्याचा प्रयत्न केला. साधारणत: जनतेच्या अन्य स्वाभाविक प्रवृत्तीचा तो उपेक्षा करीत नाही.

४. **आर्थिक अवस्था :-**

प्लेटोने आपल्या उप-आदर्श राज्यात संपत्तीच्या साम्यवादाला संपुष्टात आणले आहे. संपत्तीमध्ये तो भूमी व घर यांचा समावेश करून संपत्तीची मात्रा निश्चित करतो. सर्व नागरिकांना भूमीसारख्या प्रमाणात मिळावी तिचे एकदा विभाजन झाल्यावर अधिक तुकडे होऊ नयेत, भूमीला हस्तांतरित करता येणार नाही. मात्र उत्पादित वस्तूचे वाटप प्लेटो राज्याकडे, शासनाकडे देताना दिसतो, म्हणजे यातून संपत्तीचे समाजीकरण होईल. त्यांच्या नवीन आर्थिक व्यवस्थेचे समाजात चार वर्ग पडतात.

१) दैनंदिन आवश्यकता पूर्ण होतील इतकी जेमतेम संपत्ती असलेले वर्ग.

२) पहिल्या वर्गापेक्षा दुप्पट संपत्ती असलेला वर्ग.

३) पहिल्या वर्गापेक्षा तिप्पट संपत्ती असलेला वर्ग.

४) पहिल्या वर्गापेक्षा चौपट संपत्ती असलेला वर्ग.

अशाप्रकारे प्लेटो आपल्या उप-आदर्श राज्यामध्ये आर्थिक व्यवस्थेसंबंधी विचार व्यक्त करतो.

५. **राजकीय व्यवस्था :-**

राज्याच्या शासनाची सूत्रे सांभाळण्यासाठी एक 'साधारण सभा' राहिल. राज्याचे सर्व नागरिक या समेचे सदस्य राहतील. या सभेची बैठक वर्षातून एकदा होईल. या व्यतिरिक्त आमसभा ३७ सभासदाची निवड करून एक सल्लागार समिती तयार करेल. सदस्याचे वय ५० ते ७० राहील. ३६० सभासद असणारी एक प्रशासकीय परिषद उप-आदर्श राज्यात असेल. सल्लागार समिती राज्यकर्त्यांना सल्ला देईल तर प्रशासकीय परिषद राज्याच्या प्रशासनाची व्यवस्था बघेल.

६. **न्याय व्यवस्था :-**

प्लेटोच्या आदर्श राज्यात न्याय व्यवस्था, रचना यांचा उल्लेख आढळत नाही. मात्र प्लेटोच्या उप-आदर्श राज्यात तो न्याय व्यवस्थेची रचना स्पष्ट करतो.

१. **स्थानिक न्यायालय :** स्थानिक संघर्षाचा निवाडा हे न्यायालय करेल.

२. **क्षेत्रीय न्यायालय :** या न्यायालयात एका विशिष्ट क्षेत्रातील लोकांच्या संघर्षाचा निवाडा करतील.

३. **निवडक न्यायाधिशांचे न्यायालय :** या ठिकाणच्या न्यायाधिशांची निवड प्रशासकीय अधिकारी करतात. या न्यायालयाच्या क्षेत्रात राज्यातील सर्व वैयक्तिक संघर्षाचा निवाडा करील.

४. **संपूर्ण जनतेचे न्यायालय :** आमसभा हे स्वत: या न्यायालयाचे काम पाहील. हे राज्यातील अंतिम न्यायालय असून त्यात राज्यातील, क्षेत्रातील सर्व प्रकारचे खटले व त्यांचा अंतिम निर्णय या न्यायालयात लावला जाईल.

## ७. शिक्षण व्यवस्था :–

'दि लॉज' मध्ये प्लेटोने शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले आहे. स्त्री व पुरुषांना समान शिक्षण देण्यास तो प्राधान्य देतो. सर्व नागरिकांना तो शिक्षण अनिवार्य करतो.

अशाप्रकारे प्लेटोने उपआदर्श राज्याविषयी वास्तववादी भूमिकेमधून आपले विचार मांडले. मात्र जनसंख्येच्या बाबतीत ५,०४० ही राज्याची जी निश्चित संख्या व्यक्त केली आहे ती कायम ठेवणे अशक्य आहे. मुलांच्या संख्येवर नियंत्रण म्हणजे एक प्रकारे राज्य कुटुंबावरच नियंत्रण ठेवील ही भूमिका अयोग्य वाटते. मात्र आदर्श राज्यातील बऱ्याच काल्पनिक विचारांना अनुभवातून वास्तववादी भूमिकेतून प्लेटोने उप–आदर्श राज्यात मांडले व त्यात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

## ❑ तत्त्वज्ञ राजा :–

प्लेटोच्या 'रिपब्लिक' या ग्रंथाच्या पाचव्या व सहाव्या पुस्तकात तत्त्वज्ञ राज्यकर्त्यांसंबंधी विवेचन केलेले आढळते. प्लेटोला आदर्श राज्यासाठी आदर्श तत्त्वज्ञ राज्यकर्ते निर्माण करावयाचे होते. त्यामुळे त्याच्या तत्त्वज्ञानात राज्यकर्ते कसे असावेत यासंबंधीच्या विचारांना मध्यवर्ती स्थान आहे. ''सद्गुण हेच ज्ञान होय.' हे रिपब्लिकमधील मध्यवर्ती आधारभूत तत्त्व होय. सद्गुण हेच ज्ञान असेल तर निरपवाद सत्य अस्तित्वात आहे व त्याचे ज्ञान होऊ शकते. पण हे ज्ञान प्राप्त करण्याची क्षमता सर्वांमध्ये नसते. त्यामुळे व्यक्तींकडे शहाणपण किंवा बुध्दिमत्ता हा गुण प्रधान असेल, अशाच व्यक्ती ज्ञान प्राप्ती करू शकतात. प्लेटोच्या मते, राज्यकारभार ही श्रेष्ठ दर्जाची कला व शास्त्र आहे. त्यामुळे राज्यकर्त्यांसाठी बौध्दिक श्रेष्ठता आणि प्रशासकीय कौशल्य यांची आवश्यकता असते. ती क्षमता ही काही निवडक लोकांमध्येच असते. ज्याप्रमाणे संयम हा गुण असणाऱ्या व्यक्ती उत्पादक कार्यांसाठी, धैर्य हा गुण असणाऱ्या व्यक्ती सैनिकी पेशासाठी योग्य असतात; त्याचप्रमाणे शहाणपण हा गुण असणाऱ्याच व्यक्ती राज्यकारभार करण्यासाठी योग्य असतात असे प्लेटो म्हणतो. राजनीती ही सर्व शास्त्रात कठीण शास्त्र आहे असे प्लेटो म्हणतो. त्यामुळे राजनीतीमधील डावपेच व बारकावे सर्वसामान्य माणसाला समजू शकणार नाहीत. शहाणपण असणारी व्यक्तीच राजनीतीचे कार्य करू शकते. मात्र अशा शहाण्या, बुध्दिवान लोकांना योग्य शिक्षण देऊन राज्यकारभाराचे ज्ञान करवून दिले तर उत्तम राज्यकर्ते निर्माण होऊ शकतात.

प्लेटोच्या मते, तत्त्वज्ञ राज्यकर्त्यांच्या अंगी कोणकोणते गुण असले पाहिजेत याची सविस्तर चर्चा प्लेटोने केली. त्याच्या मते, तत्त्ववेत्ता राजा हा सत्यशोधक असायला पाहिजे. आत्मसंयमी, वीर, साहसी, न्यायी व सत्यप्रिय, नि:स्वार्थी, सुदृढ, बुध्दिमानी, कर्तव्यदक्ष, प्रजाहितदक्ष, सद्गुणी, ज्ञानी, ध्येयवादी, जिज्ञासू, नीतिमान, व्यवहारी, सुसंस्कारी अशा सर्व गुणांनी युक्त असे गुण तत्त्वज्ञ राज्यकर्त्यांमध्ये असावे असे प्लेटो म्हणतो. शिवाय राज्यकर्ते हे संपत्ती, स्त्रिया, कुटुंब यापासून अलिप्त असावे असा प्लेटो म्हणतो. कारण संपत्ती व कुटुंब यामुळे व्यक्ती स्वार्थी, भ्रष्टाचारी होते व ध्येयापासून विचलीत होते, स्वाभाविकच त्यामुळे आदर्श राज्याची निर्मिती होण्यासाठी अडथळा निर्माण होईल अशी भूमिका प्लेटो व्यक्त करतो. आदर्श राज्यकर्त्यांसाठी प्लेटो शिक्षणाची आवश्यकता स्पष्ट करतो. तत्त्वज्ञ राज्यकर्ते निर्माण करण्याकरिता

३० ते ५० वर्षांच्या वयोगटातील निवडक प्रौढ नागरिकांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता प्लेटो आदर्श राज्यासाठी व्यक्त करतो. शिक्षणामुळे व्यक्तीला आपल्या कर्तव्याची खरी जाणीव होवून आदर्श राज्याची स्थापना करणे शक्य होईल, यासाठी तो तत्त्वज्ञ राज्यकर्त्यांस शिक्षण आवश्यक आहे असे स्पष्ट करतो.

जोपर्यंत तत्त्वज्ञ राजे निर्माण होणार नाहीत, तोपर्यंत नगरराज्ये दोषमुक्त होणार नाहीत' राज्यातील दोष काढून ते नाहीसे करण्याची क्षमता, पात्रता असणारा राज्यकर्ताच सत्ताधारी असावा आणि तत्त्वज्ञच असे कार्य करू शकतील अशी प्लेटोची धारणा होती. अथेन्स नगर-राज्यातील अकार्यक्षमता व गटबाजी नाहीशी करून स्थिर व कार्यक्षम करण्याच्या उद्देशाने प्लेटोने तत्त्वज्ञ राजाची संकल्पना मांडली.

प्लेटोने तत्त्वज्ञ राजा या संकल्पनेमध्ये राज्यकर्ता वर्ग हा कायद्यापेक्षाही श्रेष्ठ मानलेला आहे. आदर्श राजा तत्त्वज्ञानी व बुध्दिमान आहे, त्याला चांगले ज्ञान असल्याने आदर्श राज्याला कायद्याची आवश्यकता नाही. असा तत्त्वज्ञ राज्यकर्ता आपल्या इच्छेनुसार कुठल्याही प्रकारचे शासन करू शकतो अशी भूमिका प्लेटो व्यक्त करताना दिसतो. कायद्याची ताठरता लक्षात घेता ज्ञानी व न्यायप्रिय अशा राज्यकर्त्यांची विवेकबुध्दिच विविध प्रश्नांबाबत निर्णण देताना आवश्यक ती लवचिकता दाखवू शकते म्हणून कायद्यापेक्षा तत्त्ववेत्ता राजाची विवेकबुध्दी श्रेष्ठ प्लेटो मानतो.

तत्त्वज्ञ राज्यकर्त्यांवर लिखित कायद्याचे नियंत्रण असू नये व लोकमताचेही दडपण असू नये असा विचार प्लेटो व्यक्त करतो. तत्त्वज्ञ राजाच्या विवेकबुध्दीला जे योग्य वाटेल तेच राज्याच्या हिताचे असेल असे त्याचे मत होते. एकूणच प्लेटो तत्त्वज्ञ राजाची सत्ता कायद्याहूनही श्रेष्ठ मानतो, मात्र हा तत्त्वज्ञ राजा हा बेजबाबदार नाही असे तो आदर्श राज्याच्या कल्पनेत मांडतो.

प्लेटोने जहाजाच्या कप्तानाचे उदाहरण देऊन स्पष्ट केले की, कप्तान शरीराने सुदृढ असला व कानाने बहिरा व डोळ्यांनी अंधदृष्टीचा असेल आणि नौकानयनाचे ज्ञान अर्धवट असल्यास जहाजावरील खलाशात तंटे निर्माण होऊन जहाजाचे बारा वाजतील, त्याचप्रमाणे अयोग्य अपात्र सत्ताधारी वर्गांकडे सत्ता दिली तर नगरराज्ये दोषमुक्त होणार नाहीत, त्यामुळे प्लेटो त्याच्या आदर्श राज्याच्या विचारात आदर्श, तत्त्वज्ञ राजास प्राधान्य देतो.

तत्त्वज्ञ राज्यकर्त्याने राज्यात न्याय प्रस्थापित व्हावा म्हणून प्रत्येकाला कुवतीप्रमाणे काम द्यावे, नगरराज्याच्या लोकसंख्येवर नियंत्रण ठेवावे. राज्यातील शिक्षण पध्दतीवर नियंत्रण ठेवावे, खाजगी संपत्तीवर योग्य मर्यादा घालून व्यक्तीला अधिक श्रीमंत व दारिद्र्य बनू देवू नये यासाठी तत्त्वज्ञ राजाने लक्ष द्यावे, असे स्पष्ट करून प्लेटो आदर्श राज्याची सूत्रे तो तत्त्वज्ञानी शासकाच्या हाती सोपवितो.

### ❑ तत्त्वज्ञ राजा : मूल्यमापन :-

प्लेटोने मांडलेला तत्त्वज्ञ राज्यकर्ता ही प्लेटोची कल्पना प्रत्यक्षात येणे कठीण आहे. राज्यकर्त्यांमध्ये असलेले गुण एका ठिकाणी एका व्यक्तीच्यामध्ये आढळणे अशक्य वाटते, शिवाय राज्यकर्त्याने संपत्ती, कुटुंब स्त्री या गोष्टीपासून अलिप्त राहण्याविषयी जी भूमिका व्यक्त केली आहे, ती मानवाच्या नैसर्गिक प्रवृत्तीच्या विरुध्द वाटतो, कारण प्रत्येक व्यक्तीला संपत्तीप्रती व स्त्रीप्रती मोह ही नैसर्गिक गोष्ट आहे.

तत्त्वज्ञ राज्यकर्त्यांकडे असणाऱ्या अमर्याद, अनियंत्रित निरंकुश सत्ता प्रदान करतो, जी एकप्रकारे एकतंत्री हुकूमशाही पध्दतीला चालना देताना दिसतो. राज्यकर्त्यास कायद्यापेक्षा श्रेष्ठ स्थान दिल्याने कायद्याचे व न्यायाचे राज्य नष्ट होईल व समाजात अराजकता निर्माण होईल.

तत्त्वज्ञ राज्यकर्ता ही कल्पना केवळ राज्यातील दोन वर्गांपुरताच मर्यादीत होती. उपजीविकेची साधने निर्माण करणाऱ्या वर्गातील लोकांना तत्त्वज्ञ राज्यकर्ता होता येत नव्हते. तत्त्वज्ञ राज्यकर्त्यांची ही भूमिका असमानतेवर आधारित असलेली दिसून येते.

ग्रीकमधील नगरराज्यांची तत्कालीन परिस्थितीनुरूप प्लेटोने आपले राजकीय विचार व्यक्त केले होते. आदर्श राज्याची संकल्पना मांडून एक राजकीय व्यवस्थित नवीन दिशा देण्याचा प्रयत्न प्लेटोने केला व या आदर्श राज्याची सर्व सूत्रे त्याने तत्त्वज्ञ राजास देवून आदर्श राज्याप्रती उच्च प्रतीचे राजकीय विचार मांडले.

### ❑ प्लेटोची न्यायाची संकल्पना :–

प्लेटोच्या 'रिपब्लिक' या ग्रंथाचे दुसरे नाव 'Concerning Justice' असे आहे. आपण ज्या कायदेशीर दृष्टीने न्यायाकडे पाहतो अशी न्यायाची भूमिका प्लेटोने व्यक्त न करता त्याची न्यायविषयक कल्पना नैतिक स्वरूपाची आहे आणि त्याची आदर्श राज्यपध्दतीची कल्पना न्यायावर आधारलेली आहे.

प्लेटोचे न्यायविषयक विचार समजून घेण्यापूर्वी त्याने त्याच्या काळात प्रचलित असलेल्या न्यायसिध्दांताचे खंडण कसे केले आहे हे पाहणे आवश्यक ठरते. त्या काळातील न्यायविषयक प्रमुख तीन सिध्दांत पुढील प्रमाणे :–

### १. न्यायाचा परंपरागत सिध्दांत :–

सिफॉलस व पॉलिमारकस यांनी न्यायविषयक मांडलेला परंपरागत सिध्दांतामध्ये ते असे स्पष्ट करतात की, न्याय ही एक कला असून ती मित्रांना सुख देण्यात व शत्रूंना दुःख देण्यात सामावलेली आहे. ही न्यायाची संकल्पना प्लेटोस पटत नाही. त्यांच्या मते, कोणत्याही व्यक्तीला, शत्रूला सुध्दा हानी पोहचविणे हा न्याय होऊ शकत नाही. स्थल–काल, परिस्थिती यानुसार न्यायाची भूमिका बदलावी लागते. परंतु हा सिध्दांत असे बदल मान्य न करता परंपरागत दृष्टीकोन स्वीकारतो. म्हणून हा सिध्दांत निरुपयोगी ठरतो. कारण न्यायाच्या सर्व बाजू समान असतात. न्याय ही कला आहे या दृष्टीकोनासही प्लेटो विरोध करतो. उदा. एखाद्या वैद्याला शल्यचिकित्सेची कला अवगत आहे, असेल म्हणून तो एखाद्या रोग्यास जीवदान देईल अथवा मारून टाकू शकेल, त्याचप्रमाणे न्याय ही कला आहे असे म्हणणे चुकीचे आहे.

### २. न्यायाचा क्रांतिकारी सिध्दांत :–

थ्रॅसिमाकस् या क्रांतीकारी सोफिस्टांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या विचारवंताच्या मते, ''शक्तिशाली व्यक्तीची इच्छा म्हणजे न्याय होय.'' समाजातील सामर्थ्यवान, बलवान व्यक्तीने व्यक्त केलेली इच्छा म्हणजे कायदा होय.'' अशक्त लोकांनी हा कायदा पाळणे म्हणजे न्याय आणि कायदा न पाळणे म्हणजे अन्याय होय. जो आज्ञाभंग करेल तो दंडास पात्र ठरेल. थ्रॅसिमाकस्च्या मते, अन्यायी व्यक्ती न्यायशील

व्यक्तीपेक्षा अधिक सुखी असते म्हणून शासक वर्गाने अन्यायी वृत्तीने वागावे म्हणजे त्यांचे जीवन सुखाचे होईल. मात्र प्लेटोच्या मते, शासनाची प्रत्येक आज्ञा न्याय ठरूशकत नाही. ज्यापध्दतीने वैद्याचे काम रोग्यावर उपचार करून रोग बरा करणे हे असते. तसेच शासकांचे कार्य नि:स्वार्थ बुध्दीने शासितांचे हित पाहण्याचे असते म्हणून शासकांनी केवळ स्वत:च्या हिताचा विचार करणे अयोग्य होय.

**३. न्यायाचा व्यवहारवादी सिध्दांत :-**

म्युकॉन या तत्त्ववेत्यांनी क्रांतिकारी सिध्दांताच्या विरोधी हा व्यवहारवादी सिध्दांत मांडला. म्युकॉनच्या मते, न्याय हा नैसर्गिक नसून तो कृत्रिम आहे. निसर्गावस्थेतील बलवान लोक दुर्बल लोकांवर अत्याचार करत ह्या अत्याचारांचा विरोध म्हणून त्यांनी आपासात करार केला. त्यानुसार कायद्याचे स्वरूप निश्चित करण्यात आले. शक्तिशाली व्यक्तीच्या भीतीमुळे दुर्बल लोकांना संघटित होऊन स्वरक्षणासाठी कायदा व न्यायाची निर्मिती केली. न्याय हा भीतीमुळे निर्माण झाला आहे. भीती हा न्यायाचा आधार आहे. मात्र प्लेटोच्या मते, न्याय हा आत्माचा गुण आहे. तो कृत्रिम किंवा अनैसर्गिक नाही. कायदे पाळले जातात ते भीती किंवा शक्तीच्या आधारावर नसून ते त्यांनी स्वत:च्या इच्छेने बनविलेले असतात म्हणून समाजाच्या ईच्छेने साकार रूप म्हणजे कायदा आहे.

प्लेटोने या तीन्ही न्यायविषयक सिध्दांताचे खंडन करून आपला स्वत:चा न्यायविषयक सिध्दांत मांडला.

**❑ प्लेटोचा न्यायविषयक सिध्दांत :-**

प्लेटोने मांडलेली न्यायाची संकल्पना हा त्यांच्या तत्त्वज्ञानातील उत्कर्ष बिंदू आहे. त्यांच्या मते, वासनेला व स्वार्थाला आवर घालून व्यक्तीला सन्मार्गाने वागण्यास भाग पाडणारी जी प्रेरणा असते ती 'न्याय' होय. प्लेटोच्या मते, 'न्याय' ही कायद्यापुरती वा हक्कापुरती बाब नसून तो आत्माच्या गुण आहे. प्लेटोची न्यायविषयक कल्पना नैतिक स्वरूपाची आहे. ज्या गुणधर्मामुळे व्यक्तीला आपापल्या भूमिकेत उत्तम व्यक्ती होता येते व ज्यांच्या प्रमाणात ती कमी अधिक चांगली ठरते. त्यांना प्लेटो गुण (व्हर्च्यू) असे संबोधतो. मानवी गुणवत्ता प्लेटोच्या मते, प्रत्येक व्यक्तीच्या अंगी कमी-जास्त प्रमाणात असते. त्याच्या मते, प्रत्येक व्यक्तीमध्ये तीन प्रकारच्या भावना असतात. (१) वासना (२) बुध्दि (३) साहस. प्लेटोच्या मते, वासनाप्रधान लोक उत्पादनकार्य, बुध्दिमान लोक शासनकार्य कुशलतापूर्वक आणि साहसप्रधान लोक आंतरिक व बाह्य संरक्षणाचे कार्य चांगल्यारितीने करतात. प्लेटोच्या मते जेव्हा हे तीन वर्ग आपआपल्या गुणानुसार कार्य करतात तेव्हा राज्यात न्यायाचे वातावरण निर्माण होऊ शकते. न्याय म्हणजे थोडक्यात, आपल्या कर्तव्याचे पालन असे प्लेटो स्पष्ट करतो. प्रत्येक नागरिक आपल्या कार्यावरच लक्ष केंद्रित करून दुसऱ्याच्या कार्यात हस्तक्षेप न करणे होय, म्हणजे न्याय प्रस्थापित होणे अशी भूमिका प्लेटो न्यायाविषयी व्यक्त करतो. थोडक्यात, न्यायविषयक भूमिका व्यक्त करताना प्लेटो न्याय म्हणजे आत्म्याची प्रतिध्वनी आहे हे स्पष्ट करतो. आदर्श राज्याचा आधारच न्याय आहे असे प्लेटो मत व्यक्त करून आदर्श राज्याची संकल्पना न्यायावर अधिष्ठित आहे असे म्हणतो.

- **प्लेटोच्या न्यायविषयक सिध्दांताची वैशिष्ट्ये :-**

१. प्लेटोने न्यायाचा सिध्दांत आत्म्याशी जोडला आहे.

२. प्लेटोने न्यायविषयक कल्पना नैतिकतेवर आधारलेली आहे.

३. प्लेटो, मनुष्यातील तीन प्रवृत्तीच्या आधारावर तीन वर्ग पाडतो व प्रत्येकाला त्याच्या वाट्याचे कार्य दुसऱ्या कार्यात हस्तक्षेप न करता करावयास सांगतो. येथे प्लेटोला सामाजिक न्याय अभिप्रेत होता ही वैशिष्ट्ये प्लेटोच्या न्यायविषयक सिध्दांतात आढळते.

- **प्लेटोच्या न्यायसिध्दांताचे टीकात्मक परीक्षण :-**

प्लेटोच्या न्यायसिध्दांतावर मोठ्या प्रमाणात टीका झाली. तो व्यक्तीचे स्वतंत्र अस्तित्व नाकारतो आणि राज्य हे व्यक्ती विकासाचे साधन न मानता राज्य हेच साधन मानतो. प्लेटोच्या न्यायाच्या सिध्दांतामध्ये व्यक्तीला राज्याहून दुय्यम स्थान दिले आहे. तो उत्पादक वर्गास राजकीय हक्क तर शासकास खासगी संपत्ती बाळगण्याचा अधिकार नाकारतो. तत्त्वज्ञ बुद्धिवादी राज्यकर्त्या वर्गाला अधिक महत्त्व दिले आहे. व्यक्तीला तिच्या अंगच्या गुणानुसार जे काम दिले जाते तेच तिने अखेरपर्यंत करावे ही भूमिका चुकीची वाटते. 'प्रत्येकाने एक निश्चित काम सतत करीत राहावे' या म्हणण्याला फारसा अर्थ उरत नाही. राज्याची ध्येये व उद्दिष्ट्ये सतत तीच राहत नसतात. उद्दिष्टे बदलली की कामाचे स्वरूप व स्थानही बदलते. एकूणच प्लेटोने न्यायविषयक विचारात व्यक्ती व समाज एकरूप मानण्यात आले आहे. त्यामुळे व्यक्तीचे स्वतं अस्तित्व नष्ट होते.

*** स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२ ***

१. प्लेटो हा कोणाचा शिष्य आहे?

२. आदर्श राज्याची कल्पना प्लेटोने कोणत्या ग्रंथात मांडली?

३. प्लेटोने आदर्श राज्यासाठी किती लोकसंख्या असावी असे सांगितले?

४. प्लेटोचा साम्यवाद कोणत्या वर्गासाठी आहे?

५. प्लेटोच्या मते, प्रत्येक व्यक्तीमध्ये किती व कोणत्या प्रकारच्या भावना असतात?

## १.२.३नागरिकत्व, राज्य आणि क्रांतीविषयक विचार

- **ॲरिस्टॉटल :-**

ॲरिस्टॉटलचा कालखंड इ.स. पूर्व ३८४ ते इ.स. पूर्व ३२२ असा आहे. ॲरिस्टॉटल प्लेटोच्या अकादमीत शिकला होता. ॲरिस्टॉटल ही प्लेटोचा शिष्य म्हणून ओळखला जातो. जगज्जेता अलेक्झांडर (सिंकदर) याच्या शिक्षणावर लक्ष ठेवण्याचे काम ॲरिस्टॉटलने तीन वर्षे केले. अथेन्समध्ये एक अकादमीची स्थापना करून प्लेटोच्या अकादमीपेक्षा वेगळ्या अशा अध्यापन परंपरा निर्माण करण्याचा प्रयत्न त्याने केला.

१२ वर्षे त्याने हे कार्य केले. ज्ञानाच्या जवळपास प्रत्येक क्षेत्रामध्ये संशोधन चिंतन, अध्यापन, ॲरिस्टॉटलने केले. सिकंदरचा दरबार ॲरिस्टॉटलच्या पाठीशी उभा होता मात्र सिंकदरच्या मृत्यूनंतर मॅसिडोनियन विरोधी पक्षाकडे अथेन्सची सत्ता गेल्याने ॲरिस्टॉटलला तिथे राहण्याचे, धोक्याचे वाटल्याने त्याने नगरराज्य सोडले. वयाच्या ६२ व्या वर्षी यूबीआ बेटावरील कॅल्सिस येथे ॲरिस्टॉटलचा मृत्यू झाला.

ॲरिस्टॉटलच्या राजकीय विचारांवर प्लेटोच्या 'लॉज' या ग्रंथाचा विशेष प्रभाव आढळतो. प्लेटोचे सिध्दांत व निष्कर्ष त्याने बव्हंशी स्वीकारले होते. राजकारणी, लोकांची मार्गदर्शिका आपण द्यावी हाच 'पॉलिटिक्स' हा ग्रंथ लिहिण्यामागे ॲरिस्टॉटलची भूमिका होती. ॲरिस्टॉटलची अभ्यासपध्दती तर्कशुध्द वैज्ञानिक, वास्तववादी व तौलनिक स्वरूपाची होती. विविध ज्ञानशाखांमध्ये चिंतन, लेखन केलेला आणि नैसर्गिक व सामाजिकशास्त्राचा पाया घालणारा शास्त्रीय व वास्तववादी विचारसरणीचा तो पहिला महान तत्वज्ञ होय. ॲरिस्टॉटलने गणितापेक्षा निरीक्षण, संशोधन, परीक्षण यावर अधिक भर देऊन वास्तववादी विचार मांडण्याचा प्रयत्न केला. ॲरिस्टॉटलच्या या तर्कसंगत व शास्त्रशुध्द अभ्यास पध्दतीमुळे आज आधुनिक राजकीय विचारवंत त्याची वर्गीकरण पायाभूत मांडून नवी वर्गीकरण मांडताना दिसतात. एकूणच ॲरिस्टॉटलला 'राज्यशास्त्राचा जनक' असे म्हटले जाते.

### ❑ ॲरिस्टॉटलचे नागरिकत्वाविषयी विचार :-

'दि पॉलिटिक्स' या ग्रंथाच्या तिसऱ्या विभागात ॲरिस्टॉटलने नागरिकत्वासंबंधी विचार मांडलेले आहेत; नागरिक कोणास म्हणावे याचे विवेचन करण्यापूर्वी ॲरिस्टॉटल प्रथम नागरिक या संज्ञेला पात्र नसणारी भूमिका स्पष्ट करतो, त्याच्या मते, राज्यात राहणारी प्रत्येक व्यक्ती नागरिक नसते. त्यांच्या मते,

१) केवळ एका ठिकाणी राहिल्याने त्या ठिकाणची ती व्यक्ति नागरिक होवू शकत नाही. स्त्रीया, गुलाम, मुले व परकीय यांना तेथील नागरिक समजले जात नाही.

२) कुटुंब नसलेल्या कौटुंबिक जीवन नसलेल्या व संपत्ती नसलेल्या व्यक्तींना नागरिकत्व बहाल करू नये असे तो म्हणतो.

३) राज्यातील न्यायालयाद्वारे न्याय मिळविणाऱ्या व्यक्तिलाही त्या-राज्याचे नागरिक म्हणता येणार नाही, कारण राज्यातील परकियांनाही न्याय मिळविण्याचा अधिकार असल्याने परकीय हे नागरिक नसतात.

ॲरिस्टॉटलच्या मते, नागरिकत्वाची व्याख्या पुढीलप्रमाणे, ''नागरिक म्हणजे अशी व्यक्ती की जी न्यायशासनात आणि विधिनियमांच्या निर्मितीच्या कार्यात सर्वसाधारण विधीमंडळाचा सदस्य या नात्याने भाग घेते. राज्याच्या या दोन्ही कार्यात किंवा एका कार्यात भाग घेणारी व्यक्ती नागरिक ठरते.''

नागरिकत्वाचे अधिकार असलेल्या लोकांची संख्या मर्यादित असल्याने सर्व नागरिकांना राजकीय सत्तेत सहभागी होणे शक्य होते. अथेन्समध्ये राजकीय अधिकारपदे तसेच न्यायाधिश पदे ही निर्वाचित

असत. नागरिकांची संख्या मर्यादित असल्याने बहुतेक नागरिकांना एखादे राजकीय पद उपभोगता येत असे. फक्त लोकप्रतिनिधी निवडून देण्यापुरते नागरिकत्व मर्यादित नव्हते तर राज्याच्या कार्यकारी, कायदेशीर व न्यायीक सत्तेमध्ये प्रत्येक आणि सहभाग अशी ॲरिस्टॉटल नागरिकत्वाच्या भूमिकेबद्दल आपले मत व्यक्त करतो. राज्यकारभार करणे किंवा न्यायदानाचे कार्य करणे यासाठी उच्च दर्जाची बौध्दिक क्षमता व नैतिकता आवश्यक असल्याने तो नागरिकत्व अशाच लोकांना बहाल करतो. श्रमजीवी, शारीरिक कष्टाची कामे करणाऱ्या लोकांना पुरेसा वेळ नसल्याने तो अशा लोकांना नागरिकत्वाचा दर्जा देत नाही. नैतिक, बौध्दिक कार्ये पार पाडण्यासाठी लोकांना फुरसतीचा वेळ असावयास लागतो तो वेळ कष्टकरी, श्रमजीवी लोकांजवळ नसतो. यामुळेच ॲरिस्टॉटल नगरराज्यात गुलाम, स्त्रिया, परकीय लोक यांना नागरिकत्व देत नाही.

प्लेटो सत्ताधारी वर्ग, सैनिक वर्ग, उत्पादक वर्ग अशा सर्वांना राज्याचे नागरिकत्व बहाल करतो, परंतु ॲरिस्टॉटल उत्पादक वर्गास नागरिकत्वाचा दर्जा देत नाही. हा फरक प्लेटो व ॲरिस्टॉटलच्या नागरिकत्वाच्या विचारांबाबत आढळून येतो. मात्र प्लेटो उत्पादक वर्गास राजकीय सत्तेत सहभागी होण्यास मज्जाव करतो, त्या अर्थाने राजकीय सहभागाबाबतचे दोघांचेही विचार सारखे वाटतात.

याच अर्थाने नागरिकत्वाची व्याख्या करताना तत्कालीन नगरराज्यात अस्तित्वात असणाऱ्या गुलामांना ॲरिस्टॉटलने वगळले आहे. त्याच्या मते निसर्गत: काही लोक बुध्दिमान असतात तर काही बुध्दिहीन त्यामुळे काही लोक जन्मत:च स्वामित्व गाजविण्यासाठी जन्मतात तर काही दुसऱ्याच्या आज्ञेत राहण्यासाठी, दुसऱ्याची सेवा करण्यासाठीच जन्माला येतात. हे गुलाम दरिद्री, युध्दबंदी किंवा बाहेरील देशातून विकत आणलेले असतात. त्यामुळे ॲरिस्टॉटल गुलामांना नागरिकत्वाचा दर्जा देत नाही, तो नागरिकत्वासाठी गुलामांना अपात्र ठरवितो.

- **ॲरिस्टॉटलच्या नागरिकत्वाच्या विचारांवर करण्यात येणारी टीका :–**

  १) नागरिकत्वासंबंधीचे विचार तत्कालीन परिस्थितीनुरूप अयोग्य वाटतात. भौगोलिक क्षेत्रफळ व विशाल जनसंख्येमुळे प्रत्येकजण न्यायालयीन व विधिनिर्मिती कार्यात सहभागी होऊ शकत नाही.

  २) नागरिकत्वाची व्याख्या लोकशाहीच्या, समानतेच्या विरोधात आहे. ॲरिस्टॉटल गुलाम, स्त्रिया यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून नागरिक म्हणून दर्जा देत नाही.

  ३) ॲरिस्टॉटलने धनिक लोकांना गुणवत्तेच्या निकष लावलेला नाही. केवळ संपत्ती या धाकाला महत्त्व दिल्यामुळे धनिकांना राजकारणात तो स्थान देतो.

एकंदरीतच ॲरिस्टॉटलने केलेली नागरिकत्वाच्या संदर्भातील व्याख्या व व्यक्त केलेले विचार संकुचित स्वरूपाचे वाटतात.

- **ॲरिस्टॉटलचे राज्यासंबंधीचे विचार :–**

ॲरिस्टॉटलने आपल्या 'दि पॉलिटीक्स' या ग्रंथातील पहिल्या भागात राज्याचा उदय, त्यांचे स्वरूप आणि राज्यसंस्थेचा उद्देश या प्रश्नांची चर्चा केली आहे. राज्य ही ईश्वरनिर्मित आहे, या स्पष्टीकरणांवर ॲरिस्टॉटल विश्वास ठेवू शकत नाही. राज्य हे निसर्गत:च निर्माण झालेले आहे असे ॲरिस्टॉटल मानतो.

ॲरिस्टॉटलच्या मते, मानव व स्वभावत:च समाजप्रिय व समाजाभिमुख आहे. त्यांच्या मते, 'ज्या माणसाला समाजात राहता येत नाही किंवा जो स्वयंपूर्ण असल्याने त्याला समाजाची गरज नसते, तो पशू तरी आसला पाहिजे किंवा परमेश्वर तरी असला पाहिजे. ॲरिस्टॉटल म्हणतो, आपल्या गरजा आणि इच्छा पूर्ण करण्यासाठी लोकांनी केलेल्या प्रयत्नातून राज्याचा उदय झालेला आहे.

ॲरिस्टॉटलच्या मते, राज्याची मूलभूत वैशिष्ट्ये पूर्णपणे आहेत.

**१. राज्य स्वाभाविक संस्था आहे :–**

ॲरिस्टॉटलच्या मते, राज्य ही एक नैसर्गिक संस्था आहे. माणूस स्वभावत:च सामाजिक व समूहप्रिय प्राणी आहे. आपल्या आवश्यकतांच्या पूर्तता करण्यासाठी त्याला समाजावर अवलंबून राहावे लागते. ॲरिस्टॉटलच्या मते, मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. तसाच तो राजकीय प्राणी आहे. राज्याची उत्पत्ती मनुष्य स्वभावातून झाली आहे, असे ॲरिस्टॉटल म्हणतो.

**२. राज्य मानवी शरिरासारखे आहे :–**

ॲरिस्टॉटलने राज्याचे सेंद्रीय स्वरूप व्यक्त केले आहे. राज्य हे मानवी शरीराप्रमाणे आहे. शरिराचे अवयव अलग–अलग असले तरी ते संपूर्ण शरीराचा अविभाज्य भाग म्हणून कार्य करतात. सर्व अवयवांना एकत्र ठेवणारे व त्यांच्यात एकसंघता मानणारे प्राण तत्त्व असते. याचप्रमाणे कुटुंब किंवा गाव हे राज्याचे अविभाज्य घटक आहेत. शरीर नष्ट झाल्यास जशी अवयवांना किंमत रहात नाही, तसेच राज्यरूपी शरीर नष्ट झाल्यास व्यक्तीला किंवा इतर घटकांना महत्त्व राहत नाही.

**३. राज्य मनुष्यापेक्षा पहिले :–**

ॲरिस्टॉटलच्या मते, 'राज्य हे व्यक्तीच्या पहिले आहे.' ऐतिहासिक विकासाच्या दृष्टीने प्रथम व्यक्तीचे कुटुंब बनले. कुटुंबाचे गाव बनले, गावाचे राज्य बनले. पण ॲरिस्टॉटल म्हणतो, राज्य पहिले बनले. ॲरिस्टॉटलच्या मते, राज्य हे पूर्ण शरीर आहे व पूर्ण शरीराच्या उत्पत्तीशिवाय अवयवाची उत्पत्ती शक्य नाही. शरीराशिवाय आपण इतर अंगाची कल्पना करू शकत नाही, त्याप्रमाणे राज्याशिवाय व्यक्तीची कल्पना करू शकत नाही.

**४. राज्य : सर्वोच्च संस्था :–**

ॲरिस्टॉटलच्या मते, राज्य ही सर्व संस्थामधील सर्वोच्च संस्था आहे. मनुष्याच्या आवश्यकता वेगवेगळ्या असतात, त्या पूर्ण करण्यासाठी निरनिराळे समुदाय स्थापन केले जातात. मात्र या वेगवेगळ्या समुदाय किंवा संस्थांमध्ये श्रेष्ठ असणारी संस्था म्हणजे तो राज्यसंस्थेस प्राधान्य देतो. त्यांच्या मते, सर्व संस्थामध्ये ती सर्वश्रेष्ठ आहे. मानवाचे सर्वोच्च हित साध्य करणे हे तिचे उद्दिष्ट आहे. कुटुंबसंस्था माणसाच्या भौतिक गरजा भागवते. पण उच्च दर्जाच्या नैतिक व बौध्दिक गरजांच्या पूर्ततेसाठी माणसाला राज्यसंस्थेची जरूरी भासते. त्यामुळे ॲरिस्टॉटल राज्यास सर्वोच्च संस्था सर्वोच्च समुदाय मानतो.

**५. राज्याचे उद्देश आणि कार्ये :–**

ॲरिस्टॉटलच्या मते, मनुष्याचा उद्देश केवळ जीवन जगणेच नाही तर एका आदर्श व श्रेष्ठ जीवनाची प्राप्ती करून घेण्याचा आहे. त्याच्या मते. ''राज्य मानवी जीवनासाठी निर्माण झाले आणि चांगल्या जीवनासाठी टिकून राहिले. मनुष्याला चांगले सद्‌गुणी बनविण्यासाठी राज्याने त्यांच्या नैतिक गुणांचा विकास करावा. ॲरिस्टॉटलच्या मते, मनुष्य गुण आणि दोषांचा समन्वय आहे. राज्याने मनुष्याच्या दोषांवर अंकुश ठेवावा. समाजात न्याय व्यवस्था प्रस्थापित करून उच्च प्रतीचे जीवन जगता यावे यासाठी राज्याने कार्य करावे.

- **राज्यांचे वर्गीकरण :–**

ॲरिस्टॉटलने त्याच्या 'पॉलिटिक्स' या ग्रंथाच्या तिसऱ्या भागात संविधानाने वर्गीकरण केलेले आहे. त्याने राज्यसंस्था व शासनसंस्था यात संबंध असे स्पष्ट केले आहे की, सत्तारूढ व्यक्ती बदलत्या की शासन बदलते पण राज्यसंस्था तीच राहते.

राज्याचे वर्गीकरण करताना ॲरिस्टॉटल दोन तत्त्वांचा आधार घेतो.

१. **संख्यात्मक तत्त्व :** राज्यातील सार्वभौम सत्तेचा वापर करणाऱ्या व्यक्तिची संख्या किती आहे हे पाहणे.

२. **गुणात्मक तत्त्व :** गुणात्मक तत्त्व म्हणजे राज्यसत्ता वापरण्यामागील त्या व्यक्तीचा हेतू स्वार्थी आहे की नि:स्वार्थी आहे हे पाहणे होय.

ॲरिस्टॉटलने केलेले राज्याचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे :–

| राज्यकर्त्यांची संख्या | सर्वसाधारण राज्यप्रकार | विकृत राज्यप्रकार |
|---|---|---|
| एक व्यक्ती | राजेशाही | हुकूमशाही |
| काही व्यक्ती | महाजनशक्ती | धनिकशक्ती |
| अनेक व्यक्ती | बहुजनशाही | लोकशाही |

ॲरिस्टॉटलने राज्याचे महा प्रकार सांगून त्याचे स्वरूप विशद केलेले दिसून येते.

१. **राजेशाही :** या प्रकारात सार्वभौमसत्ता एका व्यक्तीच्या हाती असते. राजा विवेकानुसार वागत आल्याने राजा जनहित साध्य करण्यासाठी प्रयत्नशील राहतो.

२. **हुकूमशाही :** या प्रकारात सार्वभौमसत्तेचा वापर एकाच व्यक्तीच्या हातात असला तरी राजा जनहितानुसार कारभार करत नसेल व सत्तेचा वापर स्वार्थासाठी करीत असेल तो विकृत राज्यप्रकार होतो.

३. **महाजनशाही :** या प्रकारात सत्ता काही लोकांच्या हातात असून ते जनहित हा उद्देश समोर ठेवून कार्य करतात त्यावेळी त्यांना महाजनशाही असे म्हणतात.

४. **धनिकशाही :** या प्रकारात सत्ता काही लोकांच्याच हातात असते. पण त्याचा वापर ते स्वार्थासाठी, स्वहितासाठी करतात, त्यावेळी हा विकृत राज्यप्रकार ठरतो.

५. **बहुजनशाही :** या पध्दतीत पूर्ण सत्ता जनतेच्या हाती असते. सर्वसामान्य लोकांना राज्याच्या सत्तेत सहभागी करून घेतले जाते. त्यांच्या सहकार्याने काही गुणवान व समर्थ व्यक्तींच्या नेतृत्वाखाली कायद्याचे राज्य निर्माण होते. ॲरिस्टॉटलच्या मते, या सहाही प्रकारांमध्ये सर्वोत्तम राज्यप्रकार बहुजनशाही (गणराज्य) आहे.

६. **लोकशाही :** ॲरिस्टॉटलच्या मते, सर्वात वाईट राज्य प्रकार म्हणजे लोकशाही होय. लोकशाहीत राज्याची सार्वभौम सत्ता लोकांकडे असते. नागरिकांच्या भिन्न पात्रता लक्षात न घेता त्यांना सारख्याच प्रकारे वागणूक दिली जाते. परिणामी सर्व मूल्ये पायदळी तुडवली जातात व भ्रष्टाचार जुलूम वाढतो.

ॲरिस्टॉटलने तत्कालीन ग्रीक नगरराज्यातील १५८ राज्यघटनांचा सखोल अभ्यास केलेला होता. ॲरिस्टॉटलच्या काळातील नगरराज्ये, भौगोलिक क्षेत्रफळ व लोकसंख्या यांच्यादृष्टीने अलिकडील काळातील या घटकांची परिस्थिती यात फार मोठा फरक पडलेला आहे. नैतिक तत्त्वांना अधिक महत्त्व देऊन आर्थिक परिवर्तनाचा परिणाम राजकीय बदलावर होत असतो. याबद्दल ॲरिस्टॉटलने विचार केलेला दिसत नाही. तेवीसशे वर्षांपूर्वी केलेले ॲरिस्टॉटलने केलेले राज्याचे वर्गीकरण आधुनिक काळात उपयुक्त ठरताना दिसत नाही, कारण आज महाजनसत्ता, अल्पजनसत्ता असा प्रकार आज अस्तित्वात नाही. आधुनिक काळात लोकशाही हा प्रकार सर्वत्र चांगला मानत जात असताना ॲरिस्टॉटल मात्र लोकशाही हा विकृत राज्य प्रकार मानतो. स्वाभाविकच राज्याच्या वर्गीकरणामध्ये व्यक्त केलेले विचार आजच्या काळाशी तुलना करता अयोग्य व अपूर्ण असे वाटतात.

❑ **ॲरिस्टॉटलचे क्रांतीकारक विचार :–**

ॲरिस्टॉटलने 'दि पॉलिटिक्स' या ग्रंथाच्या पाचव्या व सहाव्या विभागात क्रांती, तिचे स्वरूप, कारणे व उपाय याविषयी सविस्तर वर्णन केलेले आहे. ॲरिस्टॉटल हा वास्तववादी राज्यशास्त्रज्ञ होता समकालीन ग्रीक नगरराज्यांची वारंवार होणारे राजकीय परिवर्तन ही फार मोठी राजकीय समस्या होती यास अनुसरूनच ॲरिस्टॉटलने तत्कालीन परिस्थितीचा शास्त्रीय तुलनात्मक पध्दतीने अभ्यास करून आपली मते मांडली आहेत. ॲरिस्टॉटलच्या मते, राज्यक्रांती बहुधा असंतोषामुळेच होते. राज्यक्रांतीने राज्यात परिवर्तन होते.

राज्यात क्रांतीचे ॲरिस्टॉटलने पुढील प्रकार सांगितले आहेत.

१. **पूर्ण क्रांती :** जनतेचा संपूर्ण संविधानात बदल करण्याचा उद्देश असतो, तेव्हा ती पूर्ण क्रांती होते.

**२. आंशिक क्रांती :** ज्यावेळी संविधानाच्या एकाच भागात बदल होतो तेव्हा त्याला आंशिक क्रांती म्हणतात.

**३. व्यक्तिगत क्रांती :** शासनातील एखाद्या व्यक्तीला किंवा व्यक्तीसमूहाला, पदच्युत करण्यात आले तर त्याला व्यक्तिगत क्रांती असे म्हणतात.

ॲरिस्टॉटलच्या मते राज्यक्रांतीची कारणे दोन प्रकारची आहेत.

१) क्रांतीची सर्वसाधारण कारणे.

२) क्रांतीची विशिष्ट कारणे.

❑ **क्रांतीची सर्वसाधारण कारणे :–**

**१. अन्याय आणि समानतेची आकांक्षा :** जेव्हा जनतेला शासनाच्या अन्यायाची जाणीव होते तेव्हा त्या राज्यात जनतेतर्फे क्रांती होते. समाजात जेव्हा राजकीय, सामाजिक, आर्थिक अशी विषमता निर्माण होऊन जनतेला समानतेची जाणीव होती, तेव्हा असा विशिष्ट लोकांचा गट क्रांती करतो.

**२. शासनसत्तेचा दुरुपयोग :** जेव्हा शासक वर्ग स्वार्थी होऊन भ्रष्ट राज्यकारभार करू लागतात, तेव्हा अशा राज्यकर्त्याविरोधी जनतेत असंतोष प्रकट होतो आणि त्यांना सत्तेपासून दूर करण्यासाठी क्रांतीचा मार्ग अवलंबतात.

**३. श्रेष्ठत्वाची भावना :** जेव्हा समाजातील काही लोक इतर लोकांपेक्षा स्वत:ला श्रेष्ठ समजू लागतात व शासनाची सत्ता आपल्या हाती घेण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा जनतेमध्ये क्रांतीची भावना निर्माण होते.

**४. भीती :** काही वेळा अशी भीती निर्माण होते की, अमूक एखाद्या मार्गाद्वारे क्रांती होणार आहे. म्हणून भीतीने दुसरा वर्ग त्यांच्या आधी क्रांती होणार आहे, म्हणून भीतीने दुसरा वर्ग त्यांच्या आधी क्रांती करतो. अविश्वासामुळे भीती निर्माण होते आणि ही भीती क्रांतीचे कारण ठरते.

**५. शासकवर्गाचा बेजबाबदारपणा :** शासक वर्ग हा कधीकधी सत्तेचा गैरवापर करून निष्काळजीपणाने वागतात अशावेळी स्वाभाविकच समाजातील बहुसंख्य लोक अशा शासनकर्त्याच्या बेजबाबदारपणाला कंटाळून त्याविरुध्द क्रांती करतात.

**६. विभिन्न विभागातील असंतुलन :** देशातील एखाद्या विशिष्ट भागाची उन्नती होत असेल आणि इतर भागात दुर्लक्ष होत असेल तर अशावेळी इतर भागातील लोकांमध्ये क्रांतीची भावना निर्माण होते.

**७. मानसन्मानाची भावना :** राज्यकर्त्याद्वारे काहीवेळा अपात्र, अकार्यक्षम लोकांना सन्मान केला जातो आणि समाजातील गुणवान, कर्तृत्ववान लोकांची उपेक्षा हाते अशावेळी लोकांना राज्यकर्त्यांविषयी द्वेष, तिरस्कार निर्माण होऊन क्रांतीची भावना निर्माण होते, क्रांती होते.

८. **अल्पपरिवर्तनाची उपेक्षा :** राज्यामध्ये होणारी अनेक लहान सहान परिवर्तनाकडे शासकांनी वेळीच लक्ष न दिल्यास पुढे त्याचे क्रांतीमध्ये रूपांतर होते. काहीवेळा जनतेला अपेक्षित असणाऱ्या लहानसहान बदलांची लोकांच्या भावनाची कदर केली गेली नाही तर पुढे त्यांचे क्रांतीत रूपांतर होण्याचा धोका असतो.

❑ **क्रांतीची विशिष्ट कारणे :-**

ॲरिस्टॉटलने विशिष्ट प्रकारच्या शासनप्रणालीत विशिष्ट कारणे क्रांतीसाठी प्रभावी ठरतात.

१. **राजेशाहीमधील क्रांती :** राजघराण्यामध्ये होणारी कौटुंबिक भांडणे, घृणा, ईर्षा, सत्तास्पर्धा या कारणास्तव तसेच शासकाच्या अत्याधिक अत्याचारामुळे जनता क्रांती करण्यास प्रवृत्त होते.

२. **महाजनशाहीमध्ये क्रांती :** महाजनशाहीत मर्यादित लोकांनाच पदाची व प्रतिष्ठेची प्राप्ती होते व ते सत्तास्पर्धा, स्वार्थ, भ्रष्टाचार या दोषांमुळे लोकांवर अत्याचार, जुलूम करू लागतात, अशावेळी जनतेच्या मनात क्रांतीची भावना निर्माण होताना दिसते.

३. **लोकशाहीमधील क्रांती :** लोकशाहीमध्ये स्वातंत्र्य, समता ही तत्त्वे डावलून शासक भ्रष्टाचार, सत्तेचा दुरुपयोग करतात तेव्हा जनतेत क्रांतीची भावना निर्माण होते. काहीवेळा सत्तारूढ पक्षाविरुध्द विरोधी पक्ष जनमत भडकवून जनतेद्वारा क्रांती घडवून आणतो.

❑ **क्रांतीबंधक उपाय :-**

१. **न्याय आणि राज्यघटनेबद्दल आदर :** क्रांती टाळण्याचे महत्त्वपूर्ण उपाय म्हणजे जनतेमध्ये न्याय आणि राज्यघटनेबद्दल आदर आणि निष्ठा निर्माण करणे व कायदेभंगाला वेळीच आवर घालणे.

२. **शिक्षणप्रसार :** क्रांती टाळण्याचा सर्वोत्तम उपाय म्हणजे शिक्षण असे ॲरिस्टॉटल म्हणतो. शिक्षणामुळे व्यक्ती ज्ञानी, सुसंस्कृत बनते. क्रांती, तिचे परिणाम याविषयी ज्ञान शिक्षणामुळे नागरिकांना कळते.

३. **सत्तेचे विकेंद्रीकरण करणे :** राज्यामध्ये कोणत्याही एका वर्गाच्या हाती सत्ता केंद्रित होऊ न देता तिचे विकेंद्रीकरण करावे असे ॲरिस्टॉटल म्हणतो. सत्ता एका व्यक्ती किंवा व्यक्तीसमूहाकडे केंद्रित झाल्यास ती निरंकुश व अमर्यादित बनून जुलमी व अत्याचारी होऊ शकते, म्हणून सत्तेचे विकेंद्रीकरण हा क्रांतीबंधक उपाय ॲरिस्टॉटल सांगतो.

४. **जागृत, जबाबदार शासक :** शासक वर्ग हा नेहमी जागृत जबाबदारीने कार्य करणारा असावा. नागरिकांवर कोणत्याही प्रकारचा अत्याचार, जुलूम होणार नाही, याविषयी जागृत असला पाहिजे. जबाबदारीने जनतेप्रती त्याने आपले कार्य करत रहावे. जनतेमध्ये विश्वास निर्माण करावा.

५. **निष्पक्षपातीपणे पद व पदव्याचे वितरण :** अधिकारपदातील विषमता हे क्रांतीचे महत्त्वाचे कारण ठरू शकते. त्यामुळे राज्यातील पदनियुक्ती व्यक्तीच्या त्या पदास अनुसरून योग्यतेप्रमाणे करावी.

राज्यकारभार, प्रशासन या क्षेत्रांत सर्वांना योग्यतेनुसार समान संधी द्यावी असे ॲरिस्टॉटल म्हणतो. यामुळे साहजिकच राज्य, प्रशासनाविषयी लोकांच्या मनात विश्वास निर्माण होतो.

६. **पदांचा अवधी कमी असावा :** ॲरिस्टॉटलच्या मते, शासनाच्या पदाधिकाऱ्यांचा कार्यकाल सहा महिन्यापेक्षा अधिक ठेवू नये, म्हणजे त्यांना लाचलुचपत, अन्याय वा भ्रष्टाचार करण्यास वाव मिळणार नाही. सर्वांनाच यामुळे विविध शासकीय पदांवर काम करण्यास संधी मिळेल.

७. **आर्थिक विषमता कमी करणे व मध्यम वर्गाची निर्मिती करणे :** आर्थिक विषमता हे क्रांतीचे कारण ठरू शकते त्यामुळे ॲरिस्टॉटल धनिक व गरिब यात संतुलन निर्माण करण्यासाठी समाजात मध्यमवर्ग वाढविण्याचा प्रयत्न करावा असे सांगतो व आर्थिक विषमता कमी करण्यासाठी राज्याने प्रयत्न करावे असे सुचवितो.

८. **लोकांना भावी संकटाची माहिती द्यावी :** ॲरिस्टॉटलने क्रांती रोखण्यासाठी मानसिक उपाय सुचविला आहे. नागरिक क्रांतीच्या दिशेने वळणार नाहीत यासाठी राज्याने त्यांना भावी संकटाची जाणीव करून द्यावी. राज्यात परकीय आक्रमणाची भीती दाखवून जनतेमध्ये देशप्रेमाची भावना सतत जागृत ठेवावयास हवे, यामुळे जनता अंतर्गत विषमता, अन्याय या गोष्टीकडे दुर्लक्ष करेल व क्रांती टाळली जाऊ शकेल असे ॲरिस्टॉटल म्हणतो.

साधारणपणे ॲरिस्टॉटलने अशाप्रकारे क्रांतीप्रतिबंधक अनेक उपाय आपल्या राजकीय विचाराद्वारे व्यक्त केले आहेत. याचपध्दतीने तो हुकूमशाहीतील क्रांती टाळण्यासाठी तो हुकुमशहास शिक्षणप्रसारास विरोध करणे, लोकांना नेहमी उद्योगधंद्यात गुंतवून ठेवणे, लोकांना अधिक श्रीमंत होऊ न देणे, गुप्तहेर यंत्रणेमध्ये स्त्रीयांचा समावेश करणे, समाजातील विभिन्न वर्गात एकता निर्माण होऊ न देणे, बाह्य आक्रमणाचा धोका जनतेसमोर ठेवावा, कायद्याची कडक अंमलबजावणी करावी अशा प्रकारचे विचार व्यक्त करून हुकूमशहातील क्रांती टाळण्याचे मार्ग सांगतो. याचप्रकारे तो लोकशाही शासनयंत्रणेतील क्रांती टाळण्यासाठी विविध उपाय सुचवितो. यामध्ये तो धनिक लोकांपासून लोकशाहीस असणारा धोका ओळखून त्यांना शासनकारभारात सहभागी करून घेणे, त्यांच्या संपत्तीचे रक्षण करणे, समाजातील विभिन्न वर्गात सहकार्य, सामंजस्य निर्माण करणे, सामान्य जनतेच्या प्राथमिक गरजा (अन्न, वस्त्र,.निवारा) या भागवाव्यात अशा क्रांतीप्रतिबंधक उपाययोजना लोकशाहीतील क्रांती टाळण्यासाठी सुचवितो.

**✻ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-३ ✻**

१. ॲरिस्टॉटल कोणाचा शिष्य आहे?

२. ॲरिस्टॉटलला कशाचे जनक म्हटले जाते?

३. ॲरिस्टॉटलने कोणता ग्रंथ लिहिला?

४. ॲरिस्टॉटलने नागरिकत्व कोणासा नाकारले आहे?

५. ॲरिस्टॉटलने क्रांतीचे कोणते प्रकार सांगितले आहे?

## १.३ सारांश

राजकीय विचारांचा अभ्यास करताना सॉक्रिटिस, प्लेटो व ॲरिस्टॉटल यांच्या विचारांचा अभ्यास केल्याशिवाय राजकीय अभ्यास पूर्ण होऊ शकत नाही. हे तिघेही ग्रीक नगरराज्यातील होते. ग्रीक नगरराज्यातील तत्कालीन परिस्थितीचा राजकीय दृष्टीने अभ्यास करून या तिघांनी आपले विचार जगासमोर मांडले. सॉक्रिटिस हा प्लेटोचा गुरू होता, प्लेटो हा ॲरिस्टॉटलचा गुरू आहे. या अर्थाने तिघांची वैचारिक भूमिका ही काही प्रमाणात सारखी दिसते.

सॉक्रिटिस स्वत: प्रत्यक्ष राजकारणापासून अलिप्त होता. त्याचे लिखित साहित्य आढळत नाही. प्रश्नोत्तराच्या संवादाच्या माध्यमातून त्याने तात्वीक व राजकीय प्रबोधनाचे कार्य केले, विचार व्यक्त केले. सॉक्रिटिसच्या मते, राज्यकारभार चालविणे, राजकारणात सहभागी होणे ही सर्वश्रेष्ठ कला आहे. राज्यकारभाराचे उत्तम ज्ञान हे सर्वश्रेष्ठ ज्ञान असते असे तो म्हणतो. कायद्याच्या नैतिकत्वावर सॉक्रिटिसचा भर होता. कायदा आणि न्याय यांच्यात एकत्व निर्माण होईल. ज्ञानामुळे, राज्यकर्ते ज्ञानी, विवेकी असतील तर ते न्याय कायदे करतील व असेच कायदे सर्वांनी पाळले पाहिजेत असे सॉक्रिटीस म्हणतो. कायदा हा नागरी जीवनाचा पाया आहे. नागरिकांनी कायदे पालन निष्ठेने करावे असा आग्रह सॉक्रिटिस करतो. यास अनुसरून सॉक्रिटिसने कायद्याप्रती निष्ठा दाखवत स्वत: विषय प्रशासनाची दिलेली शिक्षा पूर्ण केली.

सॉक्रिटिसने ज्ञान व नीतीची एकरूपता हे तत्त्व मांडले. या तत्त्वाचा आधार घेऊन प्लेटोने आदर्श राज्याची कल्पना मांडली. प्लेटोने आदर्श राज्याच्या साध्यासाठी न्याय, तत्त्वज्ञ राजा, साम्यवाद, शिक्षण व्यवस्था, स्त्री-पुरुष समानता यासारखी साधने सांगितली. मात्र समाजातील शासक व सैनिक वर्गासाठी तो संपत्तीचा आणि स्त्रियांचा साम्यवाद सांगतो आणि उत्पादक वर्गास राज्यकारभारातील सहभागापासून दूर ठेवतो. सॉक्रिटिसने मांडलेल्या मौखिक विचारांचा अभ्यास करून शिष्य या नात्याने प्लेटोने त्याच्या 'दि रिपब्लिक', 'दि स्टेटसमन' आणि 'दि लॉज' हे ग्रंथ लिहून राजकीय विचारात भर घातली.

ॲरिस्टॉटल हा प्लेटोचा शिष्य होता. त्यास 'राज्यशास्त्राचा जनक' म्हणूनही ओळखले जाते. आपल्या 'दि पॉलिटिक्स' या ग्रंथाद्वारे त्याने राज्यशास्त्राच्या राजकीय विचारात मोलाची भर घातली. विविध ज्ञानशाखांमध्ये चिंतन, लेखन केलेला आणि नैसर्गिक व सामाजिक शास्त्रांचा पाया घालणारा शास्त्रीय व वास्तववादी विचारसरणीचा तो पहिला महान तत्त्वज्ञ होता. ग्रीक नगरराज्यातील १५८ राज्यघटनांचा तुलनात्मक अभ्यास करून वास्तववादी शास्त्रीय दृष्टीने त्याने आपले विचार व्यक्त केलेत.

ॲरिस्टॉटलने व्यक्त केलेले नागरिकत्व, राज्य व क्रांतीविषयक विचार व्यक्त करताना ॲरिस्टॉटल नागरिकत्वासाठी पात्रता ठरवितो. गुलाम, स्त्रिया, परकीयांना नागरिकत्व देत नाही, त्यामुळे त्याचे हे विचार समानतेच्याविरोधात वाटतात. ॲरिस्टॉटल राज्यास सर्वोच्च स्थान देतो आणि राज्यास प्रथम प्राधान्य देतो आणि त्यानंतर नागरिकांना महत्त्व देतो. राज्याचे वर्गीकरण तो संख्यात्मक आणि गुणात्मक पध्दतीने करून सर्वोत्तम राज्यप्रकार ते गणराज्यात मानतो तर सर्वात वाईट राज्यप्रकार तो लोकशाहीत मानतो. राज्याच्या विरोधात क्रांतीची कारणे स्पष्ट करून क्रांती प्रतिबंधक उपायही ॲरिस्टॉटल स्पष्ट करतो. प्लेटोने स्त्री-पुरुष

समानता मान्य केली होती. परंतु प्लेटोनंतर ॲरिस्टॉटलने आपले विचार मांडूनही त्याने त्यांच्या विचारांत स्त्रीयांना प्राधान्य दिले नाही.

एकंदरीत सॉक्रिटिस-प्लेटो-ॲरिस्टॉटल यांच्यातील गुरुशिष्याचे राजकीय विचारांचे नाते हे आधुनिक राजकीय विचारांना मार्गदर्शक ठरतात, प्रेरणा देणारे ठरतात. सॉक्रिटिसचे ज्ञान व नीतीचे विचार कायद्याप्रती नागरिकांची निष्ठा याचा आधार घेऊन प्लेटोने मांडलेल्या आदर्श राज्याची संकल्पना कायदा व न्याय यांच्याप्रती त्याचे विचार आणि हेच विचार पुढे नेऊन राज्याला ॲरिस्टॉटलने दिलेले प्राधान्य या सर्व भूमिका या राजकीय विचारांचा पाया ठरताना दिसतात.

## १.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

- **आज्ञापालन :** दिलेला शब्द पाळणे.
- **तत्त्वज्ञ राज्यकर्ता :** ज्ञानी मनुष्य जो राज्य चालवू शकतो.
- **दास्यप्रथा :** गुलामगिरी.
- **महाजनसत्ता :** समाजातील थोड्यात पण गुणी लोकांची सत्ता (Aristocracy).
- **गणराज्य :** घटनात्मक लोकशाही.
- **संविधान :** राज्यघटना.

## १.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे

१. *इसवीसनपूर्व ४६९-३९९.*

२. *ॲरिस्टॉटल.*

३. *प्लेटो.*

४. *कार्ल मार्क्स.*

५. *राजकारण.*

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे

१. *सॉक्रिटिस.*

२. *दि रिपब्लिक.*

३. *५०४०.*

४. *शासक व सैनिक.*

५. *तीन- (१) ज्ञानी (२) साहसी (३) वासना.*

❑ **स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे**

१. *प्लेटो.*

२. *राज्यशास्त्र.*

३. *दि पॉलिटिक्स.*

४. *गुलाम, स्त्रिया, परकीय.*

५. *(अ) पूर्ण क्रांती, (ब) आंशिक क्रांती, (क) व्यक्तिगत क्रांती.*

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

१. सॉक्रिटिसचे राजकीय आज्ञापालनाविषयी विचार स्पष्ट करा.

२. प्लेटोची आदर्श राज्याची संकल्पना स्पष्ट करा.

३. प्लेटोची न्यायाची संकल्पना स्पष्ट करा.

४. ॲरिस्टॉटलचे राज्यविषयक विचारांवर चर्चा करा.

५. ॲरिस्टॉटलचे क्रांतीविषयक विचार स्पष्ट करा.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके/संदर्भ ग्रंथ


१. **डॉ. भोळे भा. ल. :** *'पाश्चिमात्य राजकीय विचारवंत'*, पिंपळापुरे बुक डिस्ट्रिब्युटर्स, नागपूर-२००२.

२. **डॉ. डोळे ना. य. :** *'प्रमुख पाश्चिमात्य राजकीय विचारवंत'*, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

३. **गर्दे दि. का. :** *'पाश्चायत्य राजकीय विचारप्रवाह'.*

४. **प्रा. जोरगुलवार भूषण :** *'पाश्चिमात्य राजकीय विचारवंत'*, प्रकाशक-सुनिता बीडकर, अहमदपूर, जि. उस्मानाबाद, १९७९.

५. **प्रा. शृंगारपुरे अरविंद :** *'पाश्चिमात्य राजकीय विचार'*, प्रकाशक-मंगेश प्रकाशन, नागपूर-४४००१०.


❑❑❑

## घटक २
# आधुनिक राजकीय विचार–१

अनुक्रमणिका

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

२.२.१ निकोलो मॅकियाव्हेली: राज्य, विवेकवाद

२.२.२ थॉमस हॉब्ज: राज्य, नागरी समाज आणि विवेकवाद

२.२.३ जॉन लॉक : राज्य, नागरी समाज आणि विवेकवाद

२.२.४ जीन जॅक रुसो : राज्य, नागरी समाज आणि विवेकवाद

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द व श ब्दार्थ

२.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ

## २.० उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास पुढील संकल्पना व सिध्दांत स्पष्ट होतील.

- निकोलो मॅकियाव्हेली याचे राज्य, धर्म व नीति, शासनसंस्थेचे वर्गीकरण याबाबतचे विचार.
- थॉमस हॉब्ज याचा सामाजिक करार सिध्दांत, राज्यासंबंधीचे विचार.
- जॉन लॉक याचा सामाजिक करार सिध्दांत, नैसर्गिक हक्कांची संकल्पना.
- जीन जॅक रुसो याचा सामाजिक करार सिध्दांत, सामूहिक ईहा, राज्याच्या स्वरूपाचा सेंद्रीय सिध्दांत.

## २.१ प्रास्ताविक

पाश्चात्य राजकीय विचारांचा कालखंड हा इ.स. तिसऱ्या शतकापासून इ.स. पंधराव्या शतकापर्यंत मानला जातो. मध्ययुगाचा हा मोठा कालखंड प्राचीन युग आणि आधुनिक युग यांना जोडणारा संक्रमणाचा कालखंड होता. या युगाला 'अंध:काराचे युग' असे म्हटले जाते. त्याचे प्रमुख कारण म्हणजे युरोपमध्ये धर्माचे प्रचंड प्राबल्य निर्माण झाले होते. धर्माचा मानवाच्या स्वतंत्र विचारशक्तीवर व विवेक बुध्दीवर प्रभाव पडून ती लोप पावली होती. मानवाच्या ऐहिक जीवनापेक्षा पारलौकिक जीवनाला अवास्तव महत्त्व प्राप्त झाले होते. राजसत्तेवर धर्मसत्तेचे वर्चस्व निर्माण झाले होते. राजा हा परमेश्वराचा प्रतिनिधी आहे', या दैवी सिध्दांताला मान्यता मिळाली होती. त्यातून धर्मसत्ता व राजसत्ता यांच्यात संघर्ष निर्माण झाला. या संघर्षात धर्मसत्तेचा पराभव होऊन 'धर्मनिरपेक्ष राज्य' ही कल्पना अस्तित्वात आली. अशाप्रकारे मध्ययुगाच्या अखेरीस व आधुनिक युगाच्या प्रारंभी प्रबोधनाचे युग निर्माण झाले. हे संक्रमणाचे युग होते. युरोपसह अनेक राष्ट्रांमध्ये धर्मसुधारणेच्या व समाज सुधारणेच्या चळवळी झाल्या. धर्मसंस्था व राज्यसंस्था यात अनेक सुधारणा (Reformation) होवून त्यांचा स्वीकार (Restoration) करावा लागला. त्यातून नव्या आधुनिक युगाचा प्रारंभ झाला.

या नव्या परिवर्तनाचे मुख्य केंद्र इटली हा देश होता. या काळात इटलीच्या कला, साहित्य, विज्ञान या क्षेत्रात लिओनार्दो-द-विंची, राफेल, मायकेल अँजेलो यांनी आधुनिक युगाचा पाया घातला. इटलीच्या राजकीय जीवनातदेखील निकोलो मॅकियाव्हेली हा परिवर्तनाचा अग्रदूत ठरला. त्याचे नाव राजकीय विचारांच्या इतिहासात पहिला आधुनिक राजकीय पाश्चात्य विचारवंत म्हणून घेतले जाते.

## २.२ विषय विवेचन

या घटकांत मध्ययुगीन काळातील निकोलो मॅकियाव्हेली, थॉमस हॉब्ज, जॉन लॉक व जीन जॅक रुसो या पाश्चात्य विचारवंतांच्या राजकीय संकल्पना, सिध्दांत व राजकीय विचार यांचा आढावा घेतला आहे. निकोलो मॅकियाव्हेलीने इटलीतील अंध:कारमय कालखंड नष्ट होऊन इटलीला पुन्हा एकदा गतवैभव कसे प्राप्त होईल यादृष्टीने राजकीय विचारांची मांडणी केली आहे. या घटकात त्याचे राज्यासंबंधीचे विचार, शासन संस्थेचे वर्गीकरण, धर्म व नीती यासंबंधीचे विचार या महत्त्वाच्या मुद्यांची चर्चा केली आहे.

थॉमस हॉब्ज व जॉन लॉक हे इंग्लंडमधील आणि रुसो हा फ्रान्समधील राजकीय विचारवंत आहे. या तिघांनी राज्याच्या उन्नत्तीसंबंधी सामाजिक कराराच्या सिध्दांताची मांडणी केली. हॉब्जने सर्वप्रथम हा सिध्दांत मांडला व नंतरच्या काळात लॉक व रुसो यांनी त्याला अधिक शास्त्रीय व व्यावहारिक स्वरूप दिले. असे असले तरी या तिघांनी मांडलेल्या सिध्दांताची वैशिष्ट्ये काय आहेत व त्यात कोणत्या बाबतीत भिन्नता आहे, हे या घटकात सविस्तरपणे स्पष्ट केले आहे.

या चारही विचारवंतांनी राजकीय तत्त्वज्ञानात जी मोलाची भर घातली आहे, त्याची चर्चा या घटकात केली आहे. तसेच या विचारवंतांनी राजसंस्थेची धर्मसत्ता, दैवी किंवा ईश्वरी सत्ता, पोप, धर्मगुरु यांच्या

प्रभावातून मुक्तता केली आणि राज्य संस्थेला सर्वश्रेष्ठ, सार्वभौम आणि सर्वोच्च स्थान प्राप्त करुन दिले. त्याचबरोबर व्यक्तीचे स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या वैश्विक मूल्यांची प्रतिष्ठापना करण्याची गरज देखील प्रतिपादन केली. तसेच लोकशाही शासन व्यवस्थेचे महत्व अधोरेखित केले. या सर्व मुद्यांची क्रमश: व विस्तृत चर्चा या घटकात केली आहे.

## २.२.१ निकोलो मॅकियाव्हेली (इ.स.१४६९–इ.स.१५२७)

अल्पपरिचय : मॅकियाव्हेलीचा जन्म इ.स. १४६९ साली इटलीतील फ्लॉरेन्स या नगरराज्यात टस्कन वंशातील एका मध्यमवर्गीय कुटुंबात जन्म झाला. त्याने स्वत:च्या कर्तबगारीवर लहान वयात फ्लॉरेन्स सरकारमध्ये सचिव पद मिळविले. इतिहासाचा व प्रत्यक्ष राजकीय व्यवहाराचा सखोल अभ्यास असल्यामुळे त्याची अल्पावधीत फ्लॉरेन्सच्या राजदूत पदावर नियुक्ती झाली. राजदूत म्हणून त्याने पॅरिस, रोम, बर्लिन, फ्रान्स या ठिकाणी २४ पेक्षा जास्तवेळा भेट दिली. या अनुभवामुळे त्याची 'कौन्सिल ऑफ टेन्स'वर मंत्रिपरिषदेचा सचिव म्हणून नियुक्ती झाली. तो इटलीच्या राजकीय जीवनात सक्रीय होता. इ.स. १५२७ मध्ये त्याचा मृत्यू झाला.

**ग्रंथ रचना :–**

मॅकियाव्हेलीने इटलीचा इतिहास (एकूण १० खंड) लिहिला. इटलीला वैभवशाली काळ पुन्हा कसा प्राप्त करुन देता येईल, या उद्देशाने त्याने १५१३ साली "The Prince" आणि The Discourses of Livy हे दोन पश्चात ग्रंथ लिहिले. The Art of War, The History of Florence असे ग्रंथही लिहिले. त्यापैकी त्याचा The Prince हा ग्रंथ राज्यशास्त्राच्या अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचा ग्रंथ असून तो प्रत्यक्ष अनुभवावर व राजकीय निरिक्षणावर आधारलेला आहे.

**तत्कालीन प्रभाव :–**

कोणत्याही विचारवंतावर तत्कालीन परिस्थितीचा प्रभाव पडतो. तसा तो मॅकियाव्हेलीवर पडला आहे. त्याच्यावर पुढील गोष्टींचा प्रभाव पडला.

**१. प्रबोधन युगाचा प्रभाव :** इटलीवर प्रबोधनाच्या चळवळीचा प्रभाव पडला. साहित्य, कला, विज्ञान, व्यापार, उद्योग, भौतिक साधने यात नवे बदल झाले. या नव्या बदलांचा मॅकियाव्हेलीवर प्रभाव पडला.

**२. इटलीतील घडामोडींचा प्रभाव :** विविध क्षेत्रात झालेल्या बदलांचे प्रतिबिंब नि:संदिग्धपणे इटलीतील घडामोडींवर पडते. या घडामोडी राजकीय प्रक्रिया, राजकीय संस्कृती यांचाच एक भाग असतात.

**३. राजकीय परिस्थितीचा प्रभाव :** मॅकियाव्हेलीच्या काळात इटलीची राजकीय परिस्थिती अतिशय अस्थिर आणि बिकट होती. इटलीचे पाच विभागात विभाजन होऊन पूर्वीच्या वैभवशाली साम्राज्याचे अध:पतन झाले होते.

**४. नैतिक अध:पतन :** इटलीच्या सामाजिक जीवनात नैतिक मूल्यांचा ऱ्हास झाला होता. या युगाला अंध:कारमय कालखंड असे म्हटले जाते. धर्मगुरु, शासक, प्रजा भ्रष्ट झाले होते. भ्रष्टाचार, अविश्वास, फसवणूक , अहंकार, व्यक्ति गत महत्वाकांक्षा यामुळे इटलीमध्ये सर्वत्र अनैतिक तेचे वातावरण निर्माण झाले होते. या परिस्थितीत बदल होऊन इटलीला पुन्हा एकदा पूर्वीचे वैभव प्राप्त व्हावे, असे मॅकियाव्हेलीला मनापासून वाटत होते.

**मॅकियाव्हेलीचे राज्याबद्दलचे विचार :–**

मॅकियाव्हेलीचे राजकीय विचार अनुभवजन्य ज्ञानावर आधारित आहेत. म्हणूनच ते अधिक व्यावहारिक ही आहेत. त्याचा इटलीसह युरोपच्या राजकीय परिस्थितीचा अभ्यास अतिशय सखोल होता. त्याने राजदूत म्हणून अनेक देशांना भेटी दिल्या होत्या. तो इटलीच्या राजकीय जीवनात देखील सक्रीय होता. त्याने "The Prince' "The Discourse of Livy" या त्याच्या प्रसिध्द ग्रंथांमध्ये सामर्थ्यशाली राज्याची निमिर्ती, राज्यांचे वर्गीकरण, साम्राज्याचा विस्तार, राजाची कर्तव्ये याविषयी व्यावहारिक दृष्टिकोनातून विचार मांडले आहेत. जे नंतरच्या काळातील राजकीय विचारांना दिशा देणारे ठरले आहेत. त्याचे राज्यासंबंधीचे विचार पुढील मुद्यांच्या आधारे समजून घेता येतील.

**१. मानवनिर्मित संस्था :** त्याने धर्म व राजकारण यांचा उद्देश व कार्यक्षेत्र भिन्न आहे, असा विचार मांडला व राज्यशासनाची धर्माच्या प्रभावातून मुक्तता करण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम केले. त्याची नोंद राजकीय विचारांच्या अभ्यासकांनी घेतली आहे. याच कारणासाठी मॅकियाव्हेलीला प्रबोधन काळाचे अपत्यक्ष असे संबोधले जाते.

**२. व्यक्तीपेक्षा राज्य महत्वपूर्ण :** व्यक्तीचे हित व व्यक्तीचे कल्याण यापेक्षा राज्य, राज्याचे सामर्थ्य या गोष्टी अधिक महत्वाच्या असतात, असे मॅकियाव्हेलीचे मत आहे. व्यक्तीपेक्षा राज्य महत्त्वाचे असून व्यक्तीचे व्यक्तिमत्व राज्यात अंतर्भूत असते.

**३. निरंकुश राजसत्ता :** मॅकियाव्हेलीने निरंकुश राजसत्तेचा स्पष्टपणे, नि:संदिग्धतणे पुरस्कार केला आहे. इटलीची अस्थिर राजकीय परिस्थिती त्याला कारणीभूत आहे. राजसत्ता निरंकुश असेल तरच सामाजिक ऐक्य, सामर्थ्यशाली राज्य निर्माण होऊ शकते.

**४. राज्यपूर्व अवस्था :** राज्याची उत्पत्ती होण्याच्या पूर्वीची अवस्था कशी होती याचे वर्णन करताना मॅकियाव्हॅली म्हणतो की, राज्यपूर्व अवस्थेत सर्वत्र अराजकता व अशांतता होती. मानवाच्या जीविताच्या व संपत्तीच्या संरक्षणासाठी सतत संघर्ष चालू होता. यातून मार्ग काढण्यासाठी, शांत, सुखी जीवनाची शाश्वती मिळविण्यासाठी लोकांनी आपआपसांत एकत्र येऊन राज्यसंस्था निर्माण केली.

**५. प्रचलित सिध्दांताला छेद :** मॅकियाव्हेलीच्या पूर्वी राज्यसंस्थेविषयी जे विचार, सिध्दांत मांडले गेले त्याला मॅकियाव्हेलीने छेद दिला. राज्यसंस्था परमेश्वराने निर्माण केली असून राजा हा परमेश्वराचा अंश आहे

हा प्रचलित सिध्दांत त्याने नाकारला, तसेच राज्य ही नैसर्गिक संस्था असून तिचा विकासदेखील त्याने अमान्य केला.

**६. राज्य ही सर्वश्रेष्ठ संस्था :** व्यक्ती आणि इतर कोणत्याही संस्थेपेक्षा राज्यसंस्था श्रेष्ठ आहे, तिला तो 'संस्थाची संस्था' मानतो. इतर संस्थांचे व्यक्तीच्या जीवनात महत्त्वाचे स्थान असले तरी राज्यसंस्था सर्वात महत्त्वाची संस्था आहे. राज्यसंस्थेमुळे इतर संस्थांना अर्थ व अस्तित्त्व प्राप्त होते.

**७. व्यक्ती, समाज व हितामध्ये समन्वय :** मॅकियाव्हेलीने व्यक्ती व समाज यापेक्षा राज्यसंस्था श्रेष्ठ मानली आहे. त्यामुळे व्यक्तीचे हित व समाजाचे हित यात समन्वय साधणे हे राज्याचे कर्तव्य आहे, असे तो मानतो. व्यक्तीने देखील समाजाच्या कल्याणात स्वत:चे कल्याण अंतर्भूत आहे, असे समजून राज्याचे श्रेष्ठत्व मान्य केले पाहिजे. त्याच्या मते, व्यक्ती राज्याला जबाबदार आहे, परंतु राज्य कुणालाही जबाबदार नाही.

थोडक्यात, मॅकियाव्हेलीने त्याच्या राज्यासंबंधीच्या विचारांच्या माध्यमातून प्रस्थापित मध्ययुगीन दैवी, धर्माधिष्ठीत सिध्दांत नाकारला, त्यामुळे राजकीय विचारांना बुध्दीनिष्ठ व व्यावहारिक विचारांचा पाया मिळाला. तसेच धर्मसंस्था श्रेष्ठ की राज्यसंस्था श्रेष्ठ या संघर्षालाही विराम मिळाला. राजकीय तत्त्वज्ञानात धर्मनिरपेक्ष विचारांची परंपरा सुरू झाली. यादृष्टीने मॅकियाव्हेलीचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

**शासनसंस्थेच्या वर्गीकरणासंबंधीचे विचार :-**

मॅकियाव्हेलीने शासन संस्थेच्या वर्गीकरणासंबंधी जे विचार मांडले आहेत, त्यांच्यावर ॲरिस्टॉटल, पोलिबियस, सिसेरो यांच्या विचारांचा प्रभाव पडला आहे. मॅकियाव्हेलीने राज्यसंस्था व शासनसंस्था यात फरक केलेला नाही. राज्याच्या सार्वभौम सत्तेचा वापर कितीजणांकडून केला जातो आणि सार्वभौम सत्ता वापरण्यामागचा हेतू कोणता आहे या दोन मुख्य मुद्यांच्या आधारे त्याने हे वर्गीकरण केले आहे. त्याने शासनाचे शुध्द स्वरूप आणि विकृत किंवा भ्रष्ट स्वरूप असे दोन प्रकारे वर्गीकरण केले आहे. त्याने शासनाचे तीन शुध्द व तीन विकृत असे सहा प्रकार व सातवा मिश्र प्रकार सांगितला आहे. या वर्गीकरणाच्या आधारे शासनाचा कोणता प्रकार चांगला आहे हे त्याने सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच्या मते, मिश्र प्रकार हा शासनाचा सर्वात उत्तम प्रकार आहे, कारण त्यात शुध्द स्वरूपाच्या तिन्ही शासन प्रकारांचे गुण एकत्रित झालेत.

**शासनाचे वर्गीकरण**

| सार्वभौमत्व-संख्या | शुध्द स्वरूप | विकृत/भ्रष्ट स्वरूप |
|---|---|---|
| एक | राजेशाही | हुकूमशाही |
| काही | महाजनशाही/कुलीन तंत्र | उमरावशाही/सामंतशाही |
| अनेक | लोकशाही | झुंडशाही |

मॅकियाव्हेलीने The Prince या ग्रथांत राजेशाहीचे समर्थन केले आहे तर The Discourse of Livy मध्ये गणतंत्र/प्रजातंत्र अर्थात लोकशाही हा शासन प्रकार सर्वोत्तम आहे, असे म्हटले आहे.

**१. राजेशाही :** कोणत्या देशात राजेशाही सर्वोत्तम ठरेल याची चर्चा त्याने The Prince मध्ये केली आहे. त्याच्या मते, ज्या देशात राजकीय अस्थैर्य, अराजक ता आहे, जो समाज राजकीयदृष्ट्या विघटीत, विस्कळीत आहे व जिथे राज्यापेक्षा व्यक्तिगत स्वार्थाला अधिक महत्त्व आहे, अशा देशात राजेशाही असावी व राजाच्या हातात निरंकुश सार्वभौम सत्ता असावी. फ्रान्स, इंग्लंड, स्पेन या देशात निरंकुश राजेशाही असल्यामुळे सामाजिक ऐक्य व सामर्थ्यशाली राज्य दिसून येते. याउलट इटलीमध्ये प्रबळ राजेशाहीच्या अभावी सर्वच दैन्यावस्था निर्माण झाल्याची मॅकियाव्हेलीची भावना होती. इटलीला देखील निरंकुश राजेशाहीची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन तो करतो.

**२. कुलीन तंत्र :** मॅकियाव्हेलीच्या कुलीन तंत्राविषयीच्या विचारांवरदेखील इटलीतील राजकीय परिस्थितीचा प्रभाव पडला आहे. तो इटलीचे अध:पतन होण्यास कुलीन तंत्रात्मक शासनालाच जबाबदार धरतो. त्याच्या मते, या प्रकारात महाजनांच्या अहंकारी, स्वार्थी व विलासी वृत्तीमुळे राज्याचे ऐक्य, सामर्थ्य नष्ट होते व सर्वत्र संघर्ष, अशांतता निर्माण होते. व्यक्तीचे स्वातंत्र्य, अधिकार व व्यक्तीचा विकास याला महत्त्व उरत नाही. महाजनांच्या लहरी कारभारामुळे अन्याय व अंदाधुंदी निर्माण होते. राज्याला परकीय आक्र मणाचा धोका असतो, म्हणून सामर्थ्यशाली राज्याच्या निमिर्तीसाठी कुलीन तंत्रापेक्षा राजेशाही अधिक योग्य असल्याचे मत तो मांडतो.

**३. लोकशाही :** 'Discourse' या ग्रंथात मॅकियाव्हेलीने लोकशाही अर्थात गणतंत्र किंवा प्रजातंत्र याविषयी गौरवोद्‌गार काढले आहेत. कारण त्याच्या मते, या शासन प्रकारात राज्याची सार्वभौम सत्ता सर्वांच्या हातात असते. त्यामुळे सत्तेचा वापर शहाणपणाने होण्याची शक्यता अधिक असते. तो म्हणतो की, एकाच्या शहाणपणापेक्षा सामूहिक शहाणपण केव्हाही चांगला असतो. इतर शासन प्रकारांच्या तुलनेत लोकशाहीत लोकांना राज्यकारभारात, निर्णय प्रक्रियेत, सार्वभौम सत्तेच्या वापरात सहभागी होण्याची संधी अधिक मिळते. लोकांना राज्यकारभाराचे शिक्षण मिळते. समस्या सोडविण्याचे मार्ग, पर्याय माहित होतात. लोक राजकीयदृष्ट्या अधिक जागरूक बनतात. सर्वांना विकासाची समान संधी मिळते. राज्यासमोरील महत्त्वाच्या प्रश्नांवर मत, प्रतिक्रिया व्यक्त करता येतात. निर्णय प्रक्रियेत सहभाग मिळाल्यामुळे अनेक निर्णय लोकांच्या इच्छेनुसार घेतले जातात. ते अधिक जागरूकतेने राज्यकारभारात सहभागी होतात. लोकांमध्ये जबाबदारीची भावना वाढीस लागते. लोकांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करुन घेतल्यामुळे समाजातील अशांतता, कलह कमी होतो. राजकीय व्यवस्थेला स्थैर्य प्राप्त होते.

लोकशाही शासन प्रकाराची मॅकियाव्हेलीने प्रशंसा केली असली तरी Discourse या ग्रंथात राजेशाही व लोकशाही यांची तुलना करुन त्यातील दोष दाखविले आहेत. त्यांच्या मते, ज्या देशातील नागरिक राजकीयदृष्ट्या जागरूक, सूज्ञ नाहीत, त्या देशात लोक शाही हा शासन प्रकार यशस्वी होण्याची शक्यता कमी असते. तसेच युध्द, नैसर्गिक आपत्ती, संकटकाळातील परिस्थितीमध्ये त्वरित निर्णय घेण्यावर मर्यादा

येतात. सार्वभौम सत्ता सर्वांच्या हातात असल्याने सत्तेचा गैरवापर होण्याची शक्यता असते. तसेच काही बाबतीत सर्वांचे एक मत होणे देखील कठीण असते.

**४. मिश्र प्रकार :** या प्रकारात तीन शुध्द व तीन विकृत प्रकारांचे दोष टाळून गुण एकत्र आलेले असतात. या प्रकारात सत्तेचे नियंत्रण व सत्तेचे संतुलन या दोन्ही गोष्टी शक्य होतात. या अर्थाने हा प्रकार सर्वोत्तम आहे. यामुळे सार्वभौम सत्ता कोणत्याही एका व्यक्तीच्या, वर्गाच्या हाती न गेल्यामुळे त्याचे दुष्परिणाम होण्याची शक्यता देखील कमी होते.

थोडक्यात, मॅकियाव्हेलीने जरी शासन संस्थेच्या वर्गीकरणाचे वरील सात प्रकार सांगितले असले तरी त्याच्यामते, प्रत्येक राज्याची अंतर्गत राजकीय, सामाजिक परिस्थिती, नागरिकांची जागरूकता, बाह्यसत्तेचा हस्तक्षेप, नियंत्रण यावर त्या राज्यात कोणता शासनाचा प्रकार यशस्वी होईल, हे ठरत असते. त्यामुळे कोणताही एक शासन प्रकार सर्वत्र यशस्वी होईल, असे म्हणता येणार नाही. असे असले तरी मॅकियाव्हेलीने राजेशाही व लोकशाही या दोन शासन प्रकारांना सर्वाधिक पसंती दिली आहे.

**मॅकियाव्हेलीचा विवेकवाद**

मॅकियाव्हेलीने बुद्धिवादी व विवेकाच्या आधारावर आपले विचार मांडले. कारण मॅकियाव्हेलीच्या काळातील प्रबोधनामुळे विचारवंताचा राज्याकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला. मॅकियाव्हेलीने राज्यशास्त्रामध्ये महत्त्वाचे योगदान दिले आहे.

**धर्म व नीति यासंबंधीचे विचार :-**

ग्रीक विचार परंपरेत धर्म, नीतिमत्ता यांना महत्त्व होते. किंबहुना आदर्श राज्य निर्माण करण्याच्या उद्देशानेच ग्रीक विचारवंतांनी राजकीय तत्वज्ञानाची मांडणी केली आहे. नीतिमत्ता हा राजकीय व्यवहाराचा पाया आहे. राज्याचे स्वरूप नैतिक असावे, असा विचार मध्ययुगीन काळाच्या सुरुवातीला प्रभावी होता. युरोपसह इटलीमध्ये राज्यसंस्थेवर धर्मसत्तेचे वर्चस्व होते. धर्मसत्ता राजसत्तेपेक्षा श्रेष्ठ मानली जात होती. इटलीमध्ये धर्माचे व्यक्तीच्या जीवनातील प्राबल्य वाढल्यामुळे समाजात अंधश्रध्दा, धर्मभोळेपणा, बुध्दीवाद व विवेकवाद यापेक्षा दैववादाला महत्त्व प्राप्त झाले. धर्माचा राजकारणातील हस्तक्षेप वाढल्यामुळे चर्च, पोप यांच्या हाती सर्व सत्ता केंद्रीत झाली व राजसत्ता दुर्बल बनली. राजाचे महत्त्व कमी झाल्यामुळे इटलीमध्ये सतत गृहयुध्द, अशांतता अशी परिस्थिती निर्माण झाली. इटलीवर परकीय आक्रमणे होऊ लागली. या सर्वांचा परिणाम इटलीचे पाच विभागात विभाजन होण्यात व इटलीचे सर्वच क्षेत्रात अध:पतन होण्यात झाला. इटलीतील या परिस्थितीचा मॅकियाव्हेलीवर दूरगामी परिणाम झाला. या परिणामातून त्याचे धर्म, नीतिमत्ता व राज्याचे कार्यक्षेत्र याविषयी निश्चित असे विचार तयार झाले. धर्माच्या अतिरेकी हस्तक्षेपामुळेच इटलीचे अध:पतन झाले, असे त्याचे स्पष्ट मत बनले. त्याच्या धर्म, नीतिमत्ता व राजकारण याविषयीच्या विचारांशी त्याचा मनुष्य स्वभावाविषयी असलेला दृष्टीकोन, इटलीचे पुन्हा एकत्रीकरण करून तिला गतवैभव प्राप्त करून देण्याला दिलेले प्राधान्य, त्यासाठी निरंकुश राजसत्तेची त्याला वाटणारी अत्यंतिक गरज, सत्तेला साधन न मानता साध्य मानणे, असे अनेक मुद्दे संबंधित आहेत.

इटलीचे एकीकरण करायचे असेल व तिला सामर्थ्यशाली बनवायचे असेल तर धर्म आणि राजकारण परस्परांपासून संपूर्णत: विभक्त केले पाहिजे, हे त्याने ओळखले आणि त्याने धर्म, नीति, राजकारण याविषयी धर्मनिरपेक्ष व विवेकवादी भूमिका स्वीकारली. त्याची ही भूमिका त्या काळात अत्यंत क्रांतीकारी ठरली. ग्रीक आणि मध्ययुगीन विचार परंपरेत नैतिकता हे श्रेष्ठ मूल्य मानले गेले. राज्याचे ध्येयदेखील धार्मिक व नैतिक मूल्यांवर आधारलेले असावे, असा विचार मांडला गेला. मॅकियाव्हेलीने सर्वप्रथम या विचारांना छेद देऊन राजकीय विचारांची मुक्तता केली. या अर्थाने तो आधुनिक धर्मनिरपेक्ष विचारांचा जनक मानला जातो. त्याच्या मते, धर्माचे कार्यक्षेत्र व्यक्तीच्या खाजगी जीवनापुरते मर्यादित असावे. धर्माचा राजकारणात हस्तक्षेप असू नये. धर्म व राजकारण यांचा उद्देश व कार्यक्षेत्र स्वतंत्र आहे. त्यामुळेच ते परस्परांपासून विभक्त असावे, असे तो मानतो.

**नैतिकतेसंबंधीचे विचार**

मॅकियाव्हेलीने नैतिकतेच्या संदर्भातदेखील सविस्तर विचार मांडले आहेत. त्याने १) व्यक्तीची नैतिकता व २) राजाची नैतिकता असे नैतिकतेचे दोन प्रकार The Prince ग्रंथात सांगितले आहेत.

**१. व्यक्तीची नैतिकता :** व्यक्तीच्या नैतिकतेच्या संदर्भात मॅकियाव्हेलीने संपूर्णत: सकारात्मक दृष्टीकोनातून विचार मांडले आहेत. त्यांच्या मते, व्यक्तीगत जीवनात नैतिकतेला महत्त्व असले पाहिजे. व्यक्ती-व्यक्तींचा मिळून समाज व पर्यायाने राज्य निर्माण होत असल्यामुळे व्यक्ती सद्गुणी, चारित्र्यसंपन्न व राज्याच्या हिताला प्राधान्य देणारी असावी. व्यक्तीच्या ठिकाणी असणारी नैतिकता ही आदर्श राज्याच्या निमिर्तीसाठी आवश्यकच आहे, असे तो मानतो. धर्म व्यक्तीला नैतिक बनवितो हे जरी खरे असले तरी चर्च, धर्मगुरु व्यक्तीला खरे सुखी, समाधानी व आनंदी भौतिक जीवन देऊ शकत नाही. व्यक्तीला धर्मामुळे मानसिक व आध्यात्मिक शांती, समाधान मिळू शकते. परंतु व्यक्तीच्या जीविताचे व संरक्षण राज्यामुळेच होते. सामर्थ्यशाली व वैभवशाली राज्यामुळेच व्यक्तीचा भौतिक विकास होऊ शकतो. मॅकियाव्हेलीने धार्मिक, आध्यात्मिक, पारलौकिक विकासापेक्षा व्यक्तीच्या ऐहिक, भौतिक सुखाला, विकासाला सर्वाधिक महत्त्व दिले आहे. परमेश्वरप्राप्ती स्वर्गसुख यापेक्षा तो भौतिक सुखाला प्राधान्य देतो. प्रत्येक व्यक्तीने स्वत:च्या धार्मिक सुखापेक्षा स्वत:च्या राज्याप्रती असलेल्या कर्तव्यांचा अग्रक्रमाने विचार केला पाहिजे. म्हणून व्यक्तीची नैतिकता ही समर्थ राज्याच्या निर्मितीसाठी वापरली गेली पाहिजे, असे त्याचे मत होते.

**२. राजाची नैतिकता :** व्यक्तीच्या नैतिकतेचा सकारात्मक, अनुकूल दृष्टीकोनातून विचार करणारा मॅकियाव्हेली राज्याच्या नैतिकतेच्या संदर्भात मात्र वेगळा विचार मांडतो. त्याच्या मते, राजकारणात धार्मिक, नैतिक, आध्यात्मिक मूल्यांना महत्त्व असता कामा नये. सत्ता प्राप्त करणे, ती टिकविणे, राज्याचे सामर्थ्य वाढविणे हे राज्याचे उद्दिष्ट असल्याने राजाने हे साध्य करण्यासाठी कोणत्याही मार्गांचा वापर करावा. त्याने सत्तेला साध्य मानले. त्यामुळे ते साध्य करण्यासाठी राजाने नैतिक-अनैतिक, योग्य-अयोग्य मार्गांचा वापर करावा. राजकारणाला किंवा राजकीय उद्दिष्टांना नैतिकतेचे, धार्मिकतेचे कोणतेही नियम लागू होत

नाहीत. राजकीय उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी एखादी धर्मविरोधी कृती केली तर ती अयोग्य ठरत नाही. म्हणूनच राज्याची सत्ता आणि सामर्थ्य वाढविण्यासाठी केलेली हिंसादेखील समर्थनीय ठरते.

''यशासारखे दुसरे यश नाही'' (Endjustifies the means) याविषयीच्या त्याच्या विचारांवरुन तो साध्य-साधन यांच्या शुचितेबाबत, शुध्दतेबाबत फारसा आग्रही नाही, हे लक्षात येते. सत्ता प्राप्तीचे ध्येय साध्य करताना योग्य-अयोग्य, धार्मिक -अधार्मिक यांचा विचार निरर्थक आहे. कारण धार्मिक-अधार्मिक, नैतिक-अनैतिक या कल्पना परिस्थितीसापेक्ष आहेत. त्यामुळे साध्य साधन विवेक राजकारणात महत्त्वाचा असतोच असे नाही. थोडक्यात, ज्यामुळे राज्याचे हित साध्य होत असेल, उद्दिष्ट प्राप्त होत असेल तर राजाने कोणत्याही मार्गाचा वापर करावा, असे त्याचे स्पष्ट मत होते. याचा अर्थ मॅकियाव्हेली धर्मविरोधी होता असे नाही. त्याने राज्याचे ऐक्य, सामर्थ्य यासाठी व्यक्ती जीवनातील नैतिकता आवश्यक आहे, हे मान्य केले आहे. धर्म व्यक्तीला सद्गुणी, सदाचारी बनवतो. अनैतिकता, अधार्मिकता यापासून दूर ठेवतो. त्यामुळे चांगला समाज निर्माण होतो. व्यक्तीचे, राज्याचे नैतिक अध:पतन झाले तर राज्याचेदेखील अध:पतन होते. त्यासाठी राजाने धर्माचा वापर राज्याचे सामर्थ्य वाढविण्यासाठी मोठ्या कौशल्याने करावा. मात्र धर्माचे अतिरेकी वर्चस्व निर्माण होणार नाही, याचीही काळजी घेण्यास मॅकियाव्हेली सांगतो.

थोडक्यात, मॅकियाव्हेलीने राज्यसंस्थेला प्राधान्य देऊन धर्म, नीति यांना दुय्यम स्थान दिले, असे असले तरी त्याने सामर्थ्यशाली राज्याच्या निमिर्तीसाठी धर्माचे अस्तित्व संपूर्णत: नाकारलेले नाही. मात्र राजकीय उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी धर्माच्या कार्यक्षेत्रावर मर्यादा असावी, असा विचार मांडला. त्यामुळे धर्म व नीति यांच्या समर्थकांनी मॅकियाव्हेलीच्या विचारांवर कठोर टिका केली, असे असले तरी त्याने धर्म व नीति याबाबत मांडलेले विचार ही त्या काळाची व परिस्थितीची अत्यंतिक गरज होती, हे लक्षात घेतले पाहिजे.

**धर्मसंस्थेच्या वर्चस्वाला विरोध**

मॅकीयाव्हेलीच्या विवेकवादाचे आणखी एक उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे की, त्याने आपल्या विचारांव्दारे राजकीय क्षेत्रातील धर्मसंस्थेच्या वर्चस्वाला विरोध केला होता. मध्ययुगीन काळात समाज जीवनाच्या जवळपास सर्वच क्षेत्रांवर धर्मसंस्थेचे वर्चस्व प्रस्थापित झाले होते. राजकीय क्षेत्रही त्यास अपवाद नव्हते. पोप व त्याचे धर्मगुरू राज्याच्या कारभारात हस्तक्षेप करीत असत; त्यामुळे राजसत्तेला धर्मसंस्थेपुढे दुय्यम स्वरूप आले होते. मध्ययुगाच्या अखेरीस युरोपातील धर्मासंस्थाही कमालीची भ्रष्ट बनली होती; त्यामुळे राजकारणातील तिच्या हस्तक्षेपाचे समाजावर व लोकावर अनिष्ट परिणाम झाले होते. धर्माचा समाजजीवनावरील वर्चस्वाला विरोध करण्यासाठी युरोपात पुनरुज्जीवनाची चळवळ सुरू झाली होती. या चळवळीचे राजकीय क्षेत्रात मॅकीयाव्हेलीने प्रतिनिधित्व केले. आपल्या या विचारातून मॅकीयाव्हेलीने धर्मसंस्थेच्या वर्चस्वाला आव्हान दिले. तसेच त्यांनी धर्म आणि राज्य यांच्यात फारकत करून धर्मसंस्थेच्या वर्चस्वाला विरोध करून एका अर्थाने धर्मनिरपेक्ष राज्याची संकल्पना मांडली आहे.

**राज्य ही मानवनिर्मित संस्था**

मॅकीयाव्हेलीने राज्य ही मानवनिर्मित संस्था आहे असे मानले होते. प्राचीन ग्रीक विचारवंताप्रमाणे तो राज्याला नैसर्गिक संस्था समजत नव्हता तसेच राज्याच्या दैवी सिद्धांताच्या पुरस्कर्त्याप्रमाणे राज्य ही ईश्वराने निर्माण केलेली संस्था आहे यावरही तो विश्वास ठेवत नव्हता. राज्याची निर्मिती मानवाने आपल्या गरजेसाठी केलेले आहे असे त्याचे म्हणणे होते. अर्थात, सामाजिक करार सिद्धांत ही त्याने मान्य केला नव्हता. म्हणजे निसर्गातील लोकांनी एकत्र येऊन करार केला आणि या करार द्वारे राज्याची निर्मिती झाली असे तो समजत नव्हता. कायद्याची निर्मिती राज्याद्वारे होते आणि राज्याकडे असलेल्या दंडशक्तीच्या बळावर कायद्याचे पालन केले जाते असे त्याचे मत होते. राज्यात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी कायद्याची आवश्यकता असते.

**सार्वभौमत्वाच्या संकल्पनेचा पुरस्कार**

मॅकीयाव्हेली हा राज्याच्या सार्वभौमत्वाच्या संकल्पनेचा पुरस्कर्ता होता. अर्थात सार्वभौमत्वाची संकल्पना स्पष्ट शब्दात मांडण्याचे किंवा तिचे पुरेसे स्पष्टीकरण करण्याचे श्रेय नंतरच्या काळात होऊन गेलेल्या फ्रेंच व ब्रिटीश राजकीय विचारवंताकडे जाते. मॅकीयाव्हेलीने संकल्पना पुरेशा शब्दांत मांडली नव्हती हे खरे पण तो जेव्हा राज्यात राजाचाच अधिकार सर्वश्रेष्ठ असतो असे सांगतो तेव्हा तो राज्याच्या सार्वभौमत्वाचा विचार मांडतो. म्हणून राज्याच्या सार्वभौमत्वाच्या संकल्पनेचा पुरस्कार त्याने केला.

**※ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न -१ ※**

खालीलपैकी अचूक पर्याय निवडा व लिहा.

१. मॅकियाव्हेली याने ............ हा ग्रंथ लिहिला.

(अ) लेविएथन (ब) सामाजिक करार (क) द प्रिन्स (ड) रिपब्लीक

२. ............. या विचारवंताला 'प्रबोधन युगाचे अपत्यक्ष' असे म्हणतात.

(अ) रुसो (ब) मॅकियाव्हेली (क) जॉन लॉक (ड) थॉमस हॉब्ज.

३. मॅकियाव्हेलीने 'द प्रिन्स' या ग्रंथात .......... शासन पध्दतीचे समर्थन केले आहे.

(अ) राजेशाही (ब) लोकशाही (क) कुलीन तंत्र (ड) हुकूमशाही.

४. .............. या विचारवंताला आधुनिक धर्मनिरपेक्ष विचारांचा जनक म्हटले जाते.

(अ) जॉन लॉक (ब) प्लेटो (क) मॉन्टेस्क्यू (ड) मॅकियाव्हेली.

५. .............. या विचारवंताने निरंकुश राजेशाहीचा पुरस्कार केला आहे.

(अ) कार्ल मार्क्स (ब) जे.एस.मिल (क) मॅकियाव्हेली (ड) रुसो.

## २.२.२ थॉमस हॉब्ज (इ.स.१५८८–इ.स.१६७९)

**प्रस्तावना :–**

समाज आणि राज्य यांची निमिर्ती कशी झाली असावी हा राज्यशास्त्राप्रमाणेच समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, इतिहास, धर्मशास्त्र, नीतिशास्त्र या शास्त्रांचा व अनेक विचारवंतांचा अभ्यासाचा, संशोधनाचा विषय होता. १७ व्या शतकात इंग्लंडमधील थॉमस हॉब्ज, जॉन लॉक फ्रान्समधील जीन जॅक रुसो या विचारवंतांनी समाज व राज्य यांच्या उत्पत्तीसंबंधी 'सामाजिक करार' सिध्दांत मांडला. सामाजिक शास्त्रांना मूलभूत, अचूक व वैश्विक सत्य ठरणारे सिध्दांत मांडता येत नाहीत, हे जरी खरे असले तरी राज्यसंस्थेच्या निर्मितीसंबंधी दैवी किंवा ईश्वरी सिध्दांत, सामाजिक करार सिध्दांत,विकासवादी किंवा उत्क्रांतीवादी सिध्दांत असे सिध्दांत वेगवेगळ्या कालखंडात मांडले गेले. या सिध्दांतांचे स्वरूप बऱ्याच प्रमाणात काल्पनिक होते. अंदाज वर्तविण्याचा तो एक प्रयत्न होता. या सिध्दांतावर त्या काळातील राजकीय, सामाजिक व इतर परिस्थितीचा घटकांचा प्रभाव पडलेला होता. राजकीय तत्त्वज्ञानात हॉब्ज, लॉक व रुसो यांच्या सामाजिक कराराच्या सिध्दांताला महत्त्व आहे.

**अल्पपरिचय :–**

थॉमस हॉब्जचा जन्म ५ एप्रिल १५८८ मध्ये इंग्लंडमध्ये झाला. त्याने ऑक्सफोर्ड विद्यापीठात उच्च शिक्षण घेतले. इंग्लंडमधील यादवी युध्दाच्या काळात तो युरोपमध्ये वास्तव्यात होता. तरीदेखील इंग्लंडमधील यादवी युध्दाचा व त्याकाळातील राजकीय, सामाजिक परिस्थितीचा त्याच्यावर अपरिहार्यपणे परिणाम झाला. त्याने फ्रान्समध्येदेखील काही काळ वास्तव्य केले. फ्रान्समधील निरंकुश राजेशाहीने तो प्रभावित झाला. त्याला कॅव्हेंडीश वंशाच्या राजपुत्राचा शिक्षक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. त्यानिमित्ताने त्याचा राजघराण्याशी संबंध आला. त्याला युरोपचा प्रवास करण्याची देखील संधी मिळाली. त्यातून मिळालेल्या अनुभवामुळे त्याच्या विचारांना निश्चित दिशा मिळाली. त्याचे विचार विश्वव्यापक बनले. त्याने आपल्या राजकीय विचारांमधून निरंकुश राजेशाहीचा पुरस्कार केला. त्याने सामाजिक कराराच्या सिध्दांताचा पाया घातला. नंतरच्या काळात लॉक व रुसो यांनी या सिध्दांताला अधिक व्यावहारिक स्वरूप दिले. समाज व राज्य यांची निर्मिती कशी झाली असावी. या विचाराला सर्वप्रथम सिध्दांताचे स्वरूप देणाऱ्या या विचारवंताचा १६७९ मध्ये मृत्यू झाला.

**ग्रंथ रचना :–**

थॉमस हॉब्जने एकूण तीन ग्रंथांचे लिखाण केले. Foundation of Natural and Political Principles हा पहिला ग्रंथ त्याने लिहिला. त्यात त्याने लोकांच्या नैसर्गिक हक्कांचे व राज्याच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करणे राजाचे कर्तव्य आहे, त्यात त्याने समन्वय कसा साधला पाहिजे याविषयी विचार व्यक्त केले आहेत. Decive हा त्याचा दुसरा ग्रंथ त्याने हस्तलिखित स्वरूपात प्रसिध्द केला व त्यात त्याने सामाजिक कराराची पार्श्वभूमी व निरंकुश राजेशाहीचे समर्थन केले. Leviathan हा त्याने लिहिलेला तिसरा

ग्रंथ होय. या ग्रंथातील विचारांमुळे त्याला प्रसिध्दी मिळाली. या ग्रंथात त्याने निरंकुश राजेशाही कशी आदर्श व योग्य आहे व तिला जनसंमतीचा आधार कसा मिळविला पाहिजे याविषयी विवेचन केले आहे.

**अध्ययन पध्दती :–**

थॉमस हॉब्जचा काळ हा शास्त्र, विज्ञानाच्या क्षेत्रात पध्दतशीर वैचारिक मांडणीचा काळ होता. हॉब्ज अनेक विचारवंतांच्या व शास्त्रज्ञ व विज्ञानवाद्यांच्या संपकार्त आला. त्यामुळे त्यांच्या विचारांचा हॉब्जच्या अध्ययन पध्दतीवर प्रभाव पडला. त्यात प्रामुख्याने युक्लीड, फ्रान्सिस बेकन, देकार्त, गॅलिलिओ यांचा उल्लेख करावा लागेल. त्याने बेकनचा व्यक्तिगत सचिव म्हणून पाच वर्षे काम केले. युक्लीडच्या भूमिती शास्त्रातील पध्दतींचा त्याच्यावर परिणाम झाला. त्याचा वापर त्याने समाज व राज्याच्या निमिर्तीसंबंधी सैध्दांतिक मांडणी करण्यासाठी केला. व्यक्ती. समाज व राज्य यांच्यातील आंतरसंबंधांची मांडणी करण्यासाठी त्याने पदार्थ विज्ञानातील गतिनियम, भौतिक शास्त्रातील तत्त्वे यांचा वापर करण्याचा प्रयत्न केला. त्याद्वारे त्याने आपल्या विचारांना अधिक शास्त्रीय व व्यावहारिक तत्त्वांची बैठक देण्याचा प्रयत्न केला.

त्याच्या अध्ययन पध्दतीचे वैशिष्ट्य म्हणजे वैचारिक मांडणीसाठी सामान्याकडून विशेषतेकडे जाणाऱ्या निगमनात्मक पध्दतीचा वापर होय. तसेच काहीवेळेला तात्त्विक विचारांच्या विश्लेषणासाठी मानसशास्त्रीय पध्दतींचादेखील वापर केला. त्याने भूमिती, गणित या शास्त्रातील शास्त्रीय पध्दतींचा वापर करून राजकीय सिध्दांतांना, तात्त्विक विचारांना वैज्ञानिक बुध्दीवादी विचारांचा आधार द्यावा, असे म्हटले आहे.

**मानवी स्वभावासंबंधीचे विचार :–**

हॉब्जच्या सामाजिक कराराच्या सिध्दांतातील मध्यवर्ती कल्पना म्हणजे मानवी स्वभाव होय. हॉब्जने मानवी स्वभावाचे विश्लेषण मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून केले आहे. निसर्गावस्थेतील मानवाला त्याच्या विशिष्ट स्वभावामुळे समाज व राज्य निर्माण करण्याची गरज वाटली, असे त्याचे मत होते. मनुष्य स्वभावाचे वर्णन करताना त्याने 'मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे' हे ॲरिस्टॉटलचे गृहितक नाकारले. त्याच्या मते, मनुष्य जन्मत: अत्यंत स्वार्थी, अहंकारी, चंचल, धूर्त आणि भित्रा आहे. तो सतत स्वत:च्या सुखाचा आणि सुरक्षिततेचा विचार करतो. तो दु:ख टाळण्याचा आणि सुख मिळविण्याचा प्रयत्न करतो. आपले जीवित आणि संपत्ती सुरक्षित रहावी यासाठी त्याची धडपड चालू असते. त्यामुळे तो आत्मकेंद्री व इतरांवर अविश्वास दाखविणारा बनला. मानवाची प्रत्येक कृती स्वार्थाने प्रेरित झालेली असते. जेव्हा प्रत्येकाची कृती सुख, सुरक्षितता मिळविण्याच्यादृष्टीने होते तेव्हा त्यात विरोध, संघर्ष निर्माण होतो. त्याने या संघर्षाची तीन मुख्य कारणे सांगितली आहेत.

१) सुख व सुरक्षितता प्राप्तीसाठी चाललेली स्पर्धा.

२) परस्परांविषयी अविश्वास, भीती.

३) वैभव, किर्ती यांचा हव्यास.

निसर्गावस्थेतील मानव सतत स्वत:चे अस्तित्व टिकविण्याच्या विवेचनेत होता. त्याला सतत आक्रमणाचे, युध्दाचे व मृत्यूचे भय वाटत होते. त्यामुळे स्वत:च्या अस्तित्वासाठी दुसऱ्याचे जीवन संपविण्याचा अविचारदेखील तो करतो. त्याच्या प्रत्येक कृतीमागे स्वार्थ, असहकार्य असल्यामुळे तो सतत दु:खी होता. त्याचे सर्व व्यवहार स्वार्थाने प्रेरित झालेले होते. त्यामध्ये जर सहकार्य, परस्पर विश्वास हे सद्‌गुण निर्माण झाले तरी त्याचे कारणदेखील व्यक्तीगत स्वार्थच आहे. असे तो मानतो.

**सामाजिक कराराचा सिध्दांत :-**

हॉब्जच्या राजकीय विचारांवर १७ व्या शतकातील इंग्लंड, फ्रान्स यासह युरोपमधील राजकीय, सामाजिक परिस्थितीचा प्रभाव पडला होता. हॉब्ज प्रबोधनाच्या, पुनरुज्जीवनाच्या कालखंडात जन्माला आला. त्यामुळे या चळवळीचाही त्याच्यावर परिणाम झाला. इंग्लंडमध्ये १६४१ साली राज्यक्रांती झाली. राजाच्या सत्तेला असलेल्या ईश्वरी अधिष्ठानाला विरोध झाला. दैवी सिध्दांताद्वारे मांडण्यात आलेल्या 'राजा हा परमेश्वराचा प्रतिनिधी आहे', या तत्त्वाला धक्का बसला. राज्यसंस्था ईश्वरनिर्मित नसून ती मानव निर्मित आहे व राजसत्तेला जर जनसंमतीचा आधार नसेल तर ती निरर्थक आहे, असा नवा विचार उदयाला आला. 'राजा विरुध्द संसद' या संघर्षात संसदेचे श्रेष्ठत्व मान्य झाले. हॉब्जच्या काळातील इंग्लंडमधील ही परिस्थिती त्याच्या राजकीय तत्त्वज्ञानावर परिणाम करणारी ठरली. इंग्लंडच्या या अस्थिर राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर हॉब्जने सुसंघटित समाज व सामर्थ्यशाली राज्य कसे निर्माण करता येईल, यादृष्टीने सर्वप्रथम १६५१ साली लिहिलेल्या 'लेविएथन' या ग्रंथात या विषयाची पध्दतशीरपणे वैचारिक मांडणी केली. 'लेविएथन' या शब्दाला बायबलचा संदर्भ असून त्याचा अर्थ समुद्रातील प्रचंड शक्तीमान व अजस्त्र जलचर असा आहे. राज्याचे सामर्थ्यवान स्वरूप स्पष्ट करण्यासाठी हॉब्जने लेविएथन या जलचराची उपमा वापरली. त्यातून त्याला राज्य सर्वश्रेष्ठ, निरंकुश असून त्याचे सर्वांवर नियंत्रण असते, हे सांगायचे होते. या ग्रंथात त्याने राज्य कसे निर्माण झाले असावे याबाबत तर्क, अनुमान यावर आधारित विवेचन केले आहे. त्याच्या या विवेचनाचा उद्देश अंतिमत: निरंकुश राजेशाही निर्माण करणे हा होता, हे लक्षात घेतले पाहिजे. लेविएथन या ग्रंथात त्याने राज्य हे लोकांनी एकमेकांशी केलेल्या करारातून निर्माण झाले आहे असे गृहित तत्त्व मांडले आहे. त्याचा सामाजिक कराराचा सिध्दांत निसर्गावस्था, कराराचे स्वरूप, कराराची वैशिष्ट्ये या मुद्यांच्या आधारे समजून घेतला पाहिजे.

**१. निसर्गावस्था :-**

निसर्गावस्था ही राज्य निर्माण होण्यापूर्वीची भयानक अवस्था होती, असे हॉब्जचे मत आहे. निसर्गावस्थेत व्यक्तीला जीविताची शाश्वती नव्हती. सर्वत्र संघर्ष चालू होता. व्यक्तीचे जीवन असुरक्षित, कष्टमय व पशूतुल्य होते. मानवाचे जीवन क्षणभंगूर होते. परस्परांबद्दल अविश्वास होता, ज्याच्याजवळ शक्ती, सामर्थ्य आहे, तोच या संघर्षात टिकून रहात होता. त्यामुळे सर्वत्र 'मत्स न्याय', 'बळी तो कान पिळी' अशी अवस्था होती. हक्क, स्वातंत्र्य, समता, न्याय, नीति या कल्पनाच अस्तित्वात नव्हत्या.

थोडक्यात हॉब्जच्या मते, समाज व राज्यपूर्व अवस्था (निसर्गावस्था) अतिशय गोंधळाची होती आणि निसर्गावस्थेतील मानव क्रूर, ओंगळ, संकुचित, एकाकी व दुबळा होता.

**सामाजिक करार :–**

मानवी स्वभावाचे वर्णन हॉब्जने असे निराशाजनक केले असले तरी निसर्गावस्थेतील मानव, समाज व राज्य निर्माण करु शकतो असा आशावाद त्याने सामाजिक कराराच्या माध्यमातून व्यक्त केला आहे. त्याच्या मते, मनुष्य निसर्गत: शांतता, सुरक्षितता, वैभव, किर्ती या गोष्टींच्या शोधात असतो. मानवाचा वर उल्लेखलेला सगळा संघर्ष सुखी, समाधानी व सुरक्षित जीवन प्राप्त करण्यासाठी चाललेला असतो. त्याच्या आजूबाजूची परिस्थिती संघर्षाची, असुरक्षिततेची असली तरी या परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी त्याची खरी धडपड चालू असते. हॉब्ज म्हणतो की, या परिस्थितीतून बाहेर येण्यासाठी प्रत्येकाने जर प्रामाणिकपणे प्रयत्न केला, सर्वांनीच सद्वर्तन ठेवले. काही तत्त्वांचे, नियमांचे पालन केले तर ही अवस्था संपू शकते. या तत्त्वांनाच तो 'निसर्गनियम' असे म्हणतो. या निसर्ग नियमांचे पालन व्हावे, चांगला समाज व समर्थ, शक्तिशाली राज्याचा उदय होवो, या मुख्य हेतूने त्याने 'सामाजिक करार' सिध्दांत मांडला. निसर्ग नियमांचे पालन केले नाही तर पुन्हा निसर्गावस्थेतील भयंकर परिस्थिती निर्माण होण्याची भीती आहे आणि ही भीतीची भावनाच सर्वांना सद्वर्तन ठेवण्यास भाग पाडेल, असे त्याला वाटते.

**कराराचे स्वरुप :–**

निसर्गावस्थेतील भयंकर अवस्था संपविण्यासाठी सर्वजण एकत्र आले व त्यांनी आपसांत एक करार केला. त्याला तो 'सामाजिक करार' असे म्हणतो. हॉब्जच्या मते, निसर्गावस्थेतील प्रत्येक व्यक्ती ही अपरिहार्यपणे सामाजिक कराराचा एक भाग आहे. तिच्यावर कराराच्या अटी, नियम पाळण्याचे बंधन आहे. सर्व व्यक्तींनी करार करुन सार्वभौम सत्ता एका व्यक्तीकडे दिली. मात्र ती व्यक्ती कराराचा भाग नाही. त्यामुळे करार पाळण्याचे बंधन तिच्यावर नाही. सार्वभौम सत्ता जिच्या हातात आहे ती व्यक्ती सर्वांकडून निसर्ग नियमांचे पालन करून घेते. सार्वभौम सत्ता हातात असलेली व्यक्ती म्हणजे राजा व तिच्या आदेशांचे पालन करणाऱ्या इतर व्यक्ती म्हणजे समाज होय. याचा अर्थ हॉब्जने सामाजिक कराराच्या सिध्दांताच्या माध्यमातून सर्वंकष, सार्वभौम सत्ता असलेल्या राजेशाहीची कल्पना मांडली आहे. अशाप्रकारे सामाजिक करारातून सार्वभौम सत्ता असलेली राज्यसंस्था अस्तित्वात आली व निसर्गावस्था नष्ट होवून सर्वांनाच चांगल्या जीवनाची शाश्वती मिळाली. सामाजिक कराराद्वारे प्रत्येक व्यक्तीने असे ठरविले की, 'मी माझे व्यक्तिगत स्वातंत्र्य, सुरक्षितता व निसर्गदत्त अधिकार सार्वभौम सत्तेकडे (एका व्यक्तीकडे किंवा व्यक्ती समूहाकडे) देत आहे. परंतु प्रत्येकाने तसेच अनुकरण केले पाहिजे.' अशा प्रकारचा करार व्यक्तीव्यक्तींमध्ये झाला व सुसंघटित 'समाज निर्माण झाला व या सुसंघटित समाजाने 'राज्य निर्माण केले.

**सामाजिक कराराची वैशिष्ट्ये :–**

१) निसर्गावस्थेतील गोंधळला कंटाळून लोकांनी आपापसांत करार केला.

२) हा करार व्यक्ती-व्यक्तींमध्ये झाला.

३) सार्वभौम सत्ता प्राप्त झालेली व्यक्ती हा कराराचा दुसरा पक्ष नव्हती. व्यक्ती हा कराराचा एकमेव पक्ष आहे.

४) सार्वभौम सत्ता हा कराराचा दुसरा पक्ष नसल्यामुळे सार्वभौम सत्तेवर करार पाळण्याचे बंधन नाही.

५) व्यक्तीने आपले निसर्गदत्त अधिकार, स्वातंत्र्य सार्वभौम सत्तेला देऊन टाकले व त्याबदल्यात आज्ञा पालनाचे बंधन स्वीकारले.

६) सार्वभौम सत्ता सर्वोच्च, सर्वश्रेष्ठ व निरंकुश असते.

७) सार्वभौम सत्तेची आज्ञा म्हणजेच कायदा होय.

८) व्यक्तीला सामाजिक करारातून बाहेर पडता येणार नाही.

९) सार्वभौम सत्तेला विरोध करता येणार नाही.

१०) कायद्यांची अंमलबजावणी करणे, व्यक्तीचे संरक्षण करणे, न्यायदान करणे, आदेश देणे ही कामे सार्वभौम सत्तेची आहेत.

थोडक्यात, हॉब्जने सामाजिक कराराच्या सिध्दांताच्या माध्यमातून समाज व राज्य कसे निर्माण झाले असावे याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला.

**राज्यासंबंधीचे विचार :-**

हॉब्जच्या राज्यासंबंधीच्या विचारांवर १७व्या शतकातील युरोपमधील परिस्थितीचा प्रभाव पडलेला आहे. वास्तविक ग्रीकांनी सुरुवातीच्या काळात राज्यसंस्था परमेश्वराने निर्माण केली व राजा हा परमेश्वराचा प्रतिनिधी आहे, असा विचार मांडला. परंतु १७ व्या शतकात मॅकियाव्हेलीने सर्वप्रथम राज्याच्या उत्पत्तीसंबंधी मांडलेला दैवी सिध्दांत अमान्य केला आणि राज्यसंस्था मानवी गरजेतून निर्माण झाली या विचारांचा पाया घातला. मॅकियाव्हेलीच्या विचारांचा प्रभाव नंतरच्या काळात हॉब्ज, लॉक व रुसो यांच्यावर पडला व त्यांनी राज्याच्या उत्पत्तीसंबंधी सामाजिक कराराच्या सिध्दांताची मांडणी केली. त्याला मॅकियाव्हेलीचे विचार पूरक ठरले. थॉमस हॉब्जने सामाजिक कराराच्या सिध्दांताच्या माध्यमातून अनियंत्रित, निरंकुश राजेशाहीचा पुरस्कार केला. त्याच्या मते, निसर्गावस्थेतील मानवाने स्वत:च्या अस्तित्वासाठी, जीवन संघर्ष संपविण्यासाठी सर्वशक्तिमान अशा राज्यसंस्थेची निमिर्ती केली.

हॉब्जच्या काळात युरोपमध्ये राष्ट्र-राज्य, सार्वभौमत्त्व या संकल्पना निर्माण झाल्या होत्या. तसेच धर्मसत्ता व राजसत्ता यांचे कार्यक्षेत्र विभक्त असावे, धर्माचा राजकारणात हस्तक्षेप नसावा, धर्मगुरु, चर्च यांचे राज्यसंस्थेवर वर्चस्व नसावे या विचारांचा सर्वत्र प्रसार सुरू झाला होता. राजसत्तेला धर्मसत्तेचा नव्हे तर जनसंमतीचा आधार असावा, अशी धारणा निर्माण झाली होती. राज्याचे कार्यक्षेत्र, सार्वभौम सत्तेचे अधिकार काय असावेत त्याचबरोबर व्यक्तीचे स्वातंत्र्य, सुरक्षितता, तिचा आनंदी जीवन जगण्याचा हक्क तसेच व्यक्ती

म्हणून राज्याचे कायदे, आदेश पाळण्याचे कर्तव्य याबाबत मौलिक असे विचारमंथन सुरू झाले होते. या विचार मंथनाची परिणीती म्हणून आध्यात्मिक सुखापेक्षा भौतिक सुख महत्त्वाचे आहे अशी नवी कल्पना निर्माण झाली. त्यामुळे लोकांच्या राजा व राज्यसंस्था याविषयीच्या अपेक्षा वाढल्या होत्या. या सर्व विचारांचा प्रभाव मॅकियाव्हेलीवर पडला.

या प्रभावातून हॉब्जने त्याच्या प्रसिध्द 'लेविएथन' ग्रंथात राजा, राज्यसंस्था, राज्याचे कार्यक्षेत्र, व्यक्तीच्या अपेक्षा, कर्तव्ये याविषयी विचार मांडले आहेत. त्यांच्यामते, मनुष्य जन्मत: कपटी, दुष्ट असला तरी तो सतत सुखाच्या शोधात असतो. सुरक्षित, शांत जीवन जगण्याचा त्याचा प्रयत्न असतो. त्याच्या मते, मनुष्याचा हाच स्वभाव राज्यसंस्थेच्या निमिर्तीला कारणीभूत ठरला आहे. त्याच्या मते, मानवाचे जीवन सुखी, समाधानी बनविणे हे अंतिम साध्य आहे आणि राज्य हे साध्य प्रत्यक्षात आणणारे एक साधन आहे. राज्य ही सर्व श्रेष्ठ संस्था असून तिच्यापेक्षा कुणीही श्रेष्ठ नाही. धर्मसंस्था, चर्च, धर्मगुरु यांच्यापेक्षा राज्याची सार्वभौम सत्ताश्रेष्ठ आहे. राज्यापेक्षा फक्त परमेश्वरच श्रेष्ठ असू शकतो. थोडक्यात हॉब्जने एक प्रकारे आदर्श अशा राज्याची कल्पना मांडली आहे. ही आदर्श राज्याची कल्पना अधिक सविस्तरपणे स्पष्ट करताना हॉब्ज म्हणतो की, राज्याच्या ठिकाणी सार्वभौमत्व असते. सार्वभौमत्व हा राज्याचा आत्मा आहे. सार्वभौमत्वाशिवाय राज्य ही कल्पना सुध्दा अस्तित्वात असू शकत नाही. कायदे करणे, त्यांची अंमलबजावणी करणे व न्यायदान करणे ही कामे राज्याच्या सार्वभौम सत्तेकडून केली जातात. ही सार्वभौम सत्ता एका व्यक्तीच्या म्हणजे राजाच्या हातात असते. याचा अर्थ आदर्श राज्य म्हणजे सर्वंकष राजेशाही असे हॉब्जला अभिप्रेत असावे. तसेच राजेशाही ही मूलभूत, नैसर्गिक व मानवाने केलेल्या सामाजिक करारातून निर्माण होत असल्यामुळे ती निश्चितच आदर्श असते असेही त्याला अभिप्रेत असावे.

**शासन संस्थेचे वर्गीकरण :–**

शासनसंस्थेविषयी हॉब्जने मांडलेल्या विचारांवर ॲरिस्टॉटलच्या शासनसंस्थेच्या वर्गीकरणाचा प्रभाव पडला आहे. त्याच्या मते, राज्याची सार्वभौम सत्ता किती जणांच्या हातात आहे, यावरुन शासनसंस्थेचे वर्गीकरण करता येते. राजेशाही, महाजनशाही व लोकशाही हे शासन संस्थेचे शुध्द प्रकार आहेत. राजेशाहीमध्ये सार्वभौम सत्ता एका व्यक्तीकडे, महाजनशाहीत अनेक व्यक्तींकडे तर लोकशाहीत ती सर्वांकडे असते. शासन संस्थेचा कोणता प्रकार चांगला आहे हे ठरविण्याचा महत्त्वाचा निकष म्हणजे तो प्रकार शांतता, सुव्यवस्था व सुरक्षितता निर्माण करतो व टिकवून ठेवतो का? हा आहे. म्हणूनच अल्पजनशाही, हुकूमशाही, झुंडशाही हे शासन प्रकार हॉब्जला मान्य नाहीत. त्याच्या मते, राजेशाही हा शासनाचा सर्वोत्तम प्रकार आहे. त्याची महत्त्वाची कारणे त्याने सांगितली आहेत. राजेशाहीमध्ये सार्वभौम सत्ता एकट्या राजाच्या हातात असते. त्यामुळे राजा प्रजेचे कल्याण करु शकतो. तो प्रजेच्या हिताची काळजी घेतो. सार्वभौम सत्तेचा वापर करून तो महत्त्वाचे निर्णय घेतो, कायदे करतो, त्यांची खंबीरपणे अंमलबजावणी करतो, न्याय देतो. लोक हिताचे निर्णय घेतले जातात. त्यांची त्वरित अंमलबजावणी होते. त्यामुळे लोकांच्या शासनाकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण होतात. राजेशाहीमध्ये व्यक्तीगत हितसंबंध व सार्वजनिक हितसंबंध असा फरक केला जात नाही. त्यामुळे सार्वजनिक हितसंबंधांना प्राधान्य दिले जाते. प्रजेचे

कल्याण, हित यांना महत्त्व मिळाल्यामुळे प्रजेची नाराजी निर्माण होत नाही. राजेशाहीत राजाच्या मर्जीतील लोकांना विशेष सवलती, दर्जा, मान सन्मान मिळतो. परंतु अशा लोकांची संख्या कमी असते. लोकशाहीत अशा लोकांची संख्या मोठी असते. तसेच राजेशाहीत राजपदाच्या स्पर्धेतदेखील मर्यादित लोक असतात. याउलट लोकशाहीत सत्ता सर्वांच्या हातात असते. त्यामुळे लोकशाहीत स्पर्धकांची संख्या जास्त असते. हॉब्जने अनेक मुद्यांच्या आधारे राजेशाहीतील गुण वैशिष्ट्ये सांगितली असली तरी त्यातील दोषदेखील त्याने मान्य केले आहेत. स्वार्थ, अहंकार, भ्रष्टाचार, सत्तेचा गैरवापर असे दोष राजेशाहीत असतात. थोडक्यात, हॉब्जने राज्यसंस्था ही सर्वश्रेष्ठ संस्था आहे हे मान्य केले व राजेशाही हा शासनप्रकार सर्वोत्तम मानला.

**हॉब्जचा विवेकवाद**

हॉब्जने राज्यसंस्थेची निर्मिती दैवी इच्छेतून होत नसून, ती मनुष्यनिर्मित आहे. यांनी अनेक विवेकाच्या आधारावर आपले विचार मांडले आहे. त्यामध्ये सार्वभौमत्वाची कल्पना, नैसर्गिक हक्क इत्यादी विचाराची चर्चा केली आहे.

**सार्वभौमत्वासंबधीचे विचार**

समाजिक कराराच्या विचाराच्या पुष्ट्यर्थ त्यांनी 'राजकीय सार्वभौमत्वाची संकल्पना मांडली आहे. राज्यात सार्वभौम सत्ता कधी कशी अस्तित्वात आली याचे स्पष्टीकरण देताना हॉब्ज असे सांगतो की, निसर्गावस्थेतील मानवाने सामाजिक करारव्दारे राज्याची निर्मिती केली. या करारात निर्सगस्थेतील सर्व व्यक्तीने सहभागी झाल्या होत्या. त्यांनी करार करताना शांतता व सुरक्षितता याच्या बदल्यात निसर्गावस्थेतील आपल्या सर्व हक्कांचा त्याग केला. त्यांनी आपले हक्क एका सर्वमान्य सर्वश्रेष्ठ व्यक्तीकडे किंवा व्यक्तीसमूहाकडे दिले. हे सर्वमान्य सर्वश्रेष्ठ व्यक्ती किंवा व्यक्ती समूह हीच राज्यातील सार्वभौम सत्ता होय. अशा प्रकारे राज्यात सार्वभौमत्वाची किंवा सार्वभौम सत्तेची निर्मिती झाली आहे. तीची काही वैशिष्ट्ये सांगितले आहेत. त्याच्यामते राज्यात सार्वभौम हाच सर्वोच्च व सर्वश्रेष्ठ असतो. वर पहिल्याप्रमाणे सार्वभौम एक व्यक्ती असू शकते किंवा व्यक्ती समूह असू शकतो. सार्वभौम हा करारातील पक्ष नसल्यामुळे त्याच्यावर कोणतीही बंधने येण्याचा प्रश्न उद्भवत नाही. याचा अर्थ सार्वभौमत्व हे निरंकुश तसेच ते अमर्याद व अविभाज्याही असते.

**कायदाविषयक विचार**

नागरी समाजात शांततामय सहजीवन जगायचे असेल तर प्रत्येक व्यक्तीने कायद्याप्रमाणे वागलेच पाहिजे असे हॉब्जला वाटते. म्हणजेच निसर्गावस्थेतील स्वैरनियम तोडून निरंकुश सार्वभौम सत्तेने दिलेल्या कायद्याचे पालन हॉब्जला अपेक्षित आहे. त्यादृष्टीने ब्रिटीश विचारवंत जॉन ऑस्टीन याने लावलेला सार्वभौमत्वाचा अर्थ आणि कायद्याची व्याख्या हॉब्जला बहुतांशी मान्य होती. कायद्याचे पालन करवून कायद्याचा निर्माता असतो. परंतु स्वत: सार्वभौम मात्र कायद्याहून श्रेष्ठ असते. वास्तविक हॉब्जला अनियंत्रित सार्वभौमत्व आणि सार्वभौमाची इच्छा म्हणजेच कायदा असे मनापासून वाटत असावे. हॉब्जच्या विवेचनात सार्वभौमाने

कायद्याचा आदर करावा अशी अपेक्षा व्यक्त झाल्याचे आढळते. परंतु प्रत्यक्षात व्यवहारात त्याने कायद्याचा आदर करावा म्हणजे काय करावे हे स्पष्ट केलेले नाही.

**व्यक्तींस्वातंत्र्याची संकल्पना**

थॉमस हॉब्जने राज्याच्या उदयाच्या सामाजिक करार सिधान्दाची मांडणीच अशी केली आहे की, त्यामध्ये लोकशाहीला अभिप्रेत असलेल्या व्यक्तीस्वातंत्र्याला महत्त्व मिळू नये. तरीही त्याने सामाजिक करार सिद्धांताच्या अखेरीला आपली व्यक्ती स्वातंत्र्याची कल्पना कशीबशी का होईना स्पष्ट केली आहे. स्वातंत्र्याची व्याख्या करताना हॉब्ज म्हणतो, 'स्वातंत्र्य म्हणजे व्यक्तीच्या विचार आणि कृतींना विरोध नसणे किंवा व्यक्तीच्या विचाराने कृतीवर कसलेही बाह्य नियंत्रण नसणे. स्वातंत्र्याच्या परिस्थितीचे त्यांने मोठे गंमतीदार वर्णन केल्याचे आढळते. तो म्हणतो, 'जर माणसाला साखळदंडाने बांधून ठेवले तर त्याची शारीरिक हालचाल थाबते आणि माती कुंठीत होते.'' परंतु जर त्याला साखळदंडातून मुक्त केले तर तो पुन्हा गतिमान बनून आपल्या इच्छेनुसार कृती करू शकतो आणि असा माणूस स्वतंत्र असतो. हॉब्जच्या स्वातंत्र्याच्या अशा वर्णनाचा नेमका काय अर्थ घ्यावयाचा हे समजणे अवघड आहे.

**राज्य आणि धर्म संबध**

हॉब्जच्या मतानुसार सार्वभौम सत्तेस सर्वाधिक धोका कोणापासून असेल तर तो धर्म आणि धर्ममंदिर यांचा होय. स्वतः हॉब्ज धार्मिक प्रवृत्तीचा नव्हता. तरीदेखील राजकीय दृष्टीकोनातून धर्माचे असलेले महत्त्व ओळखून होता. धर्म आणि प्रार्थना स्थळे यांना त्यांनी कधीही अवाजवी महत्व दिले नाही. इतर सामाजिक संस्था प्रमाणे धर्म व प्रार्थनास्थळे यादेखील गौण संस्था असल्या तरी त्याची दखल सार्वभौमाला आवश्यक वाटेल तेव्हाच घेतलेली बरी असे हॉब्ज ठामपणे म्हणतो. 'धर्माज्ञां ही राजाज्ञेपेक्षा श्रेष्ठ नसून ती राजाश्रायावर चालत असल्यामुळे फाजील महत्त्व देण्याचे मुळीच कारण नाही असेही हॉब्ज म्हणतो.

**निसर्गनियम**

हॉब्जने निसर्गनियम या संकल्पनेची वेगळी मांडणी केली आहे. निसर्गचा नियम म्हणजे माणसांमध्ये असलेला निष्पापपणा नव्हे किंवा माणसा माणसातील नैसर्गिक विषमता नव्हे असे म्हणतो. आपले संरक्षण करण्यासाठी माणसाला स्वतःचे शारीरिक व बौद्धिक क्षमता वापरण्याचा नैसर्गिक हक्क असून त्यालाच हॉब्ज 'निसर्ग नियम' असे म्हणतो.

**※ स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न–२ ※**

खालीलपैकी अचूक पर्याय निवडा व लिहा.

१. थॉमस हॉब्जने .............. या सिध्दांताचा पाया घातला.

(अ) शक्ती सिध्दांत
(क) उत्क्रांतीवादी सिध्दांत
(ब) दैवी सिध्दांत
(ड) सामाजिक कराराचा सिध्दांत.

२. थॉमस हॉब्जने ............. हा ग्रंथ लिहिला.

(अ) लेविएथन (ब) द प्रिन्स (क) सामाजिक करार (ड) पॉलिटिक्स.

३. थॉमस हॉब्जने ............. या ग्रंथात सामाजिक क राराचा सिध्दांत मांडला.

(अ) रिपब्लिक (ब) लेविएथन (क) दास कॅपिटल (ड) द लॉज.

४. ............. च्या मते, समाज व राज्यपूर्व अवस्थेत मानव क्रूर, ओंगळ, संकुचित व एकाकी होता.

(अ) मॅकियाव्हेली (ब) कार्ल मार्क्स (क) थॉमस हॉब्ज (ड) रुसो.

५. हॉब्जने ........... हा शासन प्रकार सर्वोत्तम आहे, असे म्हटले आहे.

(अ) निरंकुश राजेशाही (क) हुकूमशाही

(ब) मर्यादित राजेशाही (ड) लोकशाही.

### २.२.३ जॉन लॉक (इ.स. १६३२ – इ.स. १७०४)

**अल्प परिचय :–**

जॉन लॉक चा जन्म २९ ऑगस्ट १६३२ मध्ये इंग्लंडमधील स्टिरोन येथे एका सामान्य कुटुंबात झाला. त्याचे शालेय शिक्षण बेस्ट मिनिस्टर शाळेत आणि उच्च शिक्षण ऑक्सफोर्ड विद्यापीठात झाले. तेथेच काही काळ त्याने प्राध्यापक म्हणून काम केले. त्याने वैद्यक शास्त्राचा अभ्यास करून शॅफ्टस्बरीच्या कुटुंबाचा वैद्यकीय सल्लागार व नंतर खाजगी सचिव म्हणून जबाबदारी पार पाडली. शॅफ्टस्बरी हा इंग्लंडमधील प्रसिध्द उदारमतवादी विचारवंत होता. त्याची इंग्लंडच्या राजदरबारातील अत्यंत विश्वासू व मुत्सद्दी व्यक्तींमध्ये गणना होत होती. त्याच्या संपकार्त आल्यामुळे लॉक त्याच्या विचारांनी प्रभावित झाला. शॉफ्टस् बरीमुळे लॉक ला इंग्लंडमधील राजकीय परिस्थितीचा जवळून परिचय झाला त्याचा उपयोग पुढे त्याला स्वत:च्या राजकीय तत्त्वज्ञानाची मांडणी करताना झाला. त्याने काही काळ व्हीग पक्षासाठी काम केले. त्याला १६८३ मध्ये राजकीय कारणासाठी इंग्लंडमधून हॉलंडमध्ये स्थलांतर करावे लागले. १६८८ साली इंग्लंडमध्ये रक्तहीन क्रांती घडून आल्यानंतर तो पुन्हा इंग्लंडला परतला. १७०४ साली वयाच्या ७२ व्या वर्षी त्याचा मृत्यू झाला.

**ग्रंथ रचना :–**

१. **Essay Concerning Human Understanding**: या ग्रंथात त्याने मानवी स्वभावाचे वर्णन केले आहे. ते हॉब्जने केलेल्या वर्णनापेक्षा वेगळे व चांगले आहे.

२. **Two Treatises on Civil Government**: हा त्याचा राज्यशास्त्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ त्याने १६९० साली लिहिला. या ग्रंथात त्याने सामाजिक करार, समाज, राज्य

या संक ल्पनांची मांडणी केली. त्यातून त्याचे लोकशाही विषयीचे विचार व्यक्त झाले आहे. या ग्रंथात त्याने इंग्लंडमधील रक्तहीन क्रांतीचे समर्थन केले आहे.

३. **Letter on Toleration**: या ग्रंथात त्याने व्यक्तीच्या गुणवैशिष्ट्यांचे वर्णन केले आहे. चांगला समाज व राज्य निर्माण करण्यासाठी व्यक्तीच्या ठिकाणी असलेल्या सहिष्णुतेची गरज असते. त्याचा व्यक्तीच्या सहिष्णुतेवर असलेला विश्वास या ग्रंथात अनेक ठिकाणी व्यक्त झाला आहे.

**तत्कालीन प्रभाव :–**

कोणत्याही विचारवंतावर देशांतर्गत परिस्थिती, विविध घटना, घडामोडी, विविध विचारवंतांचे विचार, तत्त्वज्ञान यांचा प्रभाव पडलेला असतो. तसा तो जॉन लॉक वर पडला. हे पुढील मुद्यांवरून लक्षात येईल.

**१. इंग्लंडमधील परिस्थिती :–**

इंग्लंडमधील तत्कालीन राजकीय विचारांचा लॉकवर दूरगामी परिणाम झालेला दिसतो. १६४१ ते १६४९ हा इंग्लंडमधील यादवी युध्दाचा काळ होता. या काळात इंग्लंडमध्ये राजा सार्वभौम की संसद सार्वभौम या कारणावरुन संघर्ष सुरू झाला. या संघर्षातून संसदेचे श्रेष्ठत्व मान्य झाले. परंतु त्यानंतर १६८८ मध्ये रक्तहीन क्रांती घडून आली. या क्रांतीमुळे राजाच्या सार्वभौम सत्तेवर पुन्हा मर्यादा घालण्यात आली. या घडामोडींच्या प्रभावामुळे लॉकने मर्यादित राजेशाहीचे समर्थन केले.

**२. उदारमतवादी विचारांचा प्रभाव :–**

सुरुवातीला हॉब्जप्रमाणेच लॉक ने निरंकुश राजेशाहीचा अतिशय प्रभावीपणे पुरस्कार केला. त्याचे वडील निरंकुश राजेशाहीचे विरोधक होते. ते उदारमतवादी विचारांचे होते. वडिलांच्या विचारांच्या प्रभावामुळे नंतरच्या काळात लॉक मर्यादित राजेशाही हा सर्वोत्तम शासन प्रकार आहे. या विचाराकडे वळला. शॉफ्टस्बरीच्या संपकार्त आल्यामुळे लॉक त्याच्या राजकीय, आथिर्क व सामाजिक विचारांमुळे प्रभावित झाला. शॉफ्टस्बरी हा देखील उदारमतवादी विचारांचा व मर्यादित राजेशाहीचा पुरस्कर्ता होता. त्यामुळे देखील लॉक मर्यादित राजेशाहीचा समर्थक बनला.

**३. विचारवंतांचा प्रभाव :–**

बायल, हुक, मिडल हॅम, डेव्हीड थॉमस, फील्मर, थॉमस हॉब्ज यांच्या विचारांचा त्याच्यावर प्रभाव पडला. निसर्गावस्था, सामाजिक करार याबाबत हॉब्जच्या विचारांचा लॉक वर प्रभाव पडला. रेनेदेकार्त, पीयर गॅसेंडी, हुक, बायल यांच्याबराबेर काम करण्याची संधी मिळाली. या विचारवंतांच्या विचारांच्या प्रभावामुळे लॉकच्या विचारांना, लिखाणाला अधिक वैज्ञानिक, बुध्दिवादी व व्यावहारिक विचारांची बैठक प्राप्त झाली. त्याचा उपयोग त्याला ग्रंथ लेखनासाठी व राजकीय तत्त्वज्ञानाची मांडणी करण्यासाठी दिला.

**सामाजिक कराराचा सिध्दांत :–**

जॉन लॉकच्या सामाजिकक करारासंबंधीच्या विचारांचे अभ्यासाच्या सोयीसाठी निसर्गावस्था, कराराचे स्वरूप आणि कराराची वैशिष्ट्ये असे तीन भाग करता येतात. पहिल्या भागात त्याचे निसर्गावस्थेविषयीचे विचार समजून घेता येतील.

**१. निसर्गावस्था :–**

लॉकने निसर्गावस्थेचे वर्णन हॉब्जपेक्षा वेगळे आणि चांगले केले आहे. त्याच्यामते, मानवाचे निसर्गावस्थेतील जीवन ओंगळवाणे, पशुतुल्य नव्हते. तर निसर्गावस्थेतील मानव अतिशय मुक्त, स्वतंत्र होता. त्याला आपल्या मर्जीप्रमाणे जगण्याचा पूर्ण अधिकार होता. त्याच्यावर कोणाचेही आणि कोणतेही बंधन नव्हते. सर्वजण जन्मत: पूर्ण स्वतंत्र समान होते. प्रत्येक व्यक्ती स्वत:च्या स्वातंत्र्याचा उपभोग घेताना इतरांच्याही स्वातंत्र्याचा, अधिकारांचा विचार करीत होती. सर्वांचे एकमेकांशी सहकार्याचे संबंध होते. त्यांच्यामध्ये परस्पर विश्वास होता. शासन संस्था, कायदा अस्तित्वात नव्हता. त्यामुळे निसर्गावस्थेतील मानव खऱ्या अर्थाने मुक्त जीवन जगत होता. मात्र या अवस्थेत मानवी वर्तन निसर्ग नियमांवर आधारलेले होते. निसर्ग नियमांचा अर्थ सर्वजण आपापल्या कुवतीप्रमाणे, बुध्दीप्रमाणे लावत होता व त्याचे पालनही करीत होता. कालांतराने निसर्गावस्थेतील मानवी जीवनात एक महत्त्वाची अडचण निर्माण झाली. ती म्हणजे समाजातील सर्वजण निसर्ग नियमांचे योग्यप्रकारे पालन करतात किंवा नाही? आणि जर कोणी निसर्ग नियमांचे पालन करीत नसेल तर त्यांच्याकडून या नियमांचे पालन करून घेणारी किंवा अशा व्यक्तीला शासन करणारी कोणतीही शक्ती, यंत्रणा अथवा संस्था अस्तित्वात नव्हती. प्रत्येकाने आपल्या बुध्दीप्रमाणे निसर्ग नियमांचा अर्थ लावला व कृती केली. त्यामुळे कालांतराने निसर्गावस्थेत विस्कळीतपणा निर्माण झाला. परिणामी निसर्गावस्थेच्या सुरुवातीच्या शांत. मुक्त, सुरक्षित जीवनाचा शेवट झाला. परस्परात कलह, असहकार्य व अविश्वास निर्माण झाला. मानवी जीवन दु:खी, असुरक्षित बनले. या परिस्थितीवर नियंत्रण ठेवणारी, सार्वभौम, सामर्थ्यशाली यंत्रणा निर्माण करण्याचा विचार निसर्गावस्थेतील मानवाने केला आणि त्याने सामाजिक कराराच्या माध्यमातून सार्वभौम सत्ता असलेली राज्यसंस्था निर्माण केली. थोडक्यात लॉकच्या मते, निसर्गावस्थेतील संघर्षाच्या परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी मानवाने आपापसांत विचार करून. एकत्र येऊन, करार करून राज्यसंस्था निर्माण केली.

**२. सामाजिक कराराचे स्वरुप :–**

लॉकने १६९० साली Two Treatises on Civil Government हा ग्रंथ लिहिला. त्यात त्याने राज्याच्या निमिर्तीसंबंधीचा सामाजिक कराराचा सिध्दांत मांडला. सामाजिक कराराच्या सिध्दांताचे स्वरूप स्पष्ट करताना लॉक म्हणतो की, निसर्गावस्थेच्या शेवटच्या कालखंडात निसर्ग निमयांचा अर्थ लावणारी व त्यांचे पालन करून न घेणारी सार्वभौम संस्था अस्तित्त्वात नसल्यामुळे सर्वत्र 'बळी तो कानपिळी' किंवा 'मत्स न्याय' यासारखी अस्थिर व अन्यायावर आधारलेली अवस्था निर्माण झाली. ती नष्ट करण्यासाठी आणि पुन्हा निसर्गावस्थेतील सुरूवातीचे शांत, सुरक्षित जीवन निर्माण करण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन

परस्परांमध्ये करार केला. सामाजिक करार करण्याइतपत निसर्गावस्थेतील मानवाची बुध्दी विकसित झाली होती, हे तो मान्य करतो. त्याच्या मते, निसर्गावस्थेतील मानवाने दोन करार केले.

१) पहिला करार व्यक्तींनी एकमेकांशी केला. या करारानुसार निसर्ग नियमांच्या बाबतीत निवाडा करण्यासाठी स्वतंत्र, सार्वभौम संस्था निर्माण करण्याचे मान्य केले.

२) दुसऱ्या करारानुसार व्यक्तींनी आपले जीवित, मालमत्ता यासह महत्त्वाचे नैसगिर्क हक्क, स्वातंत्र्य स्वत:कडे ठेवले. इतर हक्क सार्वभौम सत्तेला देऊन टाकले. मात्र त्या मोबदल्यात सर्वांचे बाह्य शत्रूपासून संरक्षण तसेच सर्वांचा जीविताचे व मालमत्तेचे संरक्षण करण्याची जबाबदारी सार्वभौम सत्तेवर टाकली. सार्वभौम सत्तेचे प्रतिक म्हणून राज्यसंस्था व राज्यसंस्थेचे मानवीरुप राजा ही कल्पना मान्य केली. राज्यसंस्थेकडे दिलेली जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडता यावी, यासाठी सार्वभौम सत्तेला कायदे करण्याचा अधिकार (कायदे मंडळ), त्यांची अंमलबजावणी करण्याचा अधिकार (कार्यकारी मंडळ) व कराराचे पालन न करणाऱ्याना शासन करण्याचा अधिकार (न्याय मंडळ) असे दिले.

थोडक्यात या कराराद्वारे लोकांना राज्यसंस्था व राजा यांची सार्वभौम सत्तेचे प्रतीक म्हणून निमिर्ती केली. तसेच सार्वभौम सत्तेच्या अधिकारांचे कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ व न्याय मंडळ यात विभाजन केले व सत्तेत समतोल निर्माण केला. लॉकच्या या सिध्दांताने मर्यादित राजेशाहीची कल्पना मांडल्याचे लक्षात येते. त्याचप्रमाणे कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ यामध्ये सत्तेची विभागणी करण्याचा लॉक ने जो विचार मांडला आहे त्यात मॉन्टेस्क्यूने नंतरच्या काळात मांडलेल्या सत्ताविभाजनाच्या सिध्दांताची बीजे आहेत.

**३. कराराची वैशिष्ट्ये :–**

**१. निसर्गावस्थेचे वर्णन :** लॉक ने निसर्गावस्थेचे व मानवी स्वभावाचे वर्णन चांगले केले आहे. मनुष्य निसर्गत: चांगला आहे. सहकार्य, परस्पर विश्वास, शांतता, सहिष्णुता या मानवी गुणांची त्याने प्रशंसा के ली आहे.

**२. समाज व राज्य स्वतंत्र कल्पना :** त्याच्या मते, निसर्गावस्थेतील लोक समाजात रहात होते. परंतु राज्यसंस्था अस्तित्वात आलेली नव्हती. लोकांनी प्रथम एकत्र येऊन नागरी समाज निर्माण केला व त्यानंतर सार्वभौम सत्तेची निमिर्ती करण्याच्या उद्देशाने नागरी समाज हा राजकीय समाजात रुपांतरित झाला. सामाजिक करार हा राजकीय समाजाने केला. म्हणजे लॉकने नागरी समाज व राजकीय समाज या दोन स्वतंत्र कल्पना आहेत; असे गृहीत धरले.

**३. कराराचे दोन पक्ष :** हॉब्जच्या सामाजिक कराराच्या सिध्दांतात व्यक्ती हा कराराचा एकच पक्ष होता. परंतु लॉकचा करार द्विपक्षीय आहे. प्रथम व्यक्ती-व्यक्तींमध्ये करार झाला. त्यातून नागरी समाज निर्माण झाला. या नागरी समाजाने सार्वभौम सत्तेशी करार करण्यासाठी राजकीय समाज म्हणून आपले ऐक्य निर्माण

केले व या राजकीय समाजाने सार्वभौम सत्तेशी करार केला. या कराराचे व्यक्ती आणि सार्वभौम सत्ता असे दोन पक्ष आहेत.

**४. करार बंधनकारक :** हा करार पाळण्याचे बंधन दोन्ही पक्षांवर–व्यक्ती व सार्वभौम सत्ता यांच्यावर आहे. या कराराचे कोणालाही उल्लंघन करता येणार नाही किंवा करारातून बाहेर पडता येणार नाही.

**५. मर्यादित राजेशाहीचा पुरस्कार :** या कराराचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे निसर्गावस्थेतील व्यक्तींनी आपले नैसगिर्क अधिकार सार्वभौम सत्तेला न देता महत्त्वाचे अधिकार स्वत:कडे ठेवले व आवश्यक तेवढीच सत्ता, अधिकार सार्वभौम सत्तेला दिले त्यातून लॉकने मर्यादित राजेशाहीचा पुरस्कार केल्याचे दिसते.

**६. व्यक्ती व राज्य संबंध :** व्यक्तीच्या नैसर्गिक अधिकारांचे रक्षण करण्याची जबाबदारी सार्वभौम सत्तेची म्हणजे राज्यसंस्थेची आहे. व्यक्ती राज्यसंस्थेच्या नियमांचे व कायद्यांचे पालन करावे व राज्यसंस्थेने व्यक्तीच्या अधिकारांचे संरक्षण करावे, यावरच या कराराचे यश अवलंबून आहे; असे लॉक म्हणतो. यातून त्याने व्यक्ती व राज्य यांचे परस्पर संबंध कसे असावेत हे स्पष्ट केले आहे.

**७. जनमताचा पाठिंबा :** लोकांनी राज्यसंस्थेची निमिर्ती आपल्या गरजेतून केली आहे. त्यामुळे राज्यसंस्थेच्या सार्वभौम सत्तेला लोकांची मान्यता, पाठिंबा किंवा जनाधार आवश्यक आहे, असे लॉक चे स्पष्ट मत आहे. जोपर्यंत जनमताचा पाठिंबा आहे, तोपर्यंतच राज्याची सत्ता लोकांवर चालू शकते. हा अत्यंत महत्त्वाचा विचार लॉक ने या कराराच्या माध्यमातून मांडला आहे. यावरून त्याच्या या सिध्दांतात प्रातिनिधीक लोक शाहीच्या विचारांची सूक्ष्म छटा दिसून येते.

थोडक्यात, जॉन लॉक चा सामाजिक कराराचा सिध्दांत थॉमस हॉब्जच्या सिध्दांतापेक्षा अनेक बाबतीत वेगळा आहे व म्हणूनच अधिक वैशिष्ट्यपूर्ण आहे. हॉब्जच्या सिध्दांतापेक्षा तो अधिक व्यवहार्य, शास्त्रीय आहे. त्यात जसे वर्तमान काळातील परिस्थितीचे प्रतिबिंब पडले आहे तसे भविष्यातील परिस्थितीचे अनुमानही व्यक्त झाले आहे. या अर्थाने त्याचा सामाजिक कराराचा सिध्दांत महत्त्वपूर्ण ठरतो.

**राज्यासंबंधीचे विचार :–**

राज्यसंस्था निसर्गनिर्मित किंवा ईश्वर निर्मित नसून मानवनिर्मित आहे, ती मानवी गरजेतून निर्माण झाली आहे, हे ठामपणे सांगितले. त्याने राज्याच्या उत्पत्तीसंबंधीचा दैवी सिध्दांत मांडला आणि सामाजिक कराराचा सिध्दांत मांडून समाज व राज्याच्या निमिर्तीसंदर्भात अधिक शास्त्रीय, वस्तुनिष्ठ कारणमिमांसा केली आहे. त्याच्या मते, मानवी इतिहासाच्या एका विशिष्ट कालखंडात निसर्गावस्थेतील मानवाला सार्वभौम सत्ता असलेल्या राज्यसंस्थेची गरज वाटू लागली. सर्वांनी एकत्र येऊन एकत्रित विचारातून सामाजिक करार केला व कराराद्वारे राज्यसंस्था निर्माण केली. राज्यसंस्थेच्या निर्मितीमुळे निसर्गावस्थेतील अनिश्चिततेची परिस्थिती संपली. राज्यसंस्था अस्तित्वात आल्यामुळे लोकांना अधिक सुरक्षित, शांत, स्वतंत्र व चांगले जीवन प्राप्त झाले. लोकांनी कराराद्वारे राज्यसंस्था निर्माण केली, त्यापाठीमागे आपल्या जीविताचे, मालमत्तेचे व नैसगिर्क स्वातंत्र्याचे रक्षण व्हावे, स्वातंत्र्याचा अधिक चांगल्या प्रकारे उपभोग घेता यावा, शांतता व

सुरक्षितता मिळावी हा मुख्य उद्देश होता. लॉकच्या मते, प्रत्येक व्यक्ती जन्मत:च स्वतंत्र असते. जरी व्यक्तीने राज्यसंस्थेची निमिर्ती केली असली तरी व्यक्तीचे निसर्गदत्त स्वातंत्र्य, अधिकार सुरक्षित ठेवणे हेच तिचे मुख्य कर्तव्य आहे.

राज्यसंस्थेचे कर्तव्य, जबाबदारी काय असावी याविषयीदेखील लॉकने सविस्तर विचार मांडले आहेत. त्याच्या मते, व्यक्तीचे जीवन अधिक चांगले बनविणे, तिचे संरक्षण करणे, तिचे स्वातंत्र्य, अधिकार सुरक्षित ठेवणे ही राज्यसंस्थेची जबाबदारी आहे आणि ही जबाबदारी कराराद्वारे निश्‍चित झाली आहे. त्यामुळे ती राज्यसंस्थेला पार पाडावी लागेल. तसेच निसर्ग नियमांचा अर्थ लावणे, नियम व कायदे करणे, त्यांची अंमलबजावणी करणे, न्यायदान करणे हीदेखील राज्यसंस्थेची जबाबदारी आहे. ही जबाबदारी पार पाडता यावी यासाठी आवश्यक असलेली सार्वभौम सत्ता लोकांनी सामाजिक कराराद्वारे राज्यसंस्थेला दिली आहे.

कायदे करणे, त्यांची अंमलबजावणी करणे व न्यायदान करणे ही राज्यसंस्थेची तीन प्रमुख कार्ये मानली आहेत. ही कामे प्रत्यक्षात शासन संस्थेच्या माध्यमातून प्रत्यक्षात आणली जातात. त्यादृष्टीने त्याने कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ व न्याय मंडळ हे शासन संस्थेचे तीन विभाग मानले आहेत. त्यांच्यात सत्तेचे योग्य प्रकारे विभाजन केले तर हे तिन्ही विभाग स्वतंत्रपणे कार्य करू शकतात. त्याच्या या विचारांचा प्रभाव मॉन्टेस्क्यूवर पडला व त्याने शासन संस्थेच्या संदर्भात सत्ता विभाजनाचा सिध्दांत मांडला. यादृष्टीने लॉकचे राज्य व शासनसंस्थेविषयीच्या विचारांचे महत्त्व लक्षात येते.

लॉकने राज्याच्या सार्वभौम सत्तेला जनमताचा पाठिंबा अर्थात जनाधार असणे आवश्यक आहे, हा अतिशय महत्त्वाचा विचार मांडला. राज्याच्या सार्वभौम सत्तेला लोकांची मान्यता असते. त्याच्या मते, जोपर्यंत राज्याकडून ही सार्वभौम सत्ता लोक हितासाठी वापरली जाईल, तोपर्यंतच लोक सार्वभौम सत्तेला मान्यता अथवा पाठिंबा देतील. केवळ दंडशक्तीच्या बळावर राज्यसंस्थेला कार्य करता येणार नाही. तर जनाधार व राज्यसंस्थेसाठी, सार्वभौम सत्तेसाठी आवश्यकच आहे. या त्याच्या विचारांमधून जनतेच्या सार्वभौमत्वाची कल्पना स्पष्ट होते.

लॉकने मर्यादित राजेशाही हा शासन प्रकार सर्वोत्तम मानला. तो व्यक्तीच्या नैसगिर्क स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता होता. त्याने निरंकुश राजेशाही, सार्वभौम सत्तेचा अनिर्बंध वापर या कल्पना अमान्य केल्या आहेत. त्याच्या मते, मानवाने राज्यसंस्थेची निमिर्ती केली असल्यामुळे अंतिम सार्वभौम सत्ता व्यक्तीच्या, समाजाच्या पर्यायाने जनतेच्या हातात असली पाहिजे. जनाधाराशिवाय सार्वभौमत्त्व निरर्थक आहे. या त्याच्या विचारांवरून जनतेचे सार्वभौमत्व, जनतेच्या आधाराचे, पाठिंब्याचे अधिष्ठान असलेली शासन पध्दती याला त्याने अधिक महत्त्व दिल्याचे लक्षात येते. थोडक्यात लॉकने जरी इंग्लंडच्या विद्यमान परिस्थितीत मर्यादित राजेशाहीचा पुरस्कार केला असला तरी त्याच्या विचारांमधून प्रातिनिधीक लोक शाहीविषयीचे विचार व्यक्त झालेले आहेत.

**जॉन लॉकचे विवेकवाद**

**नैसगिर्क हक्कांची कल्पना :–**

जॉन लॉक हा व्यक्तीच्या नैसगिर्क हक्कांचे समर्थन करणारा विचारवंत होता. त्याच्या मते, प्रत्येक व्यक्ती जन्मत: स्वतंत्र असते. निसर्गावस्थेतील मानवदेखील जन्मत: स्वतंत्र व नैसर्गिक स्वातंत्र्याचा मुक्तपणे उपभोग घेत होता. हक्क मानवाच्या कल्याणासाठी, हितासाठी आवश्यक असतात. हक्कांचे स्वरूप नैसर्गिक असल्यामुळे, हक्क मानवाला निसर्गाने दिले असल्याने ते काढून घेण्याचा अधिकार कोणालाही नाही. राज्यसंस्थेला देखील व्यक्तीचे नैसर्गिक हक्क काढून घेता येत नाहीत किंवा त्यांचा संकोच क रता येत नाही. म्हणून राज्यसंस्थेने व्यक्तीच्या नैसर्गिक हक्कांचे संरक्षण केले पाहिजे. त्याच्या मते, जीविताचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क आणि मालमत्तेचा हक्क हे व्यक्तीचे नैसगिर्क हक्क आहेत. म्हणूनच निसर्गावस्थेतील मानवानेदेखील सामाजिक कराराद्वारे नैसर्गिक हक्क सार्वभौम सत्तेकडे न देता स्वत:कडे ठेवले आणि या हक्कांना संरक्षण देण्याची जबाबदारी सार्वभौम सत्तेवर टाकली.

त्याच्या मते, प्रत्येक व्यक्ती जन्माला आल्यानंतर जिवंत राहण्याचा हक्क तिला निसर्गाने बहाल केला आहे. व्यक्तीला चांगले जीवन जगण्यासाठी स्वातंत्र्य असणे गरजेचे आहे. व्यक्ती चांगले जीवन जगता यावे यासाठी कष्ट करते. कष्टातून ती धन, संपत्ती निर्माण करते. संपत्तीचा उपयोग तिला चांगले जीवन जगण्यासाठी व आपले भविष्य सुरक्षित करण्यासाठी होतो. त्यासाठी ती संपत्तीचा संचय करते. म्हणून प्रत्येक व्यक्तीला संपत्ती मिळविण्याचे, तिचा विनियोग करण्याचे व तिचा उपभोग घेण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. प्रत्येकाचा आपण मिळविलेल्या संपत्तीवर अधिकार असला पाहिजे व ती त्याच्याकडे सुरक्षित राहिली पाहिजे. लॉकने या तिन्ही प्रकारच्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्याची जाबाबदारी राज्यसंस्थेवर टाकली आहे.

लॉकने सुरुवातीला निरंकुश राजेशाहीचे समर्थन केले होते. परंतु निरंकुश राजेशाही राजाकडे सर्व सत्ता केंद्रित होते. त्यामुळे व्यक्तीच्या नैसर्गिक हक्कांवर मर्यादा येण्याची शक्यता अधिक असते. नंतरच्या काळात त्याने मर्यादित राजेशाहीचा पुरस्कार केला. मर्यादित राजेशाहीत राजाच्या अधिकारावर मर्यादा येते व व्यक्तीचे हक्क सुरक्षित राहण्याची शक्यता अधिक असते. या त्याच्या वैचारिक स्थित्यंतरावरुन देखील त्याने व्यक्तीचे नैसर्गिक हक्क अधिक महत्वाचे मानल्याचे लक्षात येते. त्याने मांडलेल्या नैसर्गिक हक्कांच्या विचारांचा प्रभाव आधुनिक काळातील नागरिकांच्या हक्क, स्वातंत्र्य याविषयीच्या संकल्पनांवर निश्चितपणे पडलेला आहे. त्यातून पुढे नागरिकांचे मूलभूत हक्क, कायदेशीर हक्क, मानवी हक्क, वैश्विक हक्क या संकल्पना अस्तित्वात आल्या. अनेक देशांच्या राज्यघटनांवर लॉकच्या विचारांचा प्रभाव पडला. आज अनेक देशांचे नागरिक मूलभूत हक्क, स्वातंत्र्य यांचा उपभोग घेत आहेत, याचे श्रेय जॉन लॉकच्या नैसर्गिक हक्कांविषयीच्या विचारांना द्यावे लागते.

**जनतेची समती हा शासनसस्थेचा आधार**

जॉन लॉकने आपल्या सिद्धांताद्वारे राजकीय विचाराच्या क्षेत्रात आणखी एक महत्त्वाच्या विचाराची भर घातली. 'जनतेची संमती' हा शासन संस्थेचा महत्त्वाचा आधार असतो. जनतेच्या संमतीने शासनसंस्था अस्तित्वात येते. म्हणून शासन संस्थेने जनतेच्या संमतीने आणि जनतेच्या हितासाठी कारभार केला पाहिजे असे त्यांनी सांगितले. आधुनिक लोकशाहीच्या मूलभूत तत्वापैकी हे एक तत्व होय.

**कायदा जनतेच्या इच्छेची अभिव्यक्ती**

जॉन लॉकने कायद्यासंबंधी एक महत्त्वाचा विचार मांडला आहे. कायदा हा जनतेच्या इच्छ्हेची अभिव्यक्ती असला पाहिजे. शासन संस्थेच्या कायद्यात जनतेच्या इच्छा प्रतिबिबित झाल्या पाहिजेत असे त्याचे त्यांने सांगितले.

**व्यक्तिवादाचा पुरस्कार**

जॉन लॉकने आपल्या सिद्धांताव्दारे व्यक्तिवादाचा पुरस्कार केला आहे. राज्यात व्यक्तीला महत्त्वाचे स्थान असले पाहिजे. व्यक्तीचे हक्क व स्वातंत्र्याचे रक्षण शासन संस्थेने केले पाहिजे आणि व्यक्तीच्या इच्छेनुसार शासन संस्थेचा कारभार चालला पाहिजे असे प्रतिपादन करून व्यक्तीनादाला चालना देण्याचे कार्य त्याने केले.

**लॉकचे  सार्वभौमत्व राज्याची कल्पना**

लॉक हा  मर्यादित सार्वभौम राज्याची कल्पना मांडतो. राज्य हे लोकांचे विश्वस्त असते असे लॉकचे मत दिसून येते. राज्याची निर्मिती लोकांनी आपल्या सोयीसाठी व स्वातंत्र्य रक्षणासाठी केलेली असते. त्यामुळे लोकांची संमती असेपर्यंत राज्याची व शासनाची सत्ता चालते. थोडक्यात जनसंमती किंवा जनाधार हाच राज्याचा मुलाधार असतो. लॉकच्या मते संमती दोन प्रकारचे असते. पहिल्या प्रकारात समाजातील व्यक्ती आपण राजसत्तेला पाठिबा देत आहोत असे उघडपणे सांगून आपले संमती दर्शवतात. संमती दर्शवण्याचा हा प्रत्यक्ष मार्ग म्हणावा लागेल. दुसरा मार्ग म्हणजे अप्रत्यक्ष प्रकार असतो. एकदा समाजातील व्यक्तीनी राज्यामार्फत सर्वांना मिळणाऱ्या संरक्षणाचे फायदे स्वीकारण्यास सुरुवात केली की, ती सवय होणे म्हणजे  अप्रत्यक्षरित्या त्यांनी दिलेली संमती असते.

*** स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न -३ ***

खालीलपैकी अचूक पर्याय  निवडा  व  लिहा.

१.  जॉन लॉक ने १६९० साली ............... हा ग्रंथ लिहिला.

(अ) Leviation    (ब) Social Contract

(क) Two Treatises on Civil Government    (ड) The Prince.

२. Two Treatises on Civil Government या जॉन लॉक ने लिहिलेल्या ग्रंथात .......... विचारांची बीजे आढळतात.

(अ) लोक शाही (ब) हुकूमशाही (क) महाजनशाही (ड) झुंडशाही.

३. ........... ने मांडलेल्या सामाजिक कराराच्या सिध्दांतात मॉन्टेस्क्यूच्या सत्ता विभाजनाच्या सिध्दांताची बीजे सापडतात.

(अ) मॅकियाव्हेली (ब) थॉमस हॉब्ज (क) जॉन लॉक (ड) रुसो.

४. जॉन लॉकने सामाजिक कराराच्या सिध्दांताच्या माध्यमातून ............ या शासन प्रकाराचे समर्थन केले आहे.

(अ) निरंकुश राजेशाही (ब) हुकूमशाही (क) अल्पजनशाही (ड) मर्यादित राजेशाही.

५. ........... याने मांडलेल्या नैसगिर्क हक्कांच्या कल्पनेचा प्रभाव आधुनिक काळातील अनेक देशांच्या राज्यघटनांवर पडला आहे.

(अ) जॉन लॉक (ब) प्लेटो (क) कार्ल मार्क्स (ड) थॉमस हॉब्ज.

## २.२.४ जीन जॅक रुसो (इ.स. १७१२ – इ.स. १७७८)

**प्रस्तावना :–**

रुसोचे राजकीय विचार समजून घेण्यापूर्वी प्रथम फ्रेंच राज्यक्रांतीची पार्श्वभूमी समजून घेतली पाहिजे. फ्रान्समध्ये क्रांतीपूर्व काळात अनियंत्रित राजसत्ता, लहरी उमरावशाही आणि आपल्याला ईश्वरी अधिष्ठान प्राप्त झाले आहे असे मानणारे धर्मगुरु यांची भ्रष्ट युती झालेली होती. या तीन वर्गाकडे विशेष राजकीय अधिकार एक वटले होते. आथिर्क उत्पन्नाची विभागणीदेखील विषम होती. एकूण उत्पन्नापैकी ८०% पेक्षा जास्त उत्पन्न या तीन वर्गांना मिळत होते. तर सामान्य प्रजा जगण्याच्या हक्कांनाही वंचित होती. त्यांच्या प्राथमिक गरजा देखील पूर्ण होत नव्हत्या. शोषण, अन्याय, विषमता यावर समाज व राज्य व्यवस्था आधारलेली होती. याच परिस्थितीत व्हॉल्टेअर आणि जीन रुसो यांनी अधिकाऱ्यांच्या व धर्मसत्तेच्या अन्यायाविरुध्द आणि सामान्य जनतेच्या हक्कांसाठी जोरदार वैचारिक संघर्ष सुरु केला. या दोन विचारवंतांनी आपल्या ग्रंथातील विचारांद्वारे सामान्य नागरिकांमध्ये प्रस्थापित राजवटीच्या विरोधात क्रांती घडून आली. या क्रांतीने जगाला स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधूता या उच्च मानवी मूल्यांची देणगी दिली. लोकशाही विचारांची मुहूर्तमेढ रोवली.

**अल्प परिचय :–**

रुसोचा जन्म २८ जून १७१२ साली स्वित्झर्लंडमधील जिनेव्हा येथे एका सामान्य कुटुंबात झाला. त्याचे वडील कामगार होते. त्याचे बालपण अत्यंत कष्टप्रद व अनेक दुःखद प्रसंगातून, अनुभवांमधून गेले. त्यांचा त्यांच्या मनावर, व्यक्तिमत्वावर खोलवर परिणाम झाला. त्याने सर्वप्रथम १७५४ साली सामाजिक विषमतेची

कारणे या विषयावर निबंध लिहिला. त्यात त्याने वैयक्तिक मालमत्ता, खाजगी संपत्ती हे मानवी दु:खाचे व सामाजिक विषमतेचे मुख्य कारण असल्याचे मीमांसा केली. या निर्बंधामुळे त्याला मोठी प्रसिध्दी मिळाली. १७५५ साली त्याला विश्वकोषात लिखाण करण्याची संधी मिळाली आणि त्याच्या लेखन प्रवासाला सुरुवात झाली. १७६२ साली त्याने प्रसिध्द ग्रंथ 'सामाजिक करार' हा ग्रंथ लिहिला आणि 'एमिली' ही आणखी एक कादंबरी लिहिली. 'सामाजिक करार' हा प्रस्थापित राजकीय व सामाजिक व्यवस्थेवर कठोर टीका करणारा ग्रंथ तर 'एमिली' ही प्रचलित शिक्षण पध्दतीचे चिकित्सक मूल्यमापन करणारी कादंबरी होती. १७७१ साली त्याला पोलंड सरकारने संविधान विषयक दुरुस्त्या करण्यासाठी बोलावले होते. सामाजिक करार, एमिली यातील लिखाणापासून त्याचे वैचारिक व प्रतिभा संपन्न व्यक्तिमत्त्व प्रकट झाले आहे. त्याच्या लिखाणात प्रस्थापित व्यवस्थेला धक्का देण्याचे प्रचंड सामर्थ्य होते. २ जुलै १७७८ रोजी रुसोला मानसिक संतुलन बिघडल्यामुळे अनैसर्गिक मृत्यू आला. मात्र त्याचे वैचारिक लेख फ्रान्सच्या राजकीय, सामाजिक व शिक्षण क्षेत्राला नवी दिशा देणारे ठरले. त्याच्या मृत्यूनंतर ११ वर्षांनी म्हणजे १७८९ मध्ये फ्रान्समध्ये राज्यक्रांती घडून आली. तिची वैचारिक पार्श्वभूमी रुसोच्या लिखाणामुळे तयार झाली, असे मानले जाते. यावरुन त्याची प्रतिमा, प्रगल्भता, त्यातून त्याने निर्माण केलले लिखाण यात किती सामर्थ्य होते हे लक्षात येते.

**ग्रंथ परिचय :–**

रुसोने पुढील ग्रंथांचे लिखाण केले.

१. निबंध : (१) १७५४ 'सामाजिक विषमतेची कारणे'.

२. निबंध : (१) 'कला व विज्ञान यांच्या प्रगतीमुळे मानवी जीवनातील नीतिमत्तेचा विकास झाला आहे?

३. ग्रंथ : (१) सामाजिक करार : १७६२, कन्फेशन.

४. कादंबरी : (१) एमिली–१७६२.

५. नोंद लेख : A Discourse on Political Economy.

**तत्कालीन प्रभाव :–**

पुढील विविध घटकांचा प्रभावी रुसोच्या राजकीय विचारांवर पडला आहे.

**१. ग्रीक विचारधारा :** रुसोवर ग्रीक विचार परंपरेतील प्लेटो, ॲरिस्टॉटल, सॉक्रेटीस यांच्या विचारांचा प्रभाव पडला. समाज व राज्य निमिर्तीचा विचार, ग्रीकांची लोक शाहीची कल्पना, ग्रीक परंपरेतील नैतिकतेची कल्पना की त्यातून रुसोने 'सामूहीक ईहा' ही संकल्पना मांडली. या सर्वांचा त्याच्यावर प्रभाव पडला.

**२. फ्रान्सच्या परिस्थितीचा प्रभाव :** फ्रान्समधील जुलूम, अन्याय, शोषण यावर आधारलेली राजकीय व्यवस्था, फ्रान्समधील आर्थिक विषमता यांचा त्याच्यावर अधिक परिणाम झाला. विशेषत: आर्थिक शोषण

व सामाजिक विषमता दूर करुन अधिक चांगली व्यवस्था निर्माण करण्यासाठी काय करता येईल, हे सुचविणे हे रुसोच्या लिखाणाचे मुख्य सूत्र आहे.

**३. विचारवंताचा प्रभाव :** रुसोच्या राजकीय तत्त्वज्ञानाच्या जडणघडणीवर मॅकियाव्हेली, थॉमस हॉब्ज, जॉन लॉक यांच्या विचारांचा विशेष प्रभाव पडलेला जाणवतो. त्याच्या सामाजिक कराराच्या सिध्दांतावर हॉब्ज व लॉक च्या विचारांचा मोठा प्रभाव आहे. त्याने 'सामूहीक ईहा' या कल्पनेच्या माध्यमातून त्याने हॉब्ज व लॉक च्या विचारांना अधिक सुस्पष्ट व व्यावहारिक रुप दिले. मॅकियाव्हेलीच्या सार्वभौमत्व. सत्तेचे विभाजन इ. विचारांचा त्याच्यावर प्रभाव पडला.

**सामाजिक कराराचा सिध्दांत :-**

रुसोचे सामाजिक कराराविषयीचे विचार त्याने १७६२ साली लिहिलेल्या आणि नंतर जगप्रसिध्द झालेल्या 'सामाजिक करार' या ग्रंथात विस्ताररुपाने वाचायला मिळतात. तत्पूर्वी त्याने लिहिलेल्या 'कन्फेशन'या ग्रंथात व 'सामाजिक विषमतेची कारणे' या निबंधात सामाजिक कराराचे पूर्वसूत्र मांडलेले आहे. 'सामाजिक करार' ही रुसोच्या राजकीय तत्त्वज्ञानामधील सर्वात मध्यवर्ती व महत्त्वाची कल्पना आहे. त्यात त्याने मानवी समाजाचा व राज्यसंस्थेचा उदय कसा झाला असावा. या प्रश्नाच्या उत्तराचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच्या सामाजिक कराराच्या सिध्दांतावर हॉब्ज आणि लॉक यांच्या विचारांचा प्रभाव पडला आहे. त्याचा हा सिध्दांत निसर्गावस्था, कराराचे स्वरूप, सामूहिक ईहा या मुद्यांच्या आधारे समजून घ्यावा लागतो.

**अ) निसर्गावस्था :-**

मानवाने आपापसांत सामाजिक करार करुन राज्यसंस्था निर्माण केली असे प्रतिपादन हॉब्ज व लॉक यांच्याप्रमाणेच रुसोनेदेखील केले आहे. परंतु निसर्गावस्था व मानवी स्वभाव याविषयीची रुसोची कल्पना हॉब्ज आणि लॉक यांच्यापेक्षा वेगळी आहे. त्याच्यामते, निसर्गावस्थेतील मानव अतिशय मुक्त, स्वतंत्र, नि:स्वार्थी व परोपकारी होता. त्याच्यावर कुटुंब समाज यांचे बंधन नव्हते. तो संपूर्ण स्वातंत्र्य व समता यांचा उपभोग घेत होता. द्वेष, तिरस्कार, भेदभाव, महत्त्वाकांक्षा यांना त्याच्या जीवनात स्थान नव्हते. खऱ्या अर्थाने आदर्शवत् जीवन तो जगत होता. रुसोने या अवस्थेतील मानवाचे वर्णन 'सभ्य व उमदा प्राणी' असे केले आहे. रुसोच्यामते, सुरुवातीच्या अवस्थेत मानवाकडे बुध्दी, विवेक, कला व विज्ञान यांचे ज्ञान नव्हते. परंतु काळाच्या ओघात मानवाने ते आत्मसात केले व तिथूनच त्याच्या अध:पतनाला सुरुवात झाली.

रुसोने त्याच्या 'कन्फेशन' व (Dialogues) या ग्रंथांमध्ये समाज व राज्य कसे निर्माण झाले असावे. याबाबत तर्क, अनुमान यावर आधारित विवेचन के ले आहे. त्याच्यामते, अतिप्राचीन अवस्थेत मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा आणि आत्मसंरक्षण या दोनच प्रमुख गरजा होत्या, त्याच्यावर कोणतेही नीतिनियम, कायदे, संस्था यांचे बंधन नव्हते. परंतु कालांतराने मानवाचा वंश विस्तार होऊन लोकसंख्येत वाढ झाली. मानवी गरजा वाढल्या. वाढत्या गरजा भागविण्यासाठी व उदरनिर्वाहासाठी मानव प्रयत्न करु लागला. त्यासाठी तो मासेमारी, पशुपालन, शेती असे व्यवसाय करु लागला. याच काळात स्त्री-पुरुष असा नैसर्गिक

भेद नष्ट होऊन मानव निर्मित भेद निर्माण झाला. त्यातून स्त्री-पुरुषांच्या कामाची विषम पध्दतीने विभागणी झाली. शक्ती, सामर्थ्य, बुध्दी यांच्या आधारावर समाजात श्रेष्ठतेचे व कनिष्ठतेविषयी गैरसमज निर्माण झाले. काही मानवी क्षमतांना श्रेष्ठ व काहींना कनिष्ठ समजले जाऊ लागले. ज्यांच्याकडे शक्ती, सामर्थ्य, बुध्दीमत्ता आहे, त्यांना समाजात श्रेष्ठ स्थान मिळाले. श्रम करून संपत्ती निर्माण करता येते. या संपत्तीवर प्रभुत्त्व निर्माण करून समाजात श्रेष्ठ स्थान मिळविता येते याचे भान मानवाला आहे. त्यातून खाजगी मालमत्तेची कल्पना अस्तित्वात आली. काहींनी बुध्दी आणि शारीरिक सामर्थ्याच्या जोरावर साधन संपत्तीवर, खाजगी मालमत्तेवर आपले वर्चस्व निर्माण केले. मूठभर बुध्दीमान व सामर्थ्यवान लोकांनी आपला स्वामित्वाचा हक्क निर्माण करण्यास सुरुवात केली. इतरांची साधन-संपत्ती, मालमत्तादेखील आपल्याला मिळावी यासाठी कलह निर्माण झाला. रुसोच्या मते, अशारितीने निसर्गावस्थेतील मानवाची सुखाकडून दु:खाकडे, समतेकडून विषमतेकडे व स्वातंत्र्याकडून बंधनांकडे वाटचाल सुरु झाली. सर्वांचेच जीवन दु:खद परिस्थितीने ग्रस्त झाले. रुसोच्या मते, हीच परिस्थिती समाज व राज्य निमिर्तीस कारणीभूत ठरली.

**ब) कराराचे स्वरुप :-**

रुसोने राज्यसंस्था मानवनिर्मित असून ती लोकांनी एकमेकांमध्ये केलेल्या करारातून अस्तित्वात आली हे तत्त्व प्रथम मांडले व त्याच्या आधाराने सामाजिक कराराचे स्वरूप स्पष्ट केले आहे. त्याने मानवाच्या नैसर्गिक स्वातंत्र्याला सर्वोच्च मूल्य मानले आहे. त्याच्या मते, मनुष्य जन्मत: स्वतंत्र असतो. परंतु काळाच्या ओघात त्याचे समाजीकरण, सांस्कृतीकरण होते व तो मानवी समूहाचा एक अविभाज्य भाग बनतो. समाजाचा सदस्य बनल्यामुळे त्याचा इतर व्यक्ती, संस्था, संघटना यांच्याशी संबंध येतो. मानवी संबंध व व्यवहार जपण्याच्या प्रयत्नात त्याच्या नैसर्गिक स्वातंत्र्यावर अनेक बंधने येतात. निसर्गावस्थेतील कष्टप्रद जीवन संपविण्याच्या, बंधनांमधून मुक्त होण्याचा आणि समाजात राहूनही आपले स्वातंत्र्य सुरक्षित राखण्याच्या उद्देशाने मानवाने सामाजिक करार केला व राज्यसंस्था निर्माण केली, असे रुसोचे मत आहे.

तसेच राज्यसंस्थेच्या निमिर्तीला गरीब आणि श्रीमंत यांच्यातील संघर्ष मुख्यत्वे कारणीभूत आहे. तरीदेखील या दोन वर्गाच्या सहकार्यातून, करारातून राज्यसंस्था निर्माण झाली असेही रुसो म्हणतो. असे असले तरी सामाजिक करारामुळे श्रीमंत वर्गाचा सर्वाधिक फायदा व गरीब वर्गाचे सर्वाधिक नुकसान झाले, हे देखील तो स्पष्टपणे मांडतो. थोडक्यात राज्यसंस्थेच्या निमिर्तीला आर्थिक आणि सामाजिक विषमताच जबाबदार आहे, हे दाखविण्याचा त्याने प्रयत्न केला. परंतु याच आर्थिक व सामाजिक विषमतेमुळे मानव निसर्गावस्थेतील रम्य जीवनाला कायमचा पारखा झाला, असेही तो म्हणतो.

कराराचे स्वरूप स्पष्ट करताना रुसो म्हणतो की, 'निसर्गावस्थेतील परिस्थितीमध्ये बदल करण्यासाठी संघटनेचा असा एखादा प्रकार शोधायला हवा की, ज्याच्यामुळे समाजाची सगळी विधायक शक्ती सभासदांच्या जीविताचे व मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी वापरता येईल व सामाजिक ऐक्य निर्माण केल्यानंतरही त्याला पूर्वीप्रमाणेच स्वातंत्र्य व नैसर्गिक अधिकार यांचा वापर करता यईल.' त्यासाठी मानवाने

सामाजिक करार केला व कराराद्वारे प्रत्येक व्यक्तीने आपले नैसर्गिक, व्यक्तीगत हक्क, स्वातंत्र्य सार्वभौम सत्तेला देऊन टाकले व या नव्या व्यवस्थेचा भाग म्हणून त्यात स्वत:ला समर्पित केले.

या कराराद्वारे मानवाने सार्वभौम सत्ता निर्माण केली व तिला आपले नैसर्गिक स्वातंत्र्य बहाल केले. तरीही मानव पूर्वीप्रमाणेच स्वतंत्र राहिला. थोडक्यात, प्रत्येकाने आपले स्वातंत्र्यच नव्हे तर आपले स्वतंत्र अस्तित्व, व्यक्तिमत्व सर्वांच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या सार्वभौम सत्तेला देऊन टाकले. सर्वांना परस्परांशी सामाजिक ऐक्य, शांतता, सुरक्षितता यासाठी हा करार केला. अर्थात कराराद्वारे निर्माण झालेल्या सर्वाभौम सत्तेला जनसंमतीचा आधार असला पाहिजे, अशी सार्वभौम सत्ता लोकांना त्यांच्या खऱ्या स्वातंत्र्याची हमी देते. करार करण्यासाठी एकत्र आलेल्या व्यक्ती म्हणजे केवळ त्याची गोळाबेरीज नसते तर चांगला समाज व आदर्श राज्य निर्माण करण्याच्या आंतरिक प्रेरणेने एकत्र आलेल्यांचे सामूहिक ऐक्य असते. त्याच्या सामाजिक कराराच्या सिध्दांतातील सर्वात महत्त्वाची संकल्पना म्हणजे 'सामूहिक ईहा' (General Will) ही होय. याच सामूहिक ईहेतून राज्य निर्माण झाले. त्याच्या मते, कराराद्वारे अ, ब, क, ड या व्यक्तींनी आपली इच्छा, स्वातंत्र्य, अगदी स्वत:चे वैयक्तिक अधिकारदेखील अ+ब+क +ड या सर्वांच्या एकत्रित इच्छेला देऊन टाकले. त्याला रुसोने सामूहिक ईहा (General Will) असे म्हटले आहे. या क राराचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे व्यक्तीने कराराद्वारे आपले व्यक्तिमत्व समर्पित केले. परंतु प्रत्यक्षात ते व्यक्तिमत्व जपले. स्वातंत्र्य अर्पण केले. परंतु व्यक्ती स्वतंत्रच राहिली. थोडक्यात व्यक्तीने जे व्यक्तीगत स्वरूपात दिले ते सामूहिक स्वरूपात पुन्हा स्वत:कडेच अबाधित राखले. रुसो म्हणतो, ''सामाजिक करारामुळे व्यक्तीची परिस्थिती पूर्वीपेक्षा कितीतरी पटीने अधिक चांगली झाली. असुरक्षितता व भय यांच्याऐवजी तिला सुरक्षितता मिळाली. तिचे स्वहित अधिक चांगल्याप्रकारे जपले गेले.

करारानंतर निर्माण होणारा समाज व त्यातील व्यक्ती अधिक स्वातंत्र्य व समानता मिळवितो. समाजाचे ऐक्य निर्माण होते व असा समाज सर्वांचे कल्याण, सर्वांचे हित पाहणारा असतो. सर्वांच्याच व्यक्तिगत इच्छांचे विलीनीकरण झाल्यामुळे समतेवर आधारलेला समाज निर्माण होतो. अशा समाजात जनतेचे सार्वभौमत्व विचारात घेऊन राज्यकारभार चालणार असल्याने तो आदर्श समाज बनतो. अर्थात या सार्वभौम सत्तेला जनसंमतीचा आधार असावाच लागतो. अशी सार्वभौम सत्ता लोकांना खऱ्या स्वातंत्र्याची हमी देते.

**क) सामूहिक ईहा** (General Will) :-

सामाजिक कराराचा सिध्दांत अधिक सविस्तरपणे स्पष्ट करण्यासाठी रुसोने 'सामूहिक ईहा' ही कल्पना मांडली आहे. ती अधिक गुंतागुंतीची आहे व तिच्यामध्ये आंतविरोध देखील आहे. त्या संदर्भात अनेक तपशील तपासले, अभ्यासले तरी ही कल्पना बरीचशी अस्पष्टच राहिली आहे. रुसोच्या मते, सामान्यत: मानवाच्या इच्छा दोन प्रकारच्या असतात. एक व्यक्तीगत इच्छा-जी अस्थिर, चंचल, अविवेकी स्वार्थी व भावनेवर आधारलेली असते. दुसरी खरी इच्छा-जी स्थीर, विवेकी, नि:स्वार्थी असते. भावनेपेक्षा बुध्दीवर आधारलेली असते. रुसोच्या मते, सर्व व्यक्तींची खरी इच्छा म्हणजे व्यक्तीगत व सामाजिक हिताचे एकत्रिकरण असते. सामूहिक ईहेमध्ये सर्वांच्या खऱ्या इच्छांचे प्रतिबिंब पडलेले असते. परंतु सर्वांची इच्छा

म्हणजेदेखील सामूहिक ईहा नव्हे. तसेच सर्वांच्या खऱ्या इच्छांची एकत्रित बेरीज म्हणजेसुध्दा सामूहिक ईहा नव्हे. परंतु ही ईहा सर्वांच्या, समाजाच्या कल्याणाचा विचार करते. जेव्हा प्रत्येक व्यक्ती स्वत:चा व्यक्तीगत स्वार्थ सामूहिक ईहेमध्ये अंतर्भूत करून टाकते व शुध्द, विवेकी स्वरूपात जो सर्वांच्या कल्याणाचा, हिताचा विचार शिल्लक राहतो तो म्हणजे 'सामूहिक ईहा' होय. सामूहिक ईहा हाच राज्याच्या निमिर्तीचा खरा आधार असतो.

'सामूहिक ईहा' हे सर्व व्यक्तींचे संघटित रुप असते. ती सार्वभौम, चिरंतन, अविभाज्य असते, राज्याने केलेले कायदे हे या सार्वभौम सामूहिक ईहेचे दृश्य स्वरूप असते. सामूहिक ईहा ही खऱ्या अर्थाने कायद्यांमधून व्यक्त होत असते. सामूहिक ईहेचा आविष्कार म्हणजेच कायदा होय. त्यामुळे कायद्याच्या बंधनात, मर्यादेत राहूनदेखील व्यक्ती स्वतंत्र असते. तसेच ही सार्वभौम सत्ता खऱ्या अर्थाने जनतेकडेच असते. ती शासन संस्थेकडे नसते. शासन संस्था हे जनतेच्या सार्वभौम सत्तेचा तिच्या (जनतेच्या) मर्जीप्रमाणे वापर करणारे एक साधन आहे.

**सामूहिक ईहेची वैशिष्ट्ये :–**

सामान्यत: सार्वभौमत्वाची जी वैशिष्ट्ये आहेत, तिच सामूहिक ईहेची आहेत.

**१. अदेयता :** सामूहिक ईहा परस्परांनी केलेल्या करारातून निर्माण झालेली आहे, त्यामुळे ती कोणाला देता येत नाही किंवा हस्तांतरित करता येत नाही.

**२. अविभाज्यता :** ती सर्व समावेशक व एकमेव आहे, तिचे विभाजन होत नाही. ती नेहमी एकात्म स्वरूपात असते.

**३. सामाजिक ऐक्य निर्माण करणारी असते :** ती प्रत्येकाला स्वत:ची व्यक्तीगत इच्छा बाजूला ठेवून सामाजिक ऐक्यासाठी एकत्र आणते. ती सर्वांचे ऐक्य घडवून आणते व समाजाचे, सर्वांचे हितसंबंध जपते.

**४. विवेकी व न्यायी :** सामूहिक ईहा ही स्थिर, नि:स्वार्थी, सद्सद् विवेकावर आधारित असते. ती व्यक्तीगत हितापेक्षा समाजहिताला प्राधान्य देणारी म्हणून न्यायी असते.

**५. नि:स्वार्थी :** सामूहिक ईहेमध्ये सर्वांची व्यक्तीगत इच्छा समर्पित झालेली असते. व्यक्तीगत इच्छेला महत्त्व नसल्यामुळे ती सर्व समाजाच्या कल्याणाचा नि:स्वार्थीपणे विचार करणारी असते.

**६. चिरंतनता :** ती संपूर्ण समाजाच्या इच्छेचे, सार्वभौमत्वाचे प्रतिनिधीत्व करीत असल्यामुळे जोपर्यंत समाजाचे, राज्यसंस्थेचे अस्तित्व आहे, तोपर्यंत ती टिकणारी म्हणजेच चिरंतन असते.

**७. सार्वभौमत्व :** सामूहिक ईहेतून सर्व व्यक्तींचे सार्वभौमत्व व्यक्त होत असते. तिच्यातून समाजासाठी कायदे क रणारी, त्यांची अंमलबजावणी करणारी व न्यायदान करणारी सार्वभौम सत्ता निर्माण होते.

८. **समाजाचे प्रतिनिधित्व :** सामूहिक ईहेतून निर्माण झालेली सार्वभौम सत्ता संपूर्ण समाजाचे, जनतेचे प्रतिनिधीत्व करते. म्हणजे ती समाजाच्या हिताचे, लोककल्याणाचे प्रतिनिधीत्व करते. ती कोणत्याही एका व्यक्तीचे, गटाचे किंवा वर्गाचे प्रतिनिधीत्व करीत नाही. यातून रुसोचे लोकशाहीविषयीचे विचार व्यक्त होतात.

थोडक्यात, रुसोच्या सामाजिक कराराच्या सिध्दांतातून सामूहिक ईहेची निमिर्ती, सामूहिक ईहेतून सार्वभौमत्वाची निमिर्ती व या दोन्ही संकल्पनांमधून लोक शाहीची निमिर्ती करण्याचा विचार स्पष्ट होतो, हीच त्याच्या सामाजिक कराराच्या सिध्दांताची फलश्रुती आहे. त्यातून त्याचा आदर्श राज्य निर्माण करण्याचा सद्‌हेतू दिसून येतो.

**शासनसंस्थेविषयीचे विचार :–**

रुसोने समाज, राज्य आणि शासनसंस्था या तिन्ही संक ल्पनांमध्ये फरक केला आहे. त्याच्या मते, चांगले जीवन जगण्याच्या जाणिवेतून एकत्र आलेला समुदाय म्हणजे समाज होय. समाजाने सामूहिक ईहेद्वारे सार्वभौम सत्ता असलेली यंत्रणा निर्माण केली ती म्हणजे राज्य होय. सार्वभौम सत्तेचे प्रतिनिधीतव करणारी व तिची इच्छा प्रत्यक्षात आणणारी संस्था म्हणजे शासन संस्था होय. ती संपूर्ण समाजाचे कल्याण साधण्याचे एक माध्यम किंवा साधन असते. शासन संस्था राज्यापेक्षा वेगळी आहे. राज्य ही अमूर्त, अदृश्य कल्पना आहे तर शासन संस्था हे तिचे मूर्त किंवा दृश्य स्वरूप आहे. राज्य ही शाश्वत, चिरंतन संस्था आहे. तर शासन संस्थेची कालमर्यादा निश्चित असते. शासन संस्थेकडे सार्वभौम सत्ता नसते तर प्रत्यक्षात ती जनतेच्या हातात असते. शासन संस्था म्हणजे कार्यकारी सत्तेचा वापर करणारी यंत्रणा होय. हा वापर ती समाजाच्या मान्यतेनेच करू शकते. शासन संस्थेच्या सत्तेच्या वापराला देखील समाज मान्यता, जनसंमती असावी लागते. शासन संस्था जनतेचे हित, कल्याण साध्य करण्यासाठी वचनबध्द असते. ती जनसंमतीनेच चालली पाहिजे. काही परिस्थितीत शासन संस्था निरंकुश बनते. तिच्याकडून लोक हिताची उपेक्षा होऊ शकते. अशावेळी शासन संस्थेवर नियंत्रण ठेवण्याचे व तिला पुन्हा सामूहिक सद्‌हेतूच्या मार्गावर आणण्याचे काम समाजालाच करावे लागते.

रुसोच्या मते, लोक शासन संस्था निर्माण करतात अथवा ती योग्य प्रकारे काम करीत नसेल तर रद्द किंवा बरखास्त करू शकतात. सामूहिक ईहेचे अशाप्रकारे शासन संस्थेवर नियंत्रण असते, परंतु राज्यसंस्थेवर असू शकत नाही. कारण राज्याला स्वतंत्र, स्वयंभू अस्तित्व आहे व ते चिरंतन आहे. तर शासन संस्था ठराविक कालमर्यादेनंतर जनतेच्या संमत्तीतून अस्तित्वात येते व ती राज्याची सहायक यंत्रणा म्हणून काम करते. तिच्यामध्ये जनतेला आपल्या इच्छेनुसार बदल क रता येतो. सामूहिक ईहा महत्त्वाची मानून कार्यवाही करणारी यंत्रणा म्हणजे शासन संस्था होय.

**शासन संस्थेचे प्रकार :–**

रुसोच्या मते, स्थळ, काळ व परिस्थितीनुसार शासन संस्थेचा प्रकार निश्चित होत असतो. त्याने शासन संस्थेचे तीन प्रकार सांगितले आहेत.

१. लोकशाही : सत्ता सर्व लोकांच्या किंवा बहुसंख्यांकांच्या हातात असते.

२. महाजनशाही : सत्ता मूठभर, थोड्या लोकांच्या हातात असते.

३. राजेशाही : सत्ता एकाच व्यक्तीच्या हातात एक वटलेली असते.

त्याने राज्याची लोकसंख्या व भूप्रदेश यांचा विचार करून शासन संस्थेचा योग्य प्रकार कोणता हे सांगितले आहे. त्याच्या मते, आकाराने लहान असलेल्या राज्यासाठी लोकशाही, मध्यम आकाराच्या राज्यासाठी महाजनशाही व मोठ्या आकारमानाच्या राज्यासाठी राजेशाही योग्य आहे. शासनसंस्थेचा कोणता प्रकार उत्तम आहे याविषयी रुसोने मत व्यक्त केले आहे. त्यांच्यामते, राज्यातील नागरिक जर सूज्ञ, जागरुक असतील तर लोकशाही हा शासन प्रकार योग्य ठरतो. अन्यथा अस्थिरता निर्माण होते.

महाजनशाहीत निर्वाचित महाजनशाही अधिक चांगली कारण महाजनांची निवड लोकांकडून होते. अनुवांशिक महाजनशाही हा प्रकार मात्र त्याला अमान्य आहे. तर राजेशाहीत सत्तेच्या केंद्रीकरणाचा व ती अयोग्य पध्दतीने वापरली जाण्याचा धोका असतो. यासंदर्भात कोणता शासनप्रकार सर्वोत्तम आहे याचे उत्तर त्याने ज्या शासनप्रकारात लोकांचे रक्षण, कल्याण होते, सर्व प्रकारे लोकांची भरभराट होते, तो शासन प्रकार सर्वोत्तम आहे, असे दिले आहे. यावरून शासन संस्था, शासन संस्थेचे प्रकार याविषयीच्या रुसोच्या विचारांमध्ये जनतेचे सार्वभौमत्व, जनतेचे कल्याण हा विचार मध्यवर्ती आहे, हे लक्षात येते.

**राज्याच्या उदयाचा सेंद्रीय सिध्दांत :–**

रुसोने सामाजिक करारातून निर्माण झालेल्या राज्यसंस्थेसाठी मानवी देहाची उपमा वापरली आहे. ज्याप्रमाणे कोणत्याही सजीवाचे शरीर विविध सजीव अवयवांनी मिळून बनलेले असते. त्याप्रमाणेच विशिष्ट ध्येयाने संघटित झालेला समाज राज्याच्या स्वरूपात सजीव बनतो. त्याच्यामते, राज्याला एक प्रकारचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असून ते नैतिक स्वरूपात प्रकट होते. मानवी शरीराचे अनेक अवयव जसे एकाच शरीरात एकत्र येऊन सजीव होतात, कार्यान्वीत होतात, शरीराच्या विविध क्रिया पार पाडतात. तसेच राज्यरुपी सेंद्रीय तत्त्वाचेदेखील आहे. राज्यदेखील मानवी सेंद्रीय स्वरूपाप्रमाणेच आहे. मानवी शरीरातील विविध अवयवांच्या गरजा शरीरात राहूनच पूर्ण होतात. शरीरात राहूनच त्यांचा विकास होतो. त्याचप्रमाणे शासन संस्था, तिचे विभाग, समाजातील सर्व व्यक्ती, संघटना यादेखील राज्यरुपी सेंद्रीय तत्त्वाचाच एक भाग आहेत. राज्यात राहूनच त्यांच्या गरजा पूर्ण होतात व त्यांचा विकास होतो. व्यक्तीच्या आत्मसंरक्षण, स्वहित हा गरजा राज्यातच पूर्ण होतात. मानवी शरीराला नियंत्रित करणारा मेंदू हा महत्त्वाचा अवयव आहे. तो इतर अवयवांना आदेश देऊन त्यांच्याकडून कार्य करून घेतो व त्यांच्यावर नियंत्रणदेखील ठेवतो. रक्ताभिसरण, मज्जासंस्था, स्नायू, पेशी यांचे कार्य मेंदूच्या आदेशानुसार सूत्रबध्दरितीने चालते. त्याचप्रमाणे राजास्वरूपी सेंद्रिय तत्त्वात सर्वांचे कल्याण, हित साध्य करण्याचे कार्य 'सामूहिक ईहा' या तत्वामुळे होते. सामुहिक ईहेमुळे राज्याला सार्वभौमत्व प्राप्त होते. रुसो म्हणतो, निसर्गाने मानवाची निमिर्ती केली आणि मानवाने सामूहिक ईहेच्या आधारावर राज्याची निमिर्ती केली. या दोन्हींमध्ये सेंद्रिय तत्त्व महत्त्वाचे आहे.

रुसोने राज्याचे सेंद्रिय स्वरूप स्पष्ट करताना म्हटले आहे की, 'राज्य ही सजीव मानवाप्रमाणे असणारी एक संस्था आहे. सार्वभौमत्व हे राज्यरुपी शरीराचे डोके, शासन संस्था म्हणजे मेंदू, इच्छाशक्ती म्हणजे शरीरातील धमन्या आहेत. राज्यातील विविध व्यवसाय, व्यापार, शेती, पशुपालन हे राज्यरूपी शरीराचे पोट असते. सार्वजनिक उत्पन्न हे राज्यरुपी शरीरातील रक्ताप्रमाणे असून त्यामुळे इतर घटक कार्यक्षम राहतात. राज्यातील नागरिक या सेंद्रीय तत्त्वातील पेशींप्रमाणे आहेत व ते देखील राज्याची यंत्रणा सुव्यवस्थित ठेवण्यासाठी प्रयत्न क रतात. ज्याप्रमाणे मानवी शरीरात थोडा जरी बिघाड झाला तरी त्याच्या संवेदना मानवी मेंदूला कळतात. त्याप्रमाणे राज्याच्या यंत्रणेत झालेला बिघाड राज्याच्या मेंदूला म्हणजे शासन संस्थेला कळतो.'

थोडक्यात रुसोने मांडलेला राज्याच्या उदयाचा सेंद्रीय सिध्दांत राज्याचे स्वरूप आणि कार्य स्पष्ट करण्यासाठी उपयुक्त आहे. त्यासाठी त्याने मानवी शरीराचे सेंद्रिय तत्व कल्पना किंवा उपमा म्हणून वापरले आहे. त्याने मांडलेला राज्याच्या उदयासंबंधीचा सेंद्रिय सिध्दांत जरी काल्पनिक असला तरी राज्याचे स्वरूप मानवी शरीराप्रमाणे सचेतन आहे, चैतन्य गुणांनी युक्त आहे, हे सांगण्याचा रुसोने केलेला प्रयत्न निश्चितच तात्त्विक व व्यावहारिक दृष्ट्या योग्य आहे, असे म्हणावे लागते.

**रुसोचा विवेकवाद**

**सार्वभौमत्वाविषयीचे विचार :-**

रुसोच्या सामाजिक कराराच्या सिध्दांतामधील सर्वात महत्त्वाची व मध्यवर्ती संकल्पना म्हणजे सामूहिक ईहाही होय. ही सामूहिक ईहा राज्याच्या निमिर्तीचा प्रमुख आधार आहे. रुसोच्या मते, सामूहिक ईहा म्हणजेच सार्वभौमत्व होय. हे सार्वभौमत्व जनतेच्या ठिकाणी असते. रुसोने सर्वप्रथम जनतेच्या सार्वभौमत्वाचा विचार मांडला. त्याची सार्वभौमत्वाची कल्पना हॉब्जपेक्षा वेगळी आहे. हॉब्जच्या मते, राज्याची सार्वभौम सत्ता राजाच्या हातात असते व ती अमर्यादित असते. लॉक ची सार्वभौमत्वाची कल्पना जनसंमतीवर आधारलेली आहे. रुसोने हॉब्ज व लॉक यांच्या विचारांमध्ये समन्वय साधला आहे. त्यानेदेखील जनतेच्या सार्वभौमत्वाची कल्पना मांडली आहे. त्याच्या मते, राज्याची सार्वभौम सत्ता हे जनतेच्या सामूहिक ईहेचेच प्रतिरुप आहे. सामूहिक ईहा सार्वभौम असते व तिचे शासन संस्थेवर नियंत्रण असते. सार्वभौम सत्ता जनतेच्या हातात असते या त्याच्या विचारांवरून तो लोकशाहीचा पुरस्कर्ता होता हे लक्षात येते.

**सार्वभौमत्वाची वैशिष्ट्ये :-**

जनतेच्या सामूहिक ईहेतून सार्वभौम सत्तेची निमिर्ती झाली आहे, असे रुसोचे मत आहे. त्यामुळे सामूहिक ईहेची जी वैशिष्ट्ये आहेत- १) अदेयता, २) अविभाज्यता, ३) विवेकी व न्यायी ४) चिरंतनता, ५) एकमेवता. तीच सार्वभौमत्वाची देखील वैशिष्ट्ये आहेत.

**✻ स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न–४ ✻**

खालीलपैकी अचूक पर्याय निवडा व लिहा.

१. ............. या विचारवंताला फ्रेंच राज्यक्रांतीचा जनक असे म्हणतात.

(अ) थॉमस हॉब्ज (ब) रुसो (क) मॅकि याव्हेली (ड) जॉन लॉक

२. ............ या विचारवंताने सामाजिक क राराच्या सिध्दांताद्वारे 'सामूहिक ईहा' ही कल्पना मांडली.

(अ) रुसो (ब) जॉन लॉक (क) थॉमस हॉब्ज (ड) मॅकियाव्हेली.

३. रुसोने सामाजिक कराराचा सिध्दांत ............ या ग्रंथात मांडला आहे.

(अ) लेविएथन (ब) द प्रिन्स (क) सामजिक करार (ड) द स्टेटस्मन.

४. ............. या विचारवंताने निसर्गावस्थेतील मानवाचे वर्णन 'सभ्य व उमदा प्राणी' असे केले आहे.

(अ) प्लेटो (ब) थॉमस हॉब्ज (क) जॉन लॉक (ड) रुसो.

५. ............ या विचारवंताच्या मते, 'सामूहिक ईहे'चा आविष्कार म्हणजे कायदा होय.

(अ) रुसो (ब) मॅकि याव्हेली (क) ॲरिस्टॉटल (ड) थॉमस हॉब्ज.

६. रुसोच्या मते ............. हा राज्याच्या निमिर्तीचा खरा आधार आहे.

(अ) सार्वभौमत्व (ब) सामूहिक ईहा (क) शासन संस्था (ड) कायदा.

७. ............. या विचारवंताने सर्वप्रथम जनतेच्या सार्वभौमत्वाचा विचार मांडला.

(अ) मॅकियाव्हेली (ब) थॉमस हॉब्ज (क) रुसो (ड) सॉक्रेटीस.

## २.३ सारांश

युरोपमध्ये मध्ययुगीन काळाच्या अखेरीस 'प्रबोधनाचे युग' निर्माण झाले. इटली हा देश या प्रबोधनाच्या चळवळीचे मुख्य केंद्र होता. या काळात निकोलो मॅकियाव्हेलीने राजकीय विचारांचे जे योगदान दिले, त्या मौलिक योगदानामुळे तो इटलीतील परिवर्तनाचा अग्रदूत बनला. त्याने काही प्रस्थापित धारणांना, कल्पनांना व सिध्दांतांना छेद दिला. त्याने राज्यसंस्था ही परमेश्वरनिर्मित आहे, हा दैवी सिध्दांत नाकारला व ती मानवाने गरजेतून निर्माण केली, हा नवा विचार मांडला. त्याने धर्म, नीति, राजकारण याविषयी विवेकवादी व धर्मनिरपेक्ष भूमिका स्वीकारली. धर्म व राजकारण परस्परांपासून भिन्न आहेत, त्यामुळे ते विभक्त असावे असा विचार त्याने मांडला व धर्माच्या प्रभावातून राजकीय विचारांना मुक्त करण्याचे महान कार्य केले. या अर्थाने त्याने राजकीय विचारांच्या परंपरेत धर्मनिरपेक्ष विचारांचा पाया घालण्याचे काम केले. त्याने आपल्या

राजकीय विचारांमधून निरंकुश राजेशाहीचे समर्थन केले. इटलीचे सर्व क्षेत्रात झालेले अध:पतन थांबवून आपल्या देशाला वैभवसंपन्न व सामर्थ्यशाली बनविण्यासाठी त्याने के लेले प्रयत्न म्हणूनच मोलाचे ठरतात.

थॉमस हॉब्ज हा १७व्या शतकात इंग्लंडमध्ये होऊन गेलेला एक राजकीय विचारवंत आहे. मानवी समाज व राज्य कसे निर्माण झाले असावे, या प्रश्नाची उकल करण्यासाठी त्याने सामाजिक कराराचा सिध्दांत मांडला. त्याने 'लेविएथन' नावाचा ग्रंथ लिहून सामाजिक कराराच्या सिध्दांताचा पाया घातला. कालांतराने जॉन लॉक व रुसो यांनी त्याच्या सिध्दांताला अधिक सुस्पष्ट व व्यावहारिक रुप दिले. 'सार्वभौम सत्तेची आज्ञा म्हणजेच कायदा' हा त्याचा विचार पुढच्या काळात राज्याच्या संदर्भात विचार मांडताना मार्गदर्शक ठरला. त्याने आपल्या राजकीय विचारांमधून राज्यसंस्था ही सर्वश्रेष्ठ संस्था आहे व निरंकुश राजेशाही हाच सर्वोत्तम शासन प्रकार आहे, असे प्रतिपादन केले.

जॉन लॉक देखील इंग्लंडमधील प्रसिध्द राजकीय विचारवंत म्हणून ओळखला जातो. हॉब्जप्रमाणेच लॉक नेदेखील सामाजिक कराराचा सिध्दांत मांडला व राज्यसंस्था मानवनिर्मित आहे, या हॉब्जच्या सिध्दांताला पुष्टी दिली. लोकांनी सामाजिक कराराद्वारे राज्याकडे सार्वभौम सत्ता दिली असली तरी राज्याच्या सार्वभौम सत्तेला लोकांची मान्यता अथवा जनाधार असणे आवश्यक आहे, हा अत्यंत महत्वाचा विचार लॉकने मांडला. त्यातून त्याने मर्यादित राजेशाहीचे समर्थन केल्याचे लक्षात येते. त्याने मांडलेली नैसर्गिक हक्कांची कल्पनादेखील अतिशय महत्त्वाची असून या कल्पनेचा प्रभाव आधुनिक काळातील अनेक देशांच्या राज्यघटनांवर पडला आहे.

रुसो या फ्रान्समधील विचारवंताने मांडलेले राजकीय विचार क्रांतिकारी फ्रान्सच्या राजकीय, सामाजिक व शिक्षण क्षेत्राला नवी दिशा देणारे ठरले. त्याच्या विचारांनी फ्रेंच राज्यक्रांतीची पार्श्वभूमी तयार केली, असे मानले जाते. रुसोनेदेखील समाज व राज्यनिर्मितीविषयी सामाजिक कराराचा सिध्दांत मांडला, त्याच्या या सिध्दांतामधील 'सामूहिक ईहा' ही मध्यवर्ती कल्पना आहे. तिच्या माध्यमातून रुसोने कल्याणकारी राज्य, आदर्श राज्य यांचे संकल्पचित्र तयार केले. लॉक प्रमाणेच रुसोने देखील राज्याच्या सार्वभौम सत्तेला जनाधार असणे आवश्यक आहे, असे मानले आहे. या विचारांवरून तो लोक शाहीचा समर्थक होता हे लक्षात येते. थोडक्यात मॅकियाव्हेली, हॉब्ज, लॉक व रुसो यांनी मांडलेल्या राजकीय विचारांचे अध्ययन केल्यानंतर असे लक्षात येते की, हॉब्जने निरंकुश राजेशाही, लॉकने मर्यादित राजेशाही आणि रुसोने लोकशाही या शासन प्रकाराचा पुरस्कार केला. या चार राजकीय विचारवंतांचे विचार जसे त्या काळातील परिस्थितीला प्रेरक ठरले तसेच ते आधुनिक काळातील परिस्थितीला देखील प्रेरक आणि मार्गदर्शक ठरले आहेत. त्यांच्या विचारांचे महत्त्व कालातीत आहे हे मान्य केले पाहिजे.

## २.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

- **सामाजिक करार सिध्दांत :** लोकांनी एकत्र येऊन परस्परात करार करून राज्यसंस्था निर्माण केली असे प्रतिपादन करणारा विचार.
- **सार्वभौमत्व :** राज्याची सर्वश्रेष्ठ इच्छा जी कायद्याचा आधार असते.

- **नैसर्गिक हक्क :** मानवाला जन्मत: निसर्गाकडून प्राप्त झालेले अधिकार.
- **सामूहिक ईहा :** राज्यातील सर्व व्यक्तींचा सद्सद्विवेक बुध्दीवर व मानवी कल्याणावर आधारलेला विचार.

## २.५ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं-अध्ययन प्रश्न–१ ची उत्तरे

१. (क) द प्रिन्स. २. (ब) मॅकियाव्हेली. ३. (अ) राजेशाही.

४. (ड) मॅकियाव्हेली. ५. (क) मॅकियाव्हेली.

स्वयं-अध्ययन प्रश्न–२ ची उत्तरे

१. (ड) सामाजिक क राराचा सिध्दांत. २. (क) सामाजिक क रार.

३. (ब) लेविएथन. ४. (क) थॉमस हॉब्ज.

५. (ब) मर्यादित राजेशाही.

स्वयं-अध्ययन प्रश्न–३ ची उत्तरे

१. (ब) *Two Treatises on Civil Government..*

२. (अ) लोक शाही ३. (क) जॉन लॉक

४. (ड) मर्यादित राजेशाही. ५. (अ) जॉन लॉक

स्वयं-अध्ययन प्रश्न–४ ची उत्तरे

१. (ब) रुसो. २. (अ) रुसो. ३. (अ) लेविएथन. ४. (ड) रुसो.

५. (अ) रुसो. ६. (अ) सार्वभौमत्व. ७. (क) रुसो.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) दीर्घोत्तरी प्रश्न.

१. निकोलो मॅकियाव्हेलीचे राज्याविषयीचे विचार सविस्तर लिहा.
२. मॅकियाव्हेलीने शासन संस्थेचे वर्गीकरण कसे केले आहे ते विशद करा.
३. 'मॅकियाव्हेलीला प्रबोधन युगाचे अपत्य असे म्हटले जाते' या विधानाचा परामर्श घ्या.
४. मॅकियाव्हेलीचे धर्म आणि नीति याविषयीचे विचार स्पष्ट करा.
५. थॉमस हॉब्जने मांडलेला सामाजिक करार सिध्दांत सविस्तर स्पष्ट करा.
६. थॉमस हॉब्जने राज्याविषयीचे विचार विशद करा.
७. जॉन लॉकचा सामाजिक करार सिध्दांत त्याचे स्वरूप व वैशिष्ट्ये याआधारे सविस्तर लिहा.
८. जॉन लॉक चे राज्यासंबंधीचे विचार सविस्तर लिहा.

९. रुसोचा सामाजिक करार सिध्दांत विशद करा.

१०. रुसोचे शासन संस्थेविषयीचे विचार सविस्तर लिहा.

११. रुसोचा राज्याच्या उदयाचा सेंद्रिय सिध्दांत स्पष्ट करा.

ब) टिपा लिहा.

१. हॉब्जची अध्ययन पध्दती.

२. हॉब्जचे मानवी स्वभावाविषयीचे विचार.

३. हॉब्जचे शासन संस्थेचे वर्गीकरण.

४. लॉक ची नैसर्गिक हक्कांची कल्पना.

५. रुसोचे शासन संस्थेचे वर्गीकरण.

६. सामूहिक ईहा.

७. रुसोचे सार्वभौमत्वाविषयीचे विचार.

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ


१. Gupta, M. G. : "History of Political Thought", Chaitanya Publication House, Alahabad.

२. Jones, W. T. : "Masters of Political Thought", (Vol. I, II), George G. Harrap, London, १९६५.

३. Eberistein, William : "Great Political Tinkers", Oxford Press, १९७७.४. खंडकर, अरुंधती : ''राजा मॅकि याव्हेली'' , मराठी भाषांतर, साहित्य अकादमी, दिल्ली, १९६३.

५. कणिर्क व. भ. : 'सामाजिक करार (रुसो)' , मराठी भाषांतर-साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७२.

६. देव विजय, गोसावी शरद, आपटे संज्योत (१९९१) : 'पाश्चात्य राजकीय विचारवंत', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०१२.


❑❑❑

## घटक ३
# आधुनिक राजकीय विचार-२

**घटक संरचना**

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

३.२.१ जेरेमी बेंथम -

३.२.१.१ बेंथमचे लोकशाही विषयक विचार

३.२.१.२ बेंथमचे प्रतिनिधीत्व विषयक विचार

३.२.१.३ बेंथमचा उपयुक्ततावाद

३.२.२ जॉन स्टुअर्ट मिल

३.२.२.१ जॉन स्टुअर्ट मिलचे लोकशाही विषयक विचार

३.२.२.२ जॉन स्टुअर्ट मिलचे प्रतिनिधीत्व विषयक विचार

३.२.२.३ जॉन स्टुअर्ट मिलचा उपयुक्ततावाद

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ सूची

## ३.० उद्दिष्ट्ये

उपयुक्ततावाद व्यक्तिस्वातंत्र्य आणि प्रातिनिधिक लोकशाही शासन या तीनही संकल्पनांचे चिंतन व मिल यांनी मांडलेल्या विचारांची चर्चा प्रस्तुत प्रकरणात केली आहे उपयुक्ततावादी ही संकल्पना अधिकतम लोकांचे अधिकतम सुख या तत्त्वाने प्रेरित आहे व्यक्ती स्वातंत्र्य ही संकल्पना उदारमतवादाच्या तत्वाने उदयास आली आणि कमीत कमी शासन जास्तीत जास्त व्यक्तिस्वातंत्र्य हा विचार प्रसृत केला प्रातिनिधिक लोकशाही ही पूर्णपणे लोकांच्या इच्छेवर आधारलेली आहे ह्या तिन्ही तत्त्वांचा विचार करतात आजच्या

परिस्थितीला तंतोतंत उपयोगी पडणारी आहे आणि मिल यांनी या तीनही तक्रारीचे सखोल विवेचन केले असून त्याचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणांमध्ये सविस्तर केला गेला आहे.

## ३.१ प्रस्तावना

अठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत आदर्शवादी तत्व प्रणालीचा जगभर प्रभाव होता तिथून पुढे राजकीय विचारांना वेगळे वळण दिले ते ब्लॉक आणि रुसो या राजकीय विचारवंतांनी त्यांनी व्यक्तीचे नैसर्गिक हक्क मूलभूत हक्क यांच्या आधारावर राजकीय विचार युरोपात अठराव्या शतकात जी वैचारिक क्रांती झाली ही देखील या विचारवंतांच्या वैचारिक योगदानाचा परिपाक होता अनुभवाच्या आधारावर राज्याचा त्याचा प्रत्यक्ष येतो त्यानुसार त्याकडे पाहता येते यादृष्टीने उपयुक्तता वाद वस्तू आणि सेवा या क्षेत्राचा एक निकष म्हणून पुढे आला यामध्ये जेरेमी बेंथम आणि जॉन स्टुअर्ट मिल यांच्या उपयुक्ततावादी विचारांच्या भूमिकेने रचनात्मक वर्गातली यांनी कायद्यातील सुधारणा व भरतीला कायद्याचे स्वरूप कसे असावे ते स्पष्ट केले आणि विशेष म्हणजे राजकीय संस्थांच्या विश्लेषण विश्लेषणात्मक तपासणी कशी करता येईल याविषयीची भूमिका मांडली त्यांच्या उपयुक्ततावादी विचारांमध्ये आधीची भर घालून तो अधिक परिष्कृत कसा होईल या दृष्टीकोनातून प्रयत्न केले.

## ३.२ विषय विवेचन

जेरेमी बेंथम व जॉन स्टुअर्ट मिल यांच्या उपयुक्ततावाद प्रतिनिधिक शासन पद्धती व लोकशाही या विचारांच्या संदर्भातील मांडणी ही या प्रकरणाचा मुख्य भाग आहे उदारमतवादी तत्वज्ञानाच्या उदयाच्या बरोबरीनेच व्यक्ती स्वातंत्र्यवादी विचारांची सुरुवात झाली त्याला पूरक व पोषक विचारप्रणालीची निर्मिती त्याच कालखंडात निर्माण झाली. त्यांचा अभ्यास पध्दतीच्या अनुषंगाने या प्रकरणात केला नाही उपयुक्ततावाद, प्रातिनिधिक शासन व लोकशाही या तीनही संकल्पनांची भूमिका अनिल यांनी स्पष्ट केली आहे त्यांच्या विचारातील कालानुरूप बदलांची भर मिल ने टाकली आहे.

### ३.२.१ जेरेमी बेंथम जीवन परिचय (१७४८–१८३२)

जेरेमी बेंथम उपयुक्ततावादी सुधारणावादी विचारवंत म्हणून ओळखला जातो. त्याचा जन्म इंग्लंडमध्ये १७४८ साली झाला लहानपणा पासून तो कुशाग्र बुद्धीचा होता त्याचे वडील वकील होते. बेंथम नी वयाच्या चौथ्या वर्षी लॅटिन भाषा अवगत केली.सहाव्या वर्षी फ्रेंच भाषा शिकला, पंधराव्या वर्षी पदवीधर झाला. त्यानेही कायद्याचा अभ्यासक्रम पूर्ण केला त्याचे वडील आणि आजोबा सुद्धा प्रसिद्ध वकील होते. समाजकल्याण आणि राजकारण हे त्याचे आवडीचे विषय होते. सामाजिक सुधारणा करणे हे त्याचे ध्येय होते. या विषयावर त्यांनी लेखन केले जेम्स मिल हा उपयुक्ततावादी विचारवंत बेंथम चा मित्र होता. १७८५ मध्ये बेंथम रशियात इंजिनियर असलेल्या भावाला भेटण्यासाठी गेला होता. तेथे त्याने कायद्याची संहिता केल्यामुळे रशियन राजाने बेंथम मला हिऱ्याची अंगठी भेट दिली परंतु ती संहिता स्वीकारण्यास राजाने नकार दिल्यामुळे बेंथम ने ती अंगठी साभार परत केली. बेंथम ची कायद्याची सहिता करण्याची पद्धत फ्रान्सला

आवडल्याने त्यांनी बेंथम सन्माननीय फ्रेंच चे नागरिकत्व बहाल केले. हा त्याचा गौरव होता अनेक श्रेष्ठ क्रांतिकारक बेंथमचे मित्र होते.

नेपोलियनचा पराभव झाल्यावर व्हिएन्ना परिषद १८१५ साली भरली होती. या घटने नंतर सनातन वादाला विरोध करून फ्रेंच राज्यक्रांती लोकशाही, स्वातंत्र्य,अधिकार समता ही तत्वे स्वीकारण्यास तसे वातावरण निर्माण करण्यात त्याच्या ग्रंथांचा वाटा होता ही तत्वे ब्रिटिश संसदेने मंजूर केलेल्या १८३२ च्या सुधारणा कायद्यात दिसून आली.

जेरेमी बेंथम वयाच्या साठाव्या वर्षी १८०८ मध्ये लोकशाही वादी बनला. औद्योगिक क्रांती नंतर नवीन मध्यमवर्ग उदयास आला त्याला अनुसरून नवीन राजकीय सामाजिक आर्थिक सुधारणा वादी तत्वज्ञान निर्माण होऊ लागले मध्यमवर्गीयांच्या विचारांना वाचा फोडणे आवश्यक होते. ज्ञान-तंत्रज्ञान, शासन-प्रशासन, कायदे, सुधारणा यांचे स्वागत करून समर्थन करणारे विचारवंत आवश्यक होते ही अपेक्षा जेरेमी बेंथम ने पूर्ण केली.

बेंथम युगप्रवर्तक मानला जातो उपयुक्ततावादाला बेंथम ने Philosophical Radicalism म्हटले. त्याच्या बालपणी तिसरा जॉर्ज राज्यपदावर होता बेंथमला भरपूर आयुष्य लाभले त्याच्या विचारांचे प्रतिबिंब १८३२ च्या सुधारणा कायद्यात होते. ब्रिटिश संसदेने या कायद्याला मंजुरी दिली त्याच्या एक दिवस आगोदर बेंथमला मृत्यू आला तो शेवटपर्यंत अविवाहित राहिला.त्याचे पूर्ण आयुष्य सक्रिय राजकारण, लेखन-वाचन यात गेले तो दररोज विशिष्ट पाने लिहित असे त्याचा तसा संकल्प होता.उपयुक्ततावादाचा प्रचार-प्रसार करण्यासाठी त्याने वेस्टमिनिस्टर रिव्ह्यू नावाचे मासिक १८२४ मध्ये त्यांनी सुरु केले होते. त्याच्या प्रेरणेने इंग्लंडमध्ये काही विद्यापीठेही स्थापन झाली.

### ❍ बेंथमची ग्रंथरचना :-

बेंथमने चौफेर लेखन केले इतकी पुस्तके लिहिणारा विचारवंत क्वचितच आढळेल त्याच्या बहुतेक ग्रंथांचा भिन्न-भिन्न भाषा अनुवाद झालेले आहेत. त्याचे अनेक ग्रंथ अजूनही प्रकाशित व्हायचे आहेत. त्याने विधी, अर्थशास्त्र शिक्षणशास्त्र, धर्मशास्त्र, चर्च, भाषा, जनगणना, स्वराज्य संस्था, आंतरराष्ट्रीय संघटना अधिकोष या सर्वांवर लिखाण केले आहे १८८९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या Principles of Morals ans Legislation या पुस्तकात त्याने सुख-दुःख सुधारणात्मक कायद्यांचे महत्त्व या संकल्पना मांडल्या. त्यांची इतर ग्रंथसंपदा खालील प्रमाणे :-

१. Discources on Civil and Penal Legislation.

२. Politicla Economy Principles of International Law.

### ३.२.१.१ बेंथमचे लोकशाही विषयक विचार

उपयोगिता वादाच्या सिद्धांतावरच त्याचे राज्यासंबंधीचे विचार आधारित आहेत. त्यांच्या मते राज्य हा सामाजिक कराराचा परिणाम नाही राज्य म्हणजे सुख-समृद्धीसाठी मनुष्याने संघटित केलेला समूह आहे. उपयोगिता हा त्याचा पाया आहे. अधिकतम सुख हा राज्याचा उद्देश आहे असे तो म्हणतो. ॲरिस्टॉटलचा राज्याचा उद्देश नैतिक जीवनाचा विकास आहे असे म्हणतो पण इथे मला हे मत मान्य नाही. त्याच्यामध्ये व्यक्ती अंतिम आहे आणि राज्याचे अस्तित्व व्यक्तीसाठी आहे राज्याच्या आज्ञापालन करणे ह्यासाठी आवश्यक असतात. आपल्या पूर्वजांनी करार केला म्हणून आपण आज्ञापालन करीत नाही समूह म्हणजे सदस्यांचा केवळ एक संघ आहे संघातील सदस्यांच्या हिता शिवाय संघाला काहीच उद्देश नसतो. समाज त्याच्या दृष्टीने एक काल्पनिक संस्था आहे. व्यक्ती अंतिम सत्य आहे व्यक्तीसाठी राज्य आहे राज्यासाठी व्यक्ती नव्हे. समाज कृत्रिम संघटना आहे. त्यातील सदस्यांचा म्हणजे व्यक्तीच्या कल्याणाची कल्पना केल्याशिवाय समाज कल्याण याची कल्पना व्यर्थ आहे असे त्याचे म्हणणे आहे.

मनुष्य राज्याच्या आज्ञेचे पालन भीतीमुळे किंवा करारामुळे करत नाही तर त्यामध्ये असणाऱ्या उपयोगीतेमुळे करतो. आज्ञापालनाने निर्माण होणारे दोष अवाज्ञापालन आणि निर्माण होणाऱ्या दोषा पेक्षा कमी असतात म्हणून राज्याच्या आज्ञा पाळतो. राज्याचा हस्तक्षेप तो उपयोगितेच्या मापदडावर उचित किंवा अनुचित ठरवितो. राज्य सुखप्राप्ती साठी आवश्यक असेल पण ते उपयोगी नाही तर तो एक आवश्यक दोष आहे.

कोणतेही सरकार प्रजेची साथ असते तोपर्यंतच सत्तेवर राहू शकते. सरकार जर समाजाच्या सामान्य सुखा कडे लक्ष देत नसेल तर त्याच्या आज्ञा पालन करण्याचा अधिकार तो जनतेला देतो आज्ञा पालनाची सवय उपयोगीतेतून निर्माण होते राज्याला तो सर्वस्व मानतो पण त्यावर बंधनही टाकतो. अधिकतम लोकांचे अधिकतम सुख लक्षात घेऊनच राज्याने कायदे बनविले पाहिजेत आणि कार्य केले पाहिजे. सार्वभौम सत्तेला विरोध करण्याचा अधिकार तो व्यक्तीला देतो. राज्य अनैतिक समुदाय नाही व्यक्तीच्या नैतिक जीवनाशी त्याचा काहीच संबंध नाही जनतेचे नैतिक कल्याण हा त्याचा उद्देश नव्हे व्यक्तीच्या सुखाच्या मार्गातील अडचणी दूर होतील अशा प्रकारची परिस्थिती निर्माण करणे हेच राज्याचे कार्य आहे.

बेंथम यांच्या काळात सामाजिक करार सिद्धांताला बरीच मान्यता होती त्यामुळे निसर्गदत्त अधिकार नैसर्गिक कायदा या कल्पना प्रचलित होत्या बेंथम ने या सर्व कल्पनांना विरोध केला. त्याचे म्हणणे असे होते की सामाजिक कराराची कल्पनाच हास्यास्पद आहे. ऐतिहासिक सत्य नाही असा करार होऊ शकत नाही झाल्यास तो टिकू शकत नाही कारण भूतकाळात पूर्वजांनी असा करार केला होता व राज्यसंस्थेची बंधने स्वीकारली होती म्हणून पुढच्या पिढीला तो करार बंधनकारक ठरू शकत नाही हे तर्कशुद्ध नाही असे असल्यास राज्यसंस्था टिकणार नाही ही कल्पना सैधान्तिक्च नाही तर अशास्त्रीय आहे केवळ करारामुळे कोणी राज्याच्या आज्ञा पाळत नाही तर त्याची त्या काळात वाटणारी उपयोगिता लक्षात घ्यावयास पाहिजे. व्यक्तीच्या हितसंबंधांचे संरक्षण होते लोकांना सुख मिळते म्हणून लोक राज्यांच्या आज्ञांचे पालन करतात

प्रथम सामाजिक उपयोगिता व पुढे निर्माण होणारी आज्ञापालन याची सवय या दोन मुद्द्यांवर राज्याचे अस्तित्व अवलंबून आहे म्हणून राज्याच्या उदयाचे व राज्याच्या आज्ञापालनाचे मुख्य कारण म्हणजे त्यापासून मिळणारे सुख व उपयोगिता हेच होय असे त्यांचे म्हणणे आहे.

राजकीय समाज कसा निर्माण होतो याचे वर्णन बेंथम ने त्याच्या Segaments of Government या ग्रंथात केले आहे. तो म्हणतो जेव्हा काही लोक एका व्यक्तीची आज्ञा पाळण्याची किंवा विशिष्ट वर्णनाच्या व्यक्ती समूहाची आज्ञा पाळण्याची सवय बाळगून असतात तेव्हा ते सर्व लोक नियत राजकीय समाज बनतो मात्र जेव्हा अशा व्यक्ती त्यांच्या सवयीनुसार परस्परांशी चर्चा करतात संबंधित असतात परंतु वर उल्लेख केल्याप्रमाणे त्यांना आज्ञापालन याची सवय नसते तेव्हा त्याला नैसर्गिक समाज म्हणतात.

समाज व्यवस्था कशी निर्माण होते याचे उत्तर देताना बेंथम असे म्हणतो की ही एक स्वाभाविक प्रक्रिया असते. ती प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी सामाजिक करार वाद्यांनी मांडलेल्या नैसर्गिक हक्क, नैसर्गिक समाज किंवा सामाजिक करार इत्यादी संकल्पनांना काहीही अर्थ उरत नाही. अशा काल्पनिक संकल्पना मांडून राज्याच्या निर्मितीचा विचार करणे हे चुकीचे आहे. राज्य निर्मितीतील सत्य असे आहे की लोक एकमेकांना दिलेल्या शब्द पाळतात सर्वश्रेष्ठ व्यक्तींच्या आज्ञांचे पालन हि करतात कारण तसे करणे हे त्यांच्या फायद्याचे असते त्याच कारणांसाठी सर्वश्रेष्ठ व्यक्ती किंवा सर्व श्रेष्ठ व्यक्ती समूह प्रस्थापित कायद्याच्या बंधनात स्वतःच्या कृती नियंत्रित करतात कारण ते त्यांच्या फायद्याचे होते सार्वभौम सत्ता लोकांच्या इच्छा आकांक्षांचे पालन करते कारण तसे करणे सार्वभौम सत्तेला हिताचे किंवा लाभाचे असते. याबाबत लाभ फायदा किंवा हीत त्यांचा अर्थ उपयुक्तता असाच घेतो म्हणजेच उपयुक्तता हा नागरिक आणि राज्यकर्ते यांच्या परस्पर संबंधांचा विचार असतो राजाने म्हणजेच सार्वभौम लोकांच्या इच्छा आकांक्षांचा आदर केला नाही किंवा लोकांनी राजा किंवा सर्व आज्ञांचे पालन केले नाही तर राज्य ही संस्था अस्तित्वात येणार नाही किंवा अस्तित्वात येऊन ही नष्ट होईल. त्यांचे असे म्हणणे आहे की राज्याच्या ह्दयातील सर्व केंद्रीय संकल्पना या उपयुक्ततेच्या दिशेनेच जातात.

आजच्या कल्याणकारी राज्याच्या संदर्भातून विचार केल्यास त्यांचे हे विचार महत्त्वाचे ठरतात त्यातही पुन्हा कायद्याद्वारे आर्थिक बाबतीत समानता आणावी हे तो सुचवितो हे त्याचे विचार समाजवादी विचारांना पुष्टी देणारे आहेत. म्हणून कायद्याचे पालन झाले पाहिजे असे म्हणतो कायद्याचे पालन केल्याने कायद्यांना संरक्षण प्राप्त होते आणि जास्तीत जास्त लोकांना जास्तीत जास्त सुख देण्याच्या प्रक्रियेला चालना मिळते. तात्पर्य त्यांचा विश्वास व्यक्तीच्या स्वभावावर आणि सुधारणात्मक प्रवृत्तीवर होता म्हणून कायद्याद्वारे सकारात्मक सुधारणा व्हाव्यात असे वारंवार तो म्हणतो. त्यांची मीमांसा महत्त्वाची असून समाजसुधारणा करू इच्छिणाऱ्या समाजाला प्रेरक आहे. त्याच्या प्रयत्नांमुळे विवाह, घटस्फोट, संपत्तीतील मुलींचा, वाटा कामगार संघटनांना मान्यता, गुन्हेगारांना क्रूर पद्धतीने वागवण्याची पद्धत बंद करणे इत्यादी सामाजिक सुधारणा ब्रिटनमध्ये अस्तित्वात आल्या.

सुखदुःख आणि उपयुक्ततावाद या एकाच तत्वज्ञानामुळे जेरेमी बेंथम प्रसिद्ध झाला असला तरी इतर अनेक बाबतीत विचार व्यक्त करतो. राज्यसंस्था कायद्याची प्रक्रिया सामाजिक सुधारणा अधिकार स्वातंत्र्य कर्तव्य दंड शिक्षा राज्याला विरोध करणे इत्यादी गोष्टींचा तो उपयुक्ततावादी या सूत्रानुसार विचार करतो आणि समर्थन करतो शासनाने दिलेले अधिकार आणि त्यांनी केलेले कायदे यांची उपयुक्तता असते म्हणून त्याचे पालन होते. सामाजिक करार सिद्धांतावर बेंथम चा विश्वास नाही वरील गोष्टी सामाजिक करारातून निर्माण होत नसतात राजकीय सामाजिक आर्थिक न्यायविषयक अशा अनेक संस्थांचे तो उपयुक्तता या एकाच तत्वाला अनुसरून विचार करतो. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे हे राज्याचे कार्य नसते नैतिक चांगल्या जीवनासाठी प्रयत्न करणे हेही राज्याचे ध्येय नाही असे म्हणतो. जास्तीत जास्त लोकांना आनंद मिळवून देणे हे राज्याचे कार्यक्षेत्र असावे अनेक व्यक्तींचा मिळून समाज बनतो म्हणून व्यक्तीच्या सुखाचा विचार केला की समाजाच्या सुखाचा विचार होतो असेही तो म्हणतो. जनतेची संमती सामाजिक करार इत्यादी गोष्टींमुळे व्यक्ती कायद्याचे पालन करतात यावर त्याचा विश्वास नाही तर व्यक्तीच्या सुखा संबंधीचे हितसंबंध राज्य सुरक्षित ठेवते म्हणून कायद्याचे पालन केले जाते असे त्याचे म्हणणे आहे.

- **प्रातिनिधिक शासन संस्था**

मूळचा व्यक्तिवादी आणि उपयुक्ततावादी बेंथम जेंव्हा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे लोकशाहीचा विचार करतो तेव्हा तो हळूहळू उदारमतवादी झाल्याचे दिसून येते अनेक ब्रिटिश राजकीय विचारवंता प्रमाणे बेंथम ला प्राचीन ग्रीक नगर राज्यातील प्रत्यक्ष लोकशाही आवडत असे यात शंका नाही. परंतु म्हणून आधुनिक काळातील मोठ्या आकाराच्या प्रादेशिक राज्यात प्रत्यक्ष लोकशाही अस्तित्वात आणणे शक्य नाही हे तो जाणून होता अर्थातच प्रत्यक्ष लोकशाही पेक्षा प्रातिनिधिक शासन संस्था स्थापन करणारी प्रातिनिधिक लोकशाही रिप्रेझेंटेटिव्ह गव्हर्नमेंट बेंथम ला पसंत पडली. तरीही प्रातिनिधिक शासन संस्थेविषयी त्याने एक मूलभूत शंका उपस्थित केली आहे ती म्हणजे बहुमताच्या आधारावर निवडून आलेले प्रतिनिधी लोकांच्या इच्छा आकांक्षा लक्षात घेऊन त्यांच्या हिताची जपणूक करण्यासाठी राज्यपाल कारभार करतील याची खात्री देता येत नाही. परंतू यावर त्याने एक उपाय सुचविला होता तो म्हणतो लोकप्रतिनिधींना आवश्यक तेवढ्याच सुविधा देऊन तसेच त्यांच्यावर विविध प्रकारची बंधने घालून त्यांना वठणीवर आणता येईल त्यासाठी काही प्रतिबंधात्मक उपाय करावे लागतील. पहिले बंधन म्हणजे लोकप्रतिनिधी आणि शासकीय अधिकाऱ्यांची संख्या नेहमी मर्यादित ठेवावी. दुसरे लोकप्रतिनिधी आणि शासकीय अधिकारी यांना त्यांच्यावरील घटनात्मक बंधनाची जाणीव करून देण्यात यावी. आणि तिसरे म्हणजे लोकप्रतिनिधी आणि शासन अधिकारी यांच्यावर जनमताचे दडपण आणणे तसेच त्यांच्या कार्यक्षमतेवर मधूनमधून टीका घडवून आणणे लोकप्रतिनिधीनी शासन अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराला आळा घालण्याचे उपाय योजणे, सत्ता आणि अधिकारांचे विकेंद्रीकरण करते. यापैकी एक उपाय लोकप्रतिनिधींना नियंत्रणात ठेवण्यासाठी उपयोगी पडू शकतो. लोकप्रतिनिधींवर डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवले पाहिजे तसेच त्यांना सतत कार्यक्षम हि ठेवले पाहिजे त्यासाठी सत्ता आणि अधिकारांची विकेंद्रीकरण करणे संयुक्तिक ठरते.

उपयुक्ततेच्या तत्त्वानुसार लोकांचे हित व सुख समाधान राज्य आणि शासनाकडून अपेक्षित असते किंबहुना त्यासाठीच लोकांनी आपली सत्ता लोकप्रतिनिधी आणि शासन अधिकारी यांच्याकडे सोपवलेली असते. यामध्ये राज्य आणि शासनावर तीन घटकांच्या आधारे खर नियंत्रण ठेवता येईल. त्यातील पहिला घटक म्हणजे विस्तार दुसरा कार्यकाळ आणि तिसरा तीव्रता यापैकी सत्तेचा विस्तार म्हणजे किती लोकप्रतिनिधींनी किती मोठ्या संख्येवर शासन करावे याचा निर्णय शासनाचा कार्यकाळ म्हणजे किती काळ शासनाची सत्ता पुन्हा एकदा लोकप्रतिनिधींना विचारले पर्यंत लागणारा काळ सत्तेची तीव्रता म्हणजे सत्तेचा परिणामकारक वापर म्हणजेच जास्तीत जास्त लोकांना जास्तीत जास्त सुख मिळावे म्हणून शासनाने योग्य परिणाम कसा साधावा याचा विचार आणि कृती होय.

त्यांच्या मते, प्रातिनिधिक लोकशाहीमध्ये सत्तेवर या तीन मार्गांनी निवांत नियंत्रण ठेवता येते प्रतिनिधिक लोकशाहीत सर्वांना समान हक्क असून राज्यकारभारात सहभागी होऊन विविध कार्याला हातभार लावता येतो प्रातिनिधिक शासनामध्ये प्रत्येक व्यक्ती ही कायद्याच्या दृष्टीने समान असते आर्थिक विषमता कमी करण्याचे परिणाम कारक उपाय जितके प्रातिनिधिक लोकशाहीत असतात तितके अन्य शासन प्रकारात नसतात. संपत्तीची निर्मिती आणि वितरण यावर प्रातिनिधिक लोकशाही चे नियंत्रण असते आर्थिक दृष्ट्या संपूर्ण समता ही अशक्य असली तरी कमालीची विषमता ही सुखी जीवनाच्या मार्गातील फार मोठी अडचण असते हे लोकशाहीत जितके कळून येते तितके अन्य शासन प्रकारात कळत नाही. समतेचे तत्व मानणाऱ्या समाजात जास्तीत जास्त लोकांना सुखी आणि समाधानी जीवन देता येणे शक्य आहे असे दिसते.

उपयुक्ततावादाच्या आधारावर प्रातिनिधिक शासनाने कोणत्या जबाबदाऱ्या उचलाव्यात हे सांगताना बेंथम ला नागरिकाच्या नैतिक कर्तव्याचा विसर पडत नाही. राज्य उपयुक्ततावादी वस्तुनिष्ठ ऐहिक जीवन नियंत्रित करून समाजाच्या भौतिक सुखाचा विचार करू शकते. परंतु उपयुक्ततावादी विचार देऊन प्रातिनिधिक शासन नैतिक माणूस घडवू शकत नाही याचे कारण असे सांगतो की उपयुक्ततावादा च्या आधारावर व्यक्तीचा दृष्टिकोन राज्य बदलू शकत नाही. कारण त्यांच्या म्हणण्यानुसार राज्य नागरिक घडवीत नसून नागरिक राज्य निर्माण करतात व त्याला आकार देतात.

उपयुक्ततावाद आणि प्राथमिक राज्य व शासनसंस्था यांचे परस्पर संबंध लक्षात येण्यासाठी बेंथम प्रणित उपयुक्तता आणि कायदा यांचे परस्पर संबंध लक्षात घेणे आवश्यक ठरते.

### ❑ बेंथम प्रणित उपयुक्तता आणि कायदा

जेरेमी बेंथम याने सकारात्मक न्याय् शास्त्राचा सखोल विचार केल्याचे दिसते त्याच्या दृष्टीने कायदा म्हणजे सार्वभौम सत्तेची आज्ञा होय कायद्याचा उगम हा निसर्गातून होत नाही किंवा बुद्धीच्या आधारावर ही होत नाही असे त्यांचे मत होते त्याला असे वाटत असे की कायदा हा दैवी किंवा मानवी इच्छेचा विचार असतो परंतु दैवी कायदा म्हणजे नेमके काय हे सांगता येत नाही त्याचा अर्थ लावण्याची क्षमता ही सामान्य माणसात नसते त्यामुळे मानव निर्मित कायदा हात वास्तव असतो आणि त्याचा अर्थ सामान्य माणसाला कळतो असा हा मानवी कायदा हा राज्याच्या सर्वश्रेष्ठ सत्तेतून प्रत्यक्षात येतो सार्वभौम सत्ता कायद्याच्या

परिभाषेत आज्ञा करते आज्ञा पाळावयास लावण्याची क्षमता आणि सामर्थ्य सार्वभौम सत्तेच्या ठिकाणी असते. त्यामुळे राज्य आणि शासन संस्था या कायद्याची निर्मिती करणाऱ्या संस्था असतात. या संस्था निर्वाचित किंवा नियुक्त प्रतिनिधींच्या बनलेल्या असतात त्यांची निर्मिती मुळी सुखी आणि आनंदी समाज निर्माण करण्यासाठी केलेली असते. कायदा हे साधन वापरून राज्य शासन संस्था समाजाचा विकास घडवून आणतात.

थोडक्यात उपयुक्तता आणि कायदा यांच्या परस्पर संबंधातून जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त कल्याण साधले जाते. राज्य आणि शासन यांची निर्मितीच मुळी कायद्याच्या आधारे उपयुक्ततावाद प्रत्यक्षात आणण्यासाठी झालेली असते. अर्थात कायदा सुद्धा परिपूर्ण शाश्वत आणि शुद्ध स्वरूपाचा नसतो बदलत्या परिस्थितीत कायद्याचे स्वरूप आणि प्रभाव देखील बदलतो. मात्र बदल देखील कायद्यानुसारच केला जाणे हे उपयुक्ततावादा च्या महत्त्वावर अवलंबून असते. या दृष्टीने राज्य आणि शासन या देखील उपयुक्ततावादी विचार आणि उपयुक्ततावादी संस्था आहेत. व्यक्तीच्या दृष्टीने चांगली व्यक्ती निर्माण होणे हे साध्य असून राज्य म्हणजे ते साध्य साधण्यासाठी व्यक्तींनीच निर्माण केलेले साधन असते. लोक कायद्याचे विश्वस्त म्हणून राज्यकर्ते व शासनकर्ते यांच्याकडे पाहतात.

एक साधन या दृष्टीने त्यांनी कायद्याची पाच अंगे सांगितलेली आहेत. पहिले अंग म्हणजे कायद्या मुळे कार्यक्षम शासन यंत्रणेची लोकांना खात्री वाटली पाहिजे. दुसरे महत्त्वाचे अंग म्हणजे कायद्याद्वारे कमीत कमी खर्चात तसेच कालापव्यय न होता जास्तीत जास्त न्याय मिळेल याची हमी मिळाली. पाहिजे आणि तिसरे वैशिष्ट्य म्हणजे कायद्यामुळे सार्वजनिक जीवनाची नियमबद्ध माहिती किंवा ज्ञान लोकांना मिळाले पाहिजे. कायद्याचे चौथे अंग म्हणजे तो सर्वांना समान लागू असला पाहिजे. एका व्यक्तीला किंवा व्यक्ति गटाला एक कायदा किंवा दुसऱ्याला एक अशी परिस्थिती कायद्यामुळे निर्माण होऊ नये. कायद्याचे पाचवे वैशिष्ट्य सांगताना बेंथम म्हणतो की कायद्यामुळे इच्छा आकांक्षा स्पष्ट होऊन त्यांच्या संबंधीच्या गरजा भागल्या पाहिजे कारण तसे झाल्यासच न्याय मिळणे शक्य होते.

बेंथम च्या मते कायद्याची ही पाचही अंगे कायद्यातला उपयुक्ततावादा चा महत्वाचा भाग म्हणून ओळखतात. अठराव्या शतकातील ब्रिटनमध्ये संसदेने निर्माण केलेल्या कायद्यात सुधारणा व्हाव्यात म्हणून जेवढ्या चळवळी आंदोलने झाली ती राबवण्यात स्वतः त्यांनी पुढाकार घेतला होता कायद्यातील सुधारणांच्या संदर्भात त्याने कायदा मोडणाऱ्या नागरिकांना कोणत्या शिक्षा देता येतील आणि त्या भोगताना तुरुंगाच्या संदर्भात कोणत्या सुधारणा केल्या पाहिजेत याच्या उत्तम शिफारशी ब्रिटिश सरकारला वेळोवेळी केल्या होत्या. कायद्यानुसार शिक्षा आणि तुरुंग सुधारणा हा त्यांच्या उपयुक्ततावादात असणारा एक लक्षवेधक विचार आहे हे लक्षात घ्यावे लागेल.

### ❑ बेंथमच्या राजकीय तत्वज्ञानाचे मूल्यमापन :–

जेरेमी बेंथम हा व्यक्तिवादी उपयुक्ततावादी विचारसरणीतून उदारमतवादाकडे जाणारा महत्त्वाचा राजकीय विचारवंत आहे असे म्हणता येईल. जॉन लॉक आणि रुसौ या सामाजिक करार सिद्धांतवादी विचारवंतां नंतर

राज्य आणि शासन संस्था यांच्याकडे उपयुक्ततावादा च्या दृष्टिकोनातून पाहणाऱ्या बेंथम ने अठराव्या शतकात राजकीय विचारांना दिलेली कलाटणी महत्त्वपूर्ण अशी आहे. त्यांनी दिलेले राजकीय विचारातील योगदान हे महत्वपूर्ण आहे.

बेंथम चे विचार त्याच्या दृष्टीने कितीही महत्त्वाचे असले तरी त्याच्या काळात आणि नंतरही त्यावर बरीच टीका झाली. सर्व सामाजिक आणि राजकीय विचार उपयुक्ततेवर अवलंबून ठेवणारा बेंथम टीकेचे लक्ष झाला नसता तर नवल होते. व्यक्तीचे सुख आणि आनंद तसेच समाजाचे सुख आणि आनंद या दोन वेगळ्या गोष्टी असून त्यांचा व्यक्ती आणि समाजाच्या दृष्टीने स्वतंत्र विचार केला पाहिजे असे त्यांच्या टीकाकारांचे पहिले मत होते. व्यक्तीला आपले सुख दुःख कळते आणि व्यक्ति सुख मिळवण्याच्या प्रयत्नात दुःख टाळण्यासाठी प्रयत्न करते या बेंथम च्या प्रतिपादनावर बरीच टीका झाली. व्यक्तीचे आणि समाजाचे सुख परस्परांना पूरक होऊ शकत असली तरी त्यांना एकच मनणे चुकीचे असल्याचे त्याच्या विचारांच्या टीकात्मक परीक्षणात अनेक टीकाकारांनी आपले मत मांडले आहे. लोकशाहीच्या चौकटीत राहून देखील सामाजिक आणि आर्थिक समता प्रस्थापित करू पाहणारा फेबिअन समाजवाद मध्यमवर्गीय बुद्धिवाद्यामध्ये प्रसिद्ध पावला. बेंथमचा प्रसिद्ध टीकाकार बर्ट्रांड रसेल हा उपयुक्ततेच्या तत्त्वावर टीका करताना म्हणतो जर प्रत्येक व्यक्ती आपल्या जास्तीत जास्त सुखाच्या मागे लागत असेल तर कायदे मंडळाचे सदस्य बहुसंख्यकाच्या जास्तीत जास्त सुखाकर्ता कसे कायदे करतील याचे उत्तर बेंथम जवळ नाही.

बेंथम च्या उपयुक्ततावादी विचारावर घेतला जाणारा प्रमुख आक्षेप म्हणजे बेंथम ने सुख आणि आनंद मिळवण्याच्या मार्गातील नैतिकता विचारात घेतली नाही. त्यामुळे दुर्लक्षित अल्पसंख्यांकांच्या सुख दुःखाचा त्याच्या विवेचनात साधा उल्लेखही आढळत नाही सुख दुःख हा अनुभवण्याचा विषय असून तो व्यक्तिसापेक्ष आहे. परंतु बेंथमला या साध्या तत्त्वाचे भान नाही असे वाटते, बेंथमच्या राजकीय विचारसरणीवर ठीक ठिकाणी कडाडून हल्ला झाला असला तरी बेंथम चे राजकीय तत्वज्ञानाला दिलेले योगदान नाकारता येणार नाही. व्यक्तिवाद आणि उपयुक्ततावाद यांचे महत्त्व विशद करून पेन त्यांनी लोकशाही विचारधारेच्या एका महत्त्वाच्या त्रुटी वर नेमके बोट ठेवले आहे. लोकशाहीतील राज्यकर्त्यांची अशी समजूत असते की निदान त्यांना पाठिंबा देणाऱ्या बहुजनांना ते सुखी करू शकतील हा विचार निश्चितच चांगला आहे आणि तो बेंथम च्या व्यक्तिवाद आणि उपयुक्ततावादा मध्ये मांडला गेला आहे.

बेंथम चा सार्वभौमत्वाचा विचार म्हणजे मॅकियाव्हेलीच्या सार्वभौमत्वाचा सिद्धांताची सुधारित आवृत्ती असेच म्हणता येईल. राज्यसत्ता नंतरच्या काळामध्ये बरीच मर्यादित झाली होती आणि राज्याच्या सार्वभौमत्व ऐवजी जनतेच्या सार्वभौमत्वाला नवा आधार प्राप्त होत होता त्यादृष्टीने ही अठराव्या शतकातील ब्रिटिश राजकीय विचार परंपरेला मोठे योगदान मिळाले आहे.

समता आणि समानता या संकल्पनांचा व्यावहारिक अर्थ आणि उपयोग करून बेंथम ने नैसर्गिक कायदा नैसर्गिक हक्क यासारख्या संकल्पना कालबाह्य ठरवल्या त्याने हॉब्ज, लॉक यांच्या काल्पनिक विश्वाला व्यवहारिक तत्वज्ञानाची जोड दिली. सामाजिक करार वाद्यांना त्यांनी संपूर्णपणे खोडून काढले नाही तर त्यांच्या विचारांना योग्य दिशा देऊन त्यांचे स्थान त्यांना दाखवले यांच्या काळापासून आणि त्याच्या

राजकीय तत्त्वज्ञान यामुळे राज्याचा हेतू शासनाचे कार्य राज्य आणि शासन तसेच शासन आणि नागरिक यांच्या संबंधांचा नवा अर्थ आपल्याला विचारात घेऊन पुढील वाटचाल करावी अशीच एकंदर भूमिका त्याने मांडल्याचे दिसते.

### ३.२.१.२ बेंथमचे प्रतिनिधित्वविषयक विचार

मूळचा व्यक्तिवादी आणि उपयुक्ततावादी बेंथम जेव्हा प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे लोकशाहीचा विचार करतो तेव्हा तो उदारमतवादी बनल्याचे दिसून येते आणि ब्रिटिश राजकीय विचारवंत बेंथम ला प्राचीन ग्रीक नगर राज्यातील प्रत्यक्ष लोकशाही विषयी ही प्रचंड आकर्षण होते यात शंका नाही परंतु आधुनिक काळातील मोठ्या बाहुबली आकाराच्या प्रादेशिक राज्यात प्रत्यक्ष लोकशाही अस्तित्वात आणणे शक्य नाही हेही तो जाणून होता. अर्थातच प्रत्यक्ष लोकशाही पेक्षा प्रातिनिधिक शासन संस्था स्थापन करणारी प्रातिनिधिक लोकशाही बेंथमला पसंत पडली. तरीही प्रातिनिधिक शासन संस्थेविषयी त्यांनी एक मूलभूत शंका उपस्थित केल्याचे दिसते. ती म्हणजे बहुमताच्या आधारावर निवडून दिलेले प्रतिनिधी लोकांच्या इच्छा आकांक्षा लक्षात घेऊन त्यांच्या हिताची जपणूक करण्यासाठी राज्यभर राज्यकारभार करतील याची खात्री देता येत नाही. परंतु पुढे त्यावर उपाय सुचवले आहे. तो म्हणतो लोकप्रतिनिधींना आवश्यक तेवढ्याच सुविधा देऊन तसेच त्यांच्यावर विविध प्रकारची बंधने घालून त्यांना वठणीवर आणता येईल. त्यासाठी काही प्रतिबंधात्मक उपायही त्यांनी सुचविलेले आहेत. तो म्हणतो पहिले बंधन म्हणजे लोकप्रतिनिधी आणि शासकीय अधिकाऱ्यांची संख्या नेहमी मर्यादित ठेवावी लागेल. दुसरे बंधन म्हणजे लोकप्रतिनिधी आणि शासकीय अधिकारी यांना त्यांच्यावरील घटनात्मक बंधनाची जाणीव करून द्यावी लागेल. आणि तिसरे लोकप्रतिनिधी आणि शासन अधिकारी यांच्यावर जनमताचे दडपण आवश्यक आहे. तसेच त्यांच्या कार्यक्षमतेवर चर्चा करून अधून-मधून ती घडवून आणणे लोकप्रतिनिधी आणि शासन अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराला आळा घालण्याचे उपाय योजने सत्ता आणि अधिकारांचे विकेंद्रीकरण यापैकी एक लोकप्रतिनिधींना नियंत्रणात ठेवण्यासाठी उपयोगी पडू शकते. लोकप्रतिनिधींवर डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवले पाहिजे तसेच त्यांना सतत कार्यक्षम ठेवले पाहिजे त्यासाठी सत्ता आणि अधिकारांचे विकेंद्रीकरण संयुक्तिक ठरते. उपयुक्ततेच्या तत्वानुसार लोकांचे हित व सुख समाधान राज्य आणि शासनाकडून अपेक्षित असते किंबहुना त्यासाठीच लोकांनी आपली सत्ता लोकप्रतिनिधी आणि शासन अधिकारी यांच्याकडे सोपविलेली असते. त्यांच्या मते, राज्य आणि शासनावर तीन घटकांच्या आधारे खरे नियंत्रण ठेवता येईल त्यातील पहिला घटक म्हणजे विस्तार दुसरा कार्यकाळ आणि तिसरा तीव्रता यापैकी सत्तेचा विस्तार म्हणजे किती लोकप्रतिनिधी किती मोठ्या लोकसंख्येवर शासन करावे याचा निर्णय. शासनाच्या कार्यकाळ म्हणजे किती का शासनाची सत्ता पुन्हा एकदा लोकप्रतिनिधींना विचारेपर्यंत लागणारा काळ. सत्तेची तीव्रता म्हणजे सत्तेचा परिणामकारक वापर म्हणजे जास्तीत जास्त लोकांना जास्तीत जास्त सुख मिळावे म्हणून शासनाने योग्य परिणाम कसा साधावा याचा विचार आणि कृती.

त्यांच्या मते, प्रातिनिधिक लोकशाहीमध्ये सत्तेवर या तीन मार्गांनी नियंत्रण ठेवता येते प्रातिनिधिक लोकशाहीत सर्वांना समान हक्क असून राज्यकारभारात सहभागी विविध कार्याला हातभार लावता येतो.

चाचणी परीक्षणा मध्ये प्रत्येक व्यक्ती ही कायद्याच्या दृष्टीने समान असते आर्थिक विषमता कमीत कमी करण्याचे परिणामकारक उपाय जितके प्रातिनिधिक लोकशाहीत असतात तितके अन्य शासन प्रकारात खचितच नसतात. संपत्तीची निर्मिती आणि वितरण यावर प्राथमिक लोकशाहीचे नियंत्रण असते. आर्थिकदृष्ट्या संपूर्ण समता ही अशक्य असले तरी कमालीची विषमता ही सुखी जीवनाच्या मार्गातील फार मोठी अडचण असते हे लोकशाहीत जितके कळून येते तितके अन्य शासन प्रकारात कळून येत नाही. समतेचे तत्त्व मांडणाऱ्या समाजात जास्तीत जास्त लोकांना सुखी आणि समाधानी जीवन देता येणे शक्य असते.

उपयुक्तता वादाच्या आधारावर प्रातिनिधिक शासनाने कोणत्या जबाबदाऱ्या उचलाव्यात कोणत्या जबाबदाऱ्या पार पाडण्यात हे सांगताना बेंथम ला नागरिकांच्या नैतिक कर्तव्याचा विसर पडत नाही. राज्य उपयुक्ततावादी वस्तुनिष्ठ जीवन नियंत्रित करून समाजाच्या भौतिक सुखाचा विचार करू शकते. परंतु उपयुक्ततावादी विचार देऊन प्रातिनिधिक शासन नैतिक माणूस घडवू शकत नाही. याचे कारण असे सांगतो की उपयुक्ततावादा च्या आधारावर व्यक्तीचा दृष्टिकोन राज्य बदलू शकत नाही कारण त्यांच्या म्हणण्यानुसार राज्य नागरिक घडवत नसून नागरिक राज्य निर्माण करतात व त्याला आकार देतात. उपयुक्ततावाद आणि प्रातिनिधिक राज्य व शासन संस्था यांचे परस्पर संबंध अधिक चांगले लक्षात येण्यासाठी बेंथम प्रणित उपयुक्तता आणि कायदा याचे परस्परसंबंध लक्षात घेणे गरजेचे ठरत.

❑ **बेंथमच्या विचाराचे मूल्यमापन :–**

उपयोगितेचे तत्व त्यांनी प्रस्थापित केले आणि मुल्यमापनाची कसोटी म्हणून कायदा, सार्वभौम सत्ता इत्यादी सर्व गोष्टींचे विवेचन आणि समर्थन करण्यासाठी त्याचा उपयोग केला. त्याने निव्वळ उपयोगितेचे तत्त्व प्रस्थापित केले एवढेच त्याचे मोठेपण नाहीतर त्याने तर्कशुद्ध चिकित्सा आणि प्रयोगशीलता यांना शासन व प्रशासनाच्या क्षेत्रात लावून दाखविले प्रयोगाधिष्टीत तर्कवाद धोरणांच्या संबंधात त्यानेच प्रथम आणला.

बेंथम ला तत्वज्ञानी म्हणण्यापेक्षा एक वास्तववादी कायदेपंडित आणि सुधारणांवादी म्हणता येईल. समाजहिताचा निकष डोळ्यासमोर ठेवून व त्या निकषाच्या आधारे कठोर परीक्षा करून त्याने सर्व प्रचलित कल्पनांची व संस्थांची ची पुनर्रचना सुचविली ही सर्व मांडणी तर्कशुद्ध बुद्धीवादी होती. तत्कालीन बुद्धिवाद्यांवर त्याचा फार प्रभाव पडला त्यात प्रामुख्याने डेव्हिड रिकार्डो, जेम्स मिल, जॉर्ज जॉन्सन आणि जॉन्सन यांचा समावेश होतो. त्याचा निकटवर्ती अनुयायी जॉन स्टुअर्ट मिल म्हणतो अत्यंत बुद्धिमान विद्वानांच्या मालिकेत बेंथम मला स्थान दिले पाहिजे मानववंशातील थोर शिक्षकांच्या आणि नेहमीसाठी बौद्धिक आभूषणे असलेल्यांच्यामध्ये त्याचे स्थान आहे. बेंथम हा गरीबांचा कैवारी होता गरीबा संबंधी इंग्लंडमधील अनेक कायद्यांचे श्रेय त्यालाच राहील. कायदेविषयक समाजशास्त्रीय संप्रदायाचा पाया त्यांनी घातला असे समजण्यात येते सामाजिक कल्याण आणि हितसंबंधांचे संतुलन हे यातील दोन आधारस्तंभ होत. राज्यशास्त्राच्या अभ्यासातील अत्यंत बुद्धिमान अशा योगदात्यां मध्ये यांचा क्रम फार वरचा आहे.

### ३.२.१.३ बेंथमचे उपयुक्ततावादाची तत्त्वज्ञान :-

मागे उल्लेख केल्याप्रमाणे उपयुक्ततावादी विचारांचा प्रारंभ बेंथम पूर्वी झालेला होता. बेंथम ने त्यात सामाजिक आशय आणून ते तत्त्वज्ञान शास्त्रीय पद्धतीने मांडले. बेंथमच्या प्रिन्सिपल्स मोरालस लेजीसलेशन या पुस्तकात सुरुवातीलाच सुखदुःखाच्या कल्पना मांडल्या आहेत. सुख दुःख या व्यक्तीवर नियंत्रण करणाऱ्या दोन प्रवृत्ती आहेत. व्यक्तीची हालचाल त्याने काय करावे आणि काय करू नये हे या दोन प्रवृत्ती ठरवित असतात सुखाच्या प्रवृत्तीकडे आपण झुकते माप देत असतो या सुखाच्या प्रक्रियेत किती लोक सहभागी होतात यावरून सुखदुःखाचे प्रमाणात मग स्वरूप लक्षात येते बेंथम पुढे म्हणतो की चांगले-वाईट त्याची कारणे परिणाम या सर्व प्रवृत्तीतून सुखदुःख ठरत असतात या सर्वांचे मोजमाप व्यक्ती स्वतः करतो माणूसच मूल्यमापनाच्या पद्धती ठरवितो दुसऱ्या भाषेत सांगायचे झाल्यास सुख आणि दुःख मोजता येते ते प्रमाणात असते म्हणून माणसाने नेहमी सुखाच्या शोधात असावे.

- **उपयुक्तता ही कसोटी :-**

एखाद्या वस्तू पासून विचार कायदे संस्था इत्यादी पासून मिळणारे सुख किंवा दुःख मोजायचे कसे म्हणजे त्याचे मोजमाप कसे करायचे हा प्रश्न असतो त्यासाठी बेंथम म्हणतो या वस्तूची उपयोगिता किंवा उपयुक्तता हे मोजमाप नसते किंवा कसोटी असते सुखदुःखासाठी एखादी कृती स्वीकारणे किंवा नाकारणे किंवा तिचा त्याग करणे ही उपयुक्तता ची कसोटी ठरवित असते खरेखोटे तपासणी करताना एखादी गोष्ट ठरविणे चांगले वाईट शोधणे स्वतंत्र कायदे संस्था राज्य यांची तपासणी उपयुक्तता या कसोटी द्वारे करता येते या सर्व प्रक्रियेत केवळ नैतिकता निसर्गाला स्थान नसावे सुखाचा विचार करून दुःखाचा त्याग करावा हे सर्व तपासून पाहण्याचे कार्य आपणच करीत असतो, आपण जुन्या विचाराचे दिसतो, मोजमाप करणारे असतो हेच सूत्र राज्य राजकारण कायदे शासकीय निर्णय यांच्यासाठी सुद्धा आवश्यक मानले म्हणजे शासनाच्या कृतीचे मोजमाप या सूत्राने झाले पाहिजे कारण राजकारणाचा आणि कायद्याचा संबंध शेवटी समाजाशी येतो म्हणून समाजाच्या सुखदुःखाचा विचार झाला पाहिजे यासाठी लोकशाही यंत्रणा असावी आणि व्यक्तीला त्याच्या इच्छेप्रमाणे कार्य करता आले पाहिजे या धोरणाचा स्वीकार करावा सुखासाठी कसोट्या एक सुख मर्यादित आणि सुस्पष्ट असावी दोन सुखाचे स्वरूप एकेरी असावे आणि त्यामागची ठरावीक प्रेरणा असावी तीन त्यामागे नैतिक अधिष्ठान असले तरी चालेल. थॉमस् पेनचा उपयोगिता वाद केवळ व्यक्तीला लागू होत नाही तर सरकारच्या कार्यालय तो लागू होतो संपूर्ण कार्यच उपयोगितेवर संचालित होत असते उपयुक्त उपयोगिता वादी दृष्टिकोनातून सुख जीवनाचे साध्य आहे राज्याने कोणतेही कार्य करताना अधिकतम लोकांचे अधिकतम सुख या तत्वा कडे लक्ष द्यावे. चुकाने मिळतो आधार म्हणून तो जीवनातील प्रत्येक कार्य उपयोगी किंवा अनुपयोगी सिद्ध करतो नैसर्गिक कारणांनी जेव्हा सुख दुःख प्राप्त होते त्याला नैसर्गिक सुख किंवा नैसर्गिक दुःख म्हणतात त्याचप्रमाणे राजकीय नैतिक धार्मिक व लौकिक बाबतीत म्हणता येईल येईल कोणतीही गोष्ट मुळात चांगली किंवा वाईट नसते तर उपयोगी त्यामुळे ती चांगली किंवा वाईट ठरते मनुष्याच्या कार्याचे प्रयोजनच मुळी सुखाची प्राप्ती असते त्यांच्यामध्ये व्यक्तीच्या सुखात गुणात्मक फरक

नसून मात्रात्मक फरक आहे त्याच्यामध्ये सुखाची मात्र सारखीच असेल तर लहान मुलांचा खेळ व काव्य गान्हे सारखेच होय मिळणार या आनंदात मात्रात्मक फरक राहू शकतो गुणात्मक नव्हे.

**❍ बेंथमच्या उपयोगितावादी सिद्धांत वरील टिका :–**

१. थॉमस् पेनच्या सिद्धांतावर जितकी टिका झाली तितकी ठिकाण कोणत्या सिद्धांतावर झाली नसेल त्यांचा उपयोगिता सिद्धांत म्हणजे केवळ भौतिकवादी सिद्धांत वाटतो मनुष्याला खालच्या पातळीवर आणणारा हा सिद्धांत आहे मनुष्य केवळ सुखा करिताच धडपडतो ही गोष्ट योग्य वाटत नाही सुखाचा विचार करताना त्यांनी ती धर्म आणि सत्य या सर्वच तत्वांना तिलांजली दिली.

२. तेथे मला केवळ मात्रात्मक सुख मान्य आहे गुणात्मक नव्हे. देशासाठी सर्वस्वाचे बलिदान करण्याच्या देशप्रेमाला त्यात काहीच महत्त्व नाही खोखो खेळणे व शाकुंतल वाचणे या दोघांनी तिला आनंद सारखा राहू शकत नाही जॉन स्टुअर्ट मिल बेंथमवर अत्यंत कठोर टीका केली आहे त्याच्यामध्ये डुकराच्या भावनेने संतुष्ट राहण्यापेक्षा मनुष्य होऊन संतोष राहणे अधिक चांगले संतुष्ट मुर्खा पेक्षा असंतोष सॉक्रेटिस अधिक चांगला आहे प्रश्नाचे केवळ आपल्याशी संबंधित असलेले रूप असते पाहतात.

३. बेंथम च्या सिद्धांत परोपकार देशप्रेम आणि सहानुभूती यांना काहीच थारा नाही

४. सुखाचे मोजमाप करता येते असे त्यांचे मत आहे, पण सुख ही अमूर्त कल्पना असल्याने त्याचे मोजमाप होऊ शकत नाही त्याचे सुख मापक यंत्र त्याच्या उद्देशा कडे लक्ष देत नाही केवळ कार्याच्या बाह्य परिणाम कडे लक्ष देते व्यक्तिगत भावनेची ह्या पूर्ण उपेक्षा केली आहे.

५. थॉमस् पेनच्या सिद्धांतात व्यवहारिक तर नाही विधी निर्माण करताना अधिकतम लोकांच्या अधिकतम सुखाकडे लक्ष द्यावे असे तो म्हणतो पण अधिकतम लोकांचे अधिकतम सुख मोजणे.

६. थॉमस् पेनच्या उपयोगितावादी सिद्धांत मानसशास्त्रीय दृष्ट्या चुकीचा आहे मनुष्याच्या इच्छा भिन्न परिस्थितीत भिन्न असतात त्यामुळे सुखदुःख ही भिन्न असते.

७. राजकारणात अंकगणिताचा आधार घेऊन उपयोगिता मापने अव्यवहारिक आहे अनेकांच्या मते राजकारणात अंकगणित तितकेच निरर्थक आहे जितके अंकगणितात राजकारण.

## ३.२.२ जॉन स्टुअर्ट मिल यांचा अल्प जीवन परिचय (१८०६–१८७३)

जेरेमी बेंथम च्या निधन त्यानंतर व्यक्तिवाद आणि उपयुक्ततावादी या विचारांचे विश्लेषण करून उदारमतवादी विचारांची मांडणी जॉन स्टुअर्ट मिल या ब्रिटिश विचारवंतांनी केली.त्यादृष्टीने सुख आणि आनंद या उपयुक्ततावादी संकल्पनांचा नैतिकदृष्ट्या श्रेष्ठ आणि कनिष्ठ असा फरक स्पष्ट केला.

जॉन स्टुअर्ट मिल चा जन्म २० मे १८०६ मध्ये लंडन येथे झाला. त्याने रोमन कायद्याचा अभ्यास केला त्याने भाषण कलेती प्रावीण्य मिळविले सोळाव्या वर्षी तो उपयोगितावादी समितीचा सदस्य बनला सतराव्या वर्षी तो इस्ट इंडिया कंपनीत नोकरीला लागला नोकरीच्या काळातही त्याच्या लिखाणात खंड

पडला नाही. वयाच्या पंचविसाव्या वर्षी म्हणजे १८३० मध्ये हेरीअट टेलर यांच्याशी त्याची मैत्री झाली १८५१ मध्ये श्री टेलर यांच्या मृत्यूनंतर मील ने श्रीमती टेलर यांच्याशी विवाह केला श्रीमती टेलर यांच्या सहवासामध्ये त्यांच्यावर मानवतावादी दृष्टिकोनाचा प्रभाव पडला. जॉन स्टुअर्ट मिल यांनी आपले ऑन लिबर्टी हे पुस्तक श्रीमती टेलर यांना अर्पण केले आहे. मील जवळपास ३६ वर्षे ईस्ट इंडिया कंपनीच्या नोकरीमध्ये होते आठ मे १८७३ मध्ये हे व्हिग्नॉन इथे येथे मिल यांचा मृत्यू झाला.

### ❑ जॉन स्टुअर्ट मिल ची ग्रंथरचना

मिलने मानवाशी संबंधित असलेल्या जवळजवळ सर्वच विषयांवर लिखाण केलेले आहे. न्यायशास्त्र, मानसशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र इत्यादी सर्वच विषयावर त्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत त्यांचे काही प्रमुख ग्रंथ पुढीलप्रमाणे होत.

1. The system of logic 1841.
2. On Liberty 1869.
3. The principles of political economy 1848.
4. Autobiography 1873.
5. Essay on religion 1874.
6. Subjection of women.
7. Utilitarianism 1861.

### ३.२.२.१ 'मिल'चे लोकशाही विषयक विचार

मीलच्या राजकीय विचारात व्यक्तीस्वातंत्र्य, उपयुक्ततावाद आणि उदारमतवाद यांचे संतुलित अशा प्रकारचे मिश्रण दिसून येते या तीनही विचारसरणीतून मिल चे लोकशाही विषयीचे विचार प्रकट होतात परंतु मिलने लोकशाहीचा एक स्वतंत्र विचारप्रवाह म्हणून अभ्यास केल्याचे दिसत नाही किंबहुना एकोणिसाव्या शतकातील इंग्लंडच्या लोकशाही पद्धतीवर मिलने त्याच्या सौम्य पद्धतीने परखड टीका केली आहे. लोकशाहीतील काही दोष दूर करण्यासाठी मिलने लोकशाही शासन पद्धती प्रातिनिधिक शासन पद्धती बसवण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच्या 'Constutution of Government' या ग्रंथामध्ये लोकशाहीविषयक उणिवा दूर करण्याचा त्याने प्रयत्न केला.

लोकशाहीचे समर्थक राजकीय सत्तांचा विकास होऊन तो सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचेल असे मानतात लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी प्रत्येक नागरिकाने आपले राजकीय हक्क बजावले पाहिजेत. त्यांच्या मनात भाषण स्वातंत्र्य, मतदानाचा हक्क, निवडणुकीला उभे राहण्याचा, राज्यकारभारात सहभागी होण्याचा, आणि वाटल्यास शासनावर टीका करण्याचा हक्क पाहिजेत इत्यादी अधिकार असताना केवळ राजकीय स्वातंत्र्याचा विचार करून एक परिपूर्ण लोकशाही निर्माण करता येईल हे संभवत नाही व्यक्तिस्वातंत्र्याचा

लोकशाहीमध्ये साकल्याने अंतर्भाव होणे तितकेच आवश्यक असते, म्हणून प्रचलित लोकशाहीला लोकशाही न म्हणतात प्रतिनिधिक शासन म्हटलेले बरे असे तो म्हणतो.

लोकशाहीमध्ये मतदारांना राज्यकारभारात सहभागी होण्याचा हक्क असतो. परंतु राज्यकारभारात सहभागी होण्याचा मार्ग अनेक अति आणि अडथळे यांनी भरलेला असल्यामुळे प्रत्येकाला हा राजकीय सहभागाची संधी मिळतेच असे नाही, संधी मिळणे आणि संधीचा लाभ घेता येणे या दोन बाबी स्वतंत्र आहेत. प्रत्येकाजवळ संधीचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेली क्षमता असायला हवी अर्थातच खरी लोकशाही ही नागरिकांसाठी निरनिराळ्या संधी उपलब्ध करून देणारी असली पाहिजे. या ठिकाणी मिलने व्यक्तिस्वातंत्र्याचा अल्पवयीन मुले अपंग मतिमंद आणि सामाजिक आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या घटकांना काम वगळले हे लक्षात येईल या बाबतीत त्याला असे म्हणायचे आहे की अशा व्यक्तींना व्यक्तीस्वातंत्र्य दिले तरी त्याचा काहीही उपयोग होणार नाही कारण त्यांच्याजवळ स्वातंत्र्य उपभोगण्याची क्षमताच नसते या समाज घटकावर मिलने अन्याय केला असा त्याच्यावर होणारा आरोप किती चुकीचा आहे हे लक्षात येईल.

लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी व्यक्तीला केवळ हक्क देऊन भागत नाही तर त्यांना हक्कांचा योग्य उपयोग घेता यावा म्हणून सक्षम बनवणे ही तितकेच आवश्यक असते. नागरिकांना समताशिल बनवावे त्यांच्यातील विषमता दूर कराव्यात स्त्री-पुरुषाचा लिंगभेद करू नये, नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण करावी, अल्पसंख्यांकांच्याकडे विशेष लक्ष द्यावे लोकांच्या आर्थिक जीवनाचा स्तर उंचावण्याचा प्रयत्न करावा, लोकप्रतिनिधींनी समाजाभिमुख असावे, नागरिकांनी सतत जागरूक असावे, त्यांनी आपल्या स्वातंत्र्याचा विचार करताना ती दुसऱ्याच्या स्वातंत्र्याच्या आड येणार नाहीत याकडेही विशेष लक्ष द्यावे असे अनेक उपाय सुचविलेले आहेत. मिलला लोकशाही सुजाण नागरिक घडविण्याचे साधन वाटते त्याचा उपयोग करून केवळ राजकीय स्वातंत्र्याच्या माध्यमातून लोकप्रतिनिधींना निवडून देऊन बहुमताच्या गटाला शासन स्थापन करण्याची संधी देणे म्हणजे लोकशाही नाही तर लोकं शिक्षणातून लोकशाहीला पूरक असा सुजाण नागरिक निर्माण करणे तसेच लोकशाही समाज आणि राज्यपद्धती यांना पूरक अशा व्यक्ती घडविणे हे नितांत आवश्यक असते लोकशाहीचा विचार केवळ शासन पद्धती म्हणून केला तर ती एक तांत्रिक लोकशाही ठरेल त्यामुळे लोकशाही कडे केवळ एक शासन पद्धती असे न पाहता एक जीवनपद्धती म्हणून पाहता आले पाहिजे यासंदर्भात मिलच्या काही वचनांचा विचार करणे उपयुक्त ठरेल उदाहरणार्थ अखंड जागृतता ही स्वातंत्र्याची किंमत असते. लोकशाहीमध्ये बहुसंख्य लोक मतदान करतात परंतु अल्पसंख्य लोक राज्य करतात. वरील प्रमाणे आणखीन कितीतरी वचने व्यक्तिस्वातंत्र्य लोकशाहीच्या संदर्भात मिलने मांडलेली आहेत.

### ❑ मिलच्या शासनपद्धतीविषयक विचारावर झालेली टीका :-

मिलने सुचविलेली प्रमाणशीर प्रतिनिधित्व ची पद्धती तसेच अनेक मताधिकार पद्धती तात्विक दृष्ट्या जरी चांगली वाटत असली तरी प्रत्यक्षात क्लिष्ट व गुंतागुंतीची आहे ती सामान्य नागरिकांच्या मतदानाला लागू करण्यात पुष्कळ समस्या येऊ शकतात गुप्त मतदान ऐवजी खुल्या मतदानात पुरस्कार करतो यातून

परस्पर संघर्ष व नंतर सूड घेण्याची प्रकरणे उद्भवू शकतात याकडे मात्र त्याने दुर्लक्ष केले आहे शिक्षणाची तसेच संपत्तीची अट त्याने अधिकारासाठी घातली परंतु त्यामुळे अनेक लोक अधिकारापासून वंचित राहू शकतात. केवळ सुशिक्षित लोक जागरूकतेने मतदान करू शकतात व त्यांना योग्य प्रतिनिधी निवडता येतो हे गृहीत कृत्य योग्य वाटत नाही, उलटपक्षी सामान्य माणसाची सामान्य बुद्धी हीच अनेकदा सुयोग्य निवड करण्यास जास्त उपयोगी ठरते. शिक्षणाचे प्रमाण वाढल्यानंतर ही राज्यांमधील वरिष्ठ सभागृह किंवा विद्यापीठातील विधी सभांमध्ये फार चांगले कार्यक्षम व निस्वार्थ लोक निवडून येतातच असे आढळत नाही. मिलवर लोकशाहीविरोधी होता असा आरोप केला आहे समाजातील बहुसंख्य लोकांना तो राजकारणात प्रवेश देऊ इच्छित नाही तर केवळ सुशिक्षित सुसंस्कृत व्यक्ती हक्क देऊ इच्छितो अशी टीका केली आहे.

मिलच्या लोकशाही संबंधी विचारावर टीका होत असली तरी मिलचे विचार तत्कालीन इंग्लंडमधील परिस्थितीच्या संदर्भात विचारात घ्यायला हवे अल्पसंख्यांकांचे प्रतिनिधित्व त्यासाठी प्रमाणशीर प्रतिनिधित्व ची पद्धती स्त्रियांना राजकीय तसेच मतदानाचे अधिकार इत्यादी गोष्टींचा त्यांनी पुरस्कार केला प्रतिनिधींची गुणवत्ता चांगली असावी त्यासाठी त्याने किमान लिहिता-वाचता येणाऱ्यांना मताचा अधिकार द्यावा असे म्हटले असले तरी इतरांच्या साठी त्याने राष्ट्रीय स्तरावर शिक्षण देऊन त्यांना मतदार म्हणून शिक्षित करण्यावरही भर दिला म्हणजे त्याचा हेतू लोकांना वंचित ठेवण्यापेक्षा त्यांच्यात सुधारणा करणे हाच होता असे दिसते, म्हणून डब्ल्यू एल डेव्हिडसन लेखकाने हा लोकशाहीच्या विरोधात नसून तो पुरस्कर्ता होता असे म्हटले आहे तसेच लोकशाही मार्गाने व्यक्तिस्वातंत्र्याची जोपासना होऊन जनसामान्यांना सुखी व समृद्ध जीवन लाभू शकेल, अशी मीलची भावनाना होती असेही डेव्हिडसन असं म्हणतात.

### ३.२.२.२ 'मिल'चे प्रतिनिधीत्वविषयक विचार

मिलने आपल्या रिप्रेझेंटेटिव्ह गव्हर्नमेंट या पुस्तकात प्रतिनिधिक शासन संबंधी शासन पद्धतीविषयी विचार मांडले आहेत परिस्थितीनुसार लोक शासन संस्था निवडतात परंतु आपल्या हिताच्या दृष्टीने लोक त्यात परिवर्तन ही घडवितात जेथे सार्वभौम सत्ता लोकांच्या हाती असेल तोच प्रकार उत्तम असतो म्हणून सर्व प्रकारांमध्ये प्रातिनिधिक शासन योग्य ठरते समाजातल्या प्रत्येक व्यक्तीचा बौद्धिक सामाजिक व सांस्कृतिक दर्जा उच्च स्थानाला नेणे हे शासन संस्थेचे प्रमुख कार्य होय. प्रातिनिधिक शासनात सामान्य नागरिकात वक्तृत्वाचा विकास लोकहिताचे चिंतन आणि समाजहित साधण्याचे प्रवृत्ती वाढते तसेच जिज्ञासा संशोधकवृत्ती कुतूहल समिक्षण करण्याची प्रशासन कार्यात सहभागी होण्याची वृत्ती वाढते या प्रकारात मताधिकार याचे क्षेत्र व्यापक केले पाहिजे आणि अल्पसंख्यांकांना प्रमाणशीर प्रतिनिधित्व दिले पाहिजे असे मी म्हणतो मतदारांनीही आपले मत कोणाच्याही दडपणाखाली न येता निर्भयतेने दिले पाहिजे मत गुप्तपणे देण्याला त्याचा विरोध होता त्याच्यामध्ये उघडपणे मतदान झाले पाहिजे प्रत्यक्ष लोकसत्ता उत्तम परंतु आधुनिक काळात राज्य व वाढती लोकसंख्या त्यामुळे ते शक्य नसल्याने प्रातिनिधिक लोकसत्ता उत्तम ठरते, पण बहुसंख्यांक त्याच्यासोबत अल्पसंख्यांकांना ही मतदानाचा अधिकार द्यावा असे मी म्हणतो अल्पसंख्यांकांची गळचेपी होऊ नये म्हणून मिलने प्रमाणबद्ध प्रतिनिधित्वाच्या पद्धतीचा पुरस्कार केला मतदानाच्या अधिकाराचा सुयोग्य वापर व्हावा आणि सुसंस्कृत सुशिक्षित सुजाण निस्वार्थी असेच लोक

निवडून जावेत यासाठी मतदारांना योग्य अयोग्य निवडण्याची पात्रता असावी म्हणून त्याने केवळ सुशिक्षित व्यक्तीलाच मतदानाचा अधिकार द्यावा असे प्रतिपादन केले होते. किमान लिहिता वाचता येईल त्यांनाच मताचा अधिकार असावा अन्यथा अकार्यक्षम व योग्य लोकप्रतिनिधी निवडून येऊन सर्व समाजाच्या हिताला हानी पोहोचेल अशी भूमिका त्याने पुढे मांडलेली दिसते. राज्यात स्त्रियांची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या अर्धी असल्याने स्त्रियांना मताचा अधिकार द्यावा त्यामुळे स्त्रियांचा दर्जा उंचावण्यास ही मदत होईल असे न केल्यास अर्धी लोकसंख्या राजकारणापासून वंचितच राहिल जी व्यक्ती कर भरत नाही तिला मताचा अधिकार देऊ नये, कारण कर भरणारी व्यक्तीच राष्ट्राच्या संपत्तीचा वापर योग्य रीतीने करू शकेल असे त्याचे मत होते. मतदानाच्या संदर्भात केवळ संख्यात्मक समानतेचा विचार न करता गुणात्मक विचार केला त्यामुळे त्याने लोकशाहीतील नागरिकांना समान न धरता भेदभाव केला असे म्हणता येईल. प्रातिनिधिक लोकसत्तेचा नागरिकांना सहभाग येतो सार्वभौम सत्तेवर नियंत्रण लोकांच्या हाती असते अधून-मधून स्थानिक किंवा सर्वसामान्य नागरिकांना सार्वजनिक कार्यात भाग घेता येतो म्हणून ही पद्धती इतर शासन प्रकारांपेक्षा चांगली आहे असे मिलचे म्हणणे आहे.

शैक्षणिक दृष्टिकोनातून हा शासन प्रकार चांगला आहे कारण यात लोकांना सहभागाची संधी मिळाल्याने त्यांचा बौद्धिक व सांस्कृतिक विकास होतो म्हणूनच ती राष्ट्रीय शिक्षणाचे साधन बनते मात्र यासाठी जास्तीत जास्त लोकांना विशेषतः गरिबांना मजुरांना अल्पसंख्यांकांना व स्त्रियांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे तसेच समाजातील सर्व गटांना वर्गांना प्रमाणशीर प्रतिनिधित्व मिळाल पाहिजे जे केवळ डोक्याच्या संख्या लाच नव्हे तर गुणवत्तेला ही वजन द्यावे म्हणून त्यांनी एकाला अनेक मते देण्याचा अनेक मताधिकाराचा पुरस्कार केला.

नागरिकत्वाचा दर्जा उंचावण्यासाठी गुणवत्तेची कसोटी ठरवून खुल्या सार्वजनिक परीक्षा घेण्याची कल्पनाही त्यांनी मांडली शासन कार्यात नागरिकांचा सहभाग वाढावा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष ही असू शकतो असे त्याचे मत होते मात्र असा सहभाग असावा त्यात सक्ती नसावी असेही तो म्हणतो मिलच्या मते, लोकशाही व्यवस्थेत खालील दोष आढळतात

१. शिक्षण आणि गुणवत्ता नसेल तर त्या राज्यात लोकशाही यशस्वी होत नाही, त्यासाठी लोकशिक्षण राष्ट्रीय शिक्षणाचा पुरस्कार त्यांनी केला.

२. एक राष्ट्रीयत्व म्हणजे राष्ट्र ऐक्य राखणे आवश्यक ठरते वंशभेद वर्णभेद वर्ग भेट इत्यादी मुळे राष्ट्रीय ऐक्याला धोका संभवतो.

३. व्यक्तिस्वातंत्र्याचे रक्षण करणे आवश्यक ठरते अल्पसंख्यांकांची बहुसंख्यांक काकडून गळचेपी होणार नाही याची काळजी घ्यावी लागते लोकप्रतिनिधींना संपत्ती व पदांची अभिलाषा निर्माण झाल्यास आपसात संघर्ष निर्माण होऊ शकतो यासाठी लोकप्रतिनिधींनी कामासाठी मोबदला घेऊ नयेत असे मी सुचवतो लोकशाहीतील शासन कर त्यावरही नियंत्रण असणे आवश्यक आहे विशेषतः कार्यकारी मंडळावर

लोकप्रतिनिधींचे योग्य व प्रभावी नियंत्रण असावे व त्यांच्या चुकीच्या अगर अन्यायकारक कृतींसाठी त्यांना शिक्षा झाली पाहिजे पदावरून काढून टाकण्याचे ही तरतूद असावी असे तो म्हणतो.

### ❑ मिलचे प्रातिनिधिक लोकशाही संदर्भातील विचार :–

लोकशाही शासन प्रणाली तील सर्व नागरिकांनी प्रत्यक्ष रीतीने शासन कार्यात भाग घेतला पाहिजे पूर्वीच्या नगर राज्यात प्रत्यक्ष लोकशाही अस्तित्वात होती त्यावेळी नगर राज्यांची लोकसंख्या देखील कमी होती आज राज्याचा प्रदेश लोकसंख्या इतकी जास्त आहे की प्रत्यक्ष लोकशाही शक्य नाही मिलच्या मते, ज्या राज्यात सार्वभौम सत्ता संपूर्ण समाजात केंद्रित झालेली असते ते शासन सर्वोत्कृष्ट होय प्रत्यक्ष प्रजातंत्र शक्य नसल्याने अप्रत्यक्ष प्रजातंत्र किंवा प्रातिनिधिक सरकारचे तो समर्थन करतो.

इंग्लंडमध्ये असलेल्या तत्कालीन प्रतिनिधी प्रजातंत्रा मध्ये अनेक दोष होते ते दोष दूर केल्याशिवाय त्याला खऱ्या अर्थाने प्रजातंत्र म्हणता येणार नाही असे मिलला वाटते. मिलने आपल्या प्रातिनिधिक शासन अर्थात ''रिप्रेझेंटेटिव्ह गव्हर्नमेंट'' या ग्रंथात प्रजातंत्रातील दोष ठळकपणे दाखविले आहेत त्याचबरोबर त्याने त्यात सुधारणा करण्यासंबंधी उपायही सुचविले आहेत त्याच्या मते, राज्याचे शासन निर्वाचित प्रतिनिधि द्वारेच करण्यात आले पाहिजे मिलला प्रातिनिधिक शासनाची निर्मिती करावयाची होती त्याचे संघटन कसे असावे याचाही त्यांनी उल्लेख केलेला आहे जनतेमधून बुद्धिमान ईमानदारी व्यक्ति कशा निवडून आणाव्यात याचेही विवेचन त्याने केले आहे निर्वाचन पद्धतीला फार महत्त्वाचे स्थान दिलेले आहे

### ❍ अल्पसंख्यांकांना प्रतिनिधित्व :–

प्रजातंत्रामध्ये अल्पसंख्यांकांना प्रतिनिधित्व मिळाले नाही तर ती बहुमताची हुकूमशाही ठरेल त्या वेळी तेथे प्रचलित असलेल्या निर्वाचन पद्धतीने अल्पसंख्यांकांना प्रतिनिधित्व मिळणे शक्य नव्हते बहुमताला तो शासन करण्याचा अधिकार देतो पण त्याचा अर्थ असा नव्हे की अल्पसंख्यांकांना संशोधित विचार व्यक्त करायला संधीच मिळू नये अल्पसंख्यांकांना प्रतिनिधित्व मिळावे म्हणून तो प्रमाणशीर मतदान पद्धतीचे समर्थन करतो.

### ❍ मतदारांची योग्यता :–

प्रजातंत्राला सर्वात मोठा धोका मूर्ख व अज्ञानी लोकांपासून असतो मतदानाचा समान अधिकार सर्वांना दिला तर आयोग्य व्यक्ती स्वतःच्या स्वार्थासाठी सार्वजनिक जीवन धोक्यात आणू शकते, म्हणून मी सर्वांना मताचा अधिकार द्यायला तयार नाही मताचा अधिकार केवळ शिक्षित व्यक्तीला देण्यात यावा असे तो म्हणतो. मिलच्या शब्दात ज्या व्यक्तीला लिहिता वाचता येत नाही किंवा साधारण गणिताचे हि ज्ञान नाही अशा व्यक्तीला मताचा अधिकार देण्यात येऊ नये सर्व व्यक्ती शिक्षित झाल्याशिवाय मताचा अधिकार द्यायला तो तयार नव्हता ''मी गुप्त मतदान पद्धतीच्या देखील विरोधात होता जी व्यक्ती कोणत्याही प्रकारचा कर भरीत नाही ती व्यक्ती मताला किंवा मताधिकार वापरण्याला अपात्र आहे'' असे त्याचे म्हणणे होते.

मिलच्या मते, सार्वभौम सत्तेचा वापर संसदेने विवेका नुसार करावयास हवा संसदही बेजबाबदार होऊ शकते एकच गृहाच्या निरंकुश त्याला आळा घालण्यासाठी संसदेची रचना द्विगृही असावी असेही त्याचे मत आहे.

❍ **संसदेचे कार्य :–**

मिलच्या मते संसदेचे कार्य म्हणजे शासनावर नियंत्रण करणे हे आहे राज्याची सार्वभौम सत्ता प्रतिनिधी सभेत वास्तव्य करते संसदेने जनमत जाणून घेणे हे तिचे कार्य आहे. व्यक्ती विकासाला पोषक असे वातावरण बनविण्यासाठी कायद्याची निर्मिती करणे, सरकारवर पूर्ण नियंत्रण ठेवणे, सरकारच्या कार्यावर देखरेख ठेवणे, त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकणे, संकटकाळात सरकारच्या कार्यावर टीका करणे किंवा त्याचे औचित्य सिद्ध करणे, सरकारच्या दुष्कृत्ये वर टीका करणे, विश्वास घातकी शासकाला पदच्युत करणे, इत्यादी बाबी महत्त्वाच्या आहेत. संसदेने प्रशासन कार्याच्या भानगडीत पडू नये संसदेत असलेल्या तज्ञ व्यक्तीच्या समितीने कायदे बनवावेत प्रशासनासाठी स्वार्थी कर्मचाऱ्यांची आवश्यकता असते लोकतंत्र आणि शासन कुशलता यांचे मिश्रण पाहिजे. यामध्ये संस्थेचे खरे कार्य प्रशासकीय प्रश्नांसंबंधी निर्णय घेणे हे नसून निर्णय घेणाऱ्या व्यक्ती योग्य आहेत किंवा नाहीत याबाबतीत निर्णय घेण्याचे आहे.

मिलचा संपूर्ण सिद्धांतच मानवी विषमता आणि विविधतेने भरलेला आहे. लोकतंत्रावर त्याचा पूर्ण विश्वास नव्हता अशिक्षित व मागासलेल्या साठी लोकशाही उपयोगी नाहीच असे तो म्हणत असे संख्येला किंमत देऊन गुणांकडे डोळेझाक करणारे तत्त्व त्याला मान्य नव्हते त्याच्या मते, संसद सृजनात्मक असावी. बहुमत पद्धतीवर नियंत्रण असावे. प्रशासनाचे कार्यकुशलतापूर्वक काम करण्याचे स्वातंत्र्य असावे. अशा प्रमाणित प्रजातंत्राचा त्याने पुरस्कार केला.

मिलने प्रातिनिधिक लोकशाही चे गुण त्यापासून लाभ व संभाव्य धोके यांचे सविस्तर विवेचन केलेले दिसते. मिल प्रतिनिधीक शिक्षण पद्धतीला प्राधान्य देऊन व्यक्तिस्वातंत्र्याच्या आरक्षणाला मार्गदर्शन करतो.

## ३.२.२.३ जॉन स्टुअर्ट मिलचा उपयुक्ततावाद :–

जॉन स्टुअर्ट मिल च्या पूर्वी त्याचे वडील जेम्स मिल आणि त्याचे मित्र जेरेमी बेंथम यांनी उपयोगिता वादाचा पुरस्कार व प्रसार केला. जरी उपयोगिता वादाची मूळ कल्पना जेरेमी बेंथम यांनी मांडली असली तरी त्याचे सविस्तर व पद्धतशीर विवेचन आणि मांडणी जेम्स मिलने केली होती, या वादाचे मुख्य सूत्र म्हणून 'अधिकतम लोकांचे अधिकतम सुख' ही भूमिका सांगितली होती. प्रत्येकजण स्वतःला जास्त सुख कशाने मिळू शकेल याचा हिशोब करून त्यासाठी प्रयत्न करतो. सुख–दुःख हे माणसाच्या जीवनातील दोन सार्वभौम असून त्यापासून व्यक्तीच्या कृतीला चालना मिळते. जास्तीत जास्त व्यक्तींचे जास्तीत जास्त सुख एकत्रित होऊन त्यातूनच समाजहिताची निर्मिती होते असे म्हणतो. मिलच्या मते उपयोगितावाद हा केवळ स्वार्थ आणि संधिसाधूपणा नसून त्याबरोबर इतर समस्यांचाही विचार त्यात केलेला आहे. व्यक्तीचे स्वतःचे सुख आणि पूर्ण मानवजातीच्या काल्याणाचाही विचार यात अंतर्भूत आहे. तो म्हणतो उपयोगिता किंवा अधिकतमाच्या हिताच्या सिद्धांताला नैतिकतेचा आधार मानले जाते. सुखाची वृद्धी किती झाली त्या

प्रमाणात प्रत्येक व्यक्ती व त्याची कृती योग्य ठरते परंतु हे त्याच प्रमाणात अनुचित ठरेल की जेव्हा आनंदाच्या विरुद्ध काही होण्यास ती कृती कारणीभूत ठरेल. सुखाचा अर्थ आनंद किंवा दुःखाचा अभाव होय तर आनंदविरहितचा अर्थ सुखाचा अभाव दुःख होय.

बेंथम चा उपयोगिता वाद मिलला संकुचित वाटला कारण त्याच्या मते त्यात समाजहिताला प्राधान्य दिलेले नव्हते केवळ व्यक्तीच्या व्यक्तिगत हिताच्या मात्रा कितीही वाढल्या तरी त्यातून समाजाचे हित आपोआप साध्य होतेच असे नाही. व्यक्तीने स्वतःचे सुख आणि मानव जातीचे सुख यात सुसंवाद साधला पाहिजे असे मिलचे मत होते. प्रत्येकालाच स्वतःचेही चांगले वाटते म्हणून सर्वांना सर्वांचे ही चांगले वाटते व्यक्तीचे सुख आणि समाजाचे सुख हे परस्परावलंबी आणि परस्पर पूरक आहेत त्यात संघर्ष किंवा विरोध असू शकत नाही अधिक तमांचे अधिकतम सुख साधने या तत्त्वानुसार प्रत्येकाने आपल्या कृतींनी समाजातल्या अधिकाधिक व्यक्तींचे सुख साधेल असा प्रयत्न केला पाहिजे.

मिलने सुखांचा नैतिकतेच्या दृष्टिकोनातून ही विचार केला त्याच्या मते केवळ शारीरिक सुखांचा नव्हे तर भावनात्मक मानसिक आणि बौद्धिक भूमिकांमधून ही विचार केला पाहिजे शिक्षण सुसंस्कार यातून इतरांच्या साठी कार्य करण्याची प्रवृत्ती विकास पावते म्हणून उपयोगिता हा मूळ उद्देश असला तरी त्यातून अधिक तमांचे अधिकतम सुख साधले जावे हा नैतिक उद्देशही सफल होतो यामध्ये मनुष्य ज्या विशिष्ट सुखाची अपेक्षा करतो त्यामागेही त्याचा नैतिक दर्जा कारणीभूत असतो काही सुखे खालच्या दर्जाची तर काही वरच्या दर्जाची असतात म्हणून सुखाची संख्यात्मक वर्गवारी केली तशी मिल सुखांची गुणात्मक वर्गवारी करतो त्यात सुखांचा दर्जा कमी जास्त असतो या प्रत्येकात असणाऱ्या गुणात्मक दर्जा तील फरक दाखविण्यासाठी मिलने एक फारच विचित्र तुलना केली आहे तो म्हणतो संतुष्ट डुक्कर असण्यापेक्षा एक असंतुष्ट मानव प्राणी असलेले चांगले आणि एक संतुष्ट मूर्ख होण्यापेक्षा असंतुष्ट सॉक्रेटिस होणे चांगले. (It is better to be a human being dissatisfied than a pig satisfied; and better to be a Socrates dissatisfied than a fool satisfied utilitarianism, p.197) मनुष्याची नैतिक आणि बौद्धिक वाढ योग्य रीतीने झालेली असेल तर त्याला सुखाचे गुणात्मक स्वरूप समजून येथे त्यामुळे वरिष्ठ दर्जाचे सुख प्राप्त करण्याची इच्छा होते अन्यथा नाही सध्याच्या शिक्षण पद्धतीचे आणि समाजव्यवस्थेचे स्वरूप लक्षात घेता अशा प्रकारची वाढ फारच कमी व्यक्तींमध्ये झालेली आढळते अशाप्रकारे मिलने उपयोगिता वादाला नि शास्त्राचा आधार दिला, मिलने त्यांच्या अधिकतम लोकांचे अधिकतम सुख या तत्वाला त्याने नैतिकतेची बैठक प्राप्त करून दिली.

धर्माबद्दल मिलचे मत फारसे चांगले नव्हते धर्माची उपयोगिता युटीलिटी ऑफ रिलिजन या ग्रंथात मिलने नीतिमत्ता ही निसर्गाहून वेगळी असून धर्महानी तिचा मोठा शत्रू आहे असे म्हटले आहे धार्मिक गोष्टी व नियमांचे प्रस्थ मांडल्यास नीतीचा मोठा शत्रू आहे असे म्हटले आहे. नियमांचे प्रस्थ मारल्यास नीतीचा स्तर कनिष्ठ होतो आणि भ्रामक कल्पना जोपासल्या जातात मानवाने आपल्या बुद्धीने समाजधारणेसाठी नियम केले व त्यांना उपयोगीतेमुळे नीतिनियमांची स्वरूप आले, ते मिलने व्यक्तीला मिळणाऱ्या अंतरिक सुखावर ही भर दिला आहे सामाजिक हिताचे सुद्धा आंतरिक ओढ व्यक्तींमध्ये निर्माण होते व त्यातूनच साक्रेटीस येशू

ख्रिस्त सारख्यांनी आंतरिक प्रेरणेने बलिदान केले समाजहिताच्या तळमळीतून निर्माण होणारे सुख हे व्यक्तिगत सुखापेक्षा श्रेष्ठ जास्त समाधान देणारी असते.

**❍ उपयोगिता वादाची व्याख्या :–**

मिलच्या मते उपयोगिता किंवा अधिकतम सुखाच्या सिद्धांताला नैतिकतेचा आधार मानले जाते प्रत्येक कार्य सुखाच्या वृद्धीच्या प्रमाणात योग्य ठरते सुखाचा अर्थ आनंद व दुःखाचा अर्थ कष्ट किंवा सुखाचा अभाव.

बेन्थमच्या उपयोगिता वादामध्ये मिलने टाकलेली भर आपल्याला खालील प्रमाणे पाहता येईल.

सुखामध्ये जसा मात्रात्मक फारक आहे तसाच गुणात्मक फरक आहे बेंथम सुखदुःखात केवळ मात्रात्मक फरक आहे. असे म्हणतो पण मिलच्यांमते त्यात गुणात्मक आंतर देखील असते. बेंथम सुखाच्या मात्र यावर जोर देतो तर मिल गुणात्मक अंतरावर जोर देतो एखाद्या वस्तूमध्ये सुखाची मात्रा कमी मिळत असली तरी ती वस्तू गुणात्मक मात्रेमुळे प्राप्त करणे योग्य ठरते.

बेथमने सुखाच्या मोजमाप पद्धतीत परिवर्तन केले सुखाच्या गुणात्मक भेद मान्य केल्याने सुखाचे मोजमाप शक्य होते सुखाचे मोजमाप करण्याच्या बेंथम च्या प्रयोगाला काहीच अर्थ उरत नाही तर त्या व्यक्तीला मिळणारे सुख हे भिन्न प्रकारचे राहू शकेल एका व्यक्तीला ज्या गोष्टीपासून सुख मिळते त्या गोष्टीपासून दुसरीला सुख मिळेलच असे सांगता येत नाही.

**❑ मिलचा उपयोगितावादी सिद्धांत :–**

बेंथमच्या उपयोगितावादा वर जोरदार टीका होत होती ती टीका वाचविण्यासाठी मिल् ने उपयोगितावादा मध्ये संशोधन करण्यास सुरुवात केली. संशोधन करता करता मूळ उपयोगिता वादामध्ये अमुलाग्र परिवर्तन होऊन नवा सिद्धांत जन्माला आला. वेबरच्या मते उपयोगिता वादावर करण्यात येणारी टीका वाचविण्याचा प्रयत्न करताना मिलने उपयोगितावादालाच एका बाजूला फेकून दिले. उपयुक्ततावादा पेक्षा व्यक्ती वादावर त्या ने अधिक जोर दिला.

**❑ मिलचे स्वातंत्र्य विषयक विचार**

जॉन स्टुअर्ट मिल चे नाव स्वातंत्र्याचा प्रखर पुरस्कर्ता व कैवारी म्हणून घेतले जाते. त्याच्या ऑन लिबर्टी या पुस्तकांमध्ये स्वातंत्र्य विषयक विचार त्याने मांडले आहेत. तो म्हणतो की स्वातंत्र्याचा विचार नागरी किंवा सामाजिक स्वातंत्र्याच्या दृष्टिकोनातून मी केलेला आहे. इच्छा स्वातंत्र्य किंवा एक तात्विक गरज वगैरे म्हणून त्याने ग्रीस,रोम, इंग्लंड यांच्या इतिहासावरून स्वातंत्र्य आणि सत्ता यामधील लढा हा फार जुना आहे हे लक्षात येते असे तो म्हणतो. त्या काळात राजकीय सत्ताधाऱ्यांचा दुष्टपणा किंवा दडपशाही प्रचलित असे व तिच्यापासून संरक्षण म्हणून स्वातंत्र्याची मागणी होती. ग्रीक नगर राज्यातल्या काही लोकसत्ता सोडल्या तर हीच परिस्थिती होती अशा सत्ताधाऱ्यांच्या सत्तेवर मर्यादा आणणे हाच उद्देश होता. त्यासाठी काही राजकीय अधिकार किंवा स्वातंत्र्य मागणी आणि घटनात्मक बंधनाची तरतूद करणे हे दोन

मार्ग होते. बहुतांश युरोपीय देशांमध्ये यातील पहिली गोष्ट शक्य झाली व राज्य करताना थोडे नमावे लागले. परंतु दुसऱ्या बाबतीत फारसे यश आले नाही व स्वातंत्र्य प्रेमींना संघर्ष करावाच लागला. त्यानंतर साताधारक ते राज्यकर्ते किंवा लोकनियुक्त राज्यकर्त्यांच्या काळात अशा मागण्या करणारे पक्ष याबाबत यशस्वीपणे काम करू शकले. लोकप्रतिनिधींच्या हाती सत्ता आल्यावर लोक व सत्ताधारी एकच झाल्याने आणि लोकांवर जुलूम आणि अन्याय होणार नाही राष्ट्रातील लोकांना स्वतःच्या इच्छेने राज्या पासून संरक्षणाची गरज नाही अशी भावना निर्माण झाली. युरोपीय समाजातील या महत्त्वाच्या वर्गांना लोकसत्ता ही आपल्या हितसंबंधांच्या विरुद्ध जाते असे वाटू लागले तेव्हा त्यांनी आपल्यासाठी बहुसंख्यांकाचे बहुमत प्राप्त केले आणि त्यातून बहुसंख्यांकांची हुकूमशाही, टेरेनी ऑफ द मेजॉरिटी अस्तित्वात आली की जिच्याबद्दल समाजाने आता सतर्क व जागृत राहणे आवश्यक ठरते. ती कार्यकर्त्यांच्या सार्वजनिक अधिकारांचा वापर करते इथे समाज स्वतः हुकूमशहा बनतो. सामूहिकरीत्या समाजाचे घटक असलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या विरुद्ध केवळ सार्वजनिक अधिकार यांच्याच द्वारा नव्हे तर स्वतःचे आदेश काढून त्यांची अंमलबजावणी करतो व या स्थितीत हा हुकूमशाही समाज एखाद्या व्यक्तिगत हुकूमशाही पेक्षा भयानक होतो. समाजाने संघटितरित्या आपल्या कल्पना अभिमते लोकांवर लादल्यामुळे हि हुकूमशाही निर्माण होते. केवळ अधिकाऱ्यांच्या हुकूमशाही विरुद्ध नव्हे तर समाजाच्या हुकूमशाही विरुद्ध ही व्यक्तीला संरक्षण आवश्यक असते. सामूहिकरीत्या आपले अभिमत व्यक्तीवर लादण्याचा प्रयत्न अनेकदा होतो त्यापासून संरक्षण कायद्याने देण्यात येऊ शकते. प्रथा सुद्धा व्यक्तीवर वागणुकीचे नियम लादु शकते आणि त्यात कोणी ही कारणे द्यायला बांधील नसते. त्यात एकच तत्व महत्त्वाचे ठरते ते म्हणजे प्रत्येकाला वाटले पाहिजे की जे वागणे त्याच्यापासून अपेक्षित आहे तसेच वागणे इतर सर्वांपासून अपेक्षित करण्यात आलेले आहे. त्यात कारणे महत्त्वाची नसून इतरांनाही तसेच वागणे योग्य वाटते हेच समाधान असते.

केवळ स्वसंरक्षणासाठी व्यक्तिगत किंवा सामूहिकरित्या कृती स्वातंत्र्यावर मर्यादा आणू शकतात. सुसंस्कृत समाजात एखाद्यावर सत्ता वापरण्याचे एकमेव कारण त्याने दुसऱ्यांना इजा करू नये हेच असू शकते. मील स्वातंत्र्याचे तीन प्रमुख क्षेत्र व त्यानंतर त्याचे प्रकार सांगतो.

**१. मानवाच्या अंतरित विवेक बुद्धीचे स्वातंत्र्य :-**

व्यापक अर्थाने सद्सद्विवेकबुद्धीचे स्वातंत्र्य लिबर्टी ऑफ कॉन्शियस नेस याला तो मानवाच्या अंतरित विवेक बुद्धीचे स्वातंत्र्य असे म्हणतो यात विचार आणि विवेकाचे स्वातंत्र्य अभिमत आहे आणि भावनांचे स्वातंत्र्य ज्यामध्ये व्यवहारिक, काल्पनिक, शास्त्रीय, नैतिक आणि अध्यात्मिक ही सर्व क्षेत्रे अंतर्भूत व्हावीत असे तो म्हणतो.

**२. अभिरुची आणि उद्योग किंवा उपक्रमांचे स्वातंत्र्य :-**

यात आपल्या जीवनाचे नियोजन आपल्या स्वभाव वैशिष्ट्ये नुसार करणे किंवा असे करणे हे आपल्याला योग्य वाटेल व त्याची फळे असतील ती स्वीकारणे आणि यात इतर कोणीही अडथळा न आणणे हे या स्वातंत्र्यात अभिप्रेत आहे. मात्र आपल्या अशा स्वातंत्र्यापासून इतरांना इजा किंवा धोका होत

नसेल तर त्यांना हे वागणे कितीही मूर्खपणाचे विकृत आणि चूक वाटत असले तरी हे स्वातंत्र्य उपभोगता आले पाहिजे.

### ३. व्यक्तींनी एकत्रित येऊन संघटना गट करण्याचे स्वातंत्र्य :-

इतरांना धोका त्रास होणार नाही अशा प्रकारे एकत्रित येऊन कार्य करण्याचे स्वातंत्र्य आहे. मात्र त्यांच्या एकत्रित येण्यासाठी दयाभाव आणलेला किंवा फसवणूक केलेली नसावी.

थोडक्यात मिल व्यक्तिगत जीवनात आणि त्या जीवनातील आचरण की ज्याचा परिणाम फक्त त्याच्यावरच घडून येतो त्याबाबतचे स्वातंत्र्य म्हणजे व्यक्ती स्वातंत्र्य देणे आवश्यक ठरते. आपल्या मर्जीप्रमाणे वागू शकतो मात्र अशा वागण्यामुळे इतरांवर अन्याय किंवा त्यांना हानी पोहोचणार नाही याची काळजी घ्यायला हवी. स्वतःच्या हितासाठी संघटन बनविण्याचे स्वातंत्र्यही व्यक्तीला मिळायला हवे असे तो म्हणतो. कारण त्यातून व्यक्ती स्वतःचे हित साधू शकते मात्र त्यामुळे इतरांच्या हिताला दुःख पोहोचता कामा नये. मी म्हणतो संपूर्ण मानवजातीचे मत एका बाजूला असेल व अपवाद म्हणून एका व्यक्तीचे मत दुसऱ्या बाजूला असेल तर ज्याप्रमाणे त्या एकाने मानवजातीचे तोंड बंद करणे समर्थनीय होणार नाही त्याचप्रमाणे मानवजातीने त्या एका चे तोंड बंद करणे ही समर्थनीय ठरणार नाही. प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य मिळालेच पाहिजे तिचे म्हणणे इतरांना चूक वाटत असले तरी त्यातही सत्यांश असू शकतो म्हणून स्वातंत्र्य म्हणजे वेगळे मत बाळगण्याचे आणि ते व्यक्त करण्यासाठी स्वातंत्र्य हवे.

एखाद्याचे अभिमत दडपण्याचा किंवा त्याला ते प्रकट करून देण्याचा मुख्य तोटा मानवजातीला पुढे येणाऱ्या पिढ्यांना आणि आज असलेल्यांना त्या अभिमताची माहिती होण्यापासून वंचित ठेवणे सोबत त्यात त्यांचे मत समान आहे त्यांच्यापेक्षा ज्यांचे मत त्याच्याविरुद्ध आहे त्यांना ती जास्त हानीकारक आहे. जर ते अभिमत बरोबर असेल तर त्याविरुद्ध मतदान करणाऱ्यांना त्यांच्या चुकीच्या ऐवजी बरोबर मत स्वीकारण्याची संधी गमवावी लागेल आणि जर ते अभिमत चूक असेल तर बरोबर मताने त्याचा सामना करण्याची मौल्यवान संधी गमावतील असे मील म्हणतो. सत्ताधारी जेव्हा एखादे अभिमत दडपण्याचा प्रयत्न करतात तेव्हा तेच योग्य किंवा बरोबर अभिमत असू शकते हे विसरतात. ते अर्थातच ते अभिमत चुकीचे समजतात परंतु असे समजण्यात आपली ही चूक असू शकते हे मात्र विसरले जाते. असे करणे म्हणजे सत्ताधिकार यांनी आपला समज किंवा आकलन हे सर्वश्रेष्ठ आहे परिपूर्ण आहे असे समजणे होय इतरांना शांत करण्याचे सर्व प्रयत्न हे आपण चूक करूच शकत नाही या समजातून निर्माण होतात. याचा अर्थ निरंकुश सत्ताधा-यांनी सर्वच विषयांवर केवळ आपलीच मते अचूक आहेत असा विश्वास प्रगट करणे होय मिलच्या मते व्यक्तिंचे असे आणि शासनकर्त्यांचे हे कर्तव्य आहे की त्यांनी काळजीपूर्वक विचार करून स्वतःचे खरे व उत्तम अभिमत तयार करावे आणि जे खरोखरच बरोबर आहे अशी खात्री झाल्याशिवाय ते इतरांवर लादू नये. ज्या सॉक्रेटिस ला आज आपण त्या युगातील अत्यंत विद्वान आणि थोर तत्वज्ञानी मानतो. सॉक्रेटिस सारख्या नैतिक तत्वज्ञान चा गुरु म्हणून त्याला ओळखलं जातं त्याला तेव्हा च्या लोकमतातील व वैधानिक अधिकाऱ्यांमधील मत भिन्नतेसाठी गुन्हेगार ठरवून मृत्युदंडाची शिक्षा झाली व ती सुद्धा तो राजाने मान्यता

दिलेल्या देवतांना मानीत नाही आणि युवकांना बीघडवितो या कारणास्तव देण्यात आली. मिल च्यां मते एका विद्वानांचे मत आणि इतर अनेकांची मते यामधील मतमतांतर यातून कसा अन्याय होतो याचे हे उत्तम उदाहरण होय.

**२. कृती करण्याचे स्वातंत्र्य :–**

व्यक्तीला केवळ विचाराचे स्वातंत्र्य असून उपयोग नाही तर आपल्या विचारानुसार कृती करण्याचे वागण्याचे ही स्वातंत्र्य आवश्यक आहे यामध्ये कोणीही भौतिक किंवा नैतिक अडथळा आणू शकत नाही. मात्र त्याचे संभाव्य धोके स्वीकारण्याची त्यांची तयारी असायला हवी विचारा इतक्याच कृतीही मुक्त असाव्यात असे कोणीच म्हणणार नाही. कारण अभिमत प्रकट करण्याच्या स्वातंत्र्याला ही या क्षेत्रात पूर्ण आबाधित राहता येणार नाही उलट अशा मत प्रगटन मध्ये कोणीही खोडसाळ अगर विघातक कृत्य करण्यास प्रवृत्त होणार नाहीत हे पाहण्याची जबाबदारी अभिमत व्यक्त करणाऱ्या वर येते, असे मी म्हणतो. म्हणजे विचार प्रगट दिनाच्या स्वातंत्र्य इतकेच मुक्त कृती स्वातंत्र्य देण्यास तयार नाही. समर्थनीय उद्दिष्टांची अंमलबजावणी केलेल्या कोणत्याही कृती या दुसऱ्याला हानी पोहोचवतात आणि मुख्यत्वेकरून विघातक भावना निर्माण करू शकतात त्यांच्यावर नियंत्रण असणे आवश्यक असते आपल्या कृती इतरांना त्रासदायक ठरणार नाहीत याची प्रत्येकाने काळजी घेतली पाहिजे.

जर्मन विचारवंत विल्यम हॅम्बोल्ट म्हणतात त्याप्रमाणे मनुष्याच्या जीवनाचा अंतिम उद्देश त्याच्यातील पात्रता यांचा समतोल विकास व त्यातून एक परिपूर्ण आणि सुसंगत व्यक्तिमत्व निर्माण होणे हा होय व त्यामुळे व्यक्तीने व त्यांच्यावर प्रभाव पडणार या सर्वांनी सत्ता आणि विकास हा व्यक्तिमत्त्वानुसार होईल यावर सतत लक्ष ठेवायला हवे या विधानाला पाठींबा देत असताना मिल म्हणतो हम्बोल्ट म्हणाल्याप्रमाणे यासाठी दोन गोष्टी आवश्यक आहेत पहिली स्वातंत्र्य आणि विविध परिस्थितीची विविधता आणि त्यातून उद्‌भवणारी वैयक्तिक जोश आणि विविधता यांच्या एकत्रीकरणातूनच सृजनशीलता निर्माण होते. दुसरी विविध वर्ग आणि व्यक्ती आणि त्यांच्या सभोवतालची परिस्थिती जी त्यांचे चरित्र घडविते.

स्वातंत्र्याच्या वातावरणातच प्रतिभावंत व्यक्ती विकास पाहू शकते असे प्रतिभावंत फारच कमी असतात. अशा व्यक्तींचे महत्त्व सगळ्यांना माहीत असते आणि त्यांच्या विचारांची व कृतीची वाढ होण्यासाठी स्वातंत्र्य आवश्यक आहे हे ही माहीत असते तरी पण तात्विक दृष्ट्या हे सर्व मान्य असूनही प्रत्यक्षात प्रत्येक जण त्याकडे दुर्लक्षच करतो वैयक्तिक जोम आणि नाना तर्हेचे वैचित्र्य यातूनच स्वतंत्र प्रज्ञा उदयाला येऊ शकते दुसऱ्याच्या दबावामुळे नियंत्रणामुळे व्यक्तीचा विकास व पर्यायाने मानवजातीचा विकास खुंटतो स्वतःच्या इच्छेप्रमाणे अभीमता प्रमाणे स्वतःचा विकास केला पाहिजे मात्र असा विकास साधताना दुसऱ्याच्या विकासाला बाधा येणार नाही किंवा त्याला हानी पोहोचणार नाही त्याच्यावर अन्याय होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. मिल च्या मते इतरांवर व त्यांच्या हित संबंधांवर विपरीत परिणाम होऊ न देता स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विकास साधतो तेव्हा तो मनुष्य उदात्त व सर्वांच्या साठी आदर्श असतो. स्वतःच्या

आवडीनिवडीं नुसार प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या सुखासाठी प्रयत्न करते व त्यासाठी तिला व्यक्ती स्वातंत्र्य आवश्यक असते.

### ❍ मिलच्या व्यक्तिस्वातंत्र्य विचारांवरील टीकात्मक मूल्यमापन :–

मिरच्या विवेचनात व्यक्तीच्या स्वातंत्र्य विचारावर जास्त भर असून समाजाच्या विकासाला कमी प्राधान्य दिलेले दिसते वास्तविक व्यक्ती व समाज हे परस्पर पूरक असून समाजाचा घटक म्हणूनच व्यक्तीच्या स्वातंत्र्याला अर्थ प्राप्त होतो या मुद्द्याकडे कमी लक्ष दिलेले आहे अधिकार हे समाजातून व समाजामुळे प्राप्त होतात त्यामुळे व्यक्तीचे स्वातंत्र्य ही समाजातील इतरांच्या स्वातंत्र्याचा एक अविभाज्य घटक म्हणूनच महत्त्वाचा ठरतो अन्यथा नाही.

मिलने कृतींचे व्यक्तीसापेक्ष आणि समाजसापेक्ष असे केलेले वर्गीकरण कृत्रिम वस्तुस्थितीशी विसंगत वाटते वस्तुतः असा फरक करणे कठीण आहे.

प्रत्येक व्यक्तीला स्वतःचे हित कशात आहे हे समजते असे मी गृहीत धरतो अर्थात हे प्रत्येक व्यक्तीला लागू होईलच असे नाही उलट आजच्या भोगवादाच्या च्या काळात स्वतःला हानीकारक अशा अनेक सवयी व्यक्तीला लागल्या आहेत. त्यामुळे व्यक्तीच्या व्यक्तिगत कृतींवर ही व्यक्तीच्याच कल्याणासाठी काही नियंत्रणे अनिवार्य ठरतात.

व्यक्तीच्या कृतीमुळे इतरांच्या हक्कांवर अतिक्रमण होत असेल तर राज्याने मर्यादा आणावी असे मिल सुचवितो. मात्र व्यक्तीने स्वतःवर नियंत्रण ठेवावे किंवा स्वातंत्र्य सोबत काय कर्तव्ये पाळावीत याचा उल्लेख मात्र त्याच्या विवेचनात आढळत नाही.

मिलचे विवेचन हे केवळ विकसित देशांसाठीच आहे असे म्हणावे लागेल. नवोदित, नवस्वतंत्र, विकसनशील अशा देशांमधील परिस्थितीला मिलचे विवेचन लागू पडत नाही.

## ३.३ सारांश

समता आणि समानता या संकल्पनांचा व्यवहारिक अर्थ आणि उपयोग करत बेंथम ने नैसर्गिक.कायदा नैसर्गिक हक्क यासारख्या संकल्पना काल बाह्य ठरविले. बेंथम च्या काळापासून आणि त्याच्या राजकीय तत्त्वज्ञान यामुळे राज्याचा हेतू शासनाचे कार्य राज्य आणि शासन तसेच शासन आणि नागरिक यांच्या संबंधांचा नवा अर्थ आपल्या विचारात मांडून त्याने लोकशाही विचारांच्या विकासासाठी उदारमतवादाची वाट मोकळी केली त्याच वाटेवरून जॉन स्टुअर्ट मिल सारखा निखळ उदारवादी विचारवंत गेला बेंथम च्या विचाराचे हे श्रेयस म्हणावे लागेल मिलच्या राजकी विचारात व्यक्तिस्वातंत्र्य स्वातंत्र्याची उपयुक्त व लोकशाहीत आचार व विचारांची मूल्ये असल्याचे दिसते, तिला सर्वांकश उदारमतवादी का म्हणायचे याचे उत्तर म्हणजे तो व्यक्तीला सर्वांकश म्हणतो, व्यक्ती स्वातंत्र्याचे महत्त्व जाणतो, समान न्याय याचा पुरस्कार करतो, जनतेच्या सार्वभौम प्रतिनिधी असलेल्या संसदीय प्रणालीचे महत्व ओळखतो, या बाबींचा विचार

करता मिलच्या दृष्टीने वरील सर्व संकल्पनांची उपयुक्तता बेन्थाम इतकीच मिलला देखील वाटते. सद्यस्थितीत व मिल यांच्या राजकीय विचारांची प्रस्तुतता अधिक प्रकर्षाने जाणताना दिसते

## ३.४ पारिभाषिक शब्द

- उपयुक्ततावाद :
- प्रातिनिधिक :
- शासन पद्धती :
- लोकशाही :
- उदारमतवाद :
- विचारप्रणाली :
- व्यक्तिस्वातंत्र्य हक्क :

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

१. बेंथम प्रणित उपयुक्ततावाद आची सविस्तर चर्चा करा.

२. लोकशाही शासन प्रणाली विषयक बेंथम ची भूमिका सांगा.

३. प्रातिनिधिक लोकशाही तत्वाचा बेथम विचार स्पष्ट करा.

४. मिलच्या लोकशाही शासन पद्धती संकल्पनेची भूमिका स्पष्ट करा. मीलच्या उपयुक्तता वादाच्या संकल्पनेची सविस्तर चर्चा करा.

५. प्रातिनिधिक लोकशाही विषयक मिलचे विचार सांगा.

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ सूची


१. **शृंगारपुरे अरविंद** (२००९) : *'पाश्चिमात्य राजकीय विचारक'*, मंगेश प्रकाशन, नागपूर.

२. **इंदापवार दी. बा.** (१९९३) : *'राजकीय सिद्धांत वाद'*, मंगेश प्रकाशन, नागपूर.

३. **देव, गोसावी, आपटे** (२०१२) : *'पाश्चात्य राजकीय विचारवंत'*, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

४. **देगावकर श. गो.** (२००७) : *'राजकीय विचारवंत (पाश्चिमात्य आणि भारतीय)'*, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

५. **जोशी सु. ग.** (२००९) : *'पाश्चिमात्य राजकीय विचारवंत'*, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.


❑❑❑

## घटक ४
# मार्क्स आणि मार्क्सवादी राजकीय विचार

**घटक संरचना**

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

 ४.२.१ कार्ल मार्क्स - ऐतिहासिक भौतिकवाद, राज्य, वर्गसंघर्ष

 ४.२.२ फ्रेडरिक एगल्स - राज्य, वर्गसंघर्ष

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

४.५ सरावासाठी स्वाध्याय

४.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ४.० उद्दिष्ट्ये

पाश्चात्त्य राजकीय विचारांमध्ये मार्क्सवाद विचार महत्त्वाचे आहे. कार्ल मार्क्स यांनी जो वर्गसंघर्षाचा, ऐतिहासिक भौतिकवादाचा सिध्दान्त मांडला तो आजच्या आधुनिक काळामध्ये मार्क्सवादी विचार प्रभावीपणे कार्यरत असताना दिसतो. अशा मार्क्सवादी विचारांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. मार्क्सवादामध्ये कार्ल मार्क्स, एजल्स, लेनीन, स्टॅलिन माओ इत्यादी विचारवतांनी भर घातली आहे. त्यामुळे आधारभूत असलेल्या मार्क्स व एजल्सचे विचार समजून घेणे महत्त्वाचे आहे. कार्ल मार्क्सनी वर्गसंघर्ष ऐतिहासिक भौतिकवाद, राज्यविषयी विचार तसेच एजल्सनी मांडलेल्या राज्य व वर्ग संघर्षासंबंधी विचार अभ्यासणे आवश्यक आहे. एकूणच मार्क्सवादी विचारासाठी आधारभूत तत्त्वाचे स्वरूप समजावून घेणे प्रस्तुत आहे.

## ४.१ प्रस्तावना

एकोणिसाव्या शतकामध्ये अनेक राजकीय विचारधाराचा उदय झाल्याचे दिसते. या शतकात सर्वाधिक राजकीय तत्त्वज्ञाची जडणघडण इंग्लंडमध्ये झाले, त्याचबरोबर जर्मनीमध्ये झाल्याचे दिसते. एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकामध्ये सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि तात्त्विक विचारावर वर्चस्व प्रस्थापित करणारा जर्मनचा तत्वज्ञ विचारवंत म्हणजे कार्ल मार्क्स होय. मार्क्सचे तत्त्वज्ञान हे जगातील असे तत्त्वज्ञान ठरले की, त्याच्या आधारावर जागतिक परिवर्तन घडून येण्याची शक्यता निर्माण झाली. कार्ल मार्क्सने समाजवादी आणि साम्यवादी राजकीय तत्त्वज्ञानाचा पाया घातला, परंतु मार्क्सपूर्वी सेंट सायमन, चार्लस् फेरिअर, रॉबर्ट ओवेन इत्यादी विचारवंतांनी समाजवादी विचार मांडले होते. हा विचार स्वप्नाळू होता. मी

शास्त्रीय समाजवाद मांडला आहे, अशी मार्क्सची भूमिका होती. एकूणच मार्क्सचा समाजवाद हा पुढे साम्यवादी विचारधारा म्हणून विकसित झाला. मार्क्सच्या विचाराना मूर्तरूप देण्यात हातभार लावणारा त्याचा मित्र फ्रेडरिक एंजल्स हा होता. फ्रेडरिक एंजल्स यांनी मार्क्सला सहलेखक म्हणून सहकार्य केले. त्यामुळे मार्क्सवाद किंवा शास्त्रीय समाजवाद या नावाने ओळखली जाणारी विचारसरणी म्हणजे मार्क्स, एंजल्स आणि लेनिन या तिन्ही विचारवंताच्या अनुभवातून साकारलेला आणि प्रतिपादित केलेला विचार किंवा समाज परिवर्तनाचा दृष्टीकोन होय. कार्ल मार्क्स व एंजल्स यांनी एकत्रित येऊन अनेक पुस्तकाची निर्मिती केली, त्यातून त्यांनी ऐतिहासिक भौतिकवाद वर्ग संघर्ष राज्य इत्यादी घटकाची सविस्तररीत्या मांडणी केल्याचे दिसते, त्यातून समाजपरिवर्तन करण्याचा विचार उदयास आला आहे, त्यामुळे मार्क्स व एंजल्स यांची बहुमोल ग्रंथरचना आणि असंख्य लेख हे शास्त्रीय समाजवादाची मांडणी करतात.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ कार्ल मार्क्स

कार्ल मार्क्सने साम्यवादी समाजरचना निर्माण करण्याचे तत्त्वज्ञान मांडले, कारण भांडवलशाहीतील वर्ग संघर्ष व कामगार वर्गाचे शोषण कमी करून कामगार वर्गाची हुकूमशाही प्रस्थापित होईल, ती हुकूमशाही काही काळ कार्य करील त्यानंतर साम्यवादी समाजरचना प्रस्थापित होईल अशी विचारसरणी मार्क्सने मांडली. हे तत्त्वज्ञान अनेक अर्थाने क्रांतिकारी स्वरूपाचे होते. विसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत जगातील एकूण लोकसंख्येपैकी सुमारे एक तृतीयांश लोकांनी मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा स्वीकार केला होता. परंतु १९९० साली सोव्हिएत युनियनचे विघटन झाले, त्यामुळे जगावरील मार्क्सवादी विचाराचा प्रभाव हळूहळू कमी होऊ लागला, तरीही एक क्रांतीकारी विचारधारा म्हणून मार्क्सवादी विचाराची आजही प्रस्तुतता आहे. मार्क्सने मांडलेल्या तत्त्वज्ञानाचा विस्तार नवमार्क्सवादी विचारवंतांनी केला आहे. परंतु कार्ल मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवाद वर्ग संघर्ष राज्य इत्यादी तत्त्वज्ञानाचा सविस्तर चर्चा पुढीलप्रमाणे करता येईल.

- **जीवन परिचय :–**

कार्ल मार्क्सचा जन्म ५ मे १८१८ रोजी प्रशिया येथील ट्रेवेस येथे ज्यू कुटुंबात झाला. त्याचे वडिल प्रसिध्द कायदेतज्ञ होते, त्यांच्या वडिलांनी १८२४ मध्ये ख्रिस्ती धर्मातील प्रोटेस्ट धर्माचा स्विकार केला. कार्ल मार्क्सच्या बालमनावर त्याचा आघात झाल्याने तो धर्माकडे लहानपणापासूनच तिरस्काराने पाहू लागला. साहित्यामध्ये तरुण वयात मार्क्सला मोठी रुची होती. बॉन विद्यापीठात वयाच्या सतराव्या वर्षी म्हणजेच १८३५ ला विधीशाखेत प्रवेश घेतला. एक वर्ष तेथे राहिल्यानंतर १८३६ ला बर्लिन विद्यापीठात नाव दाखल केले. १८४० ला त्यानी या विद्यापीठातून एपिक्यूरसच्या तत्त्वज्ञानावर प्रबंध सादर करून पीएच.डी. ही पदवी संपादन केली. मार्क्स त्यानंतर प्राध्यापक होऊ इच्छित होता. परंतु त्यांच्या रॅडिकल विचारसरणीमुळे त्यास ही नोकरी न मिळाल्यामुळे त्याने पत्रकाराचा व्यवसाय स्विकारला. १८४२ ला तो पेपर संपादित करू लागला. त्यांचे कडवट टीकांमुळे सरकारने पेपरवर बंदी आणली. याच कालखंडात मार्क्सने राज्यशास्त्र व अर्थशास्त्र यांचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. १८४४ ला त्याने अर्थव्यवस्थेवर एक निबंध लिहिला. त्यामध्येच भावी काळातील त्यांच्या विचाराचे मूळ सापडते.

पुढील काळात कार्ल मार्क्स अर्थशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी पॅरीसला गेला असताना त्या ठिकाणी फ्रेडरिक एंजल्सची ओळख झाली. एंजल्स मार्क्सप्रमाणे निर्मितीक्षम नव्हता तरीही त्याच्याजवळ ऐतिहासिक ज्ञानाचे भांडार होते. १८४५ ला फ्रान्स सरकारने प्रशियन सरकारच्या सांगण्यावरून त्याला फ्रान्समधून हाकलून दिले. नंतर तो ब्रुसेन्सला गेला. तेथे एंजेल्स व मार्क्स यांनी जर्मनीतील कामगारांची शैक्षणिक संस्था स्थापन केली. त्यांनी साम्यवादांची तत्त्वे सांगणारा 'साम्यवादी पक्षाचा जाहिरनामा' (Communist Manifesto) १८४८ ला प्रसिध्द केला. हा जाहिरनामा सर्व जगभर प्रसिध्दीला आला. दोघांच्या कडवट विचारसरणीमुळे कोणत्याच देशात त्यांना स्थिर होता येत नव्हते. त्यामुळे त्यांना नेहमी देशांतर करावे लागले. त्यामुळे १८४९ ला कार्ल मार्क्स इंग्लंडला गेला. पुढचे आयुष्य इंग्लंडमध्येच कार्ल मार्क्सला काढावे लागले. त्याचा सकाळी १० पासून सायंकाळी ७ वाजेपर्यंत काळ 'ब्रिटीश म्युझियम'मध्ये वाचनात जात असे. १८६४ ला तो आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेच्या कार्यकारणीचा सदस्य झाला. १८६७ ला त्याच्या 'दास कॅपीटल' (Das Capital) चा पहिला खंड प्रकाशित झाला. दुसरा; तिसरा व अर्धवट राहिलेला 'दास कॅपिटल' चा खंड त्याच्या मृत्यूनंतर प्रकाशित झाला.

❍ **ग्रंथ रचना :-**

१) कम्युनिस्ट मॅनिफॅस्टो (साम्यवादी पक्षाचा जाहिरनामा) हा ग्रंथ अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामध्ये आर्थिक संघर्ष, वर्ग संघर्ष, भांडवलशाही इ. गोष्टीचा विचार केलेला आहे.

२) दास कॅपीटल- कार्ल मार्क्सचा हा ग्रंथ कम्युनिस्ट लोकांना अत्यंत प्रिय आहे. पहिला खंड हा कार्ल मार्क्स जीवंत असताना व दुसरा व तिसरा खंड मृत्यूनंतर प्रकाशित झाला.

याशिवाय पुढील ग्रंथाचा उल्लेख करावा लागेल.

1. The poverty of philosophy.
2. A contribution to the critique of political economy.
3. Eleven thesis on Feuerbach.
4. Civil War and Class struggle in France.
5. The critique of the Goetha programme.
6. The Eighteenth Brummaire of Lovis Bonaparte.

### ४.२.१.१ कार्ल मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवाद (Carl Marx : Historical Materialision) :-

साम्यवादी जाहिरनाम्यात स्पष्ट शब्दांत न मांडलेली मार्क्सची एक अत्यंत महत्त्वाची कल्पना म्हणजे इतिहासाचे त्याने भौतिक दृष्टीकोणातून केलेले विवेचन आहे. इतिहास हा वर्ग संघर्षातून निर्माण झाला आहे हे विधान करताना मार्क्सपुढे वर्ग कसे निर्माण होतात व बदलत्या अर्थव्यवस्थेत त्यांचे आपआपसांतील संघर्ष कसे बदलतात हे अधिक मूलगामी स्वरूपाचे प्रश्न होते. मार्क्स आपल्या 'क्रिटीक ऑफ द पॉलिटिकल इकॉनॉमी' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत ही कल्पना अतिशय स्पष्ट परंतु मोजक्या शब्दांत मांडतो. 'माणसे सामाजिक उत्पादनात भागीदार होत असताना काही अपरिहार्य व आपल्या इच्छेपलीकडे असलेल्या अशा

निश्चित प्रकारच्या सामाजिक संबंधांनी एकत्र येतात; हे उत्पादनासे संबंध, भौतिक उत्पादक शक्तीच्या विकासातील विशिष्ठ अवस्थांशी संलग्न असतात. उत्पादनाच्या या संबंधांची गोळाबेरीज कायद्याची व राजकीय इमारत उभी केली जाते व त्याच्याशी सामाजिक जाणिवेचे निश्चित प्रकार संलग्न आहेत. भौतिक जीवनातील उत्पादनाचे स्वरूप सामान्य सामाजिक, राजकीय व बौध्दिक जीवनाची प्रक्रिया नियंत्रित करते; माणसांची जाणिव त्यांची राहणी निश्चित करीत नाही. उलटपक्षी त्यांचे सामाजिक जीवन त्यांची जाणीव निश्चित करते. त्यांच्या विकासातील एका विशिष्ठ अवस्थेमध्ये सामाजिक, भौतिक उत्पादक शक्तींचा अस्तित्वात असलेल्या उत्पादनाच्या संबंधांशी संघर्ष होतो किंवा कायद्याच्या भाषेत हेच सांगावयाचे तर ज्या मालमत्तेच्या संबंधाच्या कक्षेत त्या आतापर्यंत कार्य करीत होत्या. त्यांच्याशी त्यांचा संघर्ष होतो. उत्पादक शक्तींच्या विकासाची रूपे म्हणून व्यक्त होण्याऐवजी हे संबंध उत्पादक शक्तींकरिता अडथळे आणतात.

आर्थिक दृष्टीकोनातून कार्ल मार्क्स यानी इतिहासाचे विश्लेषण केले आहे. तसेच भौतिकवादाच्या झालेल्या बदलातून इतिहासात बदल होत असतो. यांचेही विश्लेषण केले आहे. विश्वातील सर्व सामाजिक, राजकीय घटनांच्या मुळाशी आर्थिक कारणे असतात. इतिहास काळात जे जे बदल झाले ते सर्व बदल व्यक्तीच्या सामर्थ्याने घडून आले नाहीत तर उत्पादनाच्या साधनाने बदल झाले आहेत. उत्पादनाची साधने फक्त व्यवस्थाच बदलत नाहीत तर सर्वच क्षेत्रात प्रस्थापित व्यवस्था बदलत असतात. बदल हे राजकीय कार्यपध्दतीतून कायद्याच्या आधारे सामाजिक संबंधातून घडत नसतात. अशा बदलाना कार्ल मार्क्स मान्यता देत नाही. त्यांच्या मते, भौतिक साधनाच्याद्वारेच सामाजिक, राजकीय कायदेशीर संबंध ठरतात व बदलतात. अशा बदलाचा अभ्यास करण्यासाठी त्याच्या काळातील उत्पादनाची साधने तपासण्यास तत्कालीन परिस्थितीचे योग्य विश्लेषण करता येते. उत्पादनाची साधनेच त्याकाळातील सामाजिक वर्ग आणि त्यांचे संबंध ठरवित असतात.

उदा. शेती हे उत्पादनाचे प्रमुख साधन आहे, असे मान्य केल्यास त्यानुसार शेतमजूर, शेतमालक असे दोन वर्ग निर्माण होतात. शेतीच्या अधिक उत्पादनातून शेतकऱ्यांच्या अंतर्गत जमीनदार श्रीमंत शेतकरी, मध्यम शेतकरी, छोटा शेतकरी असे वर्ग निर्माण हातेता. उत्पादनात विज्ञानाचा वापर केल्याने कारखानदार व कामगार असे दोन वर्ग निर्माण झाले. अशा रितीने भौतिक जगात उत्पादनाची साधने बदलली की मानवी समाजाचा इतिहास बदलतो. इतिहास हा व्यक्ती निर्माण करीत नाही. तर उत्पादनाची साधने इतिहास निर्माण करतात. कार्ल मार्क्सने वरील दृष्टीकोनातून इतिहासाचे चार कालखंड तयार केले आहेत.

**१. प्राथमिक कालखंड :-**

या कालखंडात मनुष्य हा जंगलात भटकणारा इतर प्राण्यांसारखा एक प्राणी होता. या काळात त्यांचे उपजीवीकीचे किंवा उत्पादनाचे साधन हे जंगलातील फळे होती. जेव्हा भूक लागेल तेव्हा फळे तोडून खात. फळानंतर झाडांवर त्यांची मालकी नव्हती तर संपूर्ण समाजाची मालकी होती. जंगलातील साधनाचा उपभोग सर्वजण आपल्या गरजेनुसार करून घेत. त्यामुळे कोण-कोणाचा मालक व कोणी गुलामही नव्हता. या प्रारंभिक अवस्थेत सर्वत्र समता होती. व्यक्तिगत मालमत्तेचा विचारच नसल्याने दुसऱ्याचे शोषण करण्याचा विचार हा नव्हता. या प्राथमिक अवस्थेत प्रत्येक व्यक्ती सुखी व समतेच्या तत्त्वांवर जगत होती. थोडक्यात प्राथमिक अवस्थेत उत्पादनाचे साधन अस्तित्वात नव्हते. जंगलाचा उपभोग सर्वजण घेत. व्यक्तिगत

मालमत्तेचा विचार माणसांत निर्माण झालेला नव्हता. ही अवस्था चांगली होती. ही अवस्था दीर्घकाळ अस्तित्वात होती. त्यानंतर प्राचीन व्यवस्थेचा विकास झाला.

**२. प्राचीन कालखंड :–**

प्राथमिक अवस्थेच्याशेवटी मनुष्य प्राणी जगत असताना निसर्गाचे आणि इतर पशु–पक्षांचे निरीक्षण करू लागला. या निरीक्षणातून तो जंगलातील काही प्राण्यांचा अन्न म्हणून वापर करू लागला. यातूनच तो पशुपालन अवस्थेत गेला. पशुपालन अवस्थेत पशुंचा वापर आपले अन्न मिळवण्यासाठी प्रवास करण्यासाठी आणि आपले श्रम वाचविण्यासाटी करू लागला. पशुपालन अवस्थेतच निरीक्षणातूनच शेतीचा शोध लागला आणि शेती उत्पादनाचे साधन बनले. पशु व शेती या दोन्हीचा विकास म्हणजे उत्पादनाच्या साधनात झालेला बदल होय. शेती व पशुपालन हे उत्पादनाचे साधन बनल्याने मानवात खाजगी मालमत्तेचा विचार सुरू झाला. माझी जमीन, माझे पशु अशी खाजगी मालमत्तेची भावना त्यांच्यात निर्माण झाली. पशुपालनासाठी व शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी त्याला श्रमशक्तीची गरज भासू लागली. या गरजेतूनच मालक व गुलाम असे दोन वर्ग निर्माण झाले. शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी पशु व गुलामाच्या श्रमशक्तीचा तो वापर करू लागला. तसेच पशुवर मालकी हक्क प्राप्त झाल्याने पशूच्या पालनासाठी ही गुलामाची गरज भासू लागली. यातून समाजात जे मालक व गुलाम असे वर्ग निर्माण झाले. याच वर्गाला मार्क्सने दास प्रथेचे युग असे म्हटले आहे.

**३. मध्ययुगीन कालखंड :–**

या कालखंड जमिनीचा मालक हा घटक महत्त्वाचा ठरला. अधिक जमीन, अधिक उत्पादन आणि अधिक उत्पादनातून संपत्ती मिळते तसेच प्रतिष्ठा प्राप्त होते. हा विचार समाजात रुजला. उत्पादनातून संपत्ती मिळते. तसेच प्रतिष्ठा प्राप्त होते. हा विचार समाजात रुजला. उत्पादनातून संपत्ती मिळवणारा वर्ग मध्ययुगात निर्माण झाला. या वर्गाने समाज स्थीर करण्यासाठी म्हणून अनेक नैतिक नियम बनविले. शोषणाची क्रिया गुलामाना कळू नये. यासाठी धर्म या संस्थेची निर्मिती करण्यात आली. मध्ययुगीन सामंतशाहीचे युग असेही म्हणतात. सामंतशाहीत जमीनीतून आपले वर्चस्व निर्माण करून समाजातील इतर घटकांवर नियंत्रण ठेवू लागला. सामंत स्वत:शेती करत नव्हता. तर खंडणीच्या पध्दतीने इतरांना शेती करण्यास देत असत. त्यामुळे मध्ययुगीन सामंत व शेती मजूर असे दोन वर्ग निर्माण झाले. प्राचीन अवस्थेतील गुलाम मध्ययुगीन शेतमजूर बनला. मध्ययुगात उत्पादनाच्या साधनावर सामंताची मालकी असल्याने इतरघटकांवर त्यांचे वर्चस्व निर्माण झाले व हा जनतेचे शोषण करू लागला.

मध्ययुगात सामंत अंतर्गत युध्द सुरू झाले. अशा युद्धांत आपला पराभव झाल्यास आपल्या हातातून उत्पादनाची साधने जातील या भीतीतून सर्व सामंत एकत्रित आले. आपल्यापैकी एका व्यक्तीला राजा बनविले व सामंतशाहीतच राजेशाहीची सुरुवात झाली. राज्याच्या नेतृत्वाखाली सर्व सामंतानी एकत्रित आल्याने त्यांच्या शक्तीत वाढ झाली व समाजावर कठोर पध्दतीने नियंत्रण टेवणे शक्य झाले. सामंत आपल्या संरक्षणासाठी उत्पादनातील काही भाग राजाला देवू लागले. राजा त्या करातून सैन्याची उभारणी

करून आपली सत्ता बळकट करू लागला. अशा रीतीने मध्ययुगीन राजा सामंत व शेतमजूर असे वर्ग तयार झाले. अशारीतीने वर्गात राजा व सामंत यांचे संबंध आर्थिक व्यवस्थेमुळे सलोख्याचे होते.

**४. आधुनिक कालखंड :–**

सामंतशाहीच्या शेवटच्या काळात ज्ञानाचा विस्तार झाल्याने विज्ञानात अनेक शोध लागू लागले. सामंताची मुले ज्ञान घेऊन नवे शोध घेऊ लागली. आधुनिक अवस्थेत सर्वांत महत्त्वाचा शोध म्हणजे वाफेच्या शक्तीचा शोध होय. वाफेच्या शक्तीचा वापर करून आधुनिक अवस्थेत अनेक उद्योगधंदे सुरू झाले. यालाच उद्योगातील क्रांती म्हणतात. वाफेच्या शोधाने उत्पादनात वाढ झाली. अधिक उत्पादन दुसऱ्या देशात विकण्याची स्पर्धा तयार झाली. या स्पर्धातूनच साम्राज्यवादाचा विचार निर्माण झाला. सामांताची मुले भांडवलाच्या आधारे शहरात येऊन विज्ञानाच्या सहकार्याने अनेक कारखाने सुरू केले. उद्योगधंद्याच्या प्रगतीमुळे सामंतशाहीचे अवशेष नष्ट होऊन भांडवलशाहीचे युग तयार झाले. सामंतशाहीत उत्पादनाचे साधन शेती होते. तर आधुनिक अवस्थेत उत्पादनाचे साधन म्हणून कारखान्यांना महत्त्व आले. आधुनिक अवस्थेत उद्योगधंद्यांच्या प्रगतीमुळे कारखान्यांचा मालक व कारखान्यात काम करणारा कामगार असे दोन वर्ग निर्माण झाले. याला भांडवलदार व कामगार वर्ग असे म्हणतात. सामंताचा मुलगा शहरात येऊन भांडवलदार झाला. त्याचप्रमाणे शेतमजूरांचा मुलगा शहरात येऊन कामगार वर्ग बनला. भांडवलदार आपले उत्पादन वाढवण्यासाठी कामगारांना काही सवलती देऊ लागला. या सवलतीच्या आधारे कामगार आपल्या मुलाला शिक्षण देऊन कारखान्यात कारकून बनविले. या कारकूनातून मध्यम वर्ग निर्माण झाला.

अशा प्रकारे आधुनिक अवस्थेत भांडवलदार मध्यम वर्ग व कामगार वर्ग असे तीन वर्ग निर्माण झाले. कामगार व मध्यम वर्गाला आपल्या शोषणाची जाणीव होऊ नये यासाठी भांडवलदार वर्ग धर्म या संस्थेचा वापर करू लागला. तसेच शहरीकरणाला महत्त्व देऊन शहराबद्दल आकर्षण निर्माण करून शेतमजूरांना शहरात येण्यास भाग पाडू लागला. यात कमी मोबदल्यात काम करण्यास कामगार वर्ग मिळाला व शहरात वेगळी संस्कृती उभी करू लागला. आधुनिक अवस्थेत भांडवलदार व कामगारांचे शोषण करू लागला. या शोषणातून कामगार वर्ग मध्यम वर्गाच्या साहाय्याने जागृत होऊन भांडवलदार विरुध्द उठाव करू लागला.

उदा. फ्रेंच राज्यक्रांती, कामगार संघटीत होवून भांडवलशाही नष्ट होईल असे भाकित मार्क्सने बनविले. भांडवलशाही नष्ट झाल्यावर पुन्हा राज्यविहीन समाज व्यवस्था निर्माण होईल.

**५. राज्यविहीन अवस्था :–**

समाज एका कालखंडातून दुसऱ्या कालखंडात रूपांतरित होत असताना उत्पादन प्रक्रियेत सतत बदल झालेले आहेत. तसेच उत्पादन प्रक्रियेतून ही वर्ग निर्माण झालेले आहेत. तसेच उत्पादन प्रक्रियेतून हा वर्ग निर्माण झाले आहेत. उदा. सुरुवातीच्या काळात मालक व गुलाम वर्ग होते. नंतरच्या काळात राजा, सामंत व शेतमजूर असे वर्ग निर्माण झाले व विज्ञानाच्या शोधाने भांडवलदार व कामगार असे वर्ग तयार झाले. या सर्व वर्गांमध्ये शोषणाची प्रक्रिया असल्याने सतत आंतरविरोध राहिला आहे. सामंतशाहीच्या काळातही जगभर शेतमजूरांनी बंड केल्याचे अनेक उदाहरणे आहेत. म्हणजे उत्पादन पध्दतीत वर्ग संघर्ष दिसून येतो. मार्क्सने वर्ग संघर्षाच्या प्रक्रियेतून मानवी समाजाचा इतिहास घडत गेला आहे, असे स्पष्ट केले आहे.

इतिहास लिहिताना उत्पादनाच्या साधनांचा विचार करणे आवश्यक आहे. तरच मानवी समाजाचा इतिहास समजतो. समाजातील सर्व प्रथा व निती नियम हे उत्पादनाच्या साधनातून ठरतात. उत्पादनाची साधने व मालकी यावरच समाजाचे कायदे आधारलेले असतात. ज्या वर्गाच्या हातात उत्पादनाचे साधन असते. तोच वर्ग समाजाचे नियंत्रण करत असतो.

उत्पादनाची साधने भांडवलदार वर्गाच्या हाती असल्याने त्यांचे राजकीय सत्तेवर नियंत्रण असते. कामगारांचे शोषण, भांडवलदार वर्ग करीत असल्याने कामगार वर्ग संघटीत होऊन क्रांती करणे व स्वत:च्या हाती सत्ता घेईल. सत्ता हाती आल्यावर कामगार वर्ग भांडवलशाही नष्ट करून उत्पादनाची साधने समाजाच्या मालकीची बनवेल. तेव्हा वर्गविहीन समाज तयार होईल. वर्ग संघर्षातून शोषण नष्ट झाले पाहिजे, हाच मनुष्याचा इतिहास आहे. अशाप्रकारे कार्ल मार्क्सने इतिहासाची भौतिक मिमांसा केलेली आहे. मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादाचा विचार हा केवळ आर्थिक तत्त्वावर आधारलेला आहे. त्यामुळे ते योग्य वाटत नाही. राज्यविहीन समाजाची कल्पना ही प्रत्यक्षात रशिया आणि चीनमध्ये अस्तित्वात आली नाही. त्यामुळे मार्क्सच्या विचारातील आजपर्यंतचा इतिहास म्हणजे वर्ग संघर्षाचा इतिहास आहे, हे पूर्णपणे खरे ठरत नाही. म्हणून मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादाची मिमांसा ही केवळ एकांगी व आर्थिक आधारावरच उभारलेली आहे, अशी टीका केली जाते.

### ❍ कार्ल मार्क्स याचे वर्गसंघर्षावरील विचार :–

मार्क्सचा वर्गसंघर्षाचा सिध्दान्त हेगेलच्या विचार द्वंद्वाचे फलित आहे. मार्क्सच्या एकूणसामाजिक, आर्थिक राजकीय तत्त्वज्ञानातील वर्गसंघर्षाचा सिध्दान्त सर्वात महत्त्वाचे आहे. दास कॅपिटल व कम्युनिस्ट मॅनिफेस्टो या दोन्ही ग्रंथात वर्गसंघर्षाच्या विचाराची चर्चा करण्यात आली आहे. मार्क्सच्या मते. एकूण सामाजीक जीवन संघर्षमय असते. विविध राष्ट्रे व समाज यांच्यामध्ये सतत संघर्ष सुरू असतो, त्यामुळे मार्क्स म्हणतो. मानवी समाजाचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे. त्यामुळे कार्ल मार्क्सने ऐतिहासिक भौतिकवादाच्या सिध्दान्ताद्वारे वर्ग संघर्षाचा सिध्दान्त स्पष्ट केला आहे. कार्ल मार्क्सच्या मते, समाजात नेहमी परस्परविरोधी वर्ग अस्तित्वात असतात. एका वर्गाची उत्पादन साधनावर मालकी असते. तर दुसरा वर्ग त्या उत्पादन साधनावर उदरनिर्वाहासाठी अवलंबून असतो. उत्पादन साधनावर मालकी तर दुसरा वर्ग त्या उत्पादन साधनांवर उदरनिर्वाहासाठी अवलंबून असतो. उत्पादन साधनांवर मालकी असणारा भांडवलदार वर्ग कामगार वर्गाचे नेहमी शोषण करीत असतो. म्हणून भांडवलशाही समाजात शोषक व शोषीत या दोन वर्गात संघर्ष चालू असतो.

कार्ल मार्क्सने 'कम्युनिस्टमेनोफेस्टो'मध्ये वर्ग संघर्षाचा सिध्दान्त मांडत असताना इतिहासाचा आधार घेतलेला आहे. त्यांच्या मते, ''आजपर्यंतचा मानवी समाजाचा इतिहास हा वर्ग संघर्षाचा इतिहास आहे. जंगलात भटकणाऱ्या, पूर्ण स्वातंत्र्य उपभोगणाऱ्या मानवाला 'गुलाम' बनवण्यात आले. तेव्हा समाजात 'गुलाम व मालक' असे दोन वर्ग निर्माण झाले. मालकाने गुलामाचे अधिक शोषण केल्याने गुलाम एकत्रित येऊन मालकाच्या सत्तेला शह दिलेला आहे. जगाच्या इतिहासात गुलामाच्या उठावाच्या अनेक नोंदी सापडतात. मध्यम युगामध्ये 'जमीनदार व शेतमजूर' असे दोन वर्ग निर्माण झाले. जमीनदारांच्या अन्याय, अत्याचाराला कंटाळून शेतमजूराने उठाव केल्याचे नोंदी आहेत. आधुनिक काळात उद्योगधंद्याच्या

विकासानंतर समाजात 'भांडवलदार व कामगार' असे दोन वर्ग निर्माण झाले. भांडवलदार कामगारांचे शोषण करीत असल्याने कामगाराचे संघटन करून त्यांच्या राजकीय जाणिवा वाढल्यास कामगार वर्ग क्रांती करून सत्ता हाती घेतील असा अंदाज व्यक्त केला. जगातील सर्व राष्ट्रांत नेहमीच 'शोषीत विरुध्द शोषक' असा लढा झालेला आहे. या लढ्यात नेहमीच एक वर्ग नष्ट होऊन दुसऱ्यांच्या वर्गाच्या हाती सत्ता गेलेली आहे. आधुनिक काळात भांडवलदार व कामगार यांच्यात संघर्ष चालू आहे. हा संघर्ष तीव्र स्वरूपात व्यक्त होऊ नये म्हणून भांडवलदार वर्ग, धर्म, संस्कृती, नितिमत्ता, मध्यम वर्ग असे भ्रम उभा करीत आहे. विशेषत: धर्माच्या आधारे वर्गसंघर्ष टाळण्याचा प्रयत्न केला जातो. साम्यवादानी पक्षाने या दोन गटात होणाऱ्या संघर्षात जे भ्रम उभे केले जातात. त्याबाबत शोषीतांना जागृत करणे आवश्यक आहे. भांडवलदार विरुध्द कामगार हा संघर्ष तीव्र करून भांडवलशाही नष्ट करता येते. आधुनिक काळात फ्रेंच राज्यक्रांती ही भांडवली शासन व्यवस्था नष्ट करण्याचा एक प्रयोग होता. फ्रेंच राज्यक्रांतीमुळे पॅरिस शहरात काही काळ वर्गविहीन, शोषणविरहीत समाज व्यवस्था निर्माण झालेली होती.

आधुनिक काळात उत्पादनाची सर्व साधने भांडवलदारांच्या हातात केंद्रीत झालेली आहेत. भांडवलाचे केंद्रीकरण झाल्याने कामगरांचे अधिक शोषण होत आहे. यासाठी कामगार संघटना बांधणे आवश्यक आहे. कामगार वर्ग सहज संघटीत होऊ शकतो. कारण हा वर्ग 'नाही रे' वर्ग आहे. त्यामुळे संघटीत होऊन संघर्ष केल्याशिवाय या वर्गाला शोषणातून मुक्तता मिळणार नाही. संघटीत कामगारांच्या राजकीय जाणिवा वाढविण्यास वर्गसंघर्ष गतीने होऊशकतो. भांडवलदार व कामगार यांचे हितसंबंध परस्पर विरोधी असतात. तेव्हा भांडवलदार वर्ग लोकशाही हा भ्रम निर्माण करून परस्पर विरोधी विचाराने लोकशाही मार्गाने समन्वय घडवून आणण्याचा प्रयत्न करतो. परंतु लोकशाहीतही भांडवलदार वर्ग सत्ताधारी असल्याने आपले हितसंबंध सुरक्षित ठेवूनच समन्वयाचा प्रयत्न करतो. पण त्यात यश मिळत नाही. कारण भांडवलदार वर्ग नेहमीच उत्पादन वाढवून कामगारांना वेतन कमी देतो. मिळालेल्या वेतनातून कामगारांच्या किमान गरजा पूर्ण होत नाहीत. त्यामुळे तो आपल्या किमान गरजा भागवण्यासाठी भांडवलदारांना श्रम विकतो व शोषणाला बळी पडतो. या सर्व परिस्थितीची जाणीव कामगारांना करून दिल्यास कामगार संघटीत होऊन क्रांती करतील यामध्ये कामगारांचा विजय होतो. हा मार्क्सचा सिध्दान्त संघटीत कामगार शक्तीवर अवलंबून आहे. कामगार वर्ग जोपर्यंत संघटीत होणार नाही तोपर्यंत क्रांतीही होणार नाही.

मार्क्सच्या मते, कामगारांची क्रांती ही अपरिहार्य आहे. वर्ग संघर्षाचा परिणाम म्हणजे कामगार वर्गाच्या हाती सत्ता देणे असा आहे. कार्ल मार्क्सने कामगार क्रांतीमध्ये हिंसेचे समर्थन केले आहे..कामगारांनी क्रांती केल्यानंतर वर्गविहीन समाज व्यवस्था निर्माण होईपर्यंत कामगारांच्या हुकूमशाहीचे समर्थन केले आहे. समाजात सर्व प्रकारची समता येईपर्यंत हुकूमशाहीची गरज असते. शांततेच्या मार्गाने, कायद्याच्या आधारे भांडवलशाही नष्ट करता येत नाही. म्हणून मार्क्सने 'वर्गसंघर्षाचा' सिध्दांत मांडला आहे.

❍ **कार्ल मार्क्सच्या वर्ग संघर्षावर टिका :–**

१) कार्ल मार्क्सने समाजाचे विभाजन दोन वर्गात केले. अ) कामगार वर्ग ब) भांडवलदार वर्ग. या दोन वर्गाशिवाय मध्यम वर्ग, कनिष्ठ मध्यम वर्ग असेही वर्ग अस्तित्वात आहेत. परंतु मार्क्सने या वर्गाकडे

दुर्लक्ष केले. प्रत्येक वर्गाच्या राजकीय जाणिवा आणि हितसंबंध वेगवेगळे असतात. त्यांचे स्पष्टीकरण कार्ल मार्क्सने केले नाही.

२) कार्ल मार्क्सने दोन प्रतिस्पर्धी वर्गाच्या संघर्षाला द्व्द्ववादी संघर्षाचे स्वरूप देण्यासाठी त्यांचे हितसंबंध कसे विरोधी आहेत याचे स्पष्टीकरण केले. परंतु या दोन वर्गात मध्यम वर्गाची भूमिका महत्त्वाची असून देखील त्याची दखल घेतली नाही.

३) भांडवलशाही अर्थव्यवस्थेत भांडवलाचे केंद्रीकरण मूठभर लोकांच्या हाती होते आणि कामगारांचे दारिद्र्य वाढत जाते. हा मार्क्सचा निष्कर्ष अयोग्य आहे. भांडवलदारांची संपत्ती वाढल्यानंतर, कामगारांचे दारिद्र्य वाढतेच असे ठामपणे सांगता येत नाही. कारण कामगारांची आर्थिक परिस्थिती ही सुधारत असते.

४) जगातील कामगारांना एकत्रित करून क्रांती करण्याचे मार्क्सचे स्वप्न वास्तवात येऊ शकले नाही. कारण कामगार वर्ग हा देखील राष्ट्रवादी भावनेने प्रेरित असून आपले राष्ट्राच्या पलीकडील जगातील कामगारांचा विचार करण्यास तो तयार होत नाही.

५) मार्क्सच्या वर्ग संघर्षाचा सिध्दान्त 'हिंसेला' महत्त्व आहे. भांडवलदारांच्या अन्याय अत्याचाराला, कायद्याने बंदी घालता येते. त्यासाठी हिंसेची गरज नाही. असा विचार मार्क्सने केलेला नाही.

६) कार्ल मार्क्सच्या मते कामगार वर्ग हाच क्रांतीकारक वर्ग आहे. हा सिध्दांत चुकीचा आहे. कारण चीनमध्ये माओनी शेतकऱ्यांच्या आधारे क्रांती घडवून आणली. तर क्यूबा या राष्ट्रात फेडेल कॅस्ट्रो यांनी मध्यम वर्गाच्या मार्फत देशात क्रांती घडवून आणली. म्हणजेच कामगार हाच क्रांतीचा पाया आहे, हे सिध्द होत नाही.

७) कामगार वर्गाचे शोषण अधिक होत असल्यामुळे आणि तो 'नाही रे' वर्गात असल्यामुळे तोच क्रांती करून समाज व्यवस्था बदलेल हा कार्ल मार्क्सचा विचार आधुनिक लोकशाहीत पराभूत केला आहे. आजचा कामगार वेतनवाढ, बोनस व इतर भांडवली सुखसोयीत गुंतला आहे.

कार्ल मार्क्सच्या वर्ग संघर्षावर वरील प्रमाणे टीका होत असली तरी वर्ग संघर्ष अटळ आहे. परिस्थितीनुरूप वर्गसंघर्षात काही दोष निर्माण झालेले आहेत. याचा अर्थ मार्क्सचा सिध्दान्त चुकीचा आहे असा होत नाही.

### ❍ कार्ल मार्क्सचा राज्यविषयक विचार :–

कार्ल मार्क्सच्या मते, 'राज्य म्हणजे एका वर्गाची दुसऱ्या वर्गावरील हुकूमशाही होय.' राज्याचा जन्म आर्थिक शोषणातून झालेला आहे. राज्य जी प्रशासकीय यंत्रणा उभी करते तिचा उद्देशही शोषणच आहे. राज्य आर्थिक शोषण करणाऱ्या अल्पसंख्यांक भांडवलदाराच्या हिताचे रक्षण करीत असते. राज्य शोषीत अशा बहुसंख्यांक वर्गाची दडपशाही करणारी संस्था आहे. म्हणून तिला विशिष्ठ वर्गातील लोकांची संघटना असे म्हणतात. राज्य आणि त्यांचे प्रशासन नेहमीच श्रीमंत वर्गाच्या हिताचे संरक्षण करीत असते, आणि हे भांडवलशाही राष्ट्राचे प्रमुख लक्षण आहे. राज्यही संस्था सैनिक, पोलिस आणि शस्त्र यांचा आधार घेऊन अशी राहते. त्यामुळे वर्ग संघर्षाच्या काळात क्रांतीकारक वर्गाला दडपण्यासाठी राज्य, पोलीस, सैन्य आणि

शस्त्र यांचा आधार घेऊन भांडवलदार वर्गाचे हितसंबंध सुरक्षित ठेवणे आणि कामगारांना राष्ट्र शक्तीशाली करण्यासाठी सैन्य आणि शस्त्राची गरज आहे, असा भास निर्माण करते. वास्तवात सैन्य आणि शस्त्राचा वापर 'कामगारांची क्रांती' दडपण्यासाठीच केला जातो.

राज्यंसस्था ही प्राचीन संस्था नाही. समाजातील उत्पादन साधनात बदल झाल्यामुळे राज्याची निर्मिती झाली आहे. राज्यात अल्पसंख्यांक भांडवलदारांकडून बहुसंख्यांक कामगारांचे शोषण राजकीय सत्ता करीत असते. राजकीय सत्ता भांडवलदारांच्या हाती असते. वर्ग संघर्ष तीव्र होत असेल तर राजकीय सत्तेचे केंद्रीकरण होते. भांडवलदार वर्ग राजकीय सत्तेबरोबरच आर्थिक आणि सामाजिक सत्ता केंद्रीत करते. यास विरोध केल्यास सैन्य आणि पोलिसांचा वापर केला जातो. धर्माच्या साहाय्याने शासन स्थिर केले जाते. उत्पादनाची सर्व साधने भांडवलदारांच्या हाती असतात. समाजातील नैतिक कल्पना, धार्मिक तत्त्वे, रूढी, परंपरा या सर्वांचा वापर भांडवलदार बहुसंख्य वर्गाची पिळवणूक करण्यासाठीच करतात.

अतिप्राचीन काळी राज्यसंस्था अस्तित्वात नव्हती व वर्गही अस्तित्वात नव्हते. जंगलात राहणारी व्यक्ति निसर्गाच्या सानिध्यात स्वत:च्या श्रमाने अन्न मिळवत असे. वाढती लोकसंख्या व जंगलातील अन्नाची कमतरता यामुळे मालक-दास असे वर्ग निर्माण झाले. मध्ययुगात सामंतशाही जमीनदार यातून सामंत व शेतमजूर असे वर्ग निर्माण झाले. विज्ञानाच्या शोधामुळे आधुनिक काळात भांडवलदार व कामगार वर्ग असे वर्ग निर्माण झाले. भांडवलदार वर्ग कामगारांनी आपल्याविरुध्द क्रांती करू नये म्हणून लोकशाही, कायदेमंडळ यांचा विकास केला. लोकशाही ही भांडवलदारांचे हितसबंध जोपासणारी संस्था आहे. कायदेमंडळात नेहमीच श्रीमंताच्या सुरक्षिततेसाठीच कायदे करते, त्यामुळे विशिष्ठ वर्गाच्या हितासाठी राज्य निर्माण झालेले आहे, असा निष्कर्ष काढता येतो. भांडवलशाही व्यवस्थेस कामगार व भांडवलदार या दोन वर्गात संघर्ष अटळ आहे. या वर्ग संघर्षात विजय हा कामगार वर्गाचा आहे. कारण कामगार हिंसक पध्दतीने संघर्ष करून कामगारांची हुकूमशाही निर्माण होईल व त्यातूनच राज्य ही संस्था नष्ट होईल. कार्ल मार्क्सने तीन टप्पे सांगितले आहेत.

**१. कामगारांची क्रांती :-**

भांडवलशाहीत भांडवलदार व कामगार वर्ग असे दोन वर्ग असतात. भांडवलदार कामगारांचे शोषण करीत असल्यामुळे कामगार संघटीत होऊन भांडवलदार विरुध्द क्रांती करतील. या क्रांतीला कामगारांचा विजय होईल, कारण कामगार संख्येने अधिक आहेत व भांडवलदार नेहमीच मूठभर असतात. भांडवलशाही व्यवस्थेत कामगारच क्रांती करू शकतील, कारण कामगार हा 'नाही रे' वर्ग आहे. कामगाराला समाजात स्थान नाही. श्रमशक्ती विकल्याशिवाय त्यांचे दैनंदिन जीवन चालू शकत नाही. कामगार वर्गाला संघटीत करून त्याला क्रांतीची प्रेरणा दिल्यास कामगारच भांडवलशाही नष्ट करू शकेल. जगातील कोणतेही कायदेमंडळ कामगाराच्या हिताचे कायदे करू शकत नाही. कारण कायदे मंडळावर भांडवलदाराचे वर्चस्व असते. म्हणून कामगार भांडवलदाराच्या शोषणातून मुक्त होण्यासाठी क्रांती करतील व राज्यांची सत्ता आपल्या हाती घेतील असे मार्क्सने कामगार क्रांतीत स्पष्ट मत मांडले आहे.

२. **कामगारांची हुकूमशाही :-**

भांडवलदार विरुध्द कामगार या वर्ग संघर्षात कामगारांचा विजय होईल व कामगार राज्यसत्ता हस्तक्षेप केल्यानंतर आपली हुकूमशाही काही काळापुरती निर्माण करतील. कामगार वर्ग आपली हुकूमशाही निर्माण केल्यानंतर काही कार्य पार पाडतील.

अ) **उत्पादनाची सर्व साधने :** समाजाच्या मालकीची करण्यात येईल. संपत्ती नष्ट होईल. राज्यातील सर्व संपत्तीवर समाजाची मालकी निर्माण होईल. कोणतेही व्यक्तीची व्यक्तीगत संपत्ती राहणार नाही.

ब) **संपत्ती :** समाजाच्या मालकीची झाल्यानंतर राजकीय सत्ता पदावर सर्वत्र कामगारांची नियुक्ती करण्यात येईल. प्रत्येक ठिकाणी कामगारांची नियुक्ती केल्यामुळे समाजातील कोणताही घटक शोषणाला बळी पडणार नाही व कामगार सत्ताधीश असल्याने तो शोषणाला प्रोत्साहन देणार नाही.

क) कामगारांच्या हुकूमशाहीच्या काळात क्रांती विरुध्द भांडवलदारांचे गट अल्पप्रमाणात अस्तित्वात राहतील असे गट पूर्णपणे नष्ट होईपर्यंत कामगारांची हुकूमशाही आवश्यक राहील. विरुध्द गट नष्ट झाल्यानंतरच कामगारांची हुकूमशाहीचा अस्त होईल.

ड) कामगारांची हुकूमशाही क्रांती विरुध्द गट नष्ट झाल्यानंतर भांडवलशाहीचे अवशेष पूर्णपणे नष्ट होतील. अशारीतीने कामगारांची हुकूमशाही खाजगी नफा व शोषण पूर्णपणे बंद करेल. या काळात श्रमावर आधारित समाज रचना निर्माण करण्यात येईल. जो श्रम करणार नाही, त्याला राज्यात आश्रय मिळणार नाही, अशी भूमिका राज्य घेईल. त्यानंतर वर्गविहीन, राज्य विहीन समाजाची निर्मिती होईल.

३. **राज्यसंस्थेचा विनाश :-**

कामगार वर्ग राज्य संस्थेवर नियंत्रण मिळवल्यानंतर टप्प्या-टप्प्याने राज्यसंस्था नष्ट होईल. राज्यात शोषण करणारा व शोषण करून घेणारा असा वर्ग अस्तित्वात नसल्याने शासन व्यवस्थेची गरज राहणार नाही. समाजातील वर्ग व्यवस्था नष्ट होईल व साम्यवादी समाजव्यवस्था अस्तित्वात येईल. राज्यविहीन समाजाचे स्वरूप वर्गीय शोषण करणारे असणार नाही. उत्पादन व उपभोग यांच्यात श्रमाच्या आधारे व्यवहार अतील. अशाप्रकारे राज्यविहीन समाजव्यवस्था निर्माण होईल. या व्यवस्थेत कोणीही गुलाम राहणार नाही. व्यक्ती उत्स्फूर्तपणे सहकार्याने परस्परांशी व्यवहार करतील. राज्यसंस्थेशिवाय समाजातील सर्व व्यवहार श्रमांच्या आधारे चालू राहतील. प्रत्येक व्यक्ती आपल्या कुवतीनुसार काम करेल व त्याच्या गरजेनुसार दाम मिळेल. वर्गविहीन व राज्यविहीन समाजात व्यक्तींना आपल्या अधिकारासाठी लढण्याचा प्रश्नच येणार नाही, अशी भूमिका मार्क्सने मांडली आहे.

मार्क्सचे राज्याचे विचार एकांगी आहेत. राज्य म्हणजे एका वर्गाने दुसऱ्या वर्गाकडे शोषण करण्याचे साधन आहे, म्हणजे राज्याच्या खऱ्या स्वरूपाकडे दुर्लक्ष करण्यासारखे आहे. जनतेच्या कल्याणासाठी आपले सारे जीवन व्यतीत करणारे शासक होऊन गेले आहेत, त्याच्याकडे मार्क्सने दुर्लक्ष केले आहे. संक्रमणकाळानंतर राज्य नष्ट होईल हे मार्क्सचे तत्त्वज्ञान हे काल्पनिक आहे असे वाटते, कारण रशियामध्ये १९१७ साली क्रांती झाली व कामगाराची हुकूमशाही प्रस्थापित झाली तरीही तेथील राज्य नष्ट झाले नाही.

उलट राज्याचे महत्त्व रशिया व चीनमध्ये अधिक वाढल्याचे दिसून आले. त्यामुळे मार्क्सच्या राज्यविहीन समाजाची आनंददायी कल्पना ही फोल ठरली आहे. म्हणून मार्क्सच्या राज्यविहीन वर्गविहीन समाज कल्पना अस्तित्वात आलीच नाही, म्हणून मार्क्सच्या राज्यविषयक विचारावर टिका केली जाते.

### ४.२.२ फ्रेडरिक एंगल्स

कार्ल मार्क्स व फ्रेडरिक एंगल्स याचे संबंध क्रांतीकार्याच्या व व्यक्तीगत जीवनाच्या दृष्टीने अलौकिक व असामान्य होते. कारण हे दोघे १८४४ मध्ये एकत्र आले. त्यावेळी कार्ल मार्क्स वय २६ वर्षाचे आणि एंगल्स २४ वर्षाचे होते, तेव्हापासून त्या दोघांचे समान ध्येय बनले. या दोघांनी आयुष्यभर अविरतपणे परिश्रम घेऊन क्रांतीचे तत्त्वज्ञान मांडले. या दोघांनीच प्रथमत: कामगार वर्गाच्या मागण्या या भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या अपरिहार्य परिणाम असल्याचे दाखवून दिले. फ्रेडरिक एंगल्स यांनी कार्ल मार्क्सच्या लेखनामध्ये सहलेखक म्हणून मदत केली तसेच ते अखेरपर्यंत आर्थिक मदतही केली आहे. फ्रेडरिक एंगल्स हा मार्क्सवादी विचारामध्ये भर घालणारा विचारवंत आहे, तरी त्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

❑ **जीवन परिचय :-**

फ्रेडरिक एंगल्स हा जर्मनीतील यशस्वी उद्योगपतीचा मुलगा होता, त्याचा जन्म १८ नोव्हेंबर १८२० रोजी प्रशियातील (जर्मनी) ऱ्हाइन प्रांतातील बार्गेन या गावी झाला. ऱ्हाइन प्रांत हा जर्मनीतील कारखानदाराचा प्रांत होता. त्याचे कुटुंबही कारखानदाराचे होते. वडिलांचे नाव फ्रेडरिक एंगल्स सिनियर आणि एलिझाबेथ हे आईचे नाव होते. फ्रेडरिकचे वडील धर्माभिमानी प्रोटेस्टंट होते, त्यानुसारच त्याचे पालनपोषण झाले. त्याचे प्राथमिक शिक्षण बार्मेनच्या शाळेत झाले व नंतर वयाच्या १३ व्या वर्षी एलबरफिल्ड येथील शाळेत शिक्षण घेतले. परंतु एंगल्सचे वडील कर्मठ धर्मनिष्ठ व करड्या स्वभावाचे होते. त्यामुळे घरातील सर्व मंडळी वडिलांना घाबरत असत. त्यांच्या वडिलांच्या मते स्वतंत्र विचाराचा संवेदनशील मनाचा, वाचनाचा आवड असणारा मुलगा फ्रेडरिक वाया गेलेला मुलगा आहे, म्हणून कॉलेजचे शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच त्याला कॉलेज सोडावयास लावले आणि फर्ममध्ये काम करण्यास पाठविण्यात आले. या कामात त्याला रस नव्हता, परंतु काम करीत असतानाच त्याने खूप वाचन केले. फर्म व कारखान्याचे काम करणारा कामगारवर्ग, शेतकरी व छोटे कारागीर यांची जीवनशैली एंगल्सने जवळून पाहिली आणि वयाच्या एकोणिसाव्या वर्षी १८३९ मध्ये 'वुपरटालची पत्रे' या पहिल्या लेखामध्ये कामगारांच्या जीवनाचे हृदयस्पर्शी चित्र काढले. याचकाळात एंगल्सने अनेक भाषा शिकल्या. त्यात प्रामुख्याने जर्मन, इंग्लिश, फ्रेंच, इटालियन, स्पॅनिश, लॅटिन, पोर्तुगीज या भाषेचा समावेश होतो.

फ्रेडरिकचा वैचारिक क्षेत्राचा अभ्यास पाहून वडिलांनी त्याला ब्रेमेन येथील एका धर्मगुरूकडे ठेवण्यात आले. त्याठिकाणी एंगल्सने अभ्यास केला आणि धार्मिक आचार विचारांचा व समजूतीचा आपल्या मनावरील अखेरचा पगडा झुगारून दिला. याच ब्रेमेनमध्ये असतानाच एंगल्स यांनी हेगेलच्या तत्त्वज्ञानाचे वाचन करण्यास सुरूवात केली, त्यावेळी जर्मनच्या तत्त्वज्ञानावर हेगेलचे प्रभुत्व होते. १८३८ मध्ये प्रथमत: 'द बेडॉइन' नावाची कविता ब्रिमिचेस कनव्हर्शेशन्स ब्लाट नं. ४०' मध्ये प्रकाशित केले, त्यावेळी इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, स्पेन, पोर्तुगाल, इटली इत्यादी युरोपीयन देशातील औद्योगिक क्रांती व राजकीय सामाजिक

बदलाची प्रक्रिया एंगल्सने जवळून पाहिली होती, त्यामुळे त्यावर टिका करणारे वृत्तपत्र लेख लिहिण्यास सुरूवात केली आणि यंग हेगेलियन गटाकडे ओढला गेला. १९४१ साली सरकारी नियमाप्रमाणे एंगल्सला लष्करी शिक्षण घ्यावे लागले त्यात त्याने तोफखान्याचे सदस्य म्हणून सेवा बजावली त्यासाठी बर्लिनमध्ये २ वर्षे राहिला तेव्हा बर्लिन विद्यापीठातील व्याख्यानाना एंगल्स उपस्थित राहत असे, त्यामुळे यंग हेगेलियन्स गटाशी संबंध येऊ लागला. एंगल्सने कारखान्यातील कामगारांना देत असलेल्या कमी रोजगार व जगण्याच्या परिस्थितीचे चित्रण/वर्णन करणारा लेख 'राइनिचे झीटुंग' यामध्ये प्रकाशित करण्यात आला यांचे संपादक कार्ल मार्क्स होते.

ऑक्टोबर १८४२ मध्ये एंगल्सने लष्करी शिक्षण पूर्ण झाले, त्यानंतर त्यांनी लंडनला गेला. आपल्या वडिलाच्या मालकीचे एरमेन ॲन्ड एंगल्स फर्म व्हिक्टोरिया मिल मध्ये काम करू लागला. इंग्लंडमध्ये असताना मेरी बर्न्स नावाच्या आयरिश कापड कामगार स्त्री शी मैत्री झाली व ते दोघे एकत्र राहत होते, त्यांनी लग्न केले नाही. परंतु मेरी बर्न्सचा अवघ्या ४१ व्या वर्षी निधन झाले, त्यानंतर तिची बहीण लिझी बर्न्स हिच्याशी विवाह केला. मेरी लर्न्सनी एंगल्सच्या वैचारिक जीवनात महत्त्वाचे मार्गदर्शन केले.

मँचेस्टरमध्ये असताना एंगल्सने झोपडपट्ट्याचे बारीक तपशीलवार निरीक्षण केले. लहान मुलाचे, अति कष्टीत व गरीब कामगाराच्या जीवनाचे माहिती घेऊन त्याच्या परिस्थितीसंदर्भातील लेख राइनिचे झीटुंग व त्यानंतर डॉईच फ्रान्सिसचे जहरबॅचर या दोन्ही जर्नलसमध्ये प्रकाशित केले. १८४४ मध्ये एंगल्सने द कंडिशन ऑफ द वर्किंग क्लास इन इंग्लंड' हा ग्रंथ प्रसिध्द केला. त्यामध्ये या सर्व लेखाचा संग्रह होता. भांडवलशाहीच्या काळातील परिस्थितीचे सत्यदर्शन करणारा हा ग्रंथ कामगार वर्गाच्या इतिहासातील महत्त्वाचे पुस्तक आहे. तसेच तो द नॉर्दर्न स्टार, रॉबर्ट ओलेनचेन्यू मॉरल वर्ल्ड आणि डेमोक्रॅटिक रिव्ह्यू वृत्तपत्रासह अनेक जर्नल्ससाटी लेखन केले.

१८४४ मध्ये एंगल्सने जर्मनीला परत जाण्याचा निर्णय घेतला. परंतु जाताना तो कार्ल मार्क्सला भेटण्यासाठी पॅरीसमध्ये गेला का भेटण्यापूर्वीच त्याचा पत्रव्यवहार सुरू होता. राईनिचे झुटींग या जर्नलवर मार्च १८४३ मध्ये प्रशियाच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांनी बंदी घातल्यानंतर मार्क्स ऑक्टोबर १८४३ पासून पॅरीस येथे वास्तव्य करीत होता. मार्क्सला भेटण्यापूर्वी एंगेल्सच्या भौतिकवादी आणि वैज्ञानिक समाजवादी विचाराची पार्श्वभूमी तयार झाली होती. मार्क्स व एंगल्स यांची भेट दि. २८ ऑगस्ट १८४४ रोजी कॅफे द ला रेजेन्सी येथे झाले. दोघे जिवलग मित्र बनले आणि त्याचे संपूर्ण आयुष्यभर ती मैत्री कायम राहिली.

मार्क्सने एंगल्सचे लेख वाचून प्रभावित झाले आणि मार्क्सने कामगार वर्गाने बुर्ज्वा समाजाच्या विरोध लढण्यासाठी सज्ज राहील ही विचारधारा स्विकारली. तसेच एंगल्सने मार्क्सच्या होली फॅमिली आणि मार्क्सच्या डाईच फ्रान्सिस जहरबॅचर या जर्नल्सच्या कार्यात मदत करण्यासाठी पॅरीस येथे राहिला. याच काळात लीज ऑफ दी जस्ट या गुप्त संघटनेची काम करत होते. ही संघटना १८३७ मध्ये स्थापन झाली होती. पुढे १८३९ मध्ये आंदोलनात सहभागी झाली होती.

पॅरीसच्या सरकारने मार्क्स व डाईच फ्रान्सिस जहरबॅचर याच्या विरोधात बंदी घालण्याचे आदेश काढले. दि. ३ फेब्रुवारी १८४५ रोजी मार्क्सला त्याची पत्नी व मुलीसह पॅरीसमधून हद्दपार करण्यात आले, त्यानंतर एंगल्सने त्याच्या मूळ गावी बर्मेन येथे गेला व मार्क्स बुसेल्स येथे स्थायिक झाला. एगल्स एप्रिल

१८४५ मध्ये मार्क्सला लिखाणात मदत करण्यासाठी ब्रसेल्सला आला 'जर्मन विचारधारा' हे पुस्तक दोघांनी प्रकाशित केले. तसेच त्यांनी सोशीयल डेमॉक्रेटीक वर्क्स पार्टी ऑफ जर्मनी राजकीय संघटनेशी संबंधित राहिले.

सन १८४५ ते १८४८ पर्यंत एंगल्स आणि मार्क्स यांनी ब्रुसेल्स येथे राहिले. तेथे दोघांनी शहरातील जर्मन कामगारांना संघटित करण्याचे कार्य केले. तसेच जर्मन कम्युनिस्ट लीग या गुप्त संघटनेशी संबंध प्रस्थापित केले. या संघटनेसाठीच त्यांनी कम्युनिस्ट जाहीरनामा हा जगप्रसिध्द ग्रंथ लिहिला. १८४८ साली फ्रान्सची क्रांती झाली, त्याचा पडसाद इतर युरोपियन देशामध्ये पसरले. या कारणामुळे एंगल्स व मार्क्स यांनी जर्मनीला प्रशियाला परत गेले तेथे त्यांनी 'न्यू राईनिचे झुटींग' हे नियतकालिक सुरू केले. त्यात क्रांतीच्या विविध प्रश्नावर मार्गदर्शन पर लेख लिहिले. एंगल्सने स्वत: जनतेच्या सशक्त उठावात भाग घेतला होता. मार्क्स आणि एंगल्स यांच्या व्यतिरिक्त कार्ल स्केपर विल्हेम वोल्फ अन्स्ट ड्रोक पीटर नॉथजंग हेनरिक बर्गर फर्डिनाँन वोलक आणि कार्ल क्रॅमर इ. लोकांनी या दैनिकांमध्ये योगदान दिले आहे. लोलोनमधील क्रांतिकारक उठावावर न्यू राईनिचे झुटींग याच्या प्रभाव आहे. याची साक्ष एंगेल्सच्या आईनी लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. एंगल्सच्या पालकांना अशी आशा होती की, एंगल्स हा या कार्यरत असलेले सोडून आपल्या व्यवसायाकडे लक्ष द्यावे. अन्यथा आर्थिक मदत थांबवली जाईल असे सांगण्यात आले. अखेरीस जर्मनी सरकारने न्यू राईनिचे झुटींगवर बंदी घालण्यात आली. सन १८४९ मध्ये मार्क्स व एंगल्स या दोघांनाही हद्दपार करण्यात आले, कारण एंगल्स स्वत: तीन लढायात लढला होता, परंतु क्रांतीचा पराभव झाल्यामुळे ते जर्मनीतून स्वित्झर्लंडला व नंतर लंडन (मँचेस्टरला) गेले. या काळातही एंगल्सने जर्मनीतील शेतकऱ्याचे बंड व जर्मनीतील क्रांती व प्रतिक्रांती ही पुस्तके लिहिली.

नोव्हेंबर १८५० मध्ये मँचेस्टर येथे एंगल्स एरमन आणि एंगल्स या मिलमध्ये काय करू लागला. जुलै १८५१ मध्ये एंगल्सचे वडील त्याला भेटण्यासाठी इंग्लंडच्या मँचेस्टरमध्ये दाखल झाले व एर्मेनला भेट घालून दिले. पुढे १८६० मध्ये तो विभागप्रमुख झाला आणि १८६४ मध्ये ज्या कंपनीचा भागीदार झाला. त्यानंतर १८७० मध्ये दैनंदिन कामातून निवृत्त होऊन लंडनमध्ये मार्क्सबरोबर राहू लागला. मार्क्सच्या घराच्या आर्थिक जबाबदारी एंगल्सने घेतली होती, तो अखेरपर्यंत मार्क्सला मदत केला. मार्क्सचा १८८३ साली लंडन येथे मृत्यू झाला. त्यानंतर एंगल्सने भांडवल या ग्रंथाचा दुसरा व तिसरा खंड वरकड मूल्य-सिध्दांत खंड तिसरा हे महत्त्वपूर्ण ग्रंथ मार्क्सच्या टिपणावरून संपादित केले व मार्क्सच्या मृत्यूनंतर त्याच्या टीकाकारांना उत्तरे दिली, तसेच त्यांनी मार्क्सच्या दास कॅपिटल या ग्रंथाचे पुर्नमुद्रण केले. शेवटी ५ ऑगस्ट १८९५ रोजी अन्ननलिकेच्या कॅन्सरमुळे एंगल्सचे निधन झाले.

❍ **ग्रंथसंपदा :-**

एंगल्स यांनी खालील ग्रंथ प्रकाशित केले आहेत, ते पुढीलप्रमाणे :-

1. Conditions of the working class in England (1844).
2. The Peasant wars in Germony (1850).
3. Revolution and Counter-Revolution in Germoney.

4. Anti During (1878).

5. The Origion of the family, private property and the state (1884).

6. Dialectics & Nature (1883).

7. The part played by Labour in the Transition from Ape to Man.

8. Socialism : Utopian and Scientific (1880).

**४.२.२.१ एंगल्सचे राज्यविषयक विचार**

राज्यामुळे समाज जीवनाला शिस्त आणि स्थैर्य प्राप्त होते. राज्यसंस्था व्यक्तीच्या अधिकारांना कायदयाचे अधिष्ठान प्राप्त करून देते, म्हणून राजसंस्था आवश्यक आहे, असा युक्तिवाद केला जातो; परंतु कार्ल मार्क्स आणि एंगल्स आणि लेनीन इत्यादी मार्क्सवादी विचारवंतांनी मात्र राज्यसंस्था ही अनिष्ट स्वरूपाची आहे, त्यामुळे ती नष्ट करणे आवश्यक आहे असे म्हटले आहे, कारण राज्यसंस्था हा शोषक वर्गाच्या हातातील हत्यार असून शोषणावर आधारलेल्या समाजामध्ये राज्यसंस्था शोषक वर्गाच्या हस्तकाची भूमिका पार पाडते. मार्क्सवादी विचारात मानले जाते, म्हणून मार्क्सवादी विचारवंताच्या मते, वर्गविहीन समाजामध्ये राज्यसंस्था राहणार नाही आणि दमन यंत्रणा हे तिचे स्वरूप नष्ट होऊन राज्यसंस्थेचे अस्तित्वही संपुष्टात येईल.

मार्क्सवादी विचारामध्ये एंगल्स या विचारवंतानी ही योगदान दिले आहे. मार्क्सला आर्थिक मदत करणे एवढ्यापुरते मर्यादित न राहता त्यानी अनेक पुस्तकाचे सहलेखक म्हणून कार्य केले आहे. तसेच स्वत: अनेक ग्रंथ प्रकाशित केले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने 'ॲन्टीड्युटींग', 'कुटुंबसंस्था', खाजगी मालमत्ता आणि शासनसंस्था यांचा उगम निसर्गातील 'विरोध-विकास' इत्यादी ग्रंथाचा समावेश होतो.

एंगल्सच्या मते, राज्य ही समाजावर बाहेरून लादली गेलेली एखादी सत्ताही नाही अगर हेगेलने म्हटल्याप्रमाणे ती ''नैतिक कल्पनेचे मूर्त स्वरूप'' किंवा ''विवेकबुध्दीचे साकार आणि प्रत्यक्ष स्वरूपही नाही.'' मानवी समाज प्रगतीच्या एका विशिष्ट अवस्थेला पोचला म्हणजे त्यात राज्यसंथा निर्माण होते. मानवी समाज कधीही न मिटणाऱ्या अंतर्गत विरोधात गुरफटला गेला आहे. हा समाज साधल्या न जाणाऱ्या विरोधात भंगलेला आहे आणि हे विरोध नाहीसे करणे अशक्य झाले आहे याचे राज्यसंस्थेचे अस्तित्व ही कबुली आहे. या वर्गाविरोधामुळे आणि परस्परविरोधी हितसंबंध असलेल्या वर्गाच्या अस्तित्वामुळे निष्फळ झगडे निर्माण होऊन त्यात त्यांचा आणि सर्व समाजाचा नाश होऊ नये म्हणून या विरोधाची तीव्रता कमी करून त्यांना 'कायदा आणि सुव्यवस्था' त्यांच्या बंधनात ठेवण्याकरिता समाजाचे वरून नियंत्रण करणाऱ्या एखाद्या शक्तीची आवश्यकता निर्माण होते. समाजातूनच निर्माण झालेली परंतु समाजावर सत्ता गाजविणारी आणि समाजापासून जास्त जास्त अलग होत जाणारी ही शक्ती म्हणजे राज्यसंस्था होय.

एंगल्सने राज्यसंस्थेची काही वैशिष्ट्ये स्पष्ट केले आहेत. पहिले वैशिष्ट्य म्हणजे राज्यसंस्था ही नागरिकांना वेगवेगळ्या स्थानानुसार विभागणी करते हे त्याचे नैसर्गिक वैशिष्ट्य आहे. दुसरे वैशिष्ट्य म्हणजे सार्वजनिक सत्तेची स्थापना होय, कारण समाजवर्गामध्ये संघर्ष निर्माण झाल्यामुळे सार्वजनिक सत्तेची संघटना आवश्यक असते. ज्या राज्यामध्ये अंतर्गत विरोध तीव्र होत जातो, त्याप्रमाणे सार्वजनिक सत्तेची संघटना

बलिष्ठ होत जाते. सार्वजनिक सत्ता सांभाळण्यासाठी कर वसूल करणे आवश्यक आहे. त्यामुळे राज्यसंस्था सार्वजनिक सत्ता नियमित करण्यासाठी करवसूल करण्याचा हक्क सरकारी अधिकाऱ्यांना देतात, त्यामुळे एंगल्स म्हणतो की, सार्वजनिक सत्ता आणि कर वसूल करण्याचा हक्क प्राप्त झालेले सरकारी अधिकारी हे समाजाचे नियंत्रक या नात्याने स्वत: समाजाच्या वरच्या स्तरावर राहतात. पूर्वीच्या गणसंख्येच्या घटकांना जो मान सहन आणि स्वयंस्फूर्तपणे मिळे तसा मान जरी यांना मिळाला असला तरी तेवढ्याने त्यांचे समाधान झाले नसते. समाजाला दिवसेंदिवस परकीय होत जाणाऱ्या सत्तेचे ते वाहक असल्याकारणाने खास पवित्र्य आणि अनुल्लंघनियता बहाल करणारे विशेष कायदे करून त्यांना मान देण्याची समाजावर सक्ती केले जाते. गणसंस्थेवर आधारलेल्या समाजाच्या सर्व घटकांना मिळून जेवढे अधिकार असत त्यापेक्षा जास्त 'अधिकार' सुसंस्कृत समाजातील य:कश्चित् पोलिसाला असतात, परंतु गणसंस्थेतील लहानात लहान प्रमुखाला सुध्दा जो मान उत्स्फूर्तपणे आणि नि:संदिग्धपणे दिला आहे. त्यांचा सुसंस्कृत समाजातील प्रबळ राजाला, एखाद्या मोठ्या मुत्सद्याला अगर सरसेनापतीला सुध्दा हेवा वाटला असता. एक समाजातच उभा होता तर दुसऱ्याला आपण समाजापासून सलग आणि समाजाच्या 'वर' असणाऱ्या कशाचे तरी प्रतिनिधीत्व करण्याचा प्रयत्न करण्याची सक्ती होती.

यावरून समाजामध्ये वर्ग निर्माण होतात, अशी भूमिका एंगल्सने मांडली. या वर्गामध्ये कलह किंवा संघर्ष उद्‌भवतो तेव्हा त्याला नियंत्रीत करण्यासाठी राज्यसंस्था निर्माण झाली आहे असे मत एंगल्सने मांडले आहे. एंगल्सच्या मते, समाजातील वर्गाच्या कलहातूनही राज्ये निर्माण झाली असल्याने साधारणत: ती समाजातील आर्थिकदृष्ट्या सर्वात श्रेष्ठ आणि बलिष्ठ वर्गाचीच राज्यसंस्था असते. हा बलिष्ठ वर्ग राज्यसंस्थेच्या साहाय्याने राजकीयदृष्ट्याही सत्ताधारी बनतो. अशा रीतीने दडपलेल्या वर्गाला काबूत ठेवण्याचे आणि त्यांची पिळवणूक करण्याचे एक नवीनच साधन त्याला प्राप्त होते, म्हणून प्राचीन राज्यसंस्था ही गुलामाच्या मालकांची शासनसंस्था होती आणि गुलामांना दडपून ठेवणे हा तिचा उद्देश होता तसेच सरंजामशाहीची राज्यसंस्था ही उमरावांची राज्यसंस्था होती आणि तिचा उद्देश गुलामांना आणि वेठबिगार बनवून दडपणे हा होता. तर आजची प्रतिनिधीक राज्यसंस्था हीसुध्दा भांडवलाच्या (म्हणजे भांडवलदारांच्या) हातातले मोलमजूरी करणाऱ्यांची पिळवणूक करण्याचे एक साधनच आहे, म्हणून एंगल्स म्हणतो की, राज्यसंस्था ही धनवानाचे धनहितापासून संरक्षण करण्यासाठी तयार करण्यात आलेली धनवानाची संघटना असते. राज्यसंस्थेच्या विकासाची सर्वोच्च अवस्था म्हणजे आजची लोकशाही राज्य होय. यामध्ये कामगार आणि भांडवलदारांचा लढा लढणे शक्य होणार आहे. म्हणून कामगारांनी क्रांती केली पाहिजे, अशी भूमिका स्पष्ट केली आहे.

एंगल्सच्या मते, राज्यसंस्था प्राचीन काळापासून चालत आलेली नाही, तिच्याशिवाय कारभार चालविणारे समान, फार काय ज्यांना राज्यसंस्था आणि राज्याची शक्ती याची कल्पनाही नव्हती असे समाज अस्तित्वात होते. आर्थिक प्रगतीच्या विशिष्ट अवस्थेला, जी अवस्था अपरिहार्यपणे समाजाच्या वर्गीय विभागणीशी निगडीत झालेली होती, राज्यसंस्थाही त्या विभागणीमुळेच आवश्यक होऊन बसली. आज आपण उत्पादन-विकासाच्या अशा एका अवस्थेत झपाट्याने जात आहोत की, ज्या अवस्थेत जितक्या सरळपणे वर्गाची निर्मिती झाली तितक्याच अटळपणे आता त्यांचा नाशही होईल. त्याच्या विनाशाबरोबर अटळपणे राज्यसंस्थेचाही नाश होईल. समाजाने उत्पादकांच्या राजीखुषीच्या आणि समान सहकार्याच्या

पायावर उत्पादनाची पुनर्घटना केल्यानंतर, राज्यसंस्थेची योग्य ठिकाणी म्हणज चरखा आणि ब्रॉसचा परशू यांच्याबरोबर पुराणवस्तूसंग्रहालयात रवानगी केली जाईल, अशी भूमिका एंगल्सने मांडले.

अशाप्रकारे एंगल्सने राज्याची निर्मिती समाजात निर्माण झालेल्या वर्गकलहातून झाली आहे. ते शोषणाचे साधन बनले आहे म्हणून राज्यसंस्था ही वर्ग नष्ट झाले तर राज्यही नष्ट होईल असे स्पष्ट केले आहे. त्यांच्यामते, राज्यामध्ये भांडवलदाराचे प्राधान्य राहते. श्रमिकाच्या शोषणाची निश्चित योजना त्यात असते. राज्य म्हणजे एका वर्गाचे दुसऱ्या वर्गाद्वारे शोषण करणारे यंत्र आहे. तसेच एंगल्स राज्याला दलितांचे शोषण करणारी संस्था असे म्हटले आहे. शेवटी तो असे म्हणतो की, वर्ग नष्ट झाल्यानंतर एका वर्गाने दुसऱ्या वर्गाचे शोषण करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या राज्याची किंवा राज्यसंस्थेची आवश्यकता वाटणार नाही त्यामुळे राज्य नष्ट करावे लागणार नाही तर ते आपोआप विरून जाईल.

### ४.२.२.२ एंगल्सचे वर्गसंघर्षाविषयीचे विचार

एंगल्सच्या मते, समाजामध्ये पूर्वीच्या काळी उत्पादन हे सामूहिक स्वरूपाचे होते. त्याचा उपयोगही त्याच सामूहिक समाजामध्ये वाटले जात होते. हे सामूहिक उत्पादन अत्यंत मर्यादित हाते. परंतु उत्पादन क्रियेवर आणि उत्पादन केलेल्या वस्तूवरही उत्पादकांचा पूर्णपणे ताबा होता. उत्पादन त्यांच्या हाताच्या बाहेर कधी गेले नव्हते; परंतु हळूहळू उत्पादनाच्या प्रक्रियेमध्ये श्रमविभागणीचा प्रवेश झाला. उत्पादन आणि त्याचा उपयोग सामुदायिकरित्या व्हावयाचा या प्रथेला तिने सुरुंग लावला. उत्पादनाचा उपयोग वैयक्तिकरित्या घ्यावयाचा हा सामान्य नियम करून टाकला आणि अशारीतीने व्यक्ती-व्यक्तींतील विनिमयाची प्रथा अस्तित्वात आली आणि क्रयवस्तूचे उत्पादन हाच उत्पादनाचा सर्वसामान्य प्रकार बनला.

वस्तूचे उत्पादन हे स्वत:च्या उत्पादनासाठी नव्हे तर विनिमयासाठी उत्पादन झाल्याने ती वस्तू एका व्यक्तीच्या हातातून दुसऱ्या व्यक्तीच्या हातात जाऊ लागल्या. त्यामुळे उत्पादित वस्तू दुसऱ्याला विनिमय करताना त्यामध्ये पैसा व व्यापारी यांचा संबंध प्रस्थापित होतो. इतकेच नव्हे तर वस्तूचे विनिमय व्यक्ती-व्यक्तीबरोबर बाजारपेठेतून दुसऱ्या बाजारपेठेतही होत असते. अशारीतीने उत्पादक आपल्या संपूर्ण जीवनपरिस्थितीच्या उत्पादनावरील आपले नियंत्रण घालवून बसतो.

वस्तूचे विनिमय हे व्यक्ती-व्यक्तींमध्ये सुरूवात झाली. त्यानंतर माणूस हाही एक विनिमयाचे वस्तू असू शकतो. मानवी शक्तीचा विनिमय होऊ शकतो आणि माणसाला गुलाम बनवून या शक्तीचा उपयोग करता येतो. या गोष्टीचा सत्याचा शोध लागला आणि समाजामध्ये गुलामगिरी निर्माण झाली. या गुलामगिरीबरोबरच समाजामध्ये शोषण करणारे व शोषीत अशा दोन वर्गात विभागणी झाली ती विभागणी कायमच राहिली आहे, कारण प्राचीनकाळी जगात गुलामगिरी हा पिळवणूकीचा प्रकार होता. मध्ययुगीन काळात भूदास पध्दत अस्तित्वात होती, तर आजच्या जगामध्ये कामगाराने घेतली आहे. भांडवलदार व कामगार यावर्गात विभागणी झाली आहे. आधुनिक समाजात सर्वांना एकत्र बांधणारा दुवा राज्यसंस्था असते, परंतु राज्यसंस्था ही निर्विवादपणे सत्ताधारी वर्गाच्याच ताब्यात असते आणि त्याचा उपयोग दडपल्या आणि पिचल्या जाणाऱ्या वर्गाला दडपून टाकण्याचे साधन म्हणूनच केला जातो.

एंगल्सने असे स्पष्ट केले आहे की, ''आधुनिक जग हे एका वर्गाची दुसऱ्या वर्गाकडून पिळवणूक होते. या तत्त्वावरच आधारलेला आहे, त्यामुळे या जगाचा संपूर्ण विकास हा नेहमीच्या परस्परविरोधातूनच झाला आहे. उत्पादन हे एका वर्गाला वरदायी असते तर दुसऱ्या वर्गाला शाप ठरतो. रानटी युगामध्ये हक्क आणि कर्तव्य यात कोणत्याही प्रकारचा फरक नव्हता. तर आधुनिक काळात एका वर्गाला सर्वच्या सर्व हक्क बहाल केले आहे तर दुसऱ्या वर्गाला सर्वच्या सर्व कर्तव्ये लादून हक्क आणि कर्तव्य यात फरक केला आहे. तसेच विरोधाभास केला आहे. त्यामुळे जोपर्यंत दडपला गेलेला वर्ग (कामगार वर्ग) आपल्या स्वत:च्या मुक्तीसाठी पुरेसा परिपक्व होत नाही, तोपर्यंत त्या वर्गातील बहुसंख्य लोक प्रचलित समाजव्यवस्था हीच एक वास्तव समाजव्यवस्था आहे असे समजत राहतील आणि भांडवलदार वर्गाचे डावा गट म्हणून राहील. हा दडपलेला वर्ग जेव्हा स्वत:च्या मुक्तीच्या दृष्टीने स्वत: परिपक्व होईल, तेव्हा भांडवलदार वर्ग नाहीसे होईल.''

अशाप्रकारे एंगल्सने दडपलेल्या वर्गाने म्हणजेच कामगार वर्गाने भांडवलदार वर्गाच्या विरोधात क्रांती करावी, त्यासाठी परिपक्व व्हावे अशी भूमिका मांडली आहे. एकूणच प्राचीनपासून आजच्या समाजाचा इतिहास पाहिला तर समाज हा स्वतंत्र लोक आणि गुलाम, शोषण करणारे श्रीमंत आणि शोषण सहन करणारे गरीब आणि भांडवलदार व कामगार या वर्गामध्ये विभागला गेला आहे आणि हे आर्थिक परिस्थितीमुळे निर्माण झाली आहे.

फ्रेडरिक एंगल्सने २१ सप्टेंबर १९९० रोजी आपला मित्र जोसेफ ब्लॉक याला लिहिलेल्या पत्रामध्ये असे म्हटले आहे की, समाजातील घटकांमध्ये आर्थिक घटक महत्त्वाचा व मुलभूत असून त्याचबरोबर राजकीय, कायदेविषयक, तत्त्वज्ञानविषयक दृष्टीकोनाचा किंवा विचाराचा प्रभाव ऐतिहासिक स्वरूपाच्या संघर्षावर पडत असतो आणि अनेकवेळप्रसंगी तो त्याची घडण ठरवित असतो. शेवटी आर्थिक घटक आणि भौतिक परिस्थितीचे निर्णायक ठरत असते असेच आम्ही (एंगल्स आणि मार्क्स) स्पष्ट केले आहे. तरीसुध्दा आर्थिक घटक हा एकमेव प्रभावी असतो असे आम्ही म्हटले आहे असे कोणी म्हणत असेल तर त्या विधानाला निरर्थक, अपूर्ण किंवा कल्पित आणि हास्यास्पद वाक्य बनवितो, असे स्पष्ट केले आहे. थोडक्यात असे की, समाजातील निरनिराळ्या वर्गाचे हितसंबंध परस्परविरोधी असल्यामुळे वर्गसंघर्ष निर्माण होतो आणि त्या संघर्षातून विकासाचा पुढचा टप्पा गाठला जात असतो. साम्यवादी जाहिरनाम्यामध्ये मार्क्स व एंगल्सने असे स्पष्ट केले आहे की, 'मानवी समाजाचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे' आणि हा वर्गसंघर्ष हे साम्यवादी व्यवस्थेमध्ये नष्ट होईल आणि वर्गविरहीत समाज अस्तित्वात येईल. समाजात फक्त एकच वर्ग राहतो शेवटी वर्गविहीन व राज्यविहीन समाज अस्तित्वात येतो.

अशाप्रकारे फ्रेडरिक एंगल्सने मार्क्सच्या विचारासारखेच वर्गसंघर्ष संदर्भात विवेचन केले आहे, कारण मार्क्स व एंगल्स यांच्या विचाराची पार्श्वभूमी किंवा आधार हे एकच असल्यामुळे त्याच्या विचारात साम्य आहे असे दिसते. साम्य नव्हे तर एकच आहेत असे स्पष्ट केले आहे.

## ४.३ सारांश

कार्ल मार्क्स व एंगल्स याचे विरोधविकासाचा ऐतिहासिक भौतिकवाद, वर्गसंघर्षही आणि राज्यासंबंधीचे विचाराची चर्चा करण्यात आली आहे. मार्क्सने द्वंदात्मक भौतिकवाद मांडला आहे. द्वंदात्मक भौतिकवाद मार्क्सच्या संपूर्ण विचारांचा पाया आहे. मार्क्सने मानव इतिहासात होणारी परिवर्तने भौतिक किंवा आर्थिक घटकामुळे घडून येतात, अशी भूमिका द्वदात्मक भौतिकवादामध्ये मांडले आहे, तर वर्गसंघर्षाचा सिध्दान्त मांडताना मानवाचा ज्ञात इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे असे मार्क्स म्हणतो तर राज्य हे धनवान लोकांच्या हातातील निर्धनाचे शोषण करण्याचे साधन आहे. त्यामुळे राज्यविहीन व वर्गविहीन समाज प्रस्थापति करण्यासाठी कामगाराची क्रांती होईल आणि साम्यवाद निर्माण होईल असे स्पष्ट केले आहे.

एंगल्सने राज्यसंबंधी विचार स्पष्ट करताना वर्गावर्गातील कलह किंवा संघर्ष फार वाढू नयेत आणि ते एकूण व्यवस्थेच्या सीमामध्ये मर्यादित राहावे. त्या उद्देशाने राज्याची निर्मिती करण्यात आली आणि तोच त्याचा उद्देश असावा असे स्पष्ट केले परंतु त्याचा वापर शोषणाचे साधन म्हणून धनिक वर्गाने केले आहे, त्यामुळे समाजातील वर्ग नष्ट केले तर राज्य आपोआप विरून जाईल आणि त्याची खाजगी चरखा ब्रॉझ धातूची कुऱ्हाड इत्यादीच्याशेजारी पुराण वस्तुसंग्रहालयात राज्यसंस्था राहिलेले आढळेल. तर वर्गसंघर्ष हा प्राचीन काळापासून आर्थिक घटकावर आधारलेला असून तो दडपलेल्या वर्गांनी सक्षम झाल्यानंतर नष्ट होईल. एकूणच कार्ल मार्क्स व फ्रेडरिक एंगल्स यांचे संबंध क्रांतिकार्याचा व व्यक्तीगत जीवनाच्या दृष्टीने अलौकिक व असामान्य होते. बेकरला एका पत्रात एंगल्स लिहितो, ''साऱ्या आयुष्यभर मी साथ दिली आणि चांगली दिली. मी माझ्या सारंगीची कार्ल मार्क्सच्या अत्युत्तम साथ दिली. मार्क्सइतकी व्यापक दृष्टी कोणालाच नव्हती. त्यामुळे माझे पुष्कळवेळा बरोबर असे परंतु क्रांतिकारक काळात त्याचे मूल्यमापन बिनतोड होते.'' एंगल्सच्या ७०व्या वाढदिवसाच्यावेळी अनेकांनी त्याला हार पाठविले. उत्तरादाखल एंगल्सने लिहिले, ''कार्ल मार्क्सने जे पेरले त्याला आज फळे येत आहेत.''

इतक्या प्रगल्भ मानाचा, असामान्य बुद्धीचा, विविध शास्त्रकला, विद्या पारंगत कृतिकारक एंगल्स योग्य तेव्हा विनम्र वृत्तीचा होता. १८९३ मध्ये इंटरनॅशनलच्या तिसऱ्या कॉंग्रेसला झुरिचला जात असताना तो व्हिएन्ना व बर्लिन येथे गेला. त्या जाहीर सभेत तो म्हणाला, ''गेल्या १० वर्षात चळवळीत मी काही करू शकलो याची बक्षिसी मला नको तुम्ही थोर लोक हेच माझे बक्षीस आहात.

एंगल्सवरील मृत्यूलेखात लेनिने लिहिले आहे. ''जुन्या काळात भावना हेलावणारी मैत्रीची काही उदाहरणे आहेत. युरोपातील कामगार वर्ग (सारा कामगारवर्ग) असे म्हणू शकतो की, आमचे शास्त्र दोन लढवय्या विद्वानांनी निर्माण केले आहे. यांचे परस्परांशी असलेले स्नेहाचे मानवी संबंध इतके हृद्य होते की, त्याला मानवी इतिहासात तोड मिळणार नाही.

## ४.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

- **वर्गकलह :** वर्गावर्गांमधील संघर्ष.
- **वर्गविहीन :** कोणताही वर्ग नसलेला समाज.

- **राज्यविहीन :** राज्यसंस्था नसलेल्या समाज.

## ४.५ सरावासाठी स्वाध्याय

१. मार्क्सचे ऐतिहासिक भौतिकवादाविषयी चर्चा करा.

२. मार्क्सच्या राज्यविषयक विचार स्पष्ट करा.

३. मार्क्सच्या वर्गसंघर्षाच्या सिध्दान्ताची चर्चा करा.

४. एंगल्सच्या राज्यविषयक विचाराची चर्चा करा.

५. एंगल्सच्या वर्गसंघर्षाचा सिध्दान्त स्पष्ट करा.

## ४.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **एंगल्स फ्रेडरिक** (१९७६) : *'कुटुंबसंस्था खाजगी मालमत्ता आणि शासनसंस्था यांचा उगम'*, पुणे प्रागतिक पुस्तक प्रकाशन (१९७६) (भाषांतरकार : व.मा.देशमुख).

२. **डोळे, ना. य.** (२००९) : *'राजकीय विचारांचा इतिहास'*, कॉन्टीनेटल प्रकाशन, पुणे.

३. **पाठक नवराज** (२००४) : *'पाश्चिमात्त्य राजनीतिक विचारक'*, विश्वभारती पब्लिकेशन्स, नवी दिल्ली.

४. Mukharjee S. & Ramaswamy S. (2013) : *"A History of Political Thought : Plato to Marks",* Delhi. PH-I Lamy Private Limited.


❑❑❑